

# युवाकिशोरांच्या शक्तिंना विकसित करणे



ही संस्थान





पुस्तक ५

# युवाकिशोरांच्या शक्तिंना विकसित करणे

रुही संस्थान

या मालिकेतील पुस्तके:

खाली रुही संस्थेने प्रकाशित केलेल्या मालिकेतील वर्तमान शीर्षके आहेत. तरुण आणि प्रौढांना, त्यांच्या समुदायाची सेवा करण्याची क्षमता वाढवण्यासाठी पद्धतशीर प्रयत्नांमध्ये अभ्यासक्रमांचा मुख्य क्रम म्हणून या पुस्तकांचा वापर करण्याचा हेतू आहे. रुही संस्था लहान बहाई मुलांच्या वर्गाच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी या मालिकेतील तिसऱ्या पुस्तकातील अभ्यासक्रमावर आधारीत शाखा अभ्यासक्रमाचा एक संच देखील विकसित करत आहे, तसेच किशोर युवा गटांच्या अनुप्रेरकांची संख्या वाढवण्यासाठी पुस्तक ५ मधील एक अधिक संच विकसित करत आहे. हे सर्व खालील सूचीमध्ये समाविष्ट आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की कार्यक्षेत्रांच्या प्रगतीच्या अनुभवानुसार या यादीमध्ये बदल होऊ शकतात आणि विकासाधीन अनेक अभ्यासक्रम घटक ज्या टप्प्यावर ते मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केले जाऊ शकतात अशा टप्प्यावर पोहोचल्यामुळे अतिरिक्त शीर्षके जोडली जाऊ शकतात.

पुस्तक १ दिव्य जीवन – एक चिंतन
पुस्तक २ सेवा संकल्प
पुस्तक ३ लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी १
लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी २ (शाखा अभ्यासक्रम)
लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी ३ (शाखा अभ्यासक्रम)
लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी ४ (शाखा अभ्यासक्रम)
पुस्तक ४ युगल अवतार
पुस्तक ५ युवाकिशोरांच्या शक्ती मुक्त करणे
प्रारंभिक आवेग: पुस्तक ५ चा पहिला शाखा अभ्यासक्रम
विस्तारित वर्तुळ: पुस्तक ५ चा दुसरा शाखा अभ्यासक्रम
पुस्तक ६ प्रभूधर्माचा संदेश–प्रसार
पुस्तक ७ सेवेच्या मार्गावर एकत्रित चालणे
पुस्तक ८ बहाउल्लाह ह्यांचा करारनामा
पुस्तक ९ ऐतिहासिक दृष्टीकोन प्राप्त करणे
पुस्तक १० प्रगतिशील समुदाय निर्माण करणे
पुस्तक ११ भौतिक साधन
पुस्तक १२ कुटुंब आणि समुदाय
पुस्तक १३ सामाजिक क्रियांमध्ये संलग्नता
पुस्तक १४ समाजातील प्रचलीत वार्तालापांमध्ये सहभागीता

कॉपी राईट © २००६, २०१४, २०२२ – रूही फाउन्डेशन, कोलंबिया
सर्वाधिकार सुरक्षित, संस्करण १.१.१.पीई PE एप्रिल २०१४ मध्ये प्रकाशित
संस्करण २.१.१.पीई जुलै २०२२

रूही संस्थान
काली, कोलंबिया
ईमेल: instituto@ruhi.org
वेबसाईट: www.ruhi.org

# विषयसूची


सहशिक्षकासाठी काही विचार .................................. v

जीवनाचा वसंतकाळ ........................................... १

एक आशादायक वय ........................................... ५१

अनुप्रेरकाच्या भूमिकेत सेवाकार्य करणे ......................... ९३

# सहशिक्षकासाठी काही विचार

१९७०च्या दशकामध्ये स्थापना झाल्यापासून, रुही संस्थेने आपल्या शैक्षणिक क्रियाकलापांद्वारे १२ ते १५ वयोगटातील तरुणांना, ज्यांना सहसा “युवाकिशोर” म्हणून संबोधले जाते, त्यांना सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे, जे समाजाच्या एका विशेष भागाचे प्रतिनिधित्व करतात. या वयोगटातील अनेकांचा आदर्शवाद आणि ऊर्जेचा साक्षीदार असल्यामुळे, रुही संस्थेला त्यांना अनेक विषय आणि संकल्पनांचा शोध घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्व पटले, जे युवाकिशोरांना त्यांच्या जीवनातील गुंतागुंतास सामोरे जाण्यास सक्षम बनवू शकेल, वाढत्या नैतिक ऱ्हासाच्या शक्तींशी सामना करण्याचे सामर्थ्य मिळवू शकेल आणि ते सामाजिक परिवर्तनाचे सक्रिय घटक बनू शकेल. पुढील अनेक दशके कृती आणि चिंतनाचा कालावधी ठरला, ज्याचा विविध पार्श्वभूमीतील युवाकिशोरांना सेवा देण्याच्या जागतिक अनुभवाचा वाढत्या प्रमाणात फायदा झाला, ज्यात विकासाच्या क्षेत्रात, विशेषत: साक्षरतेच्या क्षेत्रातील प्रयत्नांचा समावेश आहे. वर्ष २००० च्या सुमारास, युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमाची संकल्पना उदयास आली आणि त्यासोबतच तीन वर्षांच्या कार्यक्रमाचे विविध पैलू, जे त्यांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक शक्तींना मानवतेच्या सेवेसाठी प्रसृत करण्याचा प्रयत्न करतात.

रुही संस्थेच्या इतर प्रयत्नांप्रमाणे, युवाकिशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रम तळागाळात दूरशिक्षण प्रणालीद्वारे प्रस्तुत केला जातो, ज्यामध्ये या प्रक्रियेत, तीन प्रमुख घटकांचा समावेश असतो: “युवाकिशोर गट”, “अनुप्रेरक” आणि एक अध्ययन सामग्रीचा विशिष्ट संच. *युवाकिशोरांच्या शक्तिंना विकसित करणे*, हे संस्थेच्या मुख्य क्रमातील पाचवे पुस्तक, त्यांच्या त्यांच्या गावातील आणि प्रभागातील परिसरात युवाकिशोर गटाला सहभागी करून घेऊ इच्छिणाऱ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने आहे. हा अभ्यासक्रमांच्या मालिकेतील पहिला अभ्यासक्रम आहे, जो मुख्य क्रमापासून शाखान्वित आहे, तो व्यक्तींना “अनुप्रेरक” या भूमिकेत सेवा देण्यासाठी आवश्यक क्षमता विकसित करण्यात मदत करेल —एक असे पदनाम, जे स्वत:च, अंतर्भूत असलेल्या सेवेच्या कृतीचे स्वरूप स्पष्ट करते. पुस्तकाचा अभ्यास करणारे प्रत्येकजण या सेवेच्या क्षेत्रात प्रवेश करणार नसले तरी, अशी आशा आहे की सर्वजण संबोधित केलेल्या विषयापासून प्रेरणा घेतील आणि युवाकिशोरांच्या उदात्त आकांक्षांकडे योग्य लक्ष देण्याचे महत्त्व ओळखतील —ही एक आवश्यक बाब आहे, कारण ती एक अशी संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करते जी तरुणांच्या दृष्टीकोनांना प्रोत्साहन देते, जी सध्यस्थितीत समाजात प्रचलित असलेल्या वातावरणापेक्षा भिन्न आहे. अशा परीस्थित, ज्या व्यक्ती या कार्यक्रमात थेट सहभागी नसेल तरीही, ते या वाढत्या उपक्रमांना पाठिंबा देण्यास तत्पर असतील.

जे पुस्तक ५ साठी सहशिक्षक म्हणून कार्य करतील त्यांनी हे मान्य केले पाहिजे की, सहभागींमध्ये, किशोरवयीन किंवा विशीच्या सुरुवातीचे असे बरेच तरुण असतील, ज्यांनी अनुप्रेरक म्हणून सेवा करण्याची इच्छा व्यक्त करून आणि असे करण्यासाठी आवश्यक असलेली सुप्त क्षमता दर्शवून अभ्यासक्रमांच्या मुख्य क्रमात प्रवेश केला असेल. काही जण त्यांच्या समवयस्कांशी चर्चा करून धर्मश्रध्देच्या संपर्कात आले असतील ज्यांनी तरुण पिढीला शिक्षित करण्यात ते काय भूमिका बजावू शकतात यावर जोर दिला असेल. इतर जण स्वत: युवाकिशोर म्हणून युवाकिशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमात भाग घेतला असेल आणि त्यानंतर लवकरच त्यांनी रुही पुस्तक १ चा अभ्यास सुरू केला असेल. त्यांना संस्थागत प्रक्रियेत आणणारा कोणताही मार्ग असो,

ते आता त्यांच्या गावातील किंवा प्रभागातील लोकांच्या वाढत्या मध्यकेंद्राचा भाग बनतील आणि त्यांच्या सुधारणेसाठी कटिबद्ध होतील आणि या संदर्भात, —पुस्तक २ मध्ये संबोधित केलेल्या सेवेची कृती म्हणून— कुटुंबांसोबत धर्मश्रध्देच्या केंद्रस्थानी असलेल्या विचारसरणींवर चर्चा करण्यासाठी घरांना भेट देऊन अनुभव प्राप्त करतील. या मध्यकेंद्राचा एक भाग म्हणून, त्यांच्यापैकी अनेकजण परिसरातील युवाकिशोरांच्या कमीतकमी एका गटाशी जवळून संबंधित असतील आणि कार्यक्रमाशी संबंधित संकल्पना आणि दृष्टीकोनांवर चर्चा करण्यासाठी विविध उपक्रम राबवणे आणि पालकांच्या नियमित भेटी घेण्यासाठी त्या अनुप्रेरकाला किंवा अनुप्रेरिकेला मदत करण्यात मग्न असतील. या टप्प्यावर, त्या सर्वांना बहाई शिकवणींचे पुरेसे ज्ञान असेल, जे त्यांच्या पुस्तक ३ आणि ४ च्या अध्ययनामुळे अधिक गहन होईल आणि मित्र आणि शेजारी यांच्यासोबत अर्थपूर्ण संभाषण सुरू करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक कौशल्ये, क्षमता, वृत्ती आणि आध्यात्मिक गुण ते प्रदर्शित करतील. विशेषत: येथे, जेव्हा ते पुस्तक ५ वर पोहोचतात, तेव्हा रुही संस्थेच्या मुख्य अभ्यासक्रमांमध्ये अंतर्भूत असलेल्या सेवेच्या मार्गावर चालण्याच्या दृष्टीने संकल्पित क्षमता—निर्मिती प्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट होईल. युवाकिशोरांच्या गटाला त्यांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणसाठी तीन वर्षांच्या कार्यक्रमात सहभागी करून घेणे ही आव्हानात्मक सेवाकार्याची मागणी करणारी कृती आहे आणि असे करण्यासाठी नवोदित अनुप्रेरकांचे प्रयत्न हे त्यांच्या आतापर्यंतच्या मार्गावर स्थिरपणे मिळवलेल्या क्षमतेवर अवलंबून राहतील.

"जीवनाचा वसंतकाळ" हा या पुस्तकाचा पहिला घटक, बहाई धर्मश्रध्देची पवित्र लिखाणे दर्शवितात त्या गुणधर्मांवर लक्ष केंद्रित करतो, ज्यात सामान्यत: तारुण्याच्या कालावधी आहे. सादर केलेल्या विश्लेषणातून, तरुणांच्या प्रत्येक पिढीने परमेश्वराच्या कार्यासाठी आणि मानवतेच्या सेवेत केलेल्या योगदानाची एक दृष्टी हळूहळू प्रकट होते. सहशिक्षक हे सुनिश्चित करू इच्छेल की सहभागींनी उलगडणाऱ्या दृष्टीच्या प्रकाशाद्वारे या घटकाच्या अभ्यासापासून धडा घ्यावा, कारण ही दृष्टीच युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमाची माहिती देते आणि त्यांना क्रियाकलापांमध्ये गुंतवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना दिशा देते.

खरंच, तीन वर्षांचा कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत, म्हणजे वयाच्या १५ व्या वर्षी, त्यांच्या तरुणाईचा "प्रधान कालखंड" सुरु होतांना —बहाई शिकवणींमध्ये ज्या वयास परिपक्वतेचा उंबरठा म्हणून पाहिले जाते— युवाकिशोरांमध्ये कोणती वैशिष्ट्ये विकसित होतील अशी त्यांना आशा आहे याचा विचार करण्यास सांगून हा घटक सुरु होतो. सहशिक्षकाने हे समजून घेतले पाहिजे की सरावांचा उद्देश कार्यक्रमाच्या तपशीलांचा अभ्यास करणे किंवा युवाकिशोरांच्या क्षमतांचा विचार करणे नाही, ज्यांचे अन्वेषण अनुक्रमे पुस्तकाच्या तिसऱ्या आणि दुसऱ्या युनिटमध्ये घेतले जाणार आहे. त्याऐवजी, परमेश्वराच्या कार्याला वाहून घेणाऱ्या आणि संस्कृतीच्या प्रगतीसाठी स्वत:ला समर्पित करणाऱ्या पुढच्या पिढीमध्ये स्थान घेण्यास तत्पर असलेल्या तरुण व्यक्तीची प्रतिमा त्वरित दृष्टिक्षेपात आणण्याचा हेतू आहे. सहभागींसाठी, हा सराव लवकरच अनुप्रेरक म्हणून हाती घेत असलेल्या क्रियाकलापाच्या स्वरूपाबद्दल त्यांची जाणीव वाढवेल आणि त्यांच्या नंतरच्या चर्चेला अधिक सखोल अर्थ देईल.

या पार्श्वभूमीवर, हा घटक युवा अवस्थेशी संबंधित पवित्र लेखनातील अनेक उद्धरण सादर करतो आणि त्यायोगे अनेक संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. घटकाच्या सुरुवातीला सादर केलेल्या संकल्पनांपैकी एक आहे सेवा, शिक्षण आणि भविष्यासाठी तयारी यांच्यातील परस्परसंवाद, एक गोष्ट जी काहीवेळा तरुण मनाला व्यापू शकते. हे स्पष्ट केले आहे की, जेव्हा जीवनाकडे संपूर्णपणे पाहिले जाते, तेव्हा त्याचे विविध पैलू,

एकमेकांशी संघर्ष न करता, एकमेकांना बळकट करण्यासाठी उपयोगी पडू शकतात. विभाग १० मधील सराव, सहभागींना याचा व्यावहारिक अर्थ काय आहे याचा विचार करण्यात मदत करेल. ही काळजी घेणे आवश्यक आहे, की ते हे सराव यांत्रिकरित्या करू नये, आणि जीवनाच्या काही निवडी आणि विचार करण्याच्या पद्धती काल्पनिक द्वंद्व आणि तणाव निर्माण करतात हे समजून घेण्यात अयशस्वी होणार नाहीत.

या घटकामध्ये संबोधित केलेली आणखी एक संकल्पना, तिच्या उद्दिष्टाच्या केंद्रस्थानी, दुहेरी नैतिक हेतू आहे. सहभागी, अर्थातच, त्यांच्या पूर्वीच्या पुस्तकांच्या अभ्यासातून या संकल्पनेशी परिचित झालेले असतील. येथे ती अधिक सखोलतेने हाताळली गेली आहे, आणि सहभागींनी त्याच्या शोधासाठी समर्पित विभागांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, ज्याची सुरुवात बहाई पवित्र लिखाणात अपेक्षित असलेल्या व्यक्तीच्या स्तरावर आणि समाजाच्या संरचनेच्या स्तरावर अशा दुहेरी परिवर्तनाचे वर्णन करून होते. या दृष्टीने, युवाकिशोरांना त्यांच्या स्वत:च्या बौद्धिक आणि आध्यात्मिक वाढीसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी चिरस्थायी योगदान देण्याकरीता प्रभार घेण्याच्या उद्देशाची तीव्र जाणीव ठेवण्याचे हा घटक सुचवतो. पुढे, असा दावा केला जातो की, नैतिक हेतूचे हे दोन पैलू पूरक आणि मूलभूतपणे अविभाज्य आहेत, कारण व्यक्तींची मानके आणि वर्तन त्यांच्या पर्यावरणाला आकार देतात आणि त्या बदल्यात ते सामाजिक संरचना आणि प्रक्रियांद्वारे तयार केले जातात. काही सहभागींना या दाव्याचे परिणाम मान्य करणे आव्हानात्मक वाटू शकते, ज्याचा उहापोह विभाग १६ मधील अभ्यासात केला आहे. प्रबळ जागतिक दृष्टिकोन —जे, एकीकडे, व्यक्तिमत्व आणि वैयक्तिक स्वातंत्र्यावर अधिक जोर देतात किंवा दुसरीकडे, सामाजिक शक्ती आणि राजकीय प्रक्रियांच्या महत्वाची अतिशयोक्ती करतात— ते वास्तविकतेपासून विलग होतात आणि अनेकदा नकळत विश्वास आणि विचारांच्या साचांना आकार देऊ शकतात. गटासोबत सराव करत असताना, सहशिक्षकाला यामुळे येणाऱ्या आव्हानाला सामोरे जावे लागेल याची जाणीव असली पाहिजे आणि विभागामध्ये उद्धृत केलेल्या धर्मसंरक्षकांच्या विधानाशी सुसंगत नसलेली विधाने ओळखून गरज पडल्यास सदस्यांना मदत केली पाहिजे. केवळ सेवाक्षेत्रातच असा हेतू साध्य होऊ शकतो असे प्रस्तावित करून मग, दुहेरी उद्देशाच्या संकल्पनेचा शोध पूर्णत्वास येतो. हे घटक असा दावा करतो की सेवा हीच वैयक्तिक क्षमतेच्या पूर्ततेला समाजाच्या प्रगतीशी जोडते.

दुसऱ्या घटकाचे शीर्षक आहे “एक आशादायक वय”, आणि ते युवाकिशोर आणि त्यांच्यात असलेल्या अफाट क्षमतांशी संबंधित आहे. त्याचा अभ्यास करणाऱ्यांच्या मनात ते दृढ करण्याचा प्रयत्न करते की, युवाकिशोर हे एका विशिष्ट वयोगटाचे सदस्य आहेत, ज्यांची स्वत:ची खास वैशिष्ट्ये आहेत —वैशिष्ट्ये ज्यांच्यामुळे काहीही शंका राहात नाही की त्यांना लहान मुलांप्रमाणे वागवणे हे चुकीचे असेल आणि त्यासोबतच त्यांना प्रौढत्वाच्या वरवरच्या आवृत्तीचे अनुकरण करण्यास प्रोत्साहित करणे देखील तितकेच चुकीचे असेल— जे याक्षणी समाजात अधिकाधिक ठिकाणी रुजलेले दिसून येत आहे. या घटकाला हे देखील स्पष्ट करण्याची आशा आहे की बहाई समुदायाने या वयोगटासाठी स्वीकारलेला दृष्टीकोन, जो धर्मश्रध्देच्या लिखाणातून आकारला गेला आहे आणि तरुण रुहुल्लाह सारख्या उदाहरणांद्वारे दर्शविला गेला आहे, प्रचलित गृहीतके आणि सिद्धांतांवर आधारित दृष्टिकोनापेक्षा मूलतरू भिन्न आहे, ज्यांपैकी कित्येत, युवाकिशोर बंडखोरी आणि संकट अशा विचारांचे प्रतिनिधित्व करतात हे मानतात.

वरील उद्दिष्टे लक्षात घेऊन, हा घटक सुरुवातीच्या पौगंडावस्थेच्या स्वरूपाचा थोडक्यात आढावा घेतो आणि नंतर या वयोगटातील तरुणांच्या वाढत्या जागरूकतेला योग्यरित्या निर्देशित करण्याच्या विषयावर विचार करण्यास सहभागींना आवाहन करतो. यामध्ये, हा घटक एक चेतावणी देतो: अशा प्रयत्नांमुळे काही कार्यक्रमांचे खाचखळगे टाळले पाहिजेत, जे जीवनाच्या या प्रारंभिक टप्प्यात असलेल्या लोकांच्या वाढत्या आत्म—जागरूकतेला इतरांच्या नि:स्वार्थ सेवेकडे निर्देशित करण्याऐवजी, "स्वत:" वर वळवतात आणि, दुर्दैवाने, शेवटी, त्यांना "आग्रही स्वत:चे" बंदिवान बनवतात. विभाग ५ ते ९ पर्यंत बहाई लेखनातील संबंधित उद्धरणांच्या मालिकेद्वारे सहभागींना या खाचखळग्यांच्या काही सूक्ष्म धोक्यांपासून सावध करण्याचा प्रयत्न करतो. हा घटक सुरुवातीच्या पौगंडावस्थेतील मुलांच्या जीवनावर सामाजिक वातावरणाचे परिणाम विचारात घेतो, परस्पर समर्थनाचे वातावरण म्हणून "युवाकिशोर गटाची" संकल्पना मांडतो आणि अशा गटांचे अनुप्रेरक म्हणून सेवा करण्यासाठी सज्ज झालेल्या सर्वांनी स्वीकारण्याचा पवित्रा परिभाषित करतो.

"अनुप्रेरकाच्या रुपात सेवाकार्य करणे" हा तिसरा घटक, एका प्रकारे, आधीच्या घटकाचा शेवट उचलून धरतो व पुढे नेतो आणि या सेवाकार्याच्या स्वरुपाशी परिचित होण्यासाठी सहभागींना मदत करतो. युवाकिशोर गटाच्या काही वैशिष्ठ्यांचे पुनरावलोकन केल्यानंतर, हा घटक सामग्रीची चर्चा सुरू करतो, ज्याचा अभ्यास या कार्यक्रमाचा गाभा ठरतो. या चर्चेला घटकाचा मोठा वाटा देण्यात आला आहे, आणि सहशिक्षकाने त्याचा हेतू चांगल्या प्रकारे समजून घेतला पाहिजे, जो केवळ सहभागींसाठी असलेल्या सामग्रीचे वर्णन करण्यासाठीच नव्हे तर त्यांना आध्यात्मिक सशक्तीकरणाच्या प्रक्रियेमध्ये काय समाविष्ट आहे आणि ही सामग्री त्याची गतिशीलता वाढवण्याचा कसा प्रयत्न करते याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करणे आहे. सामग्रीतील उतारे कायम अंतर्भूत केले जातात, परंतु दोन पुस्तकांचे संपूर्णपणे विश्लेषण केले जाते —*सम्पुष्टीची झुळूक* आणि *श्रद्धेचे चैतन्य*— आणि सहभागींकडे त्यांच्या प्रती असणे आवश्यक आहे.

आध्यात्मिक सशक्तीकरणाच्या प्रश्नासाठी, सर्वसाधारणपणे, सहशिक्षकांद्वारे मोठ्या प्रमाणात विचार आणि समीक्षण करणे आवश्यक आहे. खरंच, संस्थेच्या अभ्यासक्रमांनी सुरू केलेली शैक्षणिक प्रक्रिया, अंतिम विश्लेषणात, नैतिक आणि आध्यात्मिक सशक्तीकरणाचे एक साधन म्हणून पाहिले जाऊ शकते, ज्याद्वारे जीवनाच्या सर्व स्तरातील आणि प्रत्येक पार्श्वभूमीचे लोक एक चांगले जग निर्माण होण्यासाठी उद्युक्त होऊन सहभागी होण्यास सक्षम होतात. येथे नियोजित केलेली शक्तीची संकल्पना, वर्चस्व गाजवण्याच्या किंवा इतरांना एखाद्याच्या इच्छा आणि मागण्या मान्य करण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या हेतूने संबद्ध करण्याच्या प्रचलित व्याख्यांपेक्षा अत्यंत वेगळी आहे. त्याऐवजी, मानवी चैतन्याच्या शक्तींच्या प्रवाहासाठी वाहिनी बनणे हे त्याचे उद्दीष्ट आहे: एकतेची शक्ती, प्रेमाची, नम्र सेवेची, शुद्ध कर्मांची. अशा प्रक्रियेसाठी आवश्यक गतीशीलतेमध्ये कसे योगदान द्यावे —नव्हे, गती वाढवणे— हे सहशिक्षक म्हणून काम करण्याच्या कृतीमध्ये केंद्रस्थानी आहे आणि अभ्यासक्रमांच्या चर्चेत गटामागून गटात सहभागी होण्याचा अनुभव असल्याने, प्रत्येक सहशिक्षक गुंतलेल्या अनेक परस्परसंवादी घटकांची झलक जाणू शकतो, खऱ्या समजूतदारपणापेक्षा यापैकी काहीही अधिक शक्तिशाली नाही.

या पुस्तकात, अर्थातच, सहशिक्षकापुढील चिंता, पुढच्या पिढीपर्यंत आहे आणि अशा शैक्षणिक प्रक्रियेच्या स्वरूपाची आहे जी युवाकिशोरांना त्यांच्या उदयोन्मुख शक्तींचा फलदायी वापर करण्यास सक्षम करेल. या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी विचार आणि अभिव्यक्तीच्या परस्पर बळकट शक्ती आहेत. अमूर्त विचारांमध्ये गुंतण्याची मनाची शक्ती,

जी पौगंडावस्थेतील सुरुवातीच्या काळात लक्षणीयरित्या वाढते, ती युवाकिशोरांमध्ये मजबूत होते कारण ते संबंधित वैज्ञानिक, नैतिक आणि आध्यात्मिक संकल्पना त्यांच्या सभोवतालच्या जगाच्या विश्लेषणासाठी आणि त्यांच्या सुरुवातीच्या समाजावर कृती करण्याच्या प्रयत्नांमध्ये लागू करण्यास शिकतात. तरीही, कितीही महत्त्वाचे असले तरी, तर्कशुद्ध विश्लेषणाच्या सामर्थ्याला आध्यात्मिक आकलनाची आवश्यकता असते. त्याद्वारे, केवळ मानसिक शक्तींच्या वापराने उपलब्ध नसलेले समजण्याचे मार्ग उघडले जातात. तेव्हा, युवाकिशोरांना, आध्यात्मिक शक्ती ओळखण्यास आणि आध्यात्मिक तत्वांचा परिचय करण्यास मदत केली पाहिजे, जर त्यांना ज्या परिस्थितींचा सामना करावा लागतो त्या परिस्थितीत, योग्य नैतिक निवडी घ्यायच्या असतील तर. एखाद्या व्यक्तीचे विचार आणि वर्तन नियंत्रित करणारी नैतिक रचना ही त्या भाषेच्या संरचनेशी जवळून जोडलेली असते ज्यामध्ये तो किंवा ती विचार व्यक्त करते, ही कल्पना केलेल्या शैक्षणिक प्रक्रियेचा मूलभूत आधार आहे. पुस्तक ५ च्या पहिल्या दोन घटकांनी या प्रक्रियेमध्ये जी काही अंतर्दृष्टी दिलेली असेल, तिला तिसऱ्या  घटकाचे विभाग ५ ते १९ हे आवश्यकतेनुसार, कार्यक्रमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या मजकूरांमधून उदाहरणे रेखाटून, तिचे विविध पैलू स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक सहशिक्षकाने या विभागांचे काळजीपूर्वक पुनरावलोकन करणे चांगले होईल आणि त्यांच्याद्वारे गटाला मार्गदर्शन करण्याच्या तयारीत ते असतील. अशी आशा आहे की, सहभागी त्यांच्या अभ्यासातून विविध संस्कृतींमधील युवाकिशोरांना सशक्त करण्यासाठी या पुस्तकातील मजकुराच्या क्षमतेची समज मिळवतील.

या चर्चेच्या प्रकाशातच, सहभागींना दोन पूर्ण पाठांचे विश्लेषण करण्याची संधी दिली जाते, एक जो “बहाई–प्रेरित” या श्रेणीमध्ये येतो आणि दुसरा जो कार्यक्रमाच्या सुस्पष्टपणे बहाई घटकाचे प्रतिनिधित्व करतो. सहभागींना, या दोन श्रेण्यांच्या घटकाचा, सुरुवातीच्या काळात परिचय करून दिला जातो, आणि *सम्पुष्टीची झुळूक* आणि *श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकाचे पुनरावलोकन त्यांना हे पाहण्यास मदत करण्याच्या उद्देशाने आहे की, मुख्य विषय आणि संकल्पना संबोधित केल्याने आणि वापरल्या जाणाऱ्या भाषेमुळे, वर वर्णन केलेल्या कार्यक्रमास दोन्ही पाठ त्याच्या उद्दिष्टांमध्ये कशाप्रकारे योगदान देतात. उदाहरणार्थ, *सम्पुष्टीची झुळूक* या पुस्तकामध्ये उपचारित केलेली संकल्पना –जर एखाद्याने योग्य ध्येयांप्रत प्रयत्न केले तर त्यास दैवी पुष्टीकरणे प्राप्त होतील– सर्वत्र तरुण लोकांच्या हृदयात आणि मनात प्रतिध्वनित होत आहे. या पुस्तकाच्या अभ्यासाद्वारे त्यांना मिळालेली समज त्यांना “स्वत:” वर जास्त जोर देण्याचे सूचक आक्रमक वर्तन न बनवता, भीती व धास्ती आणि आत्मविश्वासाची कमतरता जी अनेकदा नवीन आणि आव्हानात्मक कार्ये हाती घेताना दृश्यमान होते, त्यावर मात करण्यास मदत करते असे दिसते. अशाप्रकारे, पुस्तकात उलगडणारी साधी पण प्रगल्भ कथा, सामान्यतरू युवाकिशोरांनी प्रथमच अभ्यासलेल्यापैकी एक, अनेकांना अशा मार्गावर आणते, जी त्यांना थोड्याफार प्रमाणात समाजाच्या जडणघडणीला विघटन करणाऱ्या शक्तींपासून, आणि उच्चप्रतीचा जीव म्हणून त्यांची खरी ओळख हिरावून घेणाऱ्या तीव्रतेपासून संरक्षण देते.

त्याचप्रमाणे, *श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकामध्ये प्रदान केलेल्या संकल्पनांचे स्पष्टीकरण, प्रत्येक पार्श्वभूमीतील युवाकिशोरांना जीवनाच्या या टप्प्यावर मन व्यापू लागलेल्या तात्विक मुद्द्यांवर सखोल चिंतन करण्यास, तसेच आध्यात्मिक आणि भौतिक यांच्यातील गुंतागुंतीचे संबंध समजून घेण्यासाठी सक्षम करते. या संकल्पनांपैकी, उदाहरणार्थ, भौतिक उत्क्रांती आणि मानवी चैतन्याचे स्वरूप या आहेत. सहशिक्षकाने काय जाणले पाहिजे ते म्हणजे, पुस्तक ५  चा अभ्यास करणाऱ्या आणि अनुप्रेरक बनण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या अनेक तरुणांसाठी, जोपर्यंत त्यांनी स्वत: युवाकिशोर म्हणून आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रम पूर्ण केला नाही, तोपर्यंत *श्रद्धेचे चैतन्य*

या पुस्तकाचा आढावा त्यांच्यासाठी पद्धतशीरपणे मांडलेल्या संकल्पनांची तपासणी करण्याची पहिली संधी असेल, आणि त्यांनी त्यांच्या परिणामांवर विचार करण्यासाठी आवश्यक वेळ दिला पाहिजे.

या पुनरावलोकनाच्या शेवटी, सहभागींना विज्ञान आणि धर्म यांच्यातील सामंजस्याच्या तत्त्वावर विचार करण्यास प्रोत्साहित केले जाते, पाठात स्पष्टपणे हाताळलेली संकल्पना म्हणून नव्हे तर तिच्या संपूर्ण चर्चेला आधार देणारी एक संकल्पना म्हणून. जे सुचवले आहे ते असे आहे की, विज्ञान आणि धर्म या ज्ञान आणि व्यवहाराच्या दोन पूरक प्रणाली म्हणून पाहिले जाऊ शकतात ज्याद्वारे संस्कृती प्रगती करते. या समीक्षेचे महत्त्व सहभागींसाठी गमावले जाऊ नये, विशेषत: जे या सेवेच्या क्षेत्रात प्रवेश करण्याची तयारी करत आहेत. सरतेशेवटी, जर वास्तविकतेचे अधिक संपूर्ण ज्ञान प्राप्त करणे हे आध्यात्मिक सशक्तीकरणाच्या प्रक्रियेचा अविभाज्य घटक असेल, तर युवाकिशोरांसाठी या पुस्तकातील सामग्री हे ज्ञानाच्या  या दोन्ही स्रोतांवर आधारित असणे आवश्यक आहे.

सामग्रीचा अभ्यास हा कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या युवाकिशोरांच्या कोणत्याही गटाचा प्राथमिक स्रोत असला तरी, ते इतर उपक्रमही एकत्रितपणे हाती घेतील. यात समाविष्ट आहेत: सेवा प्रकल्प, क्रीडा, कला आणि हस्तकला आणि अधूनमधून विशेष कार्यक्रम. विभाग २५ व २६ क्रियाकलापांशी संबंधित काही तत्त्वे आणि कल्पना सादर करतात, परंतु  फार खोलात जात नाहीत, ही नोंद करून की स्थानिक परिस्थितीनुसार त्यांचे तपशील ठरणे आवश्यक आहे. तरीसुद्धा, अशी आशा आहे की कार्यक्रमांच्या आराखडा आणि अंमलबजावणीमध्ये सेवाप्रकल्पांवर भर दिला जाईल, आणि अशा प्रकारे सेवा एक असे क्षेत्र प्रदान करील की ज्यामध्ये आधी उल्लेख केलेला दुहेरी नैतिक उद्देश स्वत: प्रकट होऊ शकतो. यामध्ये, सहभागींनी हे समजून घेतले पाहिजे की असे प्रकल्प सहकारी अनुप्रेरकांच्या बैठकीत वारंवार सल्लामसलत करण्याचा विषय असतील.

अनुप्रेरकाच्या कामाशी संबंधित अनेक बाबींवर चर्चा करून, युवाकिशोरांचा एक गट तयार करण्यात मदत कशी करावी, पहिल्या काही बैठका कशाप्रकारे आयोजित करायच्या, आणि कार्यक्रम तसेच त्यांच्या मुला मुलींची प्रगती याबाबत पालकांशी संवाद कसा साधावा याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करून घटक संपतो. सुरुवातीपासूनच, सहभागींनी हे ओळखले पाहिजे की अनुप्रेरक म्हणून प्रभावीपणे सेवा देण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमता पुस्तक ५ पासून शाखान्वित झालेल्या अभ्यासक्रमांचा सतत अनुभव आणि अध्ययन याद्वारे कालांतराने विकसित होतील. यासाठी युवाकिशोरांच्या शिक्षणाप्रती बांधिलकीची पातळी आवश्यक आहे आणि त्यांच्या किशोरवयीन आणि विशीच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात —त्यांच्या जीवनाच्या वसंत ऋतूमध्ये— अनेकांनी त्यांची ही क्षमता गाठणे प्रदर्शित केले आहे. मग, त्यांच्या श्रेणीतूनच, गटामागून गटात आध्यात्मिक सशक्तीकरण करून या विशिष्ट सेवेचा मार्ग अवलंबवणाऱ्यांची संख्या वाढत जाईल आणि अशा प्रकारे, पुढील पिढीचे वचन पूर्ण होईल याची खात्री करतील.



# जीवनाचा वसंतकाळ

उद्देश

युवाकिशोरांना आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमात
सहभागी करून घेण्याची पूर्वअट म्हणून,
युवाकिशोरांच्या काही वैशिष्ट्यांबद्दल
समज प्राप्त करणे

## विभाग १

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील वय वर्ष बारा आणि पंधरा दरम्यानचा कालावधी एका विशेष कालखंडाचे प्रतिनिधित्व करतो, कारण ह्या वर्षांमध्ये बाल्यावस्था मागे सोडीत त्याच्यात किंवा तिच्यात खोलवर बदल घडत असतात. जरी ते त्यांच्या तारुण्याच्या पूर्णावस्थेत नसले, तरी या वयोगटातील व्यक्तींना किशोर युवक किंवा युवाकिशोर असे प्राय: संबोधिले जाते. युवाकिशोरांना त्यांच्या आध्यात्मिक व बौद्धिक क्षमता वाढविणाऱ्या आणि त्यांना त्यांच्या समुदायांच्या कार्यकलापांमध्ये प्रभावीपणे सहभागी करुन घेणाऱ्या कार्यक्रमांमध्ये गुंतविणे हे अत्यंत महत्त्वाचे सेवाकार्य होय. आतापर्यंतच्या अनुभवाने, रुही संस्थेने प्रस्थापित केलेल्या या पुस्तकातील तीन घटक अशा काही संकल्पना, कौशल्ये, गुणविशेष आणि अभिवृत्तींवर केंद्रित आहेत, जे युवाकिशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रम राबविण्याची इच्छा बाळगणाऱ्यांना आवश्यक असल्याचे दिसून आले आहे.

युवाकिशोरांचा आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रम साधारणपणे लहान गटांमध्ये स्थानिक पातळीवर चालविला जातो. अशा गटांच्या प्रयत्नांना अनुप्रेरित करणारी व्यक्ती म्हणून, आपण युवाकिशोरांच्या आध्यात्मिक आणि बौद्धिक विकासाशी चिंताकुल असाल जे, कित्येक युवाकिशोर आपणास मदतनीस या दृष्टीने पाहतील, जे तुलनेने थोड्याच अवधीत पंधरा वर्षांच्या वयाप्रत म्हणजे परिपक्वतेचा उंबरठ्यावर पोहचतील, ज्यावेळी ते नव्या जबाबदाऱ्या स्वीकारतील. या पहिल्या घटकामध्ये, आपण युवाकिशोरांच्या गुणविशेषांवर इतके प्रतिबिंबित करणार नाही; तथापि यावर विचार करू, की धर्मश्रद्धेचे पवित्र लेख ते कशा प्रकारच्या युवाजनांमध्ये विकसित व्हावेत याविषयी काय सुचवितात. आपण ज्या परिच्छेदांचा अभ्यास कराल त्यावरून हे स्पष्ट व्हायला हवे, ते म्हणजे तरुणांच्या प्रत्येक पिढीला आणि त्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या विशिष्ट शक्तींमध्ये फरक करणारी अनेक गुणवैशिष्ट्ये आहेत. अर्थात, हे देखील शक्य आहे, की आपण स्वत: आपल्या किशोरवयीन किंवा विसाव्याच्या सुरुवातीच्या वयातील एक तरुण आहात, आणि अशा परिस्थितीत या घटकात सादर केलेली सामग्री आपली स्वत:ची ध्येये आणि प्राधान्यक्रम तपासण्याची संधी देईल.

## विभाग २

सुरुवात करण्यासाठी, आपण लवकरच ज्यांच्यासोबत कार्य करणार आहात त्या युवाकिशोरांच्या गटाचा विचार करा. पुढील तीन वर्षांमध्ये आपण त्यांच्याशी एक अस्सल मित्र म्हणून वारंवार भेटाल आणि त्यांना एकत्रितपणे अभ्यास करण्यात व कल्पना शोधण्यात, साध्या सेवा प्रकल्पांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आणि सोबतच अशा अनुभवातून ते एक गट म्हणून काय शिकतात यावर विचार करण्यास मदत कराल. जेव्हा त्यांनी हा तीन वर्षीय कालावधीचा कार्यक्रम पूर्ण केला असेल, तेव्हा याक्षणी त्या वेळेचा विचार करण्यासाठी थोडा वेळ काढणे आपल्याकरिता फायदेशीर ठरेल. आपल्या युवा मित्रांमध्ये फरक पडेल अशी आपणास आशा असलेली वैशिष्ट्ये तसेच आपल्या स्वत:च्या जाणीवेस स्पष्टपणे मदत करण्यासाठी, आपल्या सहकारी सहभागींसोबत या अभ्यासक्रमातील खालील सराव करा.

१. आपण ज्या प्रकारच्या युवाकिशोरांच्या व्यक्तिमत्वाची कल्पना करत आहात, ते उच्च हेतूने दर्शविले जाईल का? हा उद्देश ते कशाप्रकारे आत्मसात करतील? ——————————————————————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

२. ते त्यांची उर्जा सर्वात जास्त कशावर केंद्रित करतील अशी आपली आशा आहे? ——————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

३. त्यांच्या उद्दिष्टांसाठी कार्य करण्यास त्यांना कशापासून प्रोत्साहन मिळेल? ——————————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

४. आज मानवतेला भेडसावणाऱ्या आव्हानांबद्दल ते किती जागरूक असतील अशी आपली अपेक्षा आहे? जगाला एक चांगले स्थान बनविण्यात ते खरोखर योगदान देऊ शकतात याची त्यांना खात्री होईल का?

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

५. आपल्या युवाकिशोर मित्रांनी, सोबत एकत्रित असताना, शिकण्याच्या दिशेने एक विशिष्ट दृष्टीकोन मिळवावा अशी आपली इच्छा असेल. हा दृष्टीकोन खालील विधानांमध्ये दिसून येतो. आपण आणखी दोन किंवा तीन दृष्टीकोन जोडू शकता काय?

—— ते अभ्यासू वृत्तीचे असतील आणि जे शिकतात त्यास प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा प्रयत्न करतील.

—— त्यांना त्यांच्या कृतींच्या परिणामांवर चिंतन करण्याची सवय असेल.

—— त्यांचे मन मोकळे असेल आणि ज्ञानार्जनाकडे ते नम्रतेने वळतील.

—— मानवतेची सेवा करण्यास त्यांना त्यांची क्षमता जोपासण्याची उत्कट इच्छा असेल.

—— ते जे काही करतात त्यात उत्कृष्टता मिळवण्याची त्यांची प्रबळ इच्छा असेल.

—— विज्ञान व कलांचा अभ्यास करण्याविषयी त्यांची अभिलाषा असेल.

—— मानवजातीच्या उन्नतीसाठी कार्य करण्याविषयी ज्ञान अर्जित करण्यात त्यांना जेवढा आनंद मिळेल, तेवढाच आनंद त्यांना एक व्यक्ती म्हणून स्वत:च्या बौद्धिक आणि आध्यात्मिक वाढीतून मिळेल.

—— ——————————————————————————————

—— ——————————————————————————————

—— ——————————————————————————————

६. खालीलपैकी कोणती वक्तव्ये आपल्या मनात असणाऱ्या युवाकिशोरांच्या वागणुकीच्या पद्धतीचे वर्णन करतात?

—— त्यांची मानके जागतिक प्रवृत्ती आणि फॅशनद्वारे तरुणांसाठी ठरविल्या मानकांशी सर्वसाधारणपणे जुळतील.

—— त्यांचे जीवन नियंत्रित करण्यासाठी ते लोकप्रिय माध्यमांकडे वळतील.

—— जबरदस्त आव्हाने असूनही, ते अशा व्यक्तिंच्या पावलावर पाऊल ठेवतील, जे उच्च नैतिक दर्जेनुसार जीवन जगण्याचा प्रयत्न करतात.

—— असे विरोधाभास उद्भवल्यास, त्यांची कृती त्यांच्या धर्मश्रद्धेच्या विरुद्ध आहे हे ते शोधू शकतील.

—— मानवजातीची एकता, स्त्री—पुरुष समानता आणि न्याय यासारख्या आदर्शांवर त्यांचा विश्वास असेल, परंतु त्यांची कृती समाजाच्या स्वीकृत नियमांचे अधिक बारकाईने प्रतिबिंबित करेल, ते अशा आदर्शांच्या वक्तृत्वात पारंगत असले तरीही, ते त्या आदर्शांस आपल्या व्यवहारात आणण्यास अपयशी ठरतील.

—— सामाजिक वातावरणामध्ये आरामदायक परीस्थित जगण्यासाठी, ते उच्च मानकांचा त्याग करतील जे त्यांचे समर्थन करत नाहीत.

७. खाली विधाने शुद्ध आणि पवित्र जीवनाचे काही परिणाम व्यक्त करतात. आपण ज्या युवांच्या जीवनाची कल्पना करत आहात त्यांच्यासाठी यासारख्या परिणामांवर विचार करणे किती महत्त्वाचे आहे असे आपणास वाटते? आपण खाली दिलेल्या यादीत आणखी काही जोडू शकता का?

—— एखाद्याच्या आचरणात निरुपयोगी नसतील

—— ते क्षुल्लक आणि दिशाहीन आनंदापासून अलिप्त राहतील

—— सांसारिक सुखांमुळे त्यांच्या उच्च उद्देशापासून त्यांचे लक्ष विचलित होऊ देणार नाहीत

—— शुद्धतेच्या मानकांच्या विरुद्ध असलेले भवरंग (फॅशन) आणि छन्दिष्टाचे (फॅड) अनुसरण करणार नाही

—— पावित्र्य म्हणजे केवळ विवाहबाह्य लैंगिक संबंध नसणे असा विचार करणार नाही

—— ते त्यांच्या पेहरावात संयम राखतील

—— ते त्यांच्या वार्तालाप करण्याच्या पद्धतीत संयम ठेवतील

—— मनोरंजनासाठी ते करत असलेल्या क्रियाकलापांमध्ये ते संयम राखतील

—— त्यांच्या साधेपणाने व विनम्रतेने ते वेगळे दिसून येतील

—— ईर्षा व द्वेषापासून मुक्त राहतील

—— शुद्धता, शालीनता आणि स्वच्छ मनाने ते ओळखले जातील

—— स्वत:च्या हानिकारक भावनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दक्ष असतील

—— ————————————————————————————————————————

—— ————————————————————————————————————————

—— ————————————————————————————————————————

८. आपण आपल्या युवा मित्रांसोबत घालवलेल्या काही वर्षांमध्ये, त्यांची बौद्धिक आणि आध्यात्मिक दोन्ही शक्ती किती मजबूत होईल अशी आपणास आशा आहे आणि ते खालील गोष्टी करण्यास सक्षम असतील

—— आव्हानांवर मात करणे?

—— त्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांमध्ये चिकाटी ठेवणे?

—— उच्च नैतिक मानकांच्या विरुद्ध कृती करण्याच्या दबावाचा प्रतिकार करणे?

## विभाग ३

आता आपण पवित्र लेखांमधील काही उद्धरणांकडे वळूया आणि ते बहाई युवकाचे कशाप्रकारे वर्णन करतात याचे परीक्षण करुया. अब्दुल—बहा म्हणतात:

**"हे अब्दुल—बहांच्या प्रियजनहो! मनुष्यजीवनात त्याचा वसंतकाळ असतो आणि तो अद्‌भुत वैभवाने संपन्न असतो. किशोर वयाचा काळ हा शक्ती व जोम यामुळे वैशिष्ट्यपूर्ण असतो आणि मानवी जीवनात सर्वात चांगला असा निवडक काळ असतो. म्हणून आपण रात्रंदिवस प्रयत्न केला पाहिजे जेणेकरून स्वर्गीय**

**सामर्थ्याने संपन्न, अप्रतिम हेतूंनी प्रेरित, परमेश्वराच्या दैवी सामर्थ्याच्या व स्वर्गीय कृपेच्या मान्यतेच्या सहाय्याने, आपण मानवतेच्या जगाचे अलंकार व्हावे, आणि खऱ्या ज्ञानार्जनात आणि ईश्वरी प्रेमात दिक्षा घेतलेल्या लोकांमध्ये अग्रगण्य म्हणून गणले जावे. आपण आपल्या पवित्रतेने आणि अनासक्तीने, उद्देशाच्या भव्यतेने, उदारतेणे, दृढ निश्चयाने, अंत:करणाच्या मोठेपणाने, अटळतेने, आपल्या ध्येयाच्या उच्चत्वाने आणि आपल्या आध्यात्मिक गुणांमुळे मनुष्यमात्रांमध्ये वेगळे असले पाहिजे; जेणेकरुन आपण ईश्वराच्या धर्मकार्याच्या उन्नतीचे आणि वैभवाचे साधन आणि ईश्वराच्या स्वर्गीय कृपाप्रसादांचे उगमस्थान बनावे; आशीर्वादित सौंदर्याच्या (बहाउल्लाह —माझे जीवन त्यांच्या प्रियजनांसाठी अर्पित असो) मार्गदर्शनांच्या आणि प्रबोधनांच्या अनुरुप आपण जीवनयापन करावे; आणि बहाई सद्‌गुण व विशिष्टता प्रतिबिंबित करीत आपण इतरांहून वेगळे ठरावेत. अब्दुल—बहा उत्सुकतेने प्रत्याशा बाळगतात की आपणापैकी प्रत्येक, मानवी उत्कृष्टतेच्या हिरवळीवर विहरणाऱ्या निर्भीड सिंहाप्रमाणे आणि सद्‌गुणांच्या हिरव्यागार मैदानावर दरवळणाऱ्या कस्तुरीगंधयुक्त वाऱ्यासमान व्हावे."[१]**

१. वरील उद्धरणाच्या आधारे खालील वाक्ये पूर्ण करा:

क. मानवी जीवनाचा वसंतकाळ ———————— ————————— संपन्न असतो.

ख. किशोर वयाचा काळ हा ———— व ———— यामुळे वैशिष्ठ्यपूर्ण असतो.

ग. किशोर वयाचा काळ मानवी जीवनात सर्वात चांगला असा —————— ——— असतो.

घ. किशोर वयाच्या काळात आपण रात्रंदिवस प्रयत्न केला पाहिजे जेणेकरून स्वर्गीय सामर्थ्याने ——————, —————— ————— प्रेरित, परमेश्वराच्या ——— —————————— व —————— ———— मान्यतेच्या सहाय्याने, आपण ——————— जगाचे ——————— व्हावे, आणि खऱ्या ———————— आणि —————— ———— दिक्षा घेतलेल्या लोकांमध्ये ——————— म्हणून गणले जावे.

च. किशोर वयाच्या काळात आपण रात्रंदिवस प्रयत्न केला पाहिजे जेणेकरून —————— ————— दिक्षा घेतलेल्या लोकांमध्ये ——————— म्हणून —————————— जावे.

छ. किशोर वयाच्या काळात आपण आपल्या —————————— —————————— मनुष्यमात्रांमध्ये वेगळे असले पाहिजे.

ज. किशोर वयाच्या काळात आपण आपल्या ध्येयाच्या —————————— मनुष्यमात्रांमध्ये वेगळे असले पाहिजे.

झ. किशोर वयाच्या काळात आपण आपल्या ——————————, दृढ ——————————, ———————— मोठेपणाने, ——————————, आपल्या —————————— उच्चत्वाने आणि आपल्या आध्यात्मिक ———————— मनुष्यमात्रांमध्ये वेगळे असले पाहिजे.

ट. किशोर वयाच्या काळात आपण —————————— धर्मकार्याच्या —————————— आणि ——————— साधन आणि ईश्वराच्या ————————— कृपाप्रसादांचे —————————— बनावे.

ठ. किशोर वयाचा काळात आपण आशीर्वादित सौंदर्याच्या (बहाउल्लाह —माझे जीवन त्यांच्या प्रियजनांसाठी अर्पित असो) —————————— आणि —————————— अनुरुप आपण —————————— करावे.

ड. अब्दुल—बहा उत्सुकतेने प्रत्याशा बाळगतात की आपणापैकी प्रत्येक, मानवी —————————— —————————— विहरणाऱ्या निर्भीड —————————— आणि —————————— हिरव्यागार मैदानावर दरवळणाऱ्या —————————— —————————— व्हावे.

२. आपण बहुधा लोकप्रिय समजुतीच्या या एका किंवा दुसऱ्या अभिव्यक्तीविषयी ऐकले असेल, की तरुणांनी आपले लक्ष मौज करण्यावर केन्द्रित करावे, कारण त्यांना लवकरच आयुष्याच्या गंभीर बाबींचा सामना करावा लागणार आहे. ही स्पष्टता अब्दुल—बहा यांच्या वरील वक्तव्याशी मेळ बसणारी नाही. या लोकप्रिय समजुतीच्या मुळाशी असणारे काही समज कोणते आहेत? हा प्रश्न आपण ज्यांच्यासोबत हे साहित्य अभ्यासत आहात, त्या मित्रांच्या गटासोबत चर्चेला घ्या आणि आपले काही निष्कर्ष खाली लिहा.

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

## विभाग ४

खालील प्रार्थनेमध्ये अब्दुल—बहा युवांबद्दलच्या काही आशा व्यक्त करतात:

**"हे दयाळू स्वामी! पक्ष्यांच्या या पिलांपैकी प्रत्येकाला दैवी पंखांची जोडी कृपाळूपणे प्रदान कर आणि त्यांना आध्यात्मिक शक्ती दे, जेणेकरुन ते अनंत अंतरिक्षात भरारी मारोत आणि आभा साम्राज्याच्या उंचीप्रत उड्डाण करोत.**

**"हे परम स्वामी! या नाजूक रोपट्यांना सशक्त कर, जेणेकरुन त्यापैकी प्रत्येक, एक फळ देणारे, हिरवेगार आणि भरभराटीचे वृक्ष व्हावे. तुझ्या स्वर्गीय दूतांच्या बळाद्वारे या आत्म्यांना विजयी बनव, जेणेकरुन ते प्रमादी व अज्ञानाच्या शक्तींना चिरडून टाकण्यास आणि लोकांमध्ये सहिष्णुतेची व मार्गदर्शनाची पताका फडकविण्यास समर्थ व्हावेत; जेणेकरुन ते पुनरुज्जीवित करणाऱ्या वसंत ऋतूच्या पुनरुज्जीवन श्वासाने मानवी आत्म्यांच्या वृक्षांना पुन्हा ताजेतवाने व जोमदार करोत आणि वासंतिक पर्जन्यवृष्टीप्रमाणे त्या प्रदेशातील मळे हिरवेगार व सुपीक बनवोत.**

**"तू समर्थ व शक्तिशाली आहेस, तू प्रदाता आणि सर्व प्रेमळ आहेस."**[२]

१. वरील उद्धरणाच्या आधारे खालील वाक्ये पूर्ण करा:

क. तारुण्याच्या प्राथमिक अवस्थेत असणाऱ्यांना, अब्दुल—बहा ———— —————— च्या जोडीची आवश्यकता असणाऱ्या पक्ष्यांच्या पिलांप्रमाणे मानतात आणि ईश्वराला त्यांना ————————— —————— प्रदान करण्यास विनवितात, जेणेकरुन ते अनंत अंतरिक्षात ——————— ————————— आणि आभा साम्राज्याच्या ——————— ————————— करोत.

ख. अब्दुल—बहा जे तारुण्याच्या प्रथमावस्थेत आहेत त्यांना ते नाजूक —————— समान समजतात आणि ते प्रत्येक, ——— ——— ——————, —————————— आणि ——————————— ——— बनावेत, यासाठी सशक्त करण्यास ईश्वरास विनवितात.

ग. अब्दुल—बहा ————————— व ——————— शक्तींना ———————— टाकण्यास आणि लोकांमध्ये ———————————————— व ———————————————— पताका फडकविण्यास समर्थ व्हावेत अशी ईश्वराची विनवणी करतात.

घ. जेणेकरुन ते ————————— करणाऱ्या —————— ऋतूच्या पुनरुज्जीवन ————————— मानवी ——————— वृक्षांना पुन्हा —————————— व ——————————— करोत आणि ———————————

पर्जन्यवृष्टीप्रमाणे त्या प्रदेशातील मळे ————————— व ———————— बनवण्यास सक्षम होतील, यासाठी प्रार्थना करतात.

२. या प्रार्थनेत, अब्दुल–बहा ईश्वरास तरुणांना आध्यात्मिक शक्ती प्रदान करण्याची विनंती करतात. खालीलपैकी कशाला तुम्ही आध्यात्मिक शक्तीशी जोडता?

—— उद्देशाची भव्यता
—— ईश्वरावरील निर्भरता
—— पावित्र्यता
—— धूर्तपणा
—— स्पर्धात्मकता
—— एकत्रता
—— प्रामणिक स्वभाववृत्ती
—— सांसारिक महत्वाकांक्षा
—— सामाजिक उच्चभ्रूपणाची हाव
—— ईश्वराप्रति प्रेम
—— ऐषोआरामाप्रती प्रेम
—— मनाची विशालता
—— भौतिक मोह (ग्लॅमर)
—— कार्ये पूर्ण करण्याचा निर्धार
—— उदात्त विचारसरणी
—— औदार्य
—— इतरांवर वर्चस्व गाजवण्याची इच्छा
—— दृढता आणि संकल्प
—— विनयशीलता
—— स्वत:च्या कर्तृत्वाचा अभिमान
—— अहंकार
—— हेतूची शुद्धता

३. या प्रार्थनेत, अब्दुल–बहा तरुणांना प्रमादी व अज्ञानाच्या शक्तींना चिरडून टाकण्यास समर्थ बनविण्यासाठी ईश्वराला आळवितात. अशा शक्तींविरुद्धच्या संघर्षात तरुणांना खालीलपैकी कोणती बाब मदत करेल ते ठरवा:

—— सत्य आणि असत्य ओळखण्याची क्षमता

—— इतरांना चाणाक्ष रीतीने हाताळण्याची क्षमता

—— स्पष्टतेसह गहन कल्पना व्यक्त करण्याची क्षमता

—— पूर्वग्रह ओळखण्याची आणि त्यावर मात करण्याची क्षमता

—— भौतिक साधनांचा सदुपयोग करण्याची क्षमता

—— वैयक्तिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतरांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता

—— स्वत:च्या हानिकारक आकांक्षा नियंत्रित करण्याची क्षमता

—— विचारांच्या एकतेत योगदान देण्याची क्षमता

—— स्वतःच्या निर्णयात निष्पक्ष राहण्याची क्षमता

—— न्यायाचा पुरस्कार करण्याची क्षमता

४. या प्रार्थनेत, अब्दुल—बहा युवांना सहिष्णुतेची व मार्गदर्शनाची पताका फडकविण्यासाठी समर्थ करण्यासाठी ईश्वराला विनवितात. खालीलपैकी कोणत्या बाबी तरुणांना अशा प्रयत्नांमध्ये साह्यभूत राहतील, हे ठरवा:

—— मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करण्याची क्षमता

—— इतरांना लक्षपूर्वक ऐकण्याची क्षमता

—— शांत आणि संयमाने अडचणींचा सामना करण्याची क्षमता

—— इतरांचे दोष व उणिवा जाणून घेण्याची क्षमता

—— इतरांच्या दोषांकडे दुर्लक्ष करण्याची क्षमता

—— निःस्वार्थीपणे समाजसेवा करण्याची क्षमता

—— इतरांच्या यशामध्ये आनंद घेण्याची क्षमता

—— इतरांमध्ये आशा जागविण्याची क्षमता

—— इतरांना सहकार्य करण्याची क्षमता

—— इतरांच्या हिताचा विचार न करता स्वतःच्या हितसंबंधांचा विचार करण्याची क्षमता

—— स्वतःच्या समाजाच्या कल्याणास प्रोत्साहन देण्याची क्षमता

## विभाग ५

मागील दोन विभागांमध्ये अभ्यासिलेली उद्धरणे आम्हास युवकांमध्ये आवश्यक असणाऱ्या काही गुणांविषयी अंतर्दृष्टी प्रदान करतात. युवाकिशोर जेव्हा पंधरा वर्षांच्या वयापर्यंत पोहचतात, तेव्हा स्पष्टतः त्यांच्याकडून बरेच काही अपेक्षिले जाईल. हे आपण जाणतो, की पवित्र लिखाण पंधरा वर्षे वयाचा निर्देश परिवक्वतेची सुरवात म्हणून करते. या वयाच्या अवस्थेत प्रार्थना व उपवासाशी संबंधित अशासारखे बहाई नियम व्यक्तीवर बंधनकारक होतात. परिपक्वतेच्या संक्रमणाबद्दल, अब्दुल—बहा म्हणतात:

> **“दुग्धपान करणारे अर्भक प्रत्येक टप्प्यात वाढत व विकसित होत, त्याचे शरीर पक्वतेच्या वयात पोहचेपर्यंत बऱ्याचशा शारीरिक अवस्थांमधून जात असते. या अवस्थेत पोहचल्यावर ते आध्यात्मिक व बौद्धिक परिपूर्णता प्रदर्शित करण्याची क्षमता अर्जित करते. त्यामध्ये समंजसपणा, विद्वत्ता व ज्ञानाचा प्रकाश दृष्टिगोचर होतो आणि त्याच्या आत्म्याच्या शक्ती प्रस्फुटित होतात.”**[३]

आणि जेव्हा एखादी व्यक्ती परिपक्व वयात प्रवेश करते त्याविषयी अब्दुल—बहा आम्हास सांगतात,

**“तेव्हा त्याला गोष्टींची वास्तविकता आणि आंतरिक सत्ये समजून येतात. खरोखरच, त्याच्या आकलनात, त्याच्या भावनांत, त्याच्या तर्कांत आणि त्याच्या शोधांमध्ये, त्याच्या परिपक्वतेनंतरच्या आयुष्यातील प्रत्येक दिवस त्याच्या आधीच्या एक वर्षाइतका असतो.”**[४]

१. युवांविषयी असे अनेक विचार आहेत, जे अब्दुल—बहा यांच्या वरील वक्तव्यांच्या प्रकाशात समजले जाऊ शकतात. पंधरा वर्ष वयाच्या व्यक्तीला, त्याला किंवा तिला, खालीलपैकी कोणते लागू पडतात, असे आपणास वाटते?

—— जीवन आणि मृत्यू यांच्या अन्वयार्थावर चिंतन करण्यास आध्यात्मिक क्षमता असते.

—— जर गंभीर विषय केवळ रंजकतेच्या आवरणात प्रस्तुत केले गेले, तर त्यांविषयी विचार करण्यास समर्थता असते.

—— त्याच्या किंवा तिच्या जीवनास प्रभावित करणाऱ्या शक्तीचे विश्लेषण करण्याची बौद्धिक क्षमता असते.

—— कष्टसाध्य चोखपणे पार पाडण्याची क्षमता असते.

—— कठीण आव्हाने पार करण्याची आध्यात्मिक क्षमता असते.

—— लहान मुलांसाठी आध्यात्मिक व नैतिक वर्ग संचालन करण्याची क्षमता असते.

—— धर्मश्रद्धेची शिकवणे व तत्त्वे वाक्पटुतेने व विश्वासाने स्पष्ट करण्याची क्षमता असते.

—— पालकांच्या समर्थनाची व प्रेमाची आवश्यकता नसते.

—— बहाई नियम पाळण्याची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असते.

—— सामाजिक प्रक्रिया समजून घेण्याविषयी बौद्धिक क्षमता असते.

—— समाजात सार्थक सेवा देण्यास स्वत:ला गुंतवू शकते.

२. आपण खालील प्रार्थना मुखोद्‌गत करू शकता:

**“हे स्वामी! ह्या तरुणास तेजस्वी बनव आणि ह्या दीन प्राण्यावर तुझा कृपा—प्रसाद प्रदान कर. त्याला ज्ञान दान दे, प्रत्येक प्रभात समयी त्याला अधिकाधिक शक्ती प्रदान कर, आणि त्याला तुझ्या संरक्षणाच्या आश्रयस्थानी सुरक्षित ठेव जेणेकरून तो चुकांपासून मुक्त होईल, तुझ्या धर्मकार्याच्या सेवेसाठी स्वत:ला वाहून घेईल, पथभ्रष्टांना मार्गदर्शन करील, दुर्दैवींना मार्ग दाखवील, बंदिवानांना मुक्त करील आणि दुर्लक्ष करणाऱ्यांना जागृत करील, ज्यायोगे तुझ्या स्मरणाने व स्तवनाने सर्व आशीर्वादित होतील. तूच शक्तिशाली आणि सामर्थ्यशाली आहेस.”**[५]

## विभाग ६

जेव्हा तरुण लोक वयाचे पंधरावे वर्ष पार करुन पक्वतेच्या उंबरठ्यावर पोहचतात, तेव्हा काही शारीरिक, बौद्धिक व आध्यात्मिक क्षमता केन्द्रस्थानी आणल्या जातात. बालपणाचे कल, विचार आणि सवयी मागे सोडल्यानंतर त्यांच्यात नवीन क्षमतांचे संगोपन होत असते. ईश्वरी धर्मकार्याच्या आणि मानवतेच्या सेवेत त्या शक्तींना मार्गस्थ करणे एखाद्याच्या तारुण्याच्या बहराच्या काळात सुरु होणे योग्य असते. बहाउल्लाह म्हणतात:

**“जो आदी आणि अंताच्या स्वामींच्या धर्मकार्याची सेवा करण्यास त्याच्या तारुण्याच्या बहरात आणि त्याच्या आयुष्याच्या उमेदीच्या काळात तत्पर होईल आणि आपले अंत:करण ईश्वराच्या प्रेमाने अलंकृत करेल, तो आशीर्वादित होय. अशा अनुग्रहाची अभिव्यक्ती ही स्वर्ग आणि पृथ्वीच्या निर्मितीपेक्षा श्रेष्ठ आहे. निष्ठावंत आशीर्वाद पावतात आणि जे दृढ आहेत ते योगक्षेम पावतात.”**[६]

युवकांच्या प्रत्येक पिढीने धर्मकार्यासाठी वाहिलेली सेवा तिच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. त्यांनी दिलेल्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करून, शोघी एफेंदी त्यांच्या वतीने लिहिलेल्या पत्रात नमूद करतात की परमेश्वराच्या धर्मकार्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी परिश्रम करणारे, “नि:स्वार्थी सेवेचे चैतन्य जागृत ठेवण्याची जबाबदारी ते त्यांच्या खांद्यावर ठेवतात.” “त्या चैतन्याशिवाय”, धर्मसंरक्षक पुढे म्हणतात, “कोणत्याही कार्याची पूर्ती प्राप्त करता येणार नाही.”

सेवेच्या क्षेत्रात युवांना विशेषत्वाने योग्य बनविणाऱ्या गुणवैशिष्ट्यांविषयी सर्व राष्ट्रीय आध्यात्मिक संसदांना पाठविलेल्या संदेशात विश्व न्याय मंदिराने लिहिले आहे:

**“कठीण परिस्थितींमध्ये युवांची सहनशक्ती, त्यांची ओजस्विता आणि जोम, स्थानिय परिस्थितीशी जुळवून घेण्याची, नवीन आव्हाने स्वीकारण्याची आणि ज्यांना ते भेटतात त्यांना आपले प्रेम व उत्साह प्रदान करण्याची क्षमता, ह्यांसोबतच बहाई युवक जे उच्च प्रतीचे आचरण बाणवतात, त्यामुळे ते नियोजित प्रकल्पांच्या कार्यवाहीमध्ये प्रभावी साधने ठरतात. खरेच, ह्या विशेष गुणांमुळे ते कोणत्याही उपक्रमामध्ये बिनीचे शिलेदार आणि ज्या कोणत्या कार्यक्रमात ते भाग घेतात, ते स्थानिय असोत किंवा राष्ट्रीय, त्यांची चालनाशक्ती बनू शकतात. आमचे आशाळभूत नेत्र बहाई युवकांवर खिळले आहेत.”**[७]

आणि, जगभरातील तरुणांना संबोधित करताना, विश्व न्याय मंदिर पुढे स्पष्ट करतात:

**“यद्यपि तुमचे वास्तव परिस्थितीच्या व्यापक विविधतेने आकारास आले असले तरी, रचनात्मक बदल घडवून आणण्याची इच्छा आणि सार्थक सेवेची इच्छा, ज्या दोन्ही तुमच्या जीवनाच्या अवस्थेची गुणवैशिष्ठ्ये आहेत, त्या एखाद्या प्रजाती किंवा राष्ट्रीयतेपुरत्या मर्यादित किंवा भौतिक संसाधनांवर अवलंबून नाहीत. तुम्ही सहभागी असलेल्या तारुण्याच्या तेजस्वी काळाचा अनुभव सर्वच घेत असतात...”**[८]

१.	वरील उद्धरणांच्या आधारे खालील वाक्ये पूर्ण करा:

क. जे आपल्या तारुण्याच्या बहरात ईश्वरी धर्मकायाची सेवा करण्यास तत्पर होतात आणि आपले अंत:करण ईश्वराच्या प्रेमाने अलंकृत करतात ते ———————— होय.

ख. जे परमेश्वराच्या धर्मकार्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी परिश्रम करणारे असतात, त्यांच्या सेवेचे ——————— जागृत ठेवण्याची जबाबदारी युवांच्या खांद्यावर असते.

ग. नि:स्वार्थी सेवेच्या चैतन्याशिवाय, ज्याची जबाबदारी तरुण व सक्रिय बहाईंच्या खांद्यावर असते, त्या चैतन्याशिवाय कोणत्याही कार्याची —————— —————— —————— येणार नाही.

घ. कठीण परिस्थितींमध्ये युवांची ——————————, त्यांची ————————— आणि ———, यामुळे ते नियोजित प्रकल्पांच्या कार्यवाहीमध्ये प्रभावी साधने ठरतात.

च. नियोजित प्रकल्पांच्या कार्यवाहीमध्ये प्रभावी साधने म्हणून, तरुण त्यांची क्षमता स्थानिय परिस्थितीशी ——————— घेण्याची, नवीन आव्हाने ——————— आणि ज्यांना ते भेटतात त्यांच्यावर प्रेम व उत्साह —————— करू शकतात.

छ. त्यांच्या विशेष गुणांमुळे तरुण कोणत्याही उपक्रमामध्ये ————— ————————— बनू शकतात आणि ज्या कोणत्या कार्यक्रमात ते भाग घेतात, त्याची —————————— बनू शकतात.

ज. यद्यपि तरुणांचे वास्तव परिस्थितीच्या व्यापक विविधतेने आकारास आले असले तरी, ——————— बदल घडवून आणण्याची ————— आणि ————— सेवेची इच्छा, ज्या दोन्ही तुमच्या जीवनाच्या अवस्थेची —————————— आहेत.

## विभाग ७

युवकांद्वारे जी सेवाकार्ये केली जातात, त्यांच्याशी साधारणत: अनेक संकल्पना जुळलेल्या आहेत, ज्यांपैकी स्वयंस्फूर्तता, उत्तेजना आणि जे शक्य आहे त्याचा पाठपुरावा करण्याचे स्वातंत्र्य ह्या लक्ष वेधून घेतात. ह्या संकल्पनांचा सेवेशी संबंध जोडणे काही प्रमाणात समर्थनीय असले, तरी त्यांना अवास्तव महत्त्व न देण्याची दक्षता घेतली पाहिजे. घटनांचे स्वरुप समजून घेण्याचे महत्त्व विसरुन आणि पद्धतशीर कृतीची शिस्त अंगी बाणवून घेण्याच्या आवश्यकतेकडे दुर्लक्ष करुन युवकांच्या कार्यकलापांना केवळ उत्तेजक घटनांच्या मालिकेचे स्वरुप देण्याची सवय करुन घेणे फार सोपे आहे. पद्धतशीर सेवाकार्यांचा विचार करा ज्याद्वारे प्रचार–प्रसार आणि धर्मकार्याची तत्त्वे खेडेगावांत आणि विभागात आध्यात्मिक पाया मजबूत करण्यासाठी लागू केली जात आहेत –उदाहरणार्थ, बालकांचे आध्यात्मिक शिक्षण, सामुदायिक जीवनाचे दृढीकरण आणि मानवी संसाधनांचा विकास. याक्षणी, हा अभ्यासक्रम शिकत असणाऱ्या आपल्या मित्रांसोबत, या प्रक्रियेत योगदान देणाऱ्या युवकांद्वारे काही सेवाकार्यांचा विचार करा. हे क्रियाकलाप उल्हासाला पोषक नाहीत काय? ते उचित प्रमाणात स्वयंस्फूर्ततेला वाव देत नाहीत काय? शिस्तबद्ध पद्धतीने पुढाकार घेऊन ते सर्जनशीलतेला प्रोत्साहन देत नाहीत का?

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

## विभाग ८

आपण बऱ्याचदा ऐकतो, की तारुण्याचा काळ हा तयारीचा काळ आहे. हे म्हणणे खरेच सत्य आहे. आज जगात आवश्यक असलेल्या मोठ्या बदलांचा उल्लेख करीत विश्व न्याय मंदिर लिहितात, "समाजाच्या कार्यव्यवस्थेमध्ये जो कायापालट घडून यायचा आहे तो निश्चितपणे बऱ्याच अंशी तरुणांना ज्या जगाचा वारसा मिळणार आहे, त्यासाठी ते जी तयारी करणार आहेत, तिच्या प्रभावीपणावर अवलंबून राहील." तेव्हा आम्ही हे विचारायला हवे, की तरुण लोक त्यांना वारसाने मिळणार असणाऱ्या जबाबदाऱ्यांसाठी स्वत:स उत्तम प्रकारे कसे तयार करु शकतात, ज्यावेळी ते प्रौढावस्थेत प्रवेश करतात. विश्व न्याय मंदिर त्यांच्या संदेशात स्पष्ट करतात:

> **"कोणत्याही व्यक्तीसाठी, मग ती बहाई असो वा नसो, त्याच्या तरुणाईची वर्षे ती असतात, ज्यांत तो अनेक निर्णय घेईल, जे त्याच्या जीवनाची दिशा ठरवतील. ह्या वर्षांमध्ये तो निश्चितपणे आपल्या जीवनाचे कार्य निवडतो, आपले शिक्षण पूर्ण करतो, स्वत:च्या उपजीविकेसाठी कमविणे सुरु करतो आणि लग्न करून स्वत:च्या कुटुंबाच्या योगक्षेमाची सुरवात करतो. या सर्वांत महत्त्वपूर्ण हे, की याच अवधीत त्याचे मन सर्वाधिक चौकस असते आणि व्यक्तीच्या भावी आचरणाला मार्गदर्शन करतील अशी आध्यात्मिक मूल्ये अंगी बाणली जातात."[९]**

या संदर्भात, धर्मसंरक्षक यांच्या वतीने लिहिलेल्या पत्रातील उतारा, तरुणांनी त्यांच्या भविष्याच्या तयारीचा एक भाग म्हणून, त्यांच्या बौद्धिक व आध्यात्मिक क्षमतांचा विकास करण्याच्या आवश्यकतेशी संबंधित आहे. "आपण सुसज्ज असले पाहिजे", हे पत्र दर्शविते. "आपली बौद्धिक आणि आध्यात्मिक बाजू समानतेने विकसित असायला हवी."

क्वचितच नाही, परंतु, अभ्यासाच्या तयारीचा प्रश्न —मग तो शैक्षणिक, औद्योगिक किंवा व्यावसायिक असो; आणि धर्मकार्याची सेवा या दोहोंमधील संबंधाविषयी इतर प्रश्न उपस्थित करतो. विशेषत:, कधी कधी हे स्पष्ट होत नसते, की तरुण लोकांनी ह्यामधील प्रत्येक कामासाठी किती मेहनत खर्ची घालावी. एक टोक म्हणजे युवांना असा सल्ला देणे, की त्यांनी पूर्णपणे शिक्षणाला वाहून घ्यावे आणि धर्मकार्याच्या सेवेत गंभीरतेने गुंतण्यापूर्वी जीवनाचा अधिक अनुभव मिळेपर्यंत थांबावे. हे खरे आहे की, "सर्व बाबतीत, एखाद्याच्या शक्यतेच्या मर्यादेत

शिक्षण घेणे आणि एखाद्याचा उदरनिर्वाह करण्यासाठी एखादा व्यापार किंवा व्यवसाय प्राप्त करणे याला योग्य महत्त्व दिले पाहिजे." तरीही, विश्व न्याय मंदिर स्पष्ट करतात की, व्यापार किंवा व्यवसाय स्वीकारण्याच्या तयारीचा एक टप्पा म्हणून "तारुण्याच्या लाभदायक वर्षांची व्याख्या" करणे म्हणजे

> **"तरुणांमध्ये बहुलतेने उपलब्ध असणाऱ्या सृजनशक्तीकडे डोळेझाक करण्यासारखे होईल. सरतेशेवटी, धर्मश्रद्धेच्या सुरुवातीच्या वीरांपैकी कितीतरी तरुण पुरुष आणि स्त्रिया होत्या, ज्यांनी त्यांच्या प्रियतमाच्या मार्गात महानतम कामे पार पाडण्यास पुढाकार घेतला."**[१०]

दुसरे टोक असे, की तरुणांना कोणत्याही औपचारिक शिक्षण किंवा व्यावसायिक प्रशिक्षणाला सोडून देण्यास प्रोत्साहित करणे आणि त्यांची शक्ती, विशेषत: या संधीच्या वेळी, पूर्णपणे सेवेच्या क्षेत्रात वापरणे. प्रत्येक युवकाच्या जीवनात धर्मकार्याची सेवा ही केंद्रस्थानी असावी, हे आपण मागल्या घटकांमध्ये अभ्यासिलेल्या अनेक उताऱ्यांमधून स्पष्ट आहे. धर्मसेवेचा विशेष कालावधी, ज्यात औपचारिक शिक्षणाचा खंड झाला असो वा नसो, तो "त्यांच्या तयारीचा एक बहुमोल अंग असू शकतो" हे देखील स्पष्ट आहे. त्याच वेळी, विश्व न्याय मंदिर निरीक्षण करतात:

> **"यद्यपि, ज्यांचेजवळ सेवेच्या मार्गात बरेच काही देण्यालायक आहे त्यांचे कडून मोठ्या गोष्टी अपेक्षिणे योग्य असले तरी, मित्रांना परिपक्वतेकडे नेणाऱ्या विकासाच्या काय आवश्यकता आहेत याबद्दल संकुचित दृष्टिकोण अंगिकारण्याविरुद्ध सतर्क असले पाहिजे. आवगमनाचे स्वातंत्र्य आणि वेळेची उपलब्धता बऱ्याचशा युवकांना अशा प्रकारे सेवा देण्यास योग्य बनविते ज्या सरळसरळ समुदायाच्या आवश्यकतेनुसार असतात, परंतु जेव्हा ते पुढे विशीच्या वयोगटात येतात तेव्हा त्यांचे क्षितिज विस्तारते.... त्यांच्या समक्ष ज्या शक्यता उपलब्ध असतात तद्नुसार पुष्कळांसाठी तात्कालिक प्राथमिकता पुढचे शिक्षण, शालेय किंवा व्यावसायिक, राहील आणि समाजाशी पारस्परिक क्रियेसाठी नवीन सुसंधी उघडेल.... आपल्या वयस्क जीवनाला दिशा देण्याचे त्यांचे महत्वपूर्ण निर्णय हे ठरवतील, की ईश्वराच्या धर्मकार्याला त्यांनी दिलेली सेवा, त्यांच्या युवाकाळातील केवळ एक संक्षिप्त आणि संस्मरणीय प्रकरण होते की पृथ्वीतलावरील त्यांच्या अस्तित्त्वाचा एक सुनिश्चित केंद्रबिंदू, एक भिंग ज्याद्वारे सर्व क्रियाकलाप केंद्रिभूत होतात."**[११]

आम्ही औपचारिक शिक्षण आणि धर्म सेवाकार्य यांच्यातील संबंधांचा अधिक विचार करण्यापूर्वी, आपण येथे अल्प विराम घेऊन, एक संक्षिप्त विधान लिहा जे तरुणपणाचा काळ म्हणजे तयारीचा काळ आहे याचा अर्थ काय हे दर्शवते. ——————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

## विभाग ९

मागील विभागात आपण लिहिलेले वक्तव्य यावर नि:संशय भर देते, की युवांना वारसाने मिळणार असलेल्या जगासाठी शालेय शिक्षण किंवा धंदेविषयक अथवा व्यवसायिक प्रशिक्षण मिळवून स्वत:ला पुरेसे तयार करणे किती महत्त्वाचे आहे. परंतु आपण निश्चितच हे देखील नमूद केले आहे, की शिक्षण घेत असताना व्यक्तीला धर्मश्रद्धेची सेवा "प्रलंबित" ठेवता येत नाही. अशा मनोवृत्तीची पुनरावृत्ती व्यक्तीचे वय वाढत असताना भविष्यातही संभवते आणि मन:पूर्वक सेवा करण्यास सुरुवात करण्याच्या योग्य परिस्थितीसाठी आयुष्यभर प्रतीक्षा करावी लागू शकते. शिक्षण व सेवा या दरम्यानच्या संबंधांचे असे स्वरुप तेव्हाच उद्भवू शकते, जेव्हा शिक्षणाची व्याख्या केवळ पुस्तकी ज्ञान मिळविण्याच्या संदर्भात केली जाते. जेव्हा की सेवेकडे आम्ही एक असे क्षेत्र म्हणून पाहतो, जेथे ज्ञानाचा उपयोग केला जातो आणि बुद्धिकौशल्याचा विकास होतो, ज्यामुळे मग वरील प्रकारची विचारसरणी टाळली जाते आणि सेवाकार्य हे केवळ भविष्यासाठी निकोप तयारीच्या प्रक्रियेचा नुसता एक भाग म्हणून नव्हे, तर तिचा गाभा मानला जातो. निश्चितच, धर्मकार्याच्या सेवेची सुरवात जेव्हा तारुण्याच्या उमेदीत होते, तेव्हा एखाद्याच्या संपूर्ण आयुष्याचे ते एक पथदर्शक तत्त्व बनते, जे त्यास योग्य मार्गाची आखणी करण्यास व दिशा सुस्पष्ट ठेवण्यास समर्थ बनविते.

ही जाणीव नैसर्गिकपणे सेवेसाठी युवकांच्या क्षमता वाढविण्यास आवश्यक असणाऱ्या तयारी विषयक प्रश्नांकडे नेते. असा विचार करण्याकडे कल असतो, की युवांनी बहाई समुदायाच्या अनेक कार्यक्रमांत व क्रियाकलापांत भाग घेतल्याने, ज्यात त्यांच्या समवयस्कांसह एकत्रितपणे वेळ घालवण्याची त्यांची नैसर्गिक इच्छा पूर्ण करणाऱ्यांचा समावेश आहे, त्यांच्या क्षमता वाढतील आणि धर्मकार्याच्या सेवेच्या जीवनासाठी ते स्वत:ला पुरेसे तयार करतील. तथापि पवित्र लेख सुचवितात, की अशी अनौपचारिक शिक्षण प्रक्रिया, जरी आवश्यक असली तरी, ती पुरेशी नाही.

आपण जर त्यांचे संप्रेषण काळजीपूर्वक पाहिले तर आपणास आढळते, की शोघी एफेंदी यांनी आशा व्यक्त केली आहे, की युवक धर्माचा प्रचार–प्रसार करण्यामध्ये "चांगले शिक्षित व प्रशिक्षित" असावेत आणि त्यांनी धर्मश्रद्धेचे "परिपूर्ण" व "सखोल" ज्ञान संपादन करावे. याव्यतिरिक्त, धर्मसंरक्षक त्यांना त्यांच्या समुदायाच्या क्रियाकलापांमध्ये "सक्रिय, मन:पूर्वक आणि सतत सहभाग" द्वारे शिकण्यासाठी प्रोत्साहित करतात. या संबंधात, ते स्पष्ट करतात की सामुदायिक जीवन "एक अपरिहार्य प्रयोगशाळा" प्रदान करते, जेथे युवक "या तत्त्वांचे जीवनात आणि रचनात्मक कृतीत रूपांतर करू शकतात" जे ते धर्मश्रद्धेच्या अध्ययनातून प्राप्त करतात. धर्मसंरक्षक सूचित करतात की "त्या सजीवाचा एक वास्तविक भाग बनणे" या मध्येच ते युवक "बहाई शिकवणींमध्ये समाविष्ट असणाऱ्या वास्तविक चैतन्यास आत्मसात करू शकतात." अशा प्रकारे, युवांना सेवेसाठी स्वत:ला सुसज्ज करण्यास मदत करण्यासाठी औपचारिक शैक्षणिक प्रक्रिया आवश्यक आहे, जी सामुदायिक जीवनाच्या वास्तवात अंतर्भूत आहे. केवळ कृतीसाठी क्रियाकलाप, अध्यापनासाठी अभ्यास, हे पुरेसे नाही.

विश्व न्याय मंदिराचे अनेक संदेश अशाच संदर्भाचे सूचक आहेत.  समज मोठ्या प्रमाणात वाढते, त्यांचा एक संदेश स्पष्ट करतो, "जेव्हा अभ्यास आणि सेवेला एकत्रित करण्यात येते आणि ते साथोसाथ केले जातात." "तेथे, सेवेच्या क्षेत्रात," संदेश पुढे म्हणतो, "ज्ञानाची कसोटी लागते, व्यवहारातून प्रश्न निर्माण होतात आणि समजुतीचे नवीन स्तर गाठले जातात." जगभरातील देशांमध्ये प्रशिक्षण संस्थांची स्थापना, औपचारिक अभ्यासक्रमाद्वारे धर्मकार्यासाठी मानवी संसाधने विकसित करण्याच्या स्पष्ट हेतूने स्थापित करण्यात आली आहे. सर्वत्र लोकांची वाढती संख्या त्यांची सेवेची क्षमता वाढवण्यासाठी एका पद्धतशीर शैक्षणिक प्रक्रियेत गुंतलेली आहे आणि तयारीच्या या प्रक्रियेत युवक सातत्याने आघाडीवर राहिले आहेत. प्रशिक्षण संस्थेबद्दल, विश्व न्याय मंदिराच्या वतीने लिहिलेले एक पत्र स्पष्ट करते:

> **"ती एका शैक्षणिक प्रक्रियेत व्यक्तीला गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करते ज्यामध्ये सेवेच्या संदर्भात सद्गुण आचरण आणि स्वयंशिस्त विकसित केली जाते, एकत्र विणलेल्या जीवनाचा एक सुसंगत आणि आनंदी नमुना जोपासते जो अध्ययन, उपासना, प्रचार–प्रसार, समुदाय बांधणी आणि, सर्वसाधारणपणे, समाजात परिवर्तन घडवू पाहणाऱ्या इतर प्रक्रियांमध्ये सहभाग घेणे आहे. शैक्षणिक प्रक्रियेच्या केंद्रस्थानी परमेश्वराच्या पवित्र लेखणीसोबत संपर्क आहे, ज्याच्या सामर्थ्याने प्रत्येक व्यक्तीचे हृदय शुद्ध करण्याचा आणि 'अलिप्ततेच्या भावनेने' सेवेच्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न केला जातो."**[१२]

विश्व न्याय मंदिराच्या वतीने लिहिलेले दुसरे पत्र नमूद करते:

> **"...संस्थेच्या अभ्यासक्रमांचा उद्देश व्यक्तीला अशा मार्गावर घेऊन जाण्याचा आहे ज्यामध्ये गुण आणि वृत्ती, कौशल्ये आणि क्षमता हळूहळू सेवेद्वारे आत्मसात केल्या जातात —स्वतःच्या अहंकाराला शमवण्यासाठी केलेले सेवाकार्य, व्यक्तीला त्याच्या मर्यादित परिस्थितून बाहेर काढण्यास मदत करणे आणि त्याला किंवा तिला समुदाय उभारणीच्या गतिमान प्रक्रियेत स्थान प्रस्थापित करणे आहे."**[१३]

आणि, जगभरातील  युवांच्या सक्रीय ताफ्यांच्या संदर्भात, विश्व न्याय मंदिर लिहितात:

> **"कुठल्याही परिस्थितीच, ते, एक आणि सर्व, त्यांचा वेळ आणि शक्ती, प्रतिभा आणि क्षमता त्यांच्या समुदायांच्या सेवेसाठी समर्पित करतील. अनेक, संधी मिळाल्यावर, त्यांच्या आयुष्यातील काही वर्षे वाढत्या पिढ्यांना आध्यात्मिक शिक्षण देण्यासाठी आनंदाने समर्पित करतील. जगातील युवांमध्ये, समाजात परिवर्तन घडवून आणण्याच्या क्षमतेचा साठा आहे ज्याचा उपयोग होण्याची प्रतीक्षा होत आहे. आणि या क्षमतेचा उपयोग करणे हे प्रत्येक संस्थेने आपले एक पवित्र कर्तव्य मानले पाहिजे."**[१४]

## विभाग १०

जसे आपण आधीच्या दोन विभागांत पाहिले, की कोणत्याही परिस्थितीचा विचार करताना आपण सतर्क असावे व तिची अशा प्रकारे फोड करु नये, की आम्ही आमच्या जीवनाच्या अंगांना कप्प्याकप्प्यांमध्ये विभाजित करण्यास लागावे, जे आपणास अनावश्यक विरोधाभासांकडे नेऊ शकते. साधारणतः, मानवी मनाचा कल त्यासमोर

असलेल्या जगाची फोड करण्याकडे असतो. भौतिक, सामाजिक अथवा आध्यात्मिक सत्य हे पूर्णत्वाने समजून घेण्यासाठी फार विशाल आहे. म्हणून, त्याला अंशाअंशाने समजून घेण्यासाठी त्याचे तुकड्यांमध्ये विभाजन करणे गैरवाजवी नाही. तथापि, जेव्हा हे वास्तविकतेची संपूर्णता लक्षात न घेता केले तर अडचणी उद्भवतात. विविध वंशांच्या, वर्णांच्या, राष्ट्रीयत्वांच्या आणि धर्ममतांच्या लोकांमधील संघर्ष हे बऱ्याचशा समस्यांपैकी काही आहेत, ज्या अस्तित्वाच्या खंडित संकल्पनेपासून उद्‌भवू शकतात —कारण मानवतेचे एकत्व एक वास्तव आहे आणि तिचे वांशिक, जातीय आणि राष्ट्रीय आधारावरील विभाजन ही मानवी मनाची निपज आणि ऐतिहासिक परिस्थितींचा परिपाक आहे.

जर आपण सतर्क नसू आणि आमच्या जीवनाकडे पाहण्यास खंडित विचारसरणीचा अंगीकर करु, तर आम्ही सर्व प्रकारची द्वंद्वे निर्माण करु, जी बव्हंशी काल्पनिक असतात. काम, विरंगुळा, पारिवारिक जीवन, आध्यात्मिक जीवन, शरीरस्वास्थ्य, बौद्धिक छंद, वैयक्तिक विकास, सामूहिक प्रगती आणि अधिक हे असे अंग बनतात, जे एकत्रितपणे आमचे अस्तित्व घडवितात. जेव्हा अशा विभाजनांना आपण सत्य म्हणून स्वीकारतो, तेव्हा आम्ही ज्यांना जीवनाच्या विविध आवश्यकता मानतो, त्यांना प्रतिसाद देण्याचा प्रयत्न करताना आम्हास अनेक दिशांनी ओढल्यागत वाटते. वरवर विसंवादी दिसणाऱ्या उद्दिष्टांमुळे आम्ही संभ्रमित होतो: धर्मकार्याची सेवा करण्यास मी माझ्या कौटुंबिक जीवनाचा त्याग करावा काय? धर्मकार्याची सेवा मुलाबाळांच्या संगोपनाच्या माझ्या प्रयत्नात ढवळाढवळ करणार नाही काय? जे अनेक प्रश्न उद्‌भवू शकतात, त्यांपैकी ही दोन उदाहरणे आहेत.

आम्ही उत्पन्न केलेले द्वंद्व सोडविण्यासाठी कधीकधी आपणावर आलेल्या विविध जबाबदाऱ्यांसाठी आम्ही आपला वेळ समानतेने विभागण्याचा प्रयत्न करतो. इतर वेळी, आम्ही जबाबदाऱ्यांची प्राथमिकता ठरविण्याचा प्रयत्न करतो आणि विशिष्ट वेळेला ज्या सर्वांत महत्त्वाच्या आहेत असा विश्वास वाटतो, त्यांच्याकडे आमची शक्ती केंद्रित करतो. वेळ व शक्ती यांचे काळजीपूर्वक नियोजन अर्थातच आवश्यक असते. परंतु ते तेव्हाच फलदायी असते, जेव्हा आपण आपल्या जीवनाच्या अनेक अंगांच्या परस्परसंबंधाविषयी जागरुक असतो. जर आपण जीवनाकडे पूर्णत्वाने पाहण्यास चुकलो, तर सर्व अंगांमध्ये जे तणाव निर्माण होतात, ते चिंतेला आणि संभ्रमालादेखील जन्म देऊ शकतात.

खाली जीवनाची विविध अंगे जोड्यांच्या रुपात दिली आहेत, जी एकमेकांना बल देणारी आहेत, परंतु ज्यांना कधी कधी परस्परविरोधी मानले जाते. जोड्यांनंतर येणाऱ्या प्रत्येक वाक्याविषयी ठरवा, की ते जीवनाच्या एकात्मिक मार्गाला पोषक असणाऱ्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करते, की ते विभक्तीकरणाकडे कल असण्याचे द्योतक आहे. त्या प्रकारे त्यांना “ए—एकात्मिक” किंवा “वि—विभक्तीकरण” असे चिन्हांकित करा:

१. कुटुंब आणि नोकरी

———— माझ्या नोकरीत जर मी कठीण परिश्रम केले, तर माझ्या कौटुंबिक जीवनावर अनिष्ट परिणाम होतील.

———– मी बहुधा माझ्या कुटुंबासोबत माझ्या कामातील निष्पत्ती व तेथे समोर येणाऱ्या आव्हानांविषयी चर्चा करतो.

———– स्त्रिया अर्थातच त्यांच्या व्यवसायात कौशल्य प्राप्त करु शकतात, परंतु नेहमी मुलांना त्याची किंमत चुकवावी लागते.

———– जर मला मुलांना उत्तम प्रकारे वाढवायचे असेल, तर मी माझ्या व्यवसायाविषयी विसरायला हवे.

———– मी माझ्या व्यवसायात प्रगती करु शकतो आणि माझ्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्णपणे सांभाळू शकतो.

२. शिक्षण आणि धर्मकार्याची सेवा

———— शैक्षणिक गुणवत्ता ही सेवेच्या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी अनिवार्य आहे.

———— आपण शिक्षणाद्वारे जे ज्ञान मिळवितो, ती सेवेच्या क्षेत्रात एक जमेची बाजू आहे आणि सेवेच्या कर्मभूमीत आपण जे अनुभव मिळवितो, ते आपल्या क्षमता वाढवितात.

———— जर आपणास खरेच स्वत:ला धर्मकार्यासाठी वाहून घ्यायचे असेल, तर आपल्या शिक्षणाला तिलांजली द्यावी लागेल.

———— जगाच्या उत्थानार्थ जे काही प्रयत्न होतात, त्यांमध्ये धर्मश्रद्धेच्या शिकवणींचा वापर करावयास शिकणे हे आपल्या श्रेष्ठतम ध्येयांपैकी एक आहे.

———— आमच्या समुदायाच्या कल्याणासाठी आम्ही धर्मश्रद्धेच्या सेवाकार्यात ज्या क्षमता विकसित करतो त्यामुळे शिक्षणाचे योग्य क्षेत्र निवडण्यास आम्हास मदत मिळेल.

३. बौद्धिक विकास आणि आध्यात्मिक गुणांचा विकास

———— स्वतंत्रपणे सत्याचा शोध घेण्यासाठी बुद्धीचे संवर्धन करण्याची तसेच आध्यात्मिक गुण आत्मसात करण्याची आवश्यकता असते.

———— बौद्धिक विकासासाठी न्यायीपणा, प्रामाणिकपणा आणि पूर्वग्रहाचा अभाव आवश्यक आहे.

———— आध्यात्मिकतेचा विकास करण्यासाठी, व्यक्तीने आपल्या बुद्धीला तिलांजली द्यावी लागेल.

———— आमची मने आणि अंत:करणे एकमेकांपासून वेगळी नाहीत; ती एकाच सत्याच्या, आपल्या आत्म्याच्या, पूरक आणि परस्परकार्यप्रवण अंगांचे प्रतिनिधित्व करतात.

———— आध्यात्मिक गुणांचा विकास जाणीवपूर्वक ज्ञान आणि सत्कर्मांच्या उपयोगाने होतो.

४. भौतिक जीवन आणि आध्यात्मिक जीवन

———— आध्यात्मिक दृष्ट्या विकास करुन घेण्यासाठी आपण भौतिक सुखाला नाकारले पाहिजे.

———— आपण वयस्क होईपर्यंत आध्यात्मिक बाबी बाजूला ठेवल्या पाहिजेत; आपल्या युवावस्थेत भौतिक प्रगती करुन घेण्यासाठी प्रत्येक संधीचा लाभ घेतला पाहिजे.

———— आध्यात्मिक बाबींकडे लक्ष देण्यास तयार होण्यापूर्वी लोकांच्या भौतिक आवश्यकतांची पूर्ती होणे आवश्यक आहे.

———— ह्या पृथ्वीवरील जीवनाचा उद्देश माझे आध्यात्मिक गुण व शक्ती विकसित करणे आहे.

—————— ह्या पृथ्वीवरील माझ्या जीवनाचा उद्देश, सदैव प्रगत होत जाणारी सभ्यता पुढे नेणे हा आहे.

—————— जगाने ज्या देणग्या दिल्या आहेत त्या सर्वांचा आपण आस्वाद घेतला पाहिजे; परंतु ऐहिक इच्छांना आमच्या अंत:करणाचा ताबा घेण्यास आणि ईश्वराच्या अधिकाधिक निकट जाण्यापासून प्रतिरोध करण्यास अनुमती देऊ नये.

## विभाग ११

या घटकात आपण युवाकिशोरांना व्याख्याबद्ध करणाऱ्या गुणांविषयी फारसे नव्हे, तर युवा पुरुष आणि महिला, वयाने वाढत असताना पवित्र लेख त्यांच्यामध्ये कोणती गुणवैशिष्ट्ये असावीत असे जे सुचवितात, त्याविषयी विचार करीत आहोत. ह्यांपैकी काही गुणवैशिष्ट्यांविषयी अंतर्दृष्टी प्रदान करणाऱ्या दोन उद्धरणांकडे दृष्टिक्षेप करीत या शोधाची आपण सुरवात केली. नंतर आपण पाहिले, की वयाचे पंधरावे वर्ष व्यक्तीच्या जीवनात एक विशिष्ट बिंदू चिन्हांकित करते, कारण ते परिपक्वतेच्या उंबरठ्याचे प्रतिनिधित्व करते जेव्हा नवीन शक्ती आणि क्षमता केन्द्रस्थानी आणल्या जातात. धर्मकार्याच्या जीवनात युवक किती महत्त्वाची भूमिका बजावू शकतात आणि त्यांच्या प्रचंड क्षमता धर्मकार्याच्या सेवेकडे वळविणे किती महत्त्वाचे आहे, हे आपण जाणतो. युवांनी त्यांच्या भावी जीवनासाठी स्वत:ला हेतुपूर्वक तयार करण्याच्या आवश्यकतेलादेखील आम्ही मान्य केले आहे आणि आपण पाहिले आहे, की त्यांच्या शिक्षणासोबत सेवाभाव देखील या तयारीच्या प्रक्रियेचा एक आवश्यक भाग आहे —हे दोन्ही, उपजीविका मिळविण्यासाठी आणि धर्मकार्याची सेवा करण्यास त्यांच्या क्षमता वाढविण्यासाठी, ज्ञान व कौशल्ये प्राप्त करुन घेण्यास आवश्यक आहेत.

या बिंदूपर्यंत आपण कशाचा अभ्यास केला आहे, यावर चिंतन करण्यासाठी थोडे थांबणे आपणास उपयुक्त वाटेल. खाली बरीच विधाने दिली आहेत. प्रत्येकाचे वाचन करा व ते खरे आहे की खोटे हे ठरवा. काही बाबतीत उत्तर अगदी स्पष्ट असेल, तथापि आम्ही आशा बाळगतो, की आपण संपूर्ण सरावाकडे पुरेसे लक्ष द्याल. आतापर्यंत वापरण्यात आलेल्या साहित्याविषयी आपल्या विचारांना आकार देण्यास मदत व्हावी यासाठी आपणास या संकल्पनांच्या क्रमातून नेण्याचे योजले आहे.

—— एखाद्या व्यक्तीसाठी पंधरा वर्षांचे होणे म्हणजे परिपक्वतेच्या वयाला पोचणे होय, परंतु ते एक प्रकारे प्रतिकात्मक चिन्ह आहे आणि त्या व्यक्तीचे जीवन कोणत्याही प्रकारे सार्थकपणे प्रभावित करीत नाही.

—— बहुतांश युवा अपरिपक्व असतात आणि ते मोठी जबाबादारी पेलू शकत नाहीत; ते सहजपणे पथभ्रष्ट होतात व त्यांच्यावर विश्वास ठेवता येत नाही.

—— युवा धर्मश्रद्धेच्या कार्याची जबाबदारी घेण्यास उत्सुक असतात, परंतु त्यांच्या अनुभवहीनतेमुळे व अपरिपक्वतेमुळे, ते बरेच काही साध्य करण्यास असमर्थ असतात.

—— युवांमध्ये तत्पर होण्यास व धर्मश्रद्धेची आणि मानवतेची निरंतर आणि निस्वार्थीपणे सेवा करण्याची पूर्ण क्षमता असते.

—— युवा त्यांच्या समुदायाच्या सेवेसाठी, पद्धतशीर कृतीत गुंतण्यास आवश्यक असलेली इच्छाशक्ती आणि समर्पण प्रदर्शित करु शकतात.

—— जे धर्मश्रद्धेच्या सेवेसाठी त्यांच्या तारुण्याच्या उमेदीत उभे राहतात, ते अत्यंत आशीर्वादित असतात.

—— युवांनी त्यांचे बहुतांश लक्ष आपल्या अभ्यासावर केन्द्रित करावे; त्यांचा अतिरिक्त वेळ धर्मश्रद्धेच्या सेवेसाठी दिला जाऊ शकतो.

—— उच्च स्तरावरील शैक्षणिक प्रशिक्षण न घेता, युवा समाजाची प्रभावीपणे सेवा करू शकत नाहीत.

—— मानवी प्रयासाची सर्व क्षेत्रे युवांसाठी खुली आहेत; त्यांनी अशांची निवड करावी, जी त्यांच्या प्रतिभेला व परिस्थितीला अनुकूल आहेत, त्या क्षेत्रात त्यांनी सेवेच्या भावनेने प्रवेश करावा आणि उत्कृष्टतेसाठी झटावे.

—— ज्यांच्याशी युवा भेटतात, त्यांच्यासोबत धर्मश्रद्धेबद्दल अर्थपूर्ण संभाषण करण्यास युवांना पुरेसा अनुभव व ज्ञान नसते; त्यांनी अन्य मार्गांनी सेवा करणे उचित होय.

—— ज्यांच्याशी युवा भेटतात, त्यांच्यासोबत धर्मश्रद्धेबद्दल अर्थपूर्ण संभाषण करण्यास युवांना पुरेसा अनुभव व ज्ञान नसते आणि त्याऐवजी युवांनी अनुकरण करावे असे जीवनादर्श आचरण्यास त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे.

—— युवांमध्ये धर्मश्रद्धेच्या शिकवणी समजून घेण्याची व त्यांच्या सोबत्यांसोबत त्याची शिकवण देण्याची मोठी क्षमता असते.

—— युवांमध्ये धर्मश्रद्धेच्या शिकवणी समजून घेण्याची व त्यांची शिकवण सर्व स्तरांतील वयस्क व तरुण या दोहोंना सामायिक करण्याची मोठी क्षमता असते.

—— धर्मश्रद्धेची शिकवण इतरांसोबत सामायिक करण्यासाठी आवश्यक ज्ञान व क्षमता प्राप्त करण्यास युवा उत्सुक असतात.

—— युवा धर्मश्रद्धेच्या महानतम संसाधनांपैकी एक आहेत आणि त्यांना त्यांच्या समुदायाची आणि मानवतेची सेवा करण्यास सक्षम होण्यासाठी, उपयुक्त अध्ययन कार्यक्रमांद्वारे आणि अविरत प्रोत्साहनाद्वारे त्यांना साहाय्य करण्यात यावे.

—— युवांसाठी त्यांना मौजमजेची मुभा देणारे विशेष कार्यकलाप आवश्यक असतात कारण प्रदीर्घ काळासाठी गंभीर असणे त्यांच्यासाठी कठीण असते.

—— पद्धतशीर असण्याविषयीची शिकवण आयुष्यात नंतर येते, जेव्हा उत्स्फूर्तता संपली असते.

—— कठीण परिस्थिती सहन करण्याची आणि नवीन परिस्थितींशी जुळवून घेण्याची युवांची क्षमता त्यांच्यासाठी सेवाकार्याचे अनेक मार्ग उघडते.

—— युवकांची मने चौकस असतात आणि शिक्षणाद्वारे तसेच सामुदायिक जीवनात पूर्णपणे सहभागी झाल्याने ते त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळवू शकतात.

—— युवांद्वारे प्रदर्शित नि:स्वार्थी सेवेच्या चैतन्याद्वारे आमच्या समुदायात निहित असलेल्या महान क्षमता उघड होऊ शकतात.

—— परमेश्वराच्या वचनाची शक्ती युवांना शुद्धतेने आणि अलिप्ततेने सेवेच्या मार्गावर चालण्यास बळ देते.

—— संस्थेच्या अभ्यासक्रमांचा पाठ करून आणि संबंधित कार्यसेवेच्या कृतीत गुंतून, युवांनी विकसित केलेली वृत्ती आणि आध्यात्मिक गुण, कौशल्ये आणि क्षमता यामुळे त्यांना समुदाय उभारणीच्या गतिमान प्रक्रियेत निर्णायकपणे योगदान देणे शक्य होते.

—— जगातील युवांमध्ये असलेल्या समाजात परिवर्तन घडवून आणण्याच्या क्षमतेचा भांडार, अध्ययन आणि सेवेत सामील असलेल्या पद्धतशीर शैक्षणिक प्रक्रियेत त्यांच्या सहभागाद्वारे वापरला जाऊ शकतो.

## विभाग १२

आशा आहे की मागील विभागातील सरावाने युवावस्थेसंबंधीची आपली समज सुगठित करण्यास मदत केली असेल आणि जीवनाच्या या अवस्थेची जी प्रतिमा आपण प्राप्त केली आहे, ती ही की शालेय शिक्षणासह सक्रिय सेवा —दोन्ही भविष्याविषयी चिकाटीने तयारी म्हणून आवश्यक आहे. आपण ह्या मुद्द्यावर अधिक विचार करुया.

सेवा, शिक्षण व तयारी यांदरम्यानचा परस्परसंबंध, ज्याविषयी आपण चर्चा केली, तो एका विशिष्ट संदर्भात विकसित होणे आवश्यक आहे. विशेषत:, धर्मश्रद्धेच्या लेखांमध्ये अपेक्षिलेल्या परिवर्तनाच्या दोन प्रक्रियांना त्याने हातभार लावावा: व्यक्तीचा जबर बौद्धिक व आध्यात्मिक विकास आणि समाजाचे परिवर्तन. आपण जाणतो की बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाचे, “सर्वश्रेष्ठ आणि विशेष उद्दिष्ट, जे मनुष्यमात्राची नवीन प्रजाती अस्तित्वात आणण्याव्यतिरिक्त दुसरे कोणतेही नाही,” आणि आपल्यापैकी प्रत्येकजण त्याचे किंवा तिचे विचार व कृती पवित्र ग्रंथामध्ये चित्रित केलेल्या व्यक्तीच्या विचारांशी व कृतींशी संलग्नित करण्याचा प्रयत्न करतो. पवित्र लेख समाज रचनेच्या अशाच सखोल परिवर्तनावर भर देतात. “शीघ्र ही वर्तमान दिनाची कार्यव्यवस्था गुंडाळली जाईल,” बहाउल्लाह आम्हास सांगतात, “आणि त्याऐवजी एक नवीन कार्यव्यवस्था प्रसृत होईल.” ते उद्घोषित करतात, “चिरस्थायी संस्कृतीला पुढे नेण्यासाठी मानवाची निर्मिती केली गेली आहे.”

हे दुहेरी परिवर्तन केवळ जाणीवपूर्वक प्रयत्नाद्वारेच घडेल, आणि युवांनी त्याचे त्यांच्या जीवनावरील प्रभाव समजून घेणे, आपल्या स्वत:चा वैयक्तिक विकास आणि सामाजिक परिवर्तनास हातभार या दोहोंची जबाबदारी घेणे, या उद्देशाच्या प्रबळ भावनेने युक्त होणे अत्यावश्यक आहे. असा द्विविध उद्देश सेवावृत्तीच्या जीवनात नैसर्गिकपणे प्रदर्शित होईल.

खालील उद्धरणे, ह्या नैतिक उद्देशाच्या भावनेचा एक पैलू, जो आपल्या स्वत:च्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाशी संबंधित आहे, त्यावर प्रकाश टाकतात:

**“त्या एकमेव सत्य परमेश्वराचा स्वत:स प्रगट करण्यामधील हेतु सर्व मानवजातीस सत्यता आणि**

**प्रामाणिकता, पावित्र्य आणि विश्वासपात्रता, परमेश्वरी इच्छेपुढे शरणागती आणि अनासक्ती, सहनशीलता आणि दयाळूपणा, न्यायनिष्ठा आणि बुद्धिमत्ता यासाठी पाचारण करणे होय. त्याचे उद्दिष्ट प्रत्येक मानवास सत्त्वशील चारित्र्याच्या पोषाखाने सजविणे आणि त्यास पवित्र आणि उदात्त कृत्यांच्या अलंकाराने भूषविणे होय."**[१५]

**"नैतिक उत्कृष्टतेचे अनुसरण आणि ईश्वराच्या दृष्टीत विलोभनीय अशा गुणांची प्राप्ती ही ईश्वराच्या मार्गात जगलेल्या जीवनाची आधारशिला होय."**[१६]

**"ज्ञानार्जन करणे, उच्च आध्यात्मिक निपुणता प्राप्त करणे, दडलेले सत्य शोधणे आणि ईश्वराचे देखील गुण प्रदर्शित करणे हे मनुष्याचे संचित होय."**[१७]

**"मानवाने त्याच्या निर्मात्याला जाणावे आणि त्याचे सान्निद्य प्राप्त करण्यास पात्र व्हावे यासाठी त्याची निर्मिती करणे ईश्वराचा हेतु आहे आणि सदा राहील."**[१८]

१. वरील उद्धरणांच्या आधारे खालील वाक्ये पूर्ण करा:

क. त्या एकमेव सत्य परमेश्वराचा स्वत:स प्रगट करण्यामधील हेतु सर्व मानवजातीस ———————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

——————————————————————————— यासाठी पाचारण करणे होय.

ख. ईश्वराचे उद्दिष्ट प्रत्येक मानवास ——————— ——————— ——————— सजविणे आणि त्यास ——————— आणि ——————— कृत्यांच्या ——————— भूषविणे होय.

ग. ——————— ——————— ——————— आणि ईश्वराच्या ——————— ——————— अशा —————— ————— ही ईश्वराच्या ——————— जगलेल्या ——————— आधारशिला होय.

घ. ——————— करणे, —————— ——————— ——————— प्राप्त करणे, ——————— —————— शोधणे आणि ——————— देखील ——— ——————— करणे हे मनुष्याचे ——————— होय.

च. मानवाने त्याच्या ———————— —————— आणि त्याचे ———————— प्राप्त करण्यास ——————— व्हावे यासाठी त्याची ——————— करणे ———————— हेतु आहे आणि ————— राहील.

२. मानवी आत्म्यात अंगभूत असलेली संभावनांची दृष्टी असणे व्यक्तीच्या उद्देश भावनेला आकार देते आणि निर्देशित करते. हे आपण कशाप्रकारे स्पष्ट करू शकता? ——————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

३. हे पार्थिव जीवन ईश्वराच्या सान्निध्याकडे जाणाऱ्या चिरंतन प्रवासाचा एक छोटासा भाग आहे या ज्ञानाने एखाद्या व्यक्तीच्या उद्देशाची भावना अधिक दृढ होते. आपण हे स्पष्ट करू शकता का? ————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

उद्धरणांचा पुढील संच ह्या नैतिक उद्देशाच्या भावनेच्या दुसऱ्या पैलूवर प्रकाश टाकतो, ते म्हणजे समाजाच्या परिवर्तनास हातभार लावणे:

**"हा अन्यायपीडित साक्ष देतो की, ज्या उद्देशासाठी नश्वर मानवांनी, पूर्ण शून्यतेमधून अस्तित्वाच्या जगात पाऊल ठेवले आहे, ते हे आहे की त्यांनी जगाच्या उन्नतीसाठी कार्य करावे आणि एकत्रितपणे सामंजस्यात व सद्भावामध्ये राहावे."**[१९]

**"आणि व्यक्तीचे सन्मान आणि विशेषत्व ह्यामध्ये सामावते, की तो जगाच्या सर्व नानाविधांमध्ये सामाजिक कल्याणाचा उगमस्थान बनावा. यापेक्षा अधिक मोठी कृपा कल्पनीय आहे काय, की एका व्यक्तीस आपल्या अंतर्यामी डोकावत असताना आढळते, की ईश्वराच्या सुदृढ कृपेने तो शांतीचा व कल्याणाचा, आपल्या सहयोगी मानवांच्या सुखाचा व सुविधांचा साधन बनला आहे? नव्हे, एकमेव सत्य परमेश्वराची शपथ, यापेक्षा मोठा आनंद, यापेक्षा अधिक मोठी प्रसन्नता नाही."**[२०]

**"मानव किती उत्तम, किती गौरवशाली आहे, जर तो त्याच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास पुढाकार घेतो; किती दुर्दैवी आणि तिरस्करणीय जर तो समाजाच्या कल्याणाकडे डोळेझाक करतो आणि आपल्या स्वार्थी हितांचा व व्यक्तिगत फायद्यांचा पाठपुरावा करण्यात आपले मौल्यवान जीवन वाया घालवितो."**[२१]

**"तुम्ही स्वत:च्याच हितसंबंधात व्यस्त राहता कामा नये; ज्या गोष्टींनी मानवजातीचे भविष्य उजळेल आणि मानवी अंत:करण व आत्मा पवित्र होईल, अशावर तुमचे लक्ष केंदित करा."**[२२]

**"जे परमेश्वराचे भक्त आहेत त्यांची, जगात नवचैतन्य निर्माण करणे, त्याचे जीवन उदात्त करणे आणि त्याच्या लोकांना पुनरुज्जीवित करणे याशिवाय अन्य महत्त्वाकांक्षा नाही."**[२३]

१. वरील उद्धरणांच्या आधारे खालील वाक्ये पूर्ण करा:

क. आम्ही ज्या उद्देशासाठी, पूर्ण शून्यतेमधून अस्तित्वाच्या जगात पाऊल ठेवले आहे ते हे आहे की आम्ही ————————— ————————— कार्य करावे आणि ——————————— ————————— व ——————————— राहावे.

ख. व्यक्तीचा सन्मान आणि विशेषत्व ह्यामध्ये सामावते, की ——————————————— ———————————————————————————————————

ग. यापेक्षा अधिक मोठी कृपा कल्पनीय नाही, की एका व्यक्तीस आपल्या अंतर्यामी डोकावत असताना आढळते, की ———————————————————————————————— ——————————————————————————————————— ——————————————————————————————— बनला आहे?

घ. मानव किती गौरवशाली आहे, जर तो त्याच्या ————————— पूर्ण ————————— ————————— घेतो; किती दुर्दैवी आणि तिरस्करणीय जर तो ———————— ————————— ————————— करतो आणि आपल्या ——————— ———————— व व्यक्तिगत ————————— पाठपुरावा करण्यात आपले ——————— जीवन —————— —————————.

च. आपण स्वत:च्याच ————————— व्यस्त राहता कामा नये; ज्या गोष्टींनी ———————— ————————— उजळेल आणि मानवी ————————— व ————————— पवित्र होईल, अशावर तुमचे ———————— ————————— करा.

छ. जे परमेश्वराचे भक्त आहेत त्यांची, जगात ————————— ———————— करणे, त्याचे ————————— ———————— करणे आणि त्याच्या लोकांना ——————————— करणे याशिवाय अन्य ——————————— नाही.

२. विकासाच्या या अवस्थेत, जेव्हा मानवजातीचे एका समान कुटुंबात एकत्रीकरण होणे ही वास्तविक शक्यता आहे, अशा वेळी तिला ज्या भव्य संधी उपलब्ध आहेत, त्यांची झलक व्यक्तीच्या उद्देशाच्या भावनेला आकार देते आणि निर्देशित करते. हे आपण कसे स्पष्ट करू शकता? ————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

३. व्यक्तीची उद्देशाविषयीची संवेदना आणि हा समज की मानवजात दैवी सभ्यतेकडे नेणाऱ्या प्रदीर्घ उत्क्रांतीच्या मार्गावर आहे. हे आपण स्पष्ट करू शकता का? ————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

## विभाग १३

मागील विभागातील सरावांद्वारे सूचित केल्याप्रमाणे, व्यक्ती आणि समाजातील बदलाचे जे स्वरुप पवित्र लेखांमध्ये अपेक्षिले आहे, त्याबद्दलची जाणीव युवांमध्ये जी उद्देशाची संवेदना असायला पाहिजे, त्यासाठी आधारभूत आहे. त्या रत्नासमान गुण प्राप्त करण्यासाठी ज्या "त्याच्या सत्य व अंतर्गहन स्वत्वाच्या खाणीत दडलेली आहेत" आणि भौतिक व आध्यात्मिक दृष्ट्या प्रगतिशील वैश्विक सभ्यतेच्या निर्मितीला हातभार लावण्यासाठी, बहाउल्लाह यांनी अपेक्षिलेल्या परिवर्तनाच्या महानतेला त्यांनी समजून घेतले पाहिजे. अर्थातच, लोक सर्वत्र बदलाच्या आवश्यकतेविषयी बोलतात. आपण जे लक्षात घ्यायला पाहिजे ते हे, की बहाउल्लाह यांच्या प्रकटीकरणाच्या प्रत्यक्ष प्रभावाखाली व्यक्ती व समाजात जे परिवर्तन नियत आहे, ते बहुतांश लोक शक्य असल्याचे कल्पितात त्याहून देखील कितीतरी मोठे आहे.

कित्येक उद्धरणांवर चिंतन करुन व्यक्तीच्या स्तरावर जो बदल घडावयाचा आहे, त्याच्या महानतेची झलक मिळविण्याचा प्रयत्न आपण करुया. बहाउल्लाह आम्हास सांगतात:

> **"चारित्र्यात अतुलनीय अशी मनुष्याची प्रजाती तयार केली जाईल, जी अनासक्तीच्या पावलांनी जे काही स्वर्गात आणि पृथ्वीवर आहे त्यास नष्ट करतील आणि जे काही पाणी आणि मातीपासून निर्मिण्यात आले आहे, त्यावर पावित्र्याची अस्तनी चढवतील."**[२४]

आणि एका उद्धरणात बहाउल्लाह उद्घोषित करतात:

> **“म्हणा: जो आपल्या ऐहिक इच्छांचा पाठलाग करतो किंवा पृथ्वीच्या गोष्टींवर आपले अंत:करण खिळवितो, त्याची गणना बहाच्या अनुयायांमध्ये केली जाऊ नये. तो माझा खरा अनुयायी आहे, जो जर शुद्ध वर्णांच्या दरीसमीप येता तिच्यामधून निरिच्छ ढगासमान निघून जाईल आणि ना तर मागे वळेल, ना थांबेल. असा मानव निर्विवादपणे माझा आहे. त्याच्या परिधानापासून स्वर्गीचा मेळा पावित्र्याच्या सुगंधाचा श्वास घेऊ शकतो.”**[२५]

दुसऱ्या उद्धरणामध्ये ते नमूद करतात:

> **“ह्या दिनात ईश्वराचे सहचर हे असे पुंज आहेत, ज्यांनी निश्चितपणे जगाच्या लोकांना उत्प्रेरित करावे. त्यांनी अशी विश्वासपात्रता, अशी सत्यनिष्ठा व उद्यमशीलता, अशा कृती व चारित्र्य प्रदर्शित करावे, की संपूर्ण मानवजात त्यांच्या आदर्शाने लाभान्वित व्हावी.”**[२६]

आणि पुढे ते स्पष्ट करतात:

> **“अशा आत्म्यांच्या नि:श्वासामध्ये, ते शुद्ध व पवित्र असल्याकारणाने, दूरगामी गर्भित शक्ती दडलेल्या असतात. ह्या शक्ती एवढ्या प्रबळ असतात, की त्या आपला प्रभाव सर्व निर्मित वस्तूंवर गाजवितात.”**[२७]

अब्दुल–बहा आम्हास सांगतात:

> **“हे तुम्ही ईश्वराच्या मित्रांनो! तुम्ही असा अफाट प्रयत्न करा, की जगातील समस्त लोक आणि मानवबांधव, एवढेच नव्हे तर शत्रूदेखील, त्यांची आस्था, विश्वास आणि आशा तुमच्यावर ठेवोत. जर एखादी व्यक्ती शेकडो, हजारो वेळा गैरकृत्ये करते, तरीही तो माफीची आशा बाळगू शकतो आणि निराश किंवा दु:खी होणार नाही. बहाच्या सेवकांचे आचरण आणि वर्तन असे असले पाहिजे. असा हा उदात्ततेच्या मार्गाचा पाया आहे. तुमचे आचरण आणि शिष्टाचार अब्दुल–बहा यांच्या सल्ल्यासोबत सुसंगत असू द्या.”**[२८]

पवित्र लेखात वर्णन केल्याप्रमाणे ह्या नवीन मनूचे चित्रण करणाऱ्या गुणांची दीप्ती अत्यंत प्रखर आहे आणि या “मनुष्यमात्राच्या नवीन प्रजाती” च्या शक्तींची व क्षमतांची जी झलक आम्हास मिळते, त्याने आम्ही अचंबित होतो. अशी उद्धरणे वाचल्यानंतर आमची प्रतिक्रिया अनेक प्रकारची असू शकते. आम्हाला असा विचार करावासा वाटेल, की पवित्र लेखांद्वारे निर्धारित केलेले मानक आमच्या एवढे आवाक्याबाहेरचे आहेत, की आम्ही द्विधा स्थितीत पडतो; अशा अवस्थेत आम्ही हा विश्वास बाळगण्यात समाधान मानतो, की केवळ अशोभनीय वागणूक टाळणे, एवढेच पुरेसे आहे. तथापि, जेव्हा एखाद्या व्यक्तीमध्ये उद्देशाची प्रबळ संवेदना जागृत होते, तेव्हा वरील प्रकारची उद्धरणे प्रोत्साहनाचे कायम स्त्रोत असतात व त्यास उच्चतेकडे जाण्यास प्रेरित करतात.

तरीही, अब्दुल–बहांच्या व्यक्तित्वात, जे त्यांच्या पित्याच्या शिकवणींचे परिपूर्ण प्रतीक होते, आपणास दुसऱ्या स्त्रोताचे वरदानदेखील प्राप्त झाले आहे. आपण जरी जाणत असलो, की अब्दुल–बहांचे विचरण त्यांच्या स्वत:च्या विशिष्ट कक्षेत असले आणि कोणताही मनुष्य त्यांच्या उन्नत पदाची प्राप्ती करण्याची कधीही आशा करु

शकत नाही, तरी आपण त्यांच्यात प्रत्येक बहाई आदर्श मूर्तरुपात पाहतो आणि त्यांनी सोदाहरण दाखविलेल्या आचरणाच्या मानदंडाकडे जाण्याचा प्रयत्न करतो. वरील उद्धरणांमधून वाक्यांश निवडणे आणि त्यांत सांगितलेले गुण प्रदर्शित करणाऱ्या अब्दुल–बहा यांच्या जीवनातील घटनांविषयी विचार करणे, हे आपणासाठी आणि हा अभ्यासक्रम शिकत असणाऱ्या मित्रांसाठी उपयोगी राहील. उदाहरणार्थ, जेव्हा आम्ही "अनासक्तीच्या पावलांनी" चालणे दृष्टिक्षेपात आणण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा सर्व निर्मित वस्तूंपासून अनासक्त राहून या जगातून जाणे म्हणजे काय, हे दर्शविणाऱ्या त्यांच्या जीवनातील गोष्टी मनात येतात. जेव्हा आपण "पवित्रतेचा सुगंध" याविषयी विचार करतो, तेव्हा जाणतो की ते त्यांचे "वस्त्रपरिधान" आहे ज्यापासून "स्वर्गीय वृन्द" त्याच्या माधुर्याचा श्वास घेऊ शकतील आणि आम्हास अब्दुल–बहांची निखळ पवित्रता दर्शविणाऱ्या गोष्टी आठवतात.

## विभाग १४

आता आपण समाजाच्या स्तरावर घडावी अशा परिवर्तनाच्या सखोल प्रक्रियेचा विचार करुया. बहाउल्लाह म्हणतात:

**"माझ्या स्वत:ची शपथ! तो दिवस समीप येत आहे जेव्हा आम्ही जग आणि त्यात असलेले सर्व काही गुंडाळले असेल आणि त्याऐवजी एक नवीन कार्यव्यवस्था प्रसृत केली असेल."**[२९]

ते आम्हास पुढे सांगतात:

**"या महानतम, या नूतन जागतिक व्यवस्थेच्या थरारक प्रभावाने ह्या जगाचे संतुलन ढळले आहे. ही अद्वितीय, तसेच अद्भुत प्रणाली, जी मानवी नेत्रांनी अद्याप पाहिली नव्हती, तिच्या माध्यमाने मानवाच्या सुव्यवस्थित जीवनात क्रांती घडविली आहे."**[३०]

आणि अब्दुल–बहा पुष्टी करतात:

**"...न्याय आणि नीतीपरायणता संपूर्ण पृथ्वीवर व्याप्त होईल; द्वेष आणि शत्रुत्व अस्तास जातील; जे काही लोक, वंश आणि राष्ट्रांमध्ये विभाजनाचे कारण असेल ते नष्ट केले जाईल; आणि जे ऐक्य, सामंजस्य आणि सुसंगती सुनिश्चित करतात त्याला प्रोत्साहन दिले जाईल. निष्काळजी लोक त्यांच्या गाढ निद्रेतून जागे होतील; नेत्रहीन बघू शकतील; बधीर ऐकू शकेल; मुके बोलू लागतील; आजाऱ्यांना स्वास्थ्यलाभ होईल; मृत सजीव होऊन उठतील; आणि युद्ध शांततेला मार्ग देईल. शत्रुत्वाचे रूपांतर प्रेमात होईल; कलह व विवादांची मूळ कारणे सर्वथा नाहीशी करण्यात येतील; मानवजातीला खरा हर्षोल्हास मिळेल; हे जग स्वर्गीय साम्राज्यास प्रतिबिंबित करेल; आणि ही पृथ्वी उच्चस्थानातील स्वर्गीय साम्राज्याचे सिंहासन बनेल."**[३१]

दुसऱ्या प्रसंगी ते स्पष्ट करतात:

**"मानवजातीच्या सुरवातीच्या इतिहासकाळात मानवी आवश्यकतांना जे लागू होते, ते ह्या दिनाच्या आणि**

**नवीनता व सिद्धीच्या काळाच्या मागण्या पूर्ण करु शकत नाही किंवा भागवू शकत नाही. मानवजात तिच्या आधीच्या मर्यादेच्या व प्राथमिक प्रशिक्षणाच्या अवस्थांमधून बाहेर पडली आहे. मनुष्य आता नवीन सद्‌गुणांनी आणि शक्तींनी, नवीन नीतितत्त्वांनी व नवीन क्षमतांनी युक्त व्हायलाच हवा. नवीन कृपा, वरदाने आणि परिपूर्णता प्रतीक्षा करीत आहेत आणि प्रत्यक्ष त्याच्यावर वर्षत आहेत."**[३२]

आणि ते आम्हास उपदेश देतात:

**"...आश्रित जगाचा काळोख दूर व्हावा यासाठी आम्ही अंत:करणपूर्वक व आत्म्यापासून झटावे, जेणेकरुन दैवी साम्राज्याचे दीप सर्व क्षितिजांवर चमकावेत, मानवजातीचे विश्‍व प्रकाशित व्हावे, मानवी आरशांमध्ये ईश्‍वराची प्रतिमा दृश्यमान व्हावी, ईश्‍वराचा कायदा सुस्थापित व्हावा आणि जगाच्या सर्व प्रदेशांनी ईश्‍वराच्या न्यायोचित संरक्षणाखाली शांतीचा, प्रसन्नतेचा आणि स्थैर्याचा आनंद उपभोगावा."**[३३]

जसे की व्यक्तीच्या बाबतीत आहे, त्याचप्रमाणे अस्तित्वात येणे नियत असलेल्या सभ्यतेच्या संपूर्ण वैभवाची कल्पना करणे, आपणासाठी कठीण आहे. खरेच, तिच्या रुपरेषांचे वर्णन करणे क्वचितच शक्य आहे. तथापि ते आपल्या प्रयत्नांशिवाय किमयेने घडेल असे वाटण्यापेक्षा, आवश्यक असलेल्या परिवर्तनाच्या प्रमाणाने आपण अधिक अचंबित होऊ शकणार नाही. आमचे नेत्र बहाउल्लाह यांच्या वैश्‍विक कार्यव्यवस्थेवर खिळलेले असावेत, आणि आम्ही ओळखले पाहिजे, की एक लहानशी कृतीदेखील तिच्या निर्मितीकडे हातभार लावू शकते. समाजात घडत असलेल्या बदलांच्या प्रमाणावर अधिक चिंतन करण्यासाठी, खालीलपैकी एका शब्दाचा किंवा वाक्यांशाचा उपयोग करुन अधोलिखित प्रत्येक वाक्यातील रिक्त जागा भरा.

अस्तास जाणे, नष्ट होणे, मार्ग देणे, प्रसृत करणे, प्रकाशित होणे, सुस्थापित होणे, रूपांतर, नाहीशी करणे, गुंडाळणे, दूर होणे, मिळणे, व्याप्त करणे, प्रोत्साहन देणे, आनंद उपभोगणे, प्रतिबिंबित करणे, चमकावणे

क. तो दिवस समीप येत आहे जेव्हा आम्ही जग आणि त्यात असलेले सर्व काही ———————————— असेल.

ख. तो दिवस समीप येत आहे जेव्हा नवीन कार्यव्यवस्था ————————————— केली असेल.

ग. न्याय आणि नीतीपरायणता संपूर्ण पृथ्वीवर ————————————— होईल.

घ. शत्रुत्व आणि द्वेष ————————————— जातील.

च. जे काही लोक, वंश आणि राष्ट्रांमध्ये विभाजनाचे कारण असेल ते ————————— केले जाईल.

छ. जे ऐक्य, सामंजस्य आणि सुसंगती सुनिश्‍चित करतात त्याला ———————————— दिले जाईल.

ज. युद्ध शांततेला ————————————— देईल.

झ. शत्रुत्वाचे ————————————— प्रेमात होईल.

ट. कलह व विवादांची मूळ कारणे सर्वथा —————————————— करण्यात येतील.

ठ. मानवजातीला खरा हर्षोल्हास ——————————————.

ड. हे जग स्वर्गीय साम्राज्यास —————————————— करेल.

ढ. आश्रित जगाचा काळोख —————————————— होईल.

त. दैवी साम्राज्याचे दीप सर्व क्षितिजांवर ——————————————.

थ. मानवजातीचे विश्व —————————————— व्हावे.

द. ईश्वराचा कायदा —————————————— व्हावा.

ध. जगाच्या सर्व प्रदेशांनी ईश्वराच्या न्यायोचित संरक्षणाखाली शांतीचा, प्रसन्नतेचा आणि स्थैर्याचा —————————————— उपभोगावा.

## विभाग १५

मागील दोन विभागांतील उद्धरणांनी व सरावांनी बहाउल्लाह यांच्या प्रकटीकरणामुळे व्यक्ती आणि समाजामध्ये जे सखोल परिवर्तन घडणार आहे, त्याविषयी अंतर्दृष्टी प्रदान केली आहे. त्यांनी अपेक्षिलेल्या परिवर्तनाच्या महानतेवर अधिक विचार करण्यासाठी खालील विधाने वाचा. प्रत्येक विधान व्यक्ती किंवा समाजाच्या न्यायीपणा, औचित्य, प्रेमळ दया अशांसारख्या काही स्तुत्य गुणांची अभिव्यक्ती करते. तथापि, मागील विभागांतील उद्धरणे निःसंशय दाखवितात, की बहाउल्लाह यांनी मानवजातीला व्यक्तिगत व सामूहिक आचरणाच्या बऱ्याच वरच्या स्तराकडे पाचारण केले आहे. वाक्यांपैकी प्रत्येकाचे पुनर्शब्दांकन करण्याचा प्रयत्न करा, जेणेकरुन ते बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाने निर्धारित केलेला स्तर अधिक स्पष्टपणे दर्शवील. आपणास साहाय्य करण्यासाठी पहिल्या विधानाबद्दलचे उदाहरण दिलेले आहे.

क. व्यक्तीने ईर्षेच्या आपल्या भावनांचे नियंत्रण करावे, त्यांच्याद्वारे आपला व्यय होऊ देऊ नये.

ख. आपण आपल्या अंतःकरणातून ईर्षेचा कोणताही लवलेश पुसून काढावा आणि इतरांच्या यशात प्रामाणिकपणे आनंद दर्शवावा.

क. आपण ज्या प्रत्येकाला भेटतो त्याच्याशी विनम्र असणे पुरेसे आहे, मग ते मित्र असो वा अनोळखी.

ख. ————————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————————

क. ईश्वराने आम्हाला दिलेल्या संपत्तीसाठी आम्ही कृतज्ञ असावे आणि जेव्हा मागितले जाते, तेव्हा दानात सहभागी व्हावे.

ख. ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

क. व्यक्तीने इतरांशी वादात न शिरण्याबद्दल प्रयत्नशील राहावे.

ख. ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

क. नैतिक जीवन जगण्याचा अर्थ होतो, की आपण कुणासही इजा पोहचवू नये.

ख. ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

क. शांततेत राहण्यासाठी आम्ही विविध संस्कृतींच्या, पार्श्वभूमींच्या आणि धर्मांच्या लोकांना सहन करण्यास शिकले पाहिजे.

ख. ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

क. लोकांनी त्यांच्या अधिकारांसाठी उभे राहण्यास शिकले पाहिजे.

ख. ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

क. अशा शाळा ज्या आपल्या भावी नेत्यांची मने प्रशिक्षित करीत आहेत, त्यांना शक्य तेवढे चांगले कार्यक्रम तयार करण्यासाठी आवश्यक ती साधने पुरविणे शासनांसाठी अत्यावश्यक आहे.

ख. ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

क. गुन्हेगारांचे पुनर्वसन करण्यासाठी तुरुंगांचे आधुनिकीकरण करण्यात यावे.

ख. ———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

आता खालील उद्धरणांच्या प्रकाशात तुम्ही लिहिलेल्या वाक्यांवर चिंतन करा. पहिले उद्धरण ऐहिक इच्छांपासून हृदय किती परिशुद्ध असावे, ह्याविषयी विचार करण्यास साहाय्य करते:

**"हे मृत्तिका पुत्रा! हे खरोखर जाण की, ज्या मनुष्याच्या हृदयात मत्सराचा एक अंश देखील असेल तर तो माझी शाश्वत सत्ता कधीच प्राप्त करू शकणार नाही किंवा त्याच्याप्रत पावित्र्याच्या माझ्या राज्यापासून तरंगणारा मधुर परिमल कधीच पोहचू शकणार नाही."**[३४]

आपण एकमेकांशी कशा प्रकारे वागावे, याविषयी खालील उद्धरण काही अंतर्दृष्टी पुरविते:

**"आपल्या प्रेमाचे चैतन्य आणि कृपाळूपणा इतके प्रबळ असले पाहिजेत, की अनोळखी व्यक्ती आपणास त्याचा एक खरा मित्र मान्य करू शकेल, एक शत्रू आपणास खरा भाऊ मानेल, आपण त्यांच्या दरम्यान कोणताच फरक अस्तित्वात आणू नये."**[३५]

हे उद्धरण दानाविषयी योग्य प्रवृत्तीवर प्रकाश पाडते:

**"हे धुळीच्या बालकांनो! गरीबांच्या मध्यरात्रीच्या उसाशांविषयी श्रीमंतांना जागरूक करा, नाही तर निष्काळजीपणा त्यांना सर्व विनाशाच्या मार्गावर नेईल आणि त्यांना दिव्य संपत्तीच्या वृक्षापासून वंचित करील. दातृत्व व औदार्य माझे गुणधर्म आहेत; त्याचे कल्याण असो, जो माझ्या सद्‌गुणांनी स्वतःस भूषवितो."**[३६]

इतरांशी आपल्या संबंधांच्या स्वरुपाविषयी आपण वाचतो:

**"तू प्रेमाचा आवाहनकर्ता राहा आणि तू सर्व मानवजातीसाठी दयावान राहा. तू मनुपुत्रांवर प्रेम कर आणि त्यांच्या दुःखात सहभागी हो. तू त्यांच्यापैकी हो जे शांतीचे पोषण करतात. तुझी मैत्री दे, विश्वासपात्र राहा. प्रत्येक रूग्णासाठी दुःखशामक हो, प्रत्येक आजारासाठी औषध हो. तू आत्म्यांना एकत्रित कर. तू मार्गदर्शनाच्या श्लोकांचे पठण कर. तू तुझ्या स्वामींच्या आराधनेत व्यस्त राहा आणि लोकांना योग्य दिशेने नेण्यास तत्पर हो. तुझ्या जिव्हेला सैल कर व प्रचार–प्रसार कर आणि ईश्वराच्या प्रेमाग्नीने तुझे मुखमंडल तेजस्वी असू दे. तू क्षणासाठीदेखील विश्रांती घेऊ नकोस, आरामाचा श्वास घेण्याचे चिंतू नकोस. अशा रीतीने तू ईश्वराच्या प्रेमाचे चिन्ह आणि प्रतीक आणि त्याच्या कृपेची पताका हो."**[३७]

आणि नैतिक आचरणाच्या प्रश्नाविषयी, आम्हास सल्ला दिला जातो:

**"ते दिवस संपले आहेत, जेव्हा सुस्त पूजा पुरेशी मानली जाई. अशी वेळ आलेली आहे, जेव्हा केवळ निष्कलंक शुद्धतेच्या कृतींचे पाठबळ असलेला अतिपवित्र उद्देश, महानतम सिंहासनाप्रत पोहचू शकतो आणि ईश्वरास स्वीकार्य असू शकतो."**[३८]

निरनिराळ्या पार्श्वभूमींच्या लोकांसोबत करावयाच्या व्यवहाराविषयी हे उद्धरण आम्हास अंतर्दृष्टी पुरविते:

**“जगाच्या सर्व लोकांशी, मानवबांधवांशी आणि धर्मांशी परिपूर्ण सत्यनिष्ठेने, प्रामाणिकतेने, विश्वासाने, दयाभावनेने, सद्‌भावनेने आणि मित्रत्वाने ओतप्रोत व्हा, जेणेकरून सर्व जग बहाच्या तेजकृपेच्या पवित्र तन्मयावस्थेने भरून जाईल, ज्यामुळे जगातून अज्ञान, शत्रुत्व, द्वेष आणि घृणा यांचा नामशेष होईल आणि विश्वातील लोक आणि मानवबांधवांमधील वियोगाचा अंधार दूर होऊन त्यांना एकतेच्या प्रकाशाचा मार्ग प्राप्त होऊ शकेल. जर इतर लोक आणि राष्ट्रे तुमच्याशी अविश्वासू असतील तर त्यांच्याशी तुम्ही निष्ठा दाखवावी, जर ते तुम्हांसोबत अन्यायाने वागले तर तुम्ही त्यांच्यासोबत न्यायाने वागा, जर ते तुमच्यापासून अलिप्त असतील तर त्यांना तुमच्याकडे आकर्षित करा, जर त्यांनी तुमच्याशी शत्रुत्व दाखवले तर त्यांच्याशी मित्रत्वाने वागा, जर ते तुमचे जीवन विषाक्त करतील तर त्यांच्या आत्म्यांना गोडवा द्या, जर ते तुम्हास इजा पोहचवतील तर तुम्ही त्यांच्या व्रणांचा उपचार बना. असे आहेत प्रामाणिकाचे गुणधर्म! असे आहेत सत्यनिष्ठांचे गुणधर्म.”**[३९]

मानवमात्राच्या एकत्वाची जाणीव कशा प्रकारे सामाजिक संबंध प्रभावित करते हे समजण्यास खालील उद्धरण मदत करते:

**“मला आशा आहे, की तुम्हापैकी प्रत्येक न्यायी बनेल आणि तुमचे विचार मानवतेच्या एकतेकडे वळवेल; तुम्ही ना तर तुमच्या शेजाऱ्यांना इजा पोहचवाल ना कुणाविषयी वाईट बोलाल; तुम्ही सर्व लोकांच्या अधिकारांचा आदर कराल आणि तुमच्या स्वतःच्या हितापेक्षा इतरांच्या हिताविषयी अधिक जागरुक राहाल.”**[४०]

शिक्षणाच्या संधीविषयी, खालील उद्धरण या विषयाची दखल घेते:

**“बहाउल्लाह ह्यांनी घोषित केले आहे, की ज्या अर्थी अज्ञान आणि शिक्षणाचा अभाव, हे मानवजातीमधील दुराव्याचे अडथळे आहेत, तेव्हा सर्वांना प्रशिक्षण आणि शिक्षण मिळालेच पाहिजे. या पूर्तीद्वारे परस्परसमजुतीच्या अभावावर उपाययोजना होईल आणि मानवजातीची एकता पुढे जाईल व उन्नत होईल. विश्वव्यापी शिक्षण हा वैश्विक कायदा आहे.”**[४१]

न्यायाधिकरणाविषयी आपण खालील वाचतो:

**“तथापि, दैवी सभ्यता समाजाच्या प्रत्येक सदस्याला अशा प्रकारे प्रशिक्षित करते, की नगण्य अशा काहींचा अपवाद वगळता, कुणीही गुन्हा करण्यास प्रवृत्त होणार नाही. अशा प्रकारे हिंसक आणि प्रतिशोधात्मक उपायांद्वारे गुन्हेनिवारण करणे आणि अशा रीतीने लोकांना प्रशिक्षित करणे, त्यांना प्रबोधित करणे आणि त्यांचे आध्यात्मिकीकरण करणे, की शिक्षा किंवा कठोर दंड होण्याच्या भयाशिवाय ते सर्व गुन्हेगारी कृत्यांपासून परावृत्त होतील, या दोहोंमध्ये फार मोठा फरक आहे. त्यांना खरेच, केवळ गुन्ह्याची कृती करणे ही मोठी मानहानी आणि स्वतःमध्येच ती एक कठोरतम शिक्षा वाटेल.”**[४२]

वरील उद्धरणांवर प्रतिबिंबित केल्यावर, आपण लिहिलेल्या विधानांचे पुनरावलोकन करू शकता आणि आपण त्यांचा विस्तार कसा करू शकता यावर विचार करू शकता.

## विभाग १६

आपण उद्देशाच्या दुहेरी संवेदनेविषयी चर्चा केली आहे, जी व्यक्तींना आपल्या स्वत:च्या बौद्धिक व आध्यात्मिक विकासाची जबाबदारी घेण्यास तसेच समाजाच्या कल्याणास हातभार लावण्यास प्रेरित करते. आपण हे पाहिले आहे, की उद्देशाची ही भावना, जी आज युवांसाठी फारच आवश्यक आहे, ती पवित्र लेखांमध्ये निरुपण केलेल्या व्यक्तीतील व समाजातील परिवर्तनाच्या स्वरुपाच्या व महानतेच्या जाणिवेने बळकट होते. आपण हे देखील जाणणे आवश्यक आहे, की बदलाच्या ह्या दोन्ही प्रक्रियांमध्ये घनिष्ठ संबंध आहे. आपली क्षमता वाढविणे आणि समाजाच्या कल्याणासाठी काम करणे हे वेगवेगळे करता येणार नाही, कारण व्यक्तीचा नैतिक स्तर आणि आचरण त्याच्या किंवा तिच्या सामाजिक वातावरणाला आकार देतो आणि त्याचा सखोल परिणाम होतो. धर्मसंरक्षकांच्या वतीने लिहिलेले पत्र नमूद करते:

> **“मानवी अंत:करण आपल्या बाहेरील वातावरणापासून विभक्त करुन आपण म्हणू शकत नाही की एकदा ह्यांपैकी एक पुनर्निर्मित झाले की सर्व काही सुधारेल. मनुष्य जगाशी जैविकरीत्या जोडलेला आहे. त्याचे आंतरिक जीवन वातावरणास घडविते आणि स्वत: ते देखील त्याने खोलवर प्रभावित होते. एकाचा दुसऱ्यावर परिणाम होतो आणि मनुष्याच्या जीवनातील प्रत्येक चिरस्थायी बदल हा या परस्परप्रक्रियांचा परिपाक आहे.”**[४३]

वरील उद्धरणाच्या आधारे खालील विधाने खरी आहेत का हे ठरवा:

—— व्यक्ती तेव्हाच परिवर्तित होईल, जेव्हा समाज पूर्णत: बदलला असेल.

—— समाजाच्या व्याधी तेव्हाच पूर्णत: नाहीशा होतील, जेव्हा त्याचा प्रत्येक सदस्य आध्यात्मिक बनला असेल.

—— जेव्हा उचित कायदे पारित होतील, तेव्हा व्यक्ती कशाही प्रकारे वागली तरी समाज दडपशाहीपासून मुक्त राहील.

—— जेव्हा प्रत्येक व्यक्ती न्यायी असण्याचा प्रयत्न करेल, तेव्हा समाज दडपशाहीपासून मुक्त होईल.

—— जरी समाजात कार्यरत असणारी कायदेव्यवस्था अन्यायपूर्ण असली, तरीही त्याचे सर्व सदस्य न्यायी असू शकतात.

—— व्यक्तीचे आचरण सामाजिक वातावरणाला प्रभावित करते.

—— न्यायी समाज हा अन्यायपूर्ण रचना हटविण्याच्या आणि व्यक्तींना निष्पक्ष असण्यास तसेच सत्य शोधण्यास शिकविण्याच्या प्रयत्नांचा परिणाम राहील.

—— कुणीही त्याच्या किंवा तिच्या सामाजिक वातावरणाच्या प्रभावांपासून सुटू शकत नाही.

—— मानवमात्र, त्यांच्या आध्यात्मिक शक्तींच्या मदतीने सामाजिक वातावरणाच्या नकारात्मक प्रभावांवर मात करु शकतात.

—— एकदा प्रत्येकाने मानवमात्राची एकता स्वीकारली, की पूर्वग्रह नाहीसे होतील.

—— जेव्हा समाज त्याच्या कायद्यातील आणि संस्थांमधील भेदभावाचा प्रत्येक लवलेश नाहीसा करील, तेव्हा पूर्वग्रह नष्ट होतील.

—— उचित कायदे पारित केल्याने, आत्म्यांना सत्य शोधण्यास आणि प्रत्येकाशी प्रेमाने व बंधुभावाने मिसळण्यास प्रशिक्षित केल्याने, प्रत्येक प्रकारचे पूर्वग्रह दूर केले जाऊ शकतात.

—— जेव्हा प्रत्येकजण मानवजात एक असण्यावर विश्वास ठेवील, तेव्हा आपणास ऐक्य प्राप्त होईल

—— जगात ऐक्य स्थापनेसाठी व्यक्तीच्या आणि समाजरचनेच्या परिवर्तनाची आवश्यकता आहे.

## विभाग १७

मागील विभागात प्रस्तुत केलेल्या संकल्पना आम्हास सेवेच्या क्षेत्राकडे परत आणतात; कारण ते सेवेचेच क्षेत्र आहे, जेथे आपण आपल्या क्षमतांचा विकास करतो आणि समाजात बदल घडवितो. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत भाग घेणे म्हणजेच सेवेला समर्पित जीवन असणे, ह्याविषयी थोडे स्पष्टीकरण आवश्यक आहे. तथापि, सेवा कशा प्रकारे बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाला हातभार लावते, ह्याविषयी अधिक विचाराची आवश्यकता आहे. खाली कार्यकृतींची यादी आहे. प्रत्येकाचे कार्य करण्यासाठी आणि त्याची प्रभावीता सुनिश्चित करण्यासाठी अनेक आध्यात्मिक गुण एकत्र येणे आवश्यक आहे. या विशिष्ट सरावाच्या उद्देशाने, प्रत्येक कार्यकृतीशी विशेषत: संबंधित वाटणारे एक किंवा दोन गुण आणि वृत्ती निवडा आणि ते पूर्ण करण्यास व्यक्तीच्या क्षमतेमध्ये कशाप्रकारे योगदान देतात याचे वर्णन करण्याचा प्रयत्न करा.

क. प्रभागात किवा गावात नियमित भक्ति बैठक आयोजित करणे: ——————————————————

————————————————————————————————————————————

ख. धर्मश्रद्धेच्या शिकवणीतून प्राप्त झालेल्या आध्यात्मिक विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि बंधुवर्ग भावनेचे संबंध मजबूत करण्यासाठी मित्र आणि शेजाऱ्यांच्या घरी भेटींच्या निरंतर कार्यक्रमात भाग घेणे: ————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

ग. गावातील किंवा प्रभागातील युवांच्या आध्यात्मिक शिक्षणासाठी नियमित वर्ग आयोजित करणे: ————

————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

घ. युवाकिशोर गटाच्या प्रयत्नांना, त्याच्या क्रियाकलापांचे मार्गदर्शन करणाऱ्या अनुप्रेरकासोबत, विस्तारित कालावधीत मदत देणे: ———————————————————————————————

———————————————————————————————————————

च. संस्थेने संचालित केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये भाग घेत असलेल्या सहभागींच्या पालकांना नियमित भेटी देणे आणि त्यांच्या मुला—मुलींच्या विकासासाठी केंद्रस्थानी असलेल्या विषयाच्या संभाषणात त्यांना सहभागी करणे: ———————————————————————————————

———————————————————————————————————————

वरील सरावाने आम्हाला आध्यात्मिक गुण आणि वृत्ती, एखाद्या व्यक्तीच्या सेवेची कृत्ये करण्याच्या क्षमतेमध्ये कशाप्रकारे योगदान देतात यावर विचार करण्यास मदत केली आहे. तथापि, हे ही तितकेच खरे आहे की, सेवा प्रदान करताना व्यक्तीला असे गुण विकसित आणि बळकट करता येतात. आता खाली काही आध्यात्मिक गुण दिले आहेत, ज्यांचा विकास करण्यासाठी आपण सर्व झटत आहोत. प्रत्येक गटासाठी, वरीलपैकी अशा एका कार्यकलापाची निवड करा आणि ते कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या गुणांच्या विकासास कोणत्या प्रकारे योगदान देऊ शकेल असे तुम्हाला वाटते, याचे वर्णन करा.

क. सत्यवादिता, विश्वासपात्रता आणि न्याय: ———————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

ख. सहिष्णुता व दयाळूपणा: ———————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

ग. पवित्रता, प्रामाणिकता व तेजस्विता: —————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

घ. धैर्य, विश्वास, आत्मविश्वास व नम्रता: ————————————————————————————————

————————————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————————————

च. ईश्वरेच्छेला अधीनता आणि सादर होणे: ——————————————————————————————

————————————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————————————

## विभाग १८

सेवा आपल्या अस्तित्वाच्या प्रत्येक अंगाशी घनिष्ठपणे जोडलेली आहे. जेव्हा आपण नि:स्वार्थी सेवेच्या चैतन्याने प्रेरित होतो, तेव्हा आपल्या व्यावसायिक जीवनात, दुसऱ्यांशी व्यवहार करताना, समुदायाचे सदस्य म्हणून आपला प्रत्येक व्यवहार, आपण घेणार असलेली प्रत्येक कृती तिने प्रभावित होते. तथापि, आपण कोणत्याही सेवा देत असू, आपण ह्या वास्तवाविषयी सदैव जागरुक असावे, की बहाउल्लाह ह्यांच्या संदेशाचा जगभरातील लोकांपर्यंत प्रचार—प्रसार करण्यासाठी एक संरचित योजना आहे, एक असा संदेश जो मानवतेच्या एकतेची घोषणा करतो, त्याच्या एकीकरणासाठी आवाहन करतो आणि कायदे व तत्त्वे, आध्यात्मिक व सामाजिक शिकवणी प्रदान करतो, जो एकटाच भविष्यातील समाजासाठी भूतकाळात असलेल्या कोणत्याही समाजापेक्षा मूलत: वेगळा नमुना प्रस्थापित करू शकतो. अब्दुल—बहांनी स्वत: सुस्पष्ट वर्णन केल्याप्रमाणे, ही योजना जगाच्या आध्यात्मिक पुनरुत्थानापेक्षा काहीही कमी मिळविण्यासाठी नाही, आणि जसजशी ती विशिष्ट टप्प्यांतून सतत उलगडत जाते, आणि जेव्हा अधिकाधिक लोक त्याच्या अंमलबजावणीमध्ये समर्पित होतात, तेव्हा “समाजाच्या परिचित कलहाचा एक दृश्यमान पर्याय उदयास येत आहे.” आम्ही सर्वांनी या दैवी योजनेमध्ये स्वत:ला समर्पित केले पाहिजे. या योजनेला धर्मसंरक्षकांनी, “सर्वश्रेष्ठ नामाच्या सृजनशील शक्तीद्वारे निर्मिलेली सर्वशक्तिशाली योजना”, असे संबोधले आहे. “ती वेगाने पुढे जात आहे,” धर्मसंरक्षक आम्हास सांगतात,

> **“प्रत्येक सरत्या दिवसागणिक संवेग प्राप्त करीत, विविध लोक आणि वंशांमधील सर्व प्रचलित विचारसरणी आणि अडसर नेस्तनाबूत करीत, तिच्या कल्याणकारी कार्यांची कक्षा अप्रतिरोध रुंदावीत आणि तिच्या अंगभूत शक्तीची सतत वाढणारी बाध्यकारी चिन्हे प्रकट करीत, ती संपूर्ण ग्रहगोलाच्या आध्यात्मिक विजयाकडे अग्रेसर होत आहे.”**[४४]

दैवी योजनेद्वारे बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाचा प्रकाश वैयक्तिक आणि सामूहिक जीवन परिवर्तित करीत जगाच्या सर्व भागांमध्ये व्याप्त होईल. धर्मसंरक्षकांनी निश्चयपूर्वक सांगितले आहे की,

> **“ईश्वराने स्वत: मनुष्यासाठी निर्मिलेल्या या योजनेच्या उत्क्रांतीतील अंतिम व शीर्ष अवस्था ही स्वत:मध्ये सभ्यतेच्या उद्भवाचा संकेत म्हणून सिद्ध होईल, मानवतेच्या इतिहासात तिच्या विस्तारात, स्वरुपात आणि**

**शक्तीमध्ये अतुलनीय अशी सभ्यता, जिचा उत्तरकाल एकमुखाने बहाउल्लाह यांच्या विधानाच्या सुवर्णयुगाचे अत्युत्तम फळ म्हणून जयजयकार करेल...”**[४५]

दैवी योजनेच्या प्रकटीकरणातील प्रत्येक टप्पा, धर्मश्रद्धेचे प्रमुख (बहाउल्लाह) ह्यांचेद्वारे प्रारंभित वैश्विक शिक्षण योजनांपैकी एकाद्वारे चिन्हांकित केला जातो. प्रत्येक योजनेच्या काही विशिष्ट आवश्यकता असतात आणि त्या आधीच्या योजनेत मिळालेल्या उपलब्धी आणि शिकलेल्या अनुभवांवर आधारित असतात. एकापाठोपाठ एक योजना राबवून केलेल्या प्रयत्नांद्वारे, “वैश्विक संदर्भातील अनेक तत्वे, संकल्पना आणि धोरणे” आम्ही ज्या उपक्रमामध्ये गुंतलो आहोत त्याची प्रासंगिकता “कृतीच्या आराखड्याच्या” स्वरूपात अगदी स्पष्ट होत आहे. हीच संरचना आपल्या सामूहिक कृतीला आकार देते आणि आपण जे करतो त्यात सातत्य असल्याचे सुनिश्चित करते. आपणास भविष्यातील अभ्यासक्रमांमध्ये या विकसित होत असलेल्या संरचनेचे स्वरूप समजून घेण्याची संधी मिळेल. याक्षणी, हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की त्याचे अस्तित्व “व्यक्तींचे विस्तारणारे नाभिक” ह्यांना “नूतन जागतिक कार्यव्यवस्था निर्मितीच्या ध्येयाच्या दिशेने” स्थानिक लोकसंख्येची हालचाल निर्देशित करण्यास सक्षम करते. ह्या प्रकाश झोतात, विश्व न्याय मंदिराने २०१३ मध्ये जगभरात आयोजित केलेल्या युवा संमेलनांच्या श्रृंखलेतील सहभागींना लिहिलेला संदेश स्पष्ट करतो:

**“बऱ्याचशा दशकानंतर, या दुरवर विखुरलेल्या समुदायाच्या बहाउल्लाह यांच्या प्रकटीकरणाबद्दल अधिक पुरेशी जाण मिळविण्याच्या आणि त्यात अंतर्निहित तत्वांचा अवलंब करण्याच्या विश्वव्यापी कष्टांचे पर्यावसान, अनुभवाच्या माध्यमातून परिष्कृत झालेल्या एका सशक्त अशा कृती—आराखड्याच्या उद्भवात झाले आहे. आता एवढ्या चांगल्या प्रकारे प्रस्थापित झालेल्या त्याच्या पद्धती आणि पोहचमार्गांशी परिचित असण्याबद्दल तुम्ही सुदैवी आहात. त्याच्या अवलंबनाच्या प्रयासांद्वारे, तुम्हा स्वत:पैकी बऱ्याचशांनी दैवी शिकवणींची समाजनिर्मितीची चिन्हे पाहिली असतील. तुम्ही उपस्थित राहणार असलेल्या संमेलनांमध्ये, बहाउल्लाह यांचे आवाहनाला प्रत्युत्तर देऊ इच्छिणाऱ्या आणि ती शक्ति मुक्त करण्यास मदत करू इच्छिणाऱ्या कोणत्याही तरुण व्यक्तिकडून, जो सहभाग केला जाऊ शकतो त्यावर विचार करण्यास तुम्हाला पाचारण केले जात आहे.”**[४६]

आणि तोच संदेश पुढे नमूद करतो:

**“सामुहिक कृतीने ज्या संभावना प्रस्तुत केल्या आहेत त्या विशेषत: समुदाय निर्मितीच्या कार्यात उघड आहेत, एक अशी प्रक्रिया जी जगभरातील कित्येक समूहांमध्ये, प्रभागांमध्ये आणि खेड्यांमध्ये गति प्राप्त करीत आहे, जी सघन कृतीची केंद्रे बनली आहेत. अशा पार्श्वभूमींमध्ये प्राय: युवक कार्यकृतीच्या अग्रभागी असतात—न केवळ बहाई युवक परंतु जे समान विचाराचे आहेत, जे बहाईंद्वारे ज्याची सुरवात करण्यात आली आहे त्याचे सकारात्मक प्रभाव पाहू शकतात आणि आधारभूत ऐक्याच्या परिदृष्याचे व आध्यात्मिक परिवर्तनाचे आकलन करू शकतात. अशा ठिकाणांमध्ये, ग्रहणशील अंत:करणांना बहाउल्लाह यांच्या**

**प्रकटीकरणामध्ये सहभागी करून घेण्याची आणि आजच्या जगाकरिता त्यांच्या संदेशाच्या प्रभावावर विवेचना करण्याची अत्यावश्यकता अगत्याने जाणवते. जेव्हा समाजाचा एवढा मोठा भाग निष्क्रीयतेला आणि उदासीनतेला आमंत्रित करतो, किंवा याहूनही वाईट म्हणजे स्वत:साठी आणि इतरांसाठी हानीकारक अशा वागणुकीला प्रोत्साहन देतो, तेथे त्यांचे द्वारा सुस्पष्ट असा विरोधाभास प्रस्तुत केला जातो जे जनसामान्यांची आध्यात्मिकदृष्ट्या संवर्धक सामुदायिक जीवन पद्धती निर्मित करण्याची व ती टिकवण्याची क्षमता वाढवीत आहेत."[४७]**

आणि या शब्दांसोबत विश्व न्याय मंदिर, त्यांच्या दुसऱ्या संदेशात, सेवा जीवनाची उंच भरारी घेण्यात ज्यांना सामील व्हायचे आहे त्या बहाई तरुणांची दृष्टी वृद्धिंगत करते:

**"युवा भाविकांच्या प्रत्येक पीढीकडे मानवजातीच्या भाग्याला त्यांच्या जीवनकाळास विशिष्ठ असे योगदान प्रदान करण्याची संधी चालून येते. सध्याच्या पीढीकरिता चिंतन करण्याचा, कटिबद्ध होण्याचा, स्वत:ला सेवेच्या जीवनासाठी सक्षम करण्याचा क्षण आलेला आहे, ज्यापासून प्रचुर मात्रेत आशिष प्रवाहित होईल. पवित्र उंबरठ्यावर आम्ही पुरातन सौंदर्य (बहाउल्लाह) ह्यांना याचना करतो की त्यांनी पथभ्रष्ट आणि संभ्रमित मानवजातीमधून सुस्पष्ट दृष्टी प्राप्त असणाऱ्या विशुद्ध आत्म्यांना परिष्कृत करावे: युवा, ज्यांची सचोटी आणि निष्ठा इतरांच्या दोषांवर विचार करून कमकुवत बनणाऱ्या नाहीत आणि जे त्यांच्या स्वत:च्या कोणत्याही उणिवांमुळे हतबळ होत नाहीत; युवा जे अब्दुल–बहा यांचेकडे उन्मुख होतील आणि 'जे वगळण्यात आलेले आहेत त्यांना घनिष्ट मित्रांच्या वर्तुळात आणतील'; युवा ज्यांची समाजाच्या विफलतांविषयी जाणीव त्यांना त्याजपासून स्वत:ला दूर करण्यास नव्हे तर त्याला परिवर्तनाप्रित्यर्थ कार्य करण्यास बाध्य करते; युवा जे, कोणतीही किंमत पडो, त्याच्या अनेक स्वरूपामध्ये अस्तित्वात असणाऱ्या पक्षपाताची उपेक्षा करण्यास नकार देतील आणि त्याऐवजी परिश्रम करतील जेणेकरून, 'न्यायाच्या प्रकाशाने संपूर्ण जगतावर त्याची प्रभा पडावी.'"[४८]**

वरील उद्धरणे युवांनी दैवी योजनेत सेवा देणाऱ्यांच्या पुढल्या रांगांमध्ये सामील होण्यास सरसावण्याच्या अत्यावश्यक निकडीविषयी किंचितमात्र शंका ठेवीत नाहीत. या विभागाचा समारोप करताना, विश्व न्याय मंदिराने २००० मध्ये लॅटिन अमेरिकेत आयोजित केलेल्या युवा संमेलनांच्या श्रृंखलांच्या सहभागींना लिहिलेल्या खालील संदेशावर चिंतन करणे आपल्यासाठी उपयुक्त ठरेल:

**"जेव्हा ही तरुणांची पिढी समाजाचा कारभार चालविण्याची जबाबदारी अंगीकारेल, तेव्हा तिला समोर विस्मयकारी विरोधाभासाचा देखावा दिसेल. एका बाजूला प्रदेश बौद्धिक, तांत्रिक आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये उपलब्धीच्या वाजवीरीत्या वल्गना करु शकेल. दुसऱ्या बाजूला व्यापक गरिबीला पायबंद घालण्यात किंवा लोकांना बुडण्याची भीती घालणाऱ्या हिंसाचाराच्या सागराची भरती कमी करण्यास ते अपयशी ठरले असेल. का म्हणून —आणि हा प्रश्न सरळपणे विचारणे रास्त आहे— हा समाज त्याच्या प्रचंड संपत्तीसहित त्याची संरचना छिन्नभिन्न करणाऱ्या अन्यायांना दूर करण्यास शक्तिहीन ठरला आहे?**

**“दशकांच्या विवादास्पद इतिहासाने पुरेपूर सिद्ध केल्याप्रमाणे या प्रश्नाचे उत्तर राजकीय आवेशामध्ये, वर्गहिताच्या परस्परविरोधी अभिव्यक्तींमध्ये किंवा तांत्रिक ठोकताळ्यांमध्ये सापडू शकत नाही. ज्या कशाची आवश्यकता आहे ती आहे आध्यात्मिक पुनर्जागरणाची, जी राजकीय, आर्थिक व तांत्रिक साधनांच्या यशस्वी वापरासाठी पूर्व अपेक्षित आहे. परंतु यासाठी उत्प्रेरकाची आवश्यकता असते. खात्री बाळगा की तुमची संख्या अल्प असली, तरी तुम्ही त्या वाहिका आहात, ज्यांच्याद्वारे असे उत्प्रेरक पुरविले जाऊ शकतात.”**[४९]

१. हे दर्शवीत, की आजच्या परिस्थितीमध्ये याचे उत्तर राजकीय आवेशामध्ये, वर्गहिताच्या परस्परविरोधी अभिव्यक्तींमध्ये किंवा तांत्रिक ठोकताळ्यांमध्ये धुंडाळता येत नाही, हा शेवटचा संदेश विचारतो की अशा बौद्धिक, तांत्रिक आणि आर्थिक संपत्तीने युक्त समाज त्याला क्षतविक्षत करणाऱ्या अन्यायांना दूर करण्यास का म्हणून अपयशी ठरला आहे. तुम्ही ज्या समाजात राहता, त्याचा विचार करा आणि खालीलपैकी प्रत्येकाचे उदाहरण द्या:

क. समाजाचे स्वरुपदर्शन घडविणारा राजकीय आवेश: ——————————————————————

——————————————————————————————————

ख. समाजातील वर्गहिताच्या काही परस्परविरोधी अभिव्यक्ती: ———————————————————

——————————————————————————————————

ग. समाजाने अनुसरलेला तांत्रिक ठोकताळा: ——————————————————————————

——————————————————————————————————

२. विश्व न्याय मंदिराच्या अनुसार समाजात राजकीय, आर्थिक आणि तांत्रिक साधनांचा यशस्वीपणे वापर करण्यासाठी कशाची आवश्यकता आहे? ——————————————————————————

——————————————————————————————————

३. समाजात आध्यात्मिक पुनर्जागरण घडवून आणण्यासाठी कशाची आवश्यकता असल्याचे विश्व न्याय मंदिर आम्हास सांगते? ——————————————————————————————

——————————————————————————————————

४.	ज्याद्वारे बहाउल्लाह ह्यांनी मानवतेला दिलेला संदेश पुरविला जाऊ शकतो, त्या वाहिका कोण गठित करीत असल्याचे विश्‍व न्याय मंदिर सांगते? ————————————————————————————————————
———————————————————————————————————————————————————

आता वरील विचार मनात ठेवून हा अभ्यासक्रम शिकणाऱ्या आपल्या मित्रांशी चर्चा करा की, दैवी योजनेच्या अंमलबजावणीत सहभागी होऊन युवा मित्र समाजाच्या पुनर्जागरणासाठी वाहिकांची भूमिका बजावण्यास कशा प्रकारे समर्थ होऊ शकते.

## विभाग १९

नि:संशय, मागील विभागातील शेवटच्या भागाच्या अंतिम चर्चेने, धर्मकार्याच्या पुढच्या मार्गाक्रमणामध्ये युवांना जी महत्त्वपूर्ण भूमिका बजावयाची आहे, त्याविषयी अधिक विचार करण्यास प्रवृत्त केले आहे. "नव युगाची प्रथम शताब्दी (गॉड पासेस बाय)" या ग्रंथातील खालील उताऱ्यामध्ये शोघी एफेंदी धर्मश्रद्धेच्या आरंभकाळातील वीरांचे चित्रण करतात, ज्यांच्या शौर्यकृती बहाईंना युगानुयुगे प्रोत्साहित करणार आहेत. उल्लेखनीय आहे की त्यांतील बरेच स्वत: तरुण लोक होते, धर्मसंरक्षकांनी त्यांच्या असामान्य गुणांचे वर्णन करण्यासाठी वापरलेल्या शब्दांवर चिंतन करणे आम्हासाठी लाभदायी ठरेल. असे करण्यापूर्वी खालील शब्दावलीचे वाचन करणे आपणास उपयुक्त वाटेल:

| | |
|---|---|
| उल्केसमान: | निखळलेल्या उल्केसमान, आकाशात तीव्र वेगाने संचार करणारे तेजस्वी पुच्छ |
| मार्गक्रमण करणे: | प्रवास करणे |
| काळोखी: | अंधार व विषण्णतेने भरलेले |
| उपग्रह: | मोठ्या ग्रहगोलाभोवती परिभ्रमण करणारी खगोलीय वस्तू |
| तारकामंडळ: | अतिविशाल तारकापुंज |
| किरण प्रक्षेपण: | प्रकाश किरणे प्रक्षेपित करणे |
| तापदीप्त: | अतिउष्णतेने व तेजाने तळपणारा |
| नवसृजित: | नुकताच अस्तित्वात आलेला |
| विजय संघर्ष: | विजय प्राप्त करण्याची धडपड |
| अग्रेसर: | आद्यप्रवर्तक (सुरवातीच्या काळातले कार्य करणारे) |
| षडयंत्र: | गुप्त योजना |
| दुराचार: | भ्रष्टाचार; दुष्टपणा |
| अतिव्याप्त: | विस्तृत श्रेणीचे; शक्तिशाली |
| ईश्‍वरपरायणता: | ईश्‍वराप्रति आणि धर्मश्रद्धेप्रति जबर निष्ठा |
| भावातिरेक: | तीव्र भाव |
| सिंहासमान: | अतिशय धैर्यवान |

| | |
|---|---|
| परित्याग: | त्याग करणे; निरीच्छ वृत्ती |
| निर्धार: | पक्का निश्चय |
| वज्रासमान: | खंबीरपणा आणि सहनशक्तीमध्ये अविचल |
| अतिविशाल: | विस्मयकारक महानतेचे |
| आदर: | सन्मानाची भावना व विस्मय |
| विस्मयकारी: | आश्चर्यचकित करणारी; गोंधळात टाकणारी |

धर्मसंरक्षक लिहितात:

> **"महान नाट्याच्या ह्या पहिल्या अंकाच्या घटनांचे अवलोकन करताना आपण पाहतो, की महानायक दिव्यात्मा बाब यांची आकृती शिराझच्या क्षितिजावर उल्केसमान प्रकट होते, आणि पर्शियाच्या काळोखी आकाशात दक्षिणोत्तर मार्गक्रमण करते, दु:खद चपळतेने खाली येते आणि वैभवाच्या ज्वालेत नष्ट होते. आपण त्यांचे उपग्रह, ईश्वरधुंद नायकांचे तारकामंडल त्याच क्षितिजावर आरुढ झालेले, तीच तापदीप्त प्रभा दाखवीत, त्याच चपळतेने स्वत:ला भस्मसात करुन घेत, आणि ईश्वराच्या नवसृजित धर्मश्रद्धेच्या संथपणे वाढणाऱ्या संवेगाला आपल्या परीने अधिक जोम देत असताना पाहतो....**
>
> **"ज्या नायकांच्या कृती, ज्यात एकाच वेळी स्थानिक रहिवासी, धर्माधिकारी, राज्यसम्राट आणि सरकार यांचा समावेश असलेल्या ह्या भीषण आध्यात्मिक विजयसंघर्षाच्या वृत्तांतात उठून दिसतात, ते दिव्यात्मा बाब ह्यांचे निवडलेले अनुयायी, जीविताक्षरे आणि त्यांचे सोबती, नव्या दिनाचे आद्यप्रवर्तक होते, ज्यांनी एवढ्या मोठ्या षडयंत्राचा, अज्ञानाचा, दुराचाराचा, क्रूरतेचा, अंधश्रद्धेचा आणि भ्याडपणाचा, उदमनीय आणि विस्मयकारी उन्नत चैतन्याने, आश्चर्यकारी प्रगाढ ज्ञानाने, प्रचंड शक्तीच्या वाक्चातुर्याने, अतुल्य वातिरेकाच्या ईश्वरपरायणतेने, सिंहासमान अतीव धैर्याने, संततुल्य पावित्र्याच्या आत्मत्यागाने, वज्रासमान कठीण निर्धाराने, अतिविशाल व्याप्तीच्या दृष्टीने, संदेशवाहक आणि त्यांच्या इमामांच्या प्रतिविरोधकांना विस्मयकारी वाटणाऱ्या आदराने, त्यांच्या विरोधकांना घाबरवून सोडणाऱ्या विश्वासोद्‌पादक शक्तीने, त्यांच्या देशबांधवांच्या जीवनाला आव्हान देणाऱ्या आणि परिवर्तित करणाऱ्या श्रद्धेच्या व सदाचाराच्या उच्चत्वाने प्रतिरोध केला."**[५०]

१. खालील वाक्ये पूर्ण करा:

क. जीविताक्षरे आणि त्यांचे सोबती ——————————— विजयसंघर्षात गुंतले होते.

ख. या विजयसंघर्षात एकाच वेळी —————————— ——————————, ——————————————,

—————————— आणि ——————————— यांचा समावेश होता.

ग. धर्मश्रद्धेच्या आरंभीच्या या नायकांनी षडयंत्र, अज्ञान, दुराचार, क्रूरता, अंधश्रद्धा आणि भ्याडपणाचा प्रतिरोध यांसोबत केला

– ––––––– आणि ––––––––––– ––––––––––– चैतन्याने,

– –––––––––––––––– ––––––– ज्ञानाने,

– –––––––––– ––––––––– वाक्चातुर्याने,

– –––––––––––– ––––––––– ईश्वरपरायणतेने,

– –––––––––––– ––––––––––– धैर्याने,

– –––––––––––– ––––––––– आत्मत्यागाने,

– ––––––––––––––– –––––––– निर्धाराने,

– ––––––––––––– ––––––––– दृष्टीने,

– संदेशवाहक आणि त्यांच्या इमामांच्या –––––––– –––––––– –––––––– आदराने,

– त्यांच्या ––––––––––– ––––––––––– –––––––– विश्वासोद्पादक शक्तीने,

– त्यांच्या –––––––––––––––––– –––––––––– –––––––––––– देणाऱ्या आणि ––––––––– –––––––––––– श्रद्धेच्या व सदाचाराच्या उच्चत्वाने.

२. धर्मसंरक्षकांनी वरील उताऱ्यात वर्णन केलेल्या आध्यात्मिक विजयसंघर्षात धर्मश्रद्धेच्या आरंभीच्या नायकांनी कोणत्या उद्देशासाठी प्रवेश केला? ––––––––––––––––––––––––––––––––––––––– ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

३. सांप्रतकाळचे बहाई युवक जे दैवी योजनेच्या अंमलबजावणीत भाग घेत आहेत, त्यांच्या पूर्ववर्तींप्रमाणेच, आध्यात्मिक विजयसंघर्षात गुंतले आहेत काय? –––––––––––––––––––––––––––––––––––

४. त्यांचा विजयसंघर्ष कशा प्रकारे धर्मश्रद्धेच्या आरंभीच्या नायकांच्या विजयसंघर्षासारखा दिसतो? ––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

५. आजचे युवक ज्या आध्यात्मिक विजयसंघर्षात गुंतले आहेत, त्यास जिंकण्यास शौर्ययुगातील त्यांच्या बंधू–भगिनींप्रमाणेच ते समर्थ व्हावेत, हे कसे सुनिश्चित करु शकतात? ––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

पुढील विभागाकडे जाण्यापूर्वी, विश्व न्याय मंदिराने लिहिलेल्या संदेशातील खालील उताऱ्यावर आपण विचार करू शकता:

> **"केवळ पंचवीस वर्षे वयाचे दिव्यात्मा बाब यांचे प्रशंसित व्यक्तित्व जेव्हा त्यांचा क्रांतीकारी संदेश जगाच्या सुपूर्द करण्यास उभे राहिले, तेव्हा ज्यांनी त्यांच्या शिकवणींचा स्वीकार केला आणि प्रसार केला त्यातील बरेचसे तरुण होते, स्वत: दिव्यात्मा बाब यांच्यापेक्षाही कमी वयाचे. त्यांची वीरता, जी शहिदांची गाथा या ग्रंथामध्ये दैदिप्यमान तीव्रतेने अमर केली गेली, ती येत्या कित्येक शतकांकरिता मानवी इतिहासाच्या कालवृत्तांना सुशोभित करील. अशा प्रकारे एका आकृतिबंधाची सुरवात झाली, ज्यामध्ये युवकांच्या प्रत्येक पीढीने, नव्याने जग घडविण्यासाठी एकाच दैवी आवेगापासून प्रेरणा घेत, मानवजातीचे जीवन परिवर्तीत करणाऱ्या उमलत्या प्रक्रियेमधील नवीन चरणाला हातभार लावण्याची संधी प्राप्त केली आहे. हाच तो आकृतिबंध आहे ज्यामध्ये दिव्यात्मा बाब यांचे काळापासून ते या घडीपर्यंत खंड पडलेला नाही."**[५१]

## विभाग २०

कसोटी व विजयाच्या एकापाठोपाठ येणाऱ्या क्रमात प्रत्येक पिढीचे तरुण, विश्वधर्माच्या प्रारंभिक शिलेदारांनी उजळलेल्या मार्गाचे अनुसरण करीत, बहाउल्लाह यांचा संदेश मानवजातीपर्यंत आणण्यास कष्ट घेत, बहाई कार्यकलापाच्या आघाडीवर राहिले आहेत. विश्व न्याय मंदिर लिहितात:

> **"बहाई युगाच्या अगदी सुरुवातीपासून युवकांनी ईश्वरी प्रकटीकरणाच्या प्रचार–प्रसारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दिव्यात्मा बाब ह्यांनी जेव्हा त्यांच्या धर्मकार्याची घोषणा केली, तेव्हा स्वत: ते केवळ पंचवीस वर्षांचे होते, तर जीविताक्षरांपैकी बरेचसे त्यापेक्षाही कमी वयाचे होते. अब्दुल–बहांना अगदी तरुण वयात इराक आणि तुर्कस्थानात आपल्या पित्याच्या मोठ्या जबाबदाऱ्या खांद्यावर घेण्यास पाचारण करण्यात आले होते, आणि त्यांचे बंधू पवित्रतम शाखा, यांनी ईश्वराचे सेवक 'शीघ्रप्रेरित व्हावेत आणि सर्व पृथ्वी**

**निवासी एक व्हावेत', यासाठी महानतम कारागृहात वयाच्या बाविसाव्या वर्षी आपले जीवन ईश्वराला समर्पित केले. शोघी एफेंदी ऑक्सफर्डला विद्यार्थी होते, जेव्हा त्यांना धर्मसंरक्षकपदाच्या सिंहासनाकडे पाचारण करण्यात आले आणि बरेचसे 'बहाउल्लाह ह्यांचे शूरवीर' ज्यांनी दशवर्षीय धर्मयुद्धाच्या काळात अविनाशी कीर्ती मिळविली, ते तरुण लोक होते."[५२]**

१९८४ मध्ये लिहिलेल्या संदेशात, विश्व न्याय मंदिर अधिक नजीकच्या भूतकाळातील नायकांची प्रशंसा करते:

**"उदाहरणार्थ, मागील उन्हाळ्यात, शिराझमधील अठरा ते पंचवीस वर्षादरम्यान वयाच्या सहा तरुण स्त्रियांच्या घटनेबद्दल विचार करा, ज्यांचे जीवन जल्लादाच्या गळफासाद्वारे संपविण्यात आले होते. सर्वांना त्यांच्या धर्मश्रद्धा त्यागण्यासाठी प्रलोभन प्रयत्नांचा सामना करावा लागला आणि सर्वांनी त्यांच्या प्रियतमाला नाकबूल करण्यास नकार दिला. मुलांनी व तरुणांनी वारंवार दाखविलेल्या विलक्षण धैर्याच्या वृत्तांताकडे देखील लक्ष द्या, ज्यांना उलटतपासण्या आणि शिक्षक व मुल्लांच्या शिव्यांना बळी पडावे लागले आणि त्यांची स्वत:ची धर्मश्रद्धा जोपासण्यासाठी शेवटी शाळेमधून निष्कासित करण्यात आले. त्यांच्या समुदायावर निष्ठूरतेने लादलेल्या बंधनांच्या अवस्थेतही तरुणांनी त्यांची शक्ती देशभरातील बहाई संस्थांना समर्पित करीत ज्या असाधारण सेवा दिल्या, ते नोंद घेण्यालायक आहे. नि:स्वार्थीपणाच्या आणि समर्पणाच्या ह्या शुद्ध कृतींपेक्षा शब्दसुमनांची कोणतीही चमक त्यांच्या आध्यात्मिक बांधीलकीची आणि विश्वासपात्रतेची अधिक उचित ग्वाही देऊ शकली नसती. पृथ्वीवरील जवळजवळ इतर कोणत्याही ठिकाणी धर्मश्रद्धेसाठी बहाईंना जी किंमत द्यावी लागते, ती एवढी मोठी नाही. तद्वतच, इराणच्या बहाद्दर युवकांपेक्षा अधिक उत्सुक, अधिक तेजस्वी त्यागाच्या चषकाचे धारक कुठे आढळू शकत नाहीत. तेव्हा, तुम्हा तरुण व तरुण वयस्कांकडून, जे अशा असामान्य काळात राहत आहेत, जे आपल्या पर्शियन मित्रांच्या शौर्याची प्रेरक उदाहरणे पाहत आहेत आणि हालचालीचे असे स्वातंत्र्य उपभोगत आहेत त्यांच्याकडून, अशी रास्त अपेक्षा केली जाऊ शकत नाही काय, की त्यांनी बहाई कार्याच्या क्षेत्रामध्ये 'वाऱ्यासमान अनिर्बंध' होऊन कूच करावे?"[५३]**

जगभरातील बहाई युवकांच्या जीवनातील लक्षणीय घटनांवर चिंतन करण्याचे अवसर युवांच्या प्रत्येक पिढीला जीवनलक्ष्याची संवेदना प्राप्त करण्यास साहाय्य करतात. बहाईंना बालवर्गांमध्ये आणि घरी ज्या गोष्टी सांगितल्या जातात, त्यांद्वारे ह्या असामान्य विभूतींशी बालवयात जवळचा संबंध प्रस्थापित होतो; परंतु किशोरावस्थेत आणि अर्थातच तारुण्याच्या संपूर्ण अवधीमध्ये ही आवश्यकता पूर्ण करण्यासाठी अधिक जाणीवपूर्वक प्रयत्नाची आवश्यकता असते. काही नाट्यपूर्ण व इतर कमी नाट्यपूर्ण अशी काळजीपूर्वक निवडलेली उदाहरणे धैर्य, निर्धार, उत्साह आणि नि:स्वार्थीपणा अशा गुणांचे प्रदर्शन करु शकतात, जे आत्मसात करण्यास युवांनी अवश्य झटावे.

१. धर्मश्रद्धेच्या आरंभीच्या इतिहासातून किंवा अधिक नजीकच्या काळातून काही अशा घटना ओळखा, ज्यांवर युवांनी चिंतन करावे असे आपणास वाटते: ————————————————————————————————

————————————————————————————————————————————————

२.　　ह्या विशिष्ट घटना निवडण्याचे आपले कारण सांगा: ——————————————————————————

——————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————

## विभाग २१

वर प्रस्तुत केलेल्या उद्धरणांच्या अल्पशा नमुन्यांतूनदेखील, हे पाहणे शक्य आहे, की धर्मश्रद्धेच्या आरंभीच्या नायकांचे व त्यांचे अनुसरण करणाऱ्या वीरात्म्यांचे जीवन उद्देशाच्या संवेदनेमुळे वैशिष्ट्यपूर्ण होते. हे देखील तेवढेच स्पष्ट आहे, की त्यांपैकी प्रत्येकाला ते ज्या ऐतिहासिक कालखंडात जगत होते, त्याच्या महत्तेची जाणीव व त्याचबरोबर मानवजातीला परिवर्तनाच्या ज्या स्तरापर्यंत पाचारण करण्यात येत होते, त्याची दृष्टी होती. उद्देशाच्या संवेदनेची अभिव्यक्ती दैवी संदेशाच्या प्रसारासाठी समर्पित जीवनामध्ये त्यांना आढळली, हे देखील स्पष्ट आहे. तथापि, त्यांनी केलेल्या शौर्याच्या कृतींवर आणि त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी केलेल्या निर्वाणीच्या त्यागावर जेव्हा आपण चिंतन करतो, तेव्हा आपला विश्वास बसू शकत नाही, की केवळ ह्या गुणांमुळेच अशा पवित्र व्यक्तींना विशेषत्व प्राप्त झाले. ते काय होते, ज्याने त्यांचे जीवन सर्वाधिक प्रभावित केले? ते कोणत्या आवेगाने भारले होते आणि नि:स्वार्थी सेवेच्या अशा उंचीप्रत पोहचण्यास त्यांना कशाने गती मिळाली? त्यांच्या अंत:करणात ईश्वराविषयीचे प्रेम इतके प्रज्वलित झाले होते का? ते त्यांच्या प्रियतमाच्या सौंदर्याने धुंद झाले नव्हते काय? पुढील पिढीच्या युवांमध्ये आम्ही जर त्यांच्या निर्मात्याच्या सौंदर्याप्रति व पूर्णतेप्रति आकर्षण निर्माण केले नाही आणि त्याच्याशी घनिष्ट संबंध जोडण्यास त्यांना साहाय्य केले नाही, तर त्यांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणाला हातभार लावण्याची आम्ही कधीतरी आशा करु शकतो काय? स्वत:स खालील शब्दांमध्ये तल्लीन करुन या अभ्यासक्रमाची आपण सांगता करुया:

**“कारण जेव्हा खरा प्रेमी आणि समर्पित मित्र प्रियतमाच्या उपस्थितिप्रत पोचेल, तेव्हा प्रियतमाचे उचंबळणारे सौंदर्य आणि प्रेमीच्या हृदयातील अग्नी ज्वाला चेतवील आणि सर्व पटल आणि आवरणे भस्मसात करील. होय, त्याच्याजवळचे सर्व काही, हृदयापासून त्वचेपर्यंत प्रज्ज्वलित होईल, जेणेकरुन मित्राव्यतिरिक्त काहीएक उरणार नाही.”**[५४]

**“हे मित्रांनो! जे सौंदर्य मर्त्य आहे त्यासाठी चिरंतन सौंदर्याचा त्याग करू नका आणि धुळीच्या नश्वर जगावर आपली आसक्ती जडू देवू नका.”**[५५]

**“हे तू जाण, की तोच खरा विद्वान आहे, ज्याने माझे प्रकटीकरण स्वीकारले आहे, आणि माझ्या ज्ञानाच्या सागरातून प्राशन केले आहे, आणि माझ्या प्रेमाच्या वातावरणात भरारी मारली आहे, आणि माझ्या व्यतिरिक्त सर्वकाही त्यागले आहे, आणि माझ्या विस्मयकारी उद्गाराच्या साम्राज्यातून जे काही पाठविले गेले, त्यावर पकड घट्ट केली आहे. तो, सत्यत:, मानवजातीसाठी नेत्रदेखील आहे आणि संपूर्ण निर्मितीच्या देहासाठी जीवनाचे चैतन्य आहे. सर्वदयानिधीचे गुणगान असो, ज्याने त्याला ज्ञानबोधित केले आहे आणि जो त्याच्या**

तत्पर होण्यास व त्याच्या थोर व शक्तिशाली धर्मकार्याची सेवा करविण्यास कारणीभूत झाला. सत्यतः, असा मनुष्य स्वर्गीय मेळाव्याकडून आणि त्यांच्याकडून जे श्रेष्ठत्वाच्या मंडपाखाली निवास करतात, ज्यांनी माझ्या सर्वसमर्थ, सर्वशक्तिशाली नामाद्वारे माझ्या मोहोरबंद अमृताचे प्राशन केले आहे, त्यांच्याकडून आशिर्वादित होतो."[५६]

"हे तुम्ही ईश्वराच्या योद्ध्यांनो! तुम्ही जर पाहता, की आत्म्याने आपला चेहरा पूर्णतः ईश्वराच्या धर्मकार्याकडे वळविला आहे; ज्याचा उद्देश केवळ ईश्वराच्या शब्दाचा ठाव घेण्यावर केन्द्रित असेल; ज्याचा हेतू संपूर्ण निष्ठेने रात्रंदिवस धर्मकार्याची सेवा करण्याचा असेल; ज्याच्या वर्तनातून त्याच्या व्यक्तित्वात अहंता किंवा खाजगी स्वार्थी हेतूंचा लवलेशही दिसणार नाही —जो, त्याऐवजी, ईश्वरी प्रेमाच्या विस्तीर्ण प्रदेशात भटकणारा असेल, जो ईश्वरी ज्ञानाच्या प्याल्यातूनच प्राशन करून धुंद झालेला असेल, आणि ईश्वराच्या सुगंधाच्या प्रसारात सर्वस्वी व्यग्र आणि ईश्वरी साम्राज्याच्या पवित्र श्लोकांवर मोहित असेल— तू हे निश्चित जाण, की तो व्यक्ती सामर्थ्याच्या स्वर्गाद्वारे सहायताप्राप्त आणि आश्वासित आहे; तो चिरंतन देणगीच्या क्षितिजावर अत्यंत तेजाने व वैभवाने प्रभाततार्‍यासमान अखंडपणे प्रकाशमान होईल. तथापि, जर तो वासनेच्या, इच्छेच्या, अवडंबराच्या किंवा स्वहिताच्या किंचितशा लवलेशाने मिश्रित झाला तर हे निश्चित, की त्याच्या सर्व प्रयत्नांचा परिणाम निष्फळ सिद्ध होईल, आणि तो वंचित आणि निराश बनेल."[५७]

"सत्यतः तू हे जाण, की दैवी विधात्याच्या करकमलाने तुला साम्राज्याच्या सिंहासनाकडे आकर्षिले आहे आणि दैवी समाचाराने तुझ्यात असा उल्हास आणि आनंद निर्माण केला आहे, ज्याद्वारे तू दैवी सौंदर्याच्या मुखाकृतीपासून आवरण दूर केले आहेस आणि पटल वर उचलले आहे, तुझ्या अंतर्दृष्टीद्वारे तेजस्वी मुखकमल पाहिले आहेस आणि या दैवी धर्मकार्यामधील पवित्रतेच्या आणि शुद्धतेच्या रहस्यांविषयी जागरुक झाला आहेस!

"आता, ईश्वरी प्रेमाने हृदय उचंबळत असताना, संपूर्ण उल्हासाने ईश्वराची आराधना कर आणि त्याच्या ह्या मार्गदर्शनासाठी व ह्या उदात्त देणगीसाठी तू ईश्वराचे आभार मान. तू हे जाण, की सत्यतः, जेव्हा तुझे चरण धर्मश्रद्धेच्या मार्गात दृढ होतील, तेव्हा तुझ्या स्वामीच्या देणग्यांचे रक्षक सर्व बाजूंनी तुला घेरतील."[५८]

"हे माझ्या परमेश्वरा! हे माझ्या परमेश्वरा! हा तुझा सेवक तुझ्याकडे वेगाने सरसावला आहे, तुझ्या प्रेमाच्या वाळवंटात उत्कंठेने भटकत आहे, तुझ्या सेवेच्या मार्गावर चालत आहे, तुझ्या कृपेची आशा बाळगत आहे, तुझ्या अनुग्रहांची अपेक्षा करीत आहे, तुझ्या अधिराज्यावर विसंबून आहे आणि तुझ्या देणगीच्या अमृताने धुंद झाला आहे. हे माझ्या ईश्वरा! तुझ्या प्रति त्याच्या स्नेहाचा उत्साह, तुझ्या स्तवनाचे त्याचे सातत्य आणि तुझ्या प्रति त्याच्या प्रेमाची आतुरता वाढव.

सत्यतः, तू महाऔदार्यशाली आहेस, तू अमर्याद अनुग्रहाचा स्वामी आहेस. तुझ्याशिवाय क्षमाशील, दयानिधी अन्य कोणी परमेश्वर नाही."[५९]

## संदर्भ


१. अब्दुल–बहा, बहाई प्रार्थना
२. वरील प्रमाणे
३. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
४. अब्दुल–बहा, विश्व न्याय मंदिर – ११ एप्रिल १९८५ पत्रातून
५. अब्दुल–बहा, बहाई प्रार्थना
६. बहाउल्लाह, विश्व न्याय मंदिर – रिझवान १९८२ संदेशामधून
७. विश्व न्याय मंदिर – २५ मे १९७५ संदेशामधून
८. विश्व न्याय मंदिर – १ जुलै २०१३ संदेशामधून
९. विश्व न्याय मंदिर – १० जून १९६६ संदेशामधून
१०. विश्व न्याय मंदिर – २३ फेब्रुवारी १९९५ पत्रातून
११. विश्व न्याय मंदिर – २९ डिसेंबर २०१५ संदेशामधून
१२. विश्व न्याय मंदिर – २३ एप्रिल २०१३ पत्रातून
१३. विश्व न्याय मंदिर – १९ एप्रिल २०१३ पत्रातून
१४. विश्व न्याय मंदिर – १२ डिसेंबर २०११ संदेशामधून
१५. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे क्र. १३७
१६. शोघी एफेंदी – ८ डिसेंबर १९२३ पत्रातून
१७. अब्दुल–बहा
१८. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे क्र. २९
१९. बहाउल्लाह
२०. अब्दुल–बहा – दैवी संस्कृतीचे रहस्य
२१. वरील प्रमाणे
२२. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे क्र. ४३
२३. वरील प्रमाणे, क्र.१२६
२४. बहाउल्लाह, दैवी न्यायाचे आगमन
२५. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे क्र. ६०
२६. बहाउल्लाह, दैवी न्यायाचे आगमन
२७. वरील प्रमाणे
२८. अब्दुल–बहा
२९. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे क्र.१४३
३०. वरील प्रमाणे क्र. ७०
३१. अब्दुल–बहा, काही उत्तरीत प्रश्न
३२. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
३३. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
३४. बहाउल्लाह – रहस्यमय शब्द – पर्शियन क्र. ६
३५. अब्दुल–बहांचे इच्छापत्र व वारसपत्र
३६. बहाउल्लाह – रहस्यमय शब्द – पर्शियन क्र. ४९
३७. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
३८. दिव्यात्मा बाब
३९. अब्दुल–बहांचे इच्छापत्र व वारसपत्र
४०. अब्दुल–बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
४१. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
४२. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
४३. शोघी एफेंदी – १७ फेब्रुवरी १९३३ पत्रातून
४४. शोघी एफेंदी – एप्रिल १९५५ पत्रातून
४५. शोघी एफेंदी – ४ मे १९५३ पत्रातून
४६. विश्व न्याय मंदिर – १ जुलै २०१३ संदेशामधून
४७. वरील प्रमाणे

४८. विश्व न्याय मंदिर – ८ फेब्रुवारी २०१३ संदेशामधून
४९. विश्व न्याय मंदिर – ८ जानेवारी २००० संदेशामधून
५०. शोघी एफेंदी, नव युगाची प्रथम शताब्दी (गॉड पासेस बाय)
५१. विश्व न्याय मंदिर – १ जुलै २०१३ संदेशामधून
५२. विश्व न्याय मंदिर – १० जून १९६६ संदेशामधून
५३. विश्व न्याय मंदिर – ३ जानेवारी १९८४ संदेशामधून
५४. दैवी प्रियतमाची हाक: बहाउल्लाह ह्यांची निवडक गूढ उद्धरणे
५५. बहाउल्लाह – रहस्यमय शब्द – पर्शियन क्र. १४
५६. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
५७. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
५८. अब्दुल–बहा
५९. अब्दुल–बहा, बहाई प्रार्थना



# एक आशादायक वय

उद्देश

बारा ते पंधरा वयोगटातील युवा तरुणांच्या अपरिमित क्षमतांना ओळखणे आणि त्यांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणासाठी अनुकूल वातावरण प्रदान करून देण्याचे महत्व जाणणे

## विभाग १

या आधीच्या घटकामध्ये, आम्ही बहाई युवकांच्या काही वैशिष्ट्यांचे परीक्षण केले. या घटकाचा उद्देश युवा तरुणांच्या अपरिमित क्षमता आणि त्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या शक्तींवर प्रतिबिंबित करणे हा आहे. आपण येथे ज्या संकल्पनांवर विचार करणार आहात त्या अनेक दशकांच्या अनुभवातून हळूहळू एकत्रित केल्या गेल्या आहेत. बारा ते पंधरा वयोगटातील युवांच्या विशेष गरजा बहाई समुदायाने फार पूर्वीपासून ओळखल्या आहेत. या वयोगटातील सहभागींना शिक्षित करण्याच्या सुरुवातीच्या प्रयत्नांपासून आणि त्यानंतरच्या त्यांच्या क्षमतेला विकसित कसे करावे आणि त्यांच्या वाढत्या उर्जेचा वापर कसा करावा, हे शिकण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमधून, आम्ही या पुस्तकात प्रतिबिंबित करत असलेल्या विषयांमुळे, किशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रम हळूहळू उदयास आला. आपण या कार्यक्रमाशी परिचित असाल, कारण आपण युवा अवस्थेत असताना त्यामध्ये स्वत: सहभागी झाले असाल, आपण एखाद्या मित्रासोबत युवाकिशोर गटासह हा उपक्रम हाती घेऊन काम केले असेल किंवा इतर मित्रांसोबत याविषयी दृष्टिकोन आणि विषयावर चर्चा करण्यासाठी आपल्या गावातील व प्रभागातील पालकांना भेटी दिल्या असतील.

आपण आता ज्या सामग्रीचा अभ्यास करत आहात ते आपणास सुरुवातीला तीन वर्षे समर्पित करण्यात मदत करण्याच्या उद्देशाने आहे, परंतु कदाचित त्याहूनही अधिक, सेवेच्या या गुणवंत क्षेत्रासाठी, आपणास या विशिष्ठ वयोगटातील अनेक युवांना त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यावर मार्गदर्शन करण्यास सक्षम करेल.

किशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमाबाबत विश्व न्याय मंदिर लिहितात:

> **“युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणाच्या कार्यक्रमाचा जलदगतीने होणारा प्रसार हे बहाई समुदायाच्या सांस्कृतिक विकासाचे आणखी दुसरे द्योतक आहे. जेव्हा जागतिक विचारसरणी या वयोगटाविषयी समस्याग्रस्त, उपद्रवी भौतिक आणि भावनिक बदलांच्या व्यथेत गुंतलेली, बेजबाबदार व आपल्या नादात ढंग असलेली अशी प्रतिमा सादर करते तेव्हा बहाई समुदाय –त्यांचेसाठी जी भाषा वापरतो आणि ज्या पद्धती अंगीकारतो– त्या दृष्टीने निश्चितपणे विरुद्ध दिशेने मार्गक्रमण करीत आहे, बहाई समुदाय त्याऐवजी तरुणांमध्ये परहितवाद, न्यायाची तीव्र भावना, विश्वासंबंधी शिकण्याविषयी उत्सुकता आणि अधिक चांगल्या जगाच्या उभारणीस हातभार लावण्याची इच्छा पाहतो. जगभरातील देशांमध्ये कार्यक्रमामधून युवाकिशोर आपले जे विचार शब्दांवाटे प्रस्तुत करतात, त्याविषयींच्या वार्तेमागून वार्ता या दृष्टीच्या सत्यतेची पुष्टी करतात. असे प्रत्ययास येते की कार्यक्रमांमध्ये त्याच्या वाढत्या जाणिवेचा उपयोग सत्यशोधनासाठी केला जातो जे त्यांना समाजात कार्यरत असलेल्या रचनात्मक आणि विधातक शक्तींचे विश्लेषण करण्यास आणि त्या शक्ती त्यांच्या विचारांवर आणि कृतींवर जे प्रभाव पडतात ते ओळखण्यास, त्यांची आध्यात्मिक दृष्टी तीक्ष्ण बनविण्यास, त्यांची अभिव्यक्तीची शक्ती वाढविण्यास आणि नैतिक जडणघडण मजबूत करण्यास मदत करते ज्याचा उपयोग त्यांना आयुष्यभर होईल. अशा वयामध्ये की जेव्हा वाढत्या बौद्धिक, आध्यात्मिक आणि भौतिक शक्ती त्यांना सहज प्राप्त आहेत तेव्हा त्यांना अशी अवजारे दिली जात**

**आहेत जी उदात्त व्यक्ती म्हणून त्यांच्या खऱ्या ओळखीचे हरण करणाऱ्या शक्तींशी लढा देण्यास आवश्यक आहेत आणि सार्वत्रिक हिताची कामे करण्यास मदत करणार आहेत."[१]**

विश्व न्याय मंदिराने वरील उताऱ्यात नमूद केलेल्या अनेक संकल्पना आणि विचार या घटकाच्या अभ्यासाचे केंद्रबिंदू आहेत आणि जसजसे आपण त्यामधून पुढे जाल तसतसे ते आपल्याकरिता अधिक स्पष्ट होत जातील. यावेळी, आपण खालील प्रश्नांची उत्तरे देऊ शकता:

१. प्रचलित जागतिक प्रवृत्ती युवाकिशोरांना ते कोणत्या वयोगटात आहेत याची प्रतिमा मांडतात? ————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

२. त्याऐवजी, बहाई समुदाय या वयोगटाची प्रतिमा कशाप्रकारे मांडतात? ————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

३. युवाकिशोरांच्या वाढत्या चेतनेला वास्तवाच्या शोधात गुंतवून, त्यांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणाचा कार्यक्रम त्यांना काय करण्यास मदत करतो? ————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

४. या कार्यक्रमाद्वारे युवाकिशोरांना मिळणारी शिकवण त्यांना काय करण्यास सक्षम करतात? ——————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

५. आपणास असे का वाटते की बारा ते पंधरा वयोगटातील युवाकिशोर एका विशेष गटाचे प्रतिनिधित्व करतात? ——————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

६. वरील तथ्ये लक्षात ठेऊन, आणि आपणास आधीच माहीत असलेल्या काही युवाकिशोरांना लक्षात ठेवून, आपण या तरुण पिढीच्या काही विशिष्ट गरजा ओळखू शकाल का? ——————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

७.	सेवेच्या या विशिष्ट क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी आपणास काय प्रेरणा देते? ——————————————

————————————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————————————

## विभाग २

बहाउल्लाह आपणास सांगतात, की पंधरा वर्षाचे वय झाल्यानंतर व्यक्तीमध्ये परिपक्वता येण्यास सुरुवात होते, जेव्हा अनिवार्य प्रार्थना आणि उपवास या गोष्टींचे पालन करणे अनिवार्य असते. या दृष्टीने पंधरा वर्षांची अवस्था प्राप्त करण्याआधीची वर्षे विशेष महत्त्वाची असतात. या काही वर्षांतच बालपणापासून तारुण्याच्या काळात संक्रमण होते. या संक्रमणाशी संबंधित अचानक आणि जलद बदल —शारीरिक, बौद्धिक आणि भावनिक— वागणुकीवर अनेक प्रकारे प्रभाव पाडतात.

वयाच्या बाराव्या वर्षापासून, परिवर्तन दिसावयास सुरुवात होते. अनेक युवाकिशोर पुढील तीन ते चार वर्षांत त्यांच्या आयुष्याच्या इतर कोणत्याही टप्प्यापेक्षा शारीरिकदृष्ट्या अधिक वाढतात. त्यांची उंची आणि शरीराच्या मांसपेशींचा विकास होतो आणि हार्मोनल बदल अनुभवतात. मुलांचा आवाज घोगरा होऊ लागतो आणि मुलींमध्ये एका युवतीप्रमाणे शारीरिक बनावट विकसित होऊ लागते. दोघेही यौवनाची सुरुवात करतात आणि मुलांना जन्म देण्याची शारीरिक क्षमता प्राप्त करतात.

या काळात व्यक्तीत ज्या शारीरिक आणि भावनात्मक बदलांची जाणीव होते, ते सर्व बदल परस्परसंबंधित असतात. या नवीन शक्तींच्या उदयाबद्दल उत्साह आणि त्यांचा वापर करण्याची उत्सुकता अस्वस्थता, संवेदनशीलता आणि चिंतेच्या भावनांसह सोबतीस असते. या अनुभूती, व्यक्तीच्या वागण्यात कधी कधी विरोधाभास उत्पन्न करतात. अशा व्यक्तींना कधी लाजरेपणाची जाणीव होते, तर कधी त्या मनमिळाऊपणे वागतात; तर कधी एकटे राहण्याच्या इच्छा व्यक्त करतात, त्याचबरोबर लोकांनी आपल्याकडे लक्ष द्यावे असे त्यांना वाटते; काही परिस्थितीत त्यांच्यात बेसुमार धैर्य असेल आणि इतर वेळी त्या भयभीत असतील. एखाद्याच्या स्वत:च्या प्रतिभा आणि क्षमतांबद्दल वाढणारी चिंता हळूहळू प्रकट होते, सोबतच जगातील एखाद्याच्या स्थानाबद्दल जागरूकतेची भावना वाढते, विशेषत: समवयस्क आणि प्रौढ या दोहींशी असलेल्या नातेसंबंधाच्या संदर्भात. एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे इतर कशाप्रकारे पाहतात आणि एखाद्याच्या विचारांना कसा प्रतिसाद देतात याला विशेष महत्त्व देण्यात येते.

याशिवाय, आपण पंधरा वर्षे वयापर्यंत पोहचण्यापूर्वीच्या काही वर्षांत, वैयक्तिक व सामूहिक जीवनाविषयीच्या मौलिक संकल्पना आपल्या मनात आकार घेऊ लागतात. आपली विश्लेषणाची शक्ती अधिक मजबूत होते आणि आपल्याला जे काही शिकवले गेले आहे त्यावर आपण प्रश्न विचारू लागतो आणि आपल्या सभोवतालच्या जगामध्ये पूर्वी लक्षात न आलेले विरोधाभास आपण पाहू शकतो. प्रौढांनी ठरवलेल्या मानकांचे आपोआप पालन करण्यास आम्ही पूर्वीसारखे इच्छुक नसतो. या संक्रमणाच्या काळात, व्यक्ती नेहमी प्रश्नांची उत्तरे शोधत असते, ज्या बहुतेकदा तात्विक स्वरूपाच्या असतात, आणि एक नवीन चैतन्य वेगाने विकसित होते.

जर युवाकिशोरांना त्यांच्या उदयोन्मुख शक्तींचा फलदायी वापर करण्यास मदत करायची असेल तर, एकीकडे, त्यांचे बालपण वाढवणारे आणि दुसरीकडे, त्यांच्या अनेक पैलूंमध्ये वरवरच्या प्रौढत्वाच्या आवृत्तीचे अनुकरण करण्यास त्यांना प्रोत्साहन देणे, अशा प्रकारची वागणूक टाळणे आवश्यक आहे –अशी एक प्रवृत्ती जी दुर्दैवाने, समाजांमध्ये अधिकाधिक रुजलेली आहे. अब्दुल–बहा दर्शवितात:

**“कालांतराने तो युवावस्थेत प्रवेशतो, ज्यामध्ये त्याच्या पूर्वीच्या अवस्था व आवश्यकतांचे स्थान त्याच्या उन्नत दर्जाला लागू असणाऱ्या नवीन आवश्यकतांनी घेतलेले असते. त्याची निरीक्षण क्षमता विस्तृत व सखोल झालेली असते; त्याची बौद्धिक क्षमता प्रशिक्षित व जागृत झालेली असते; बाल्यावस्थेतील मर्यादा व वातावरण त्याच्या शक्तीवर व संपादनांवर बंधनकारी राहत नाहीत.”**[२]

बाल्यावस्था व युवावस्थेतील वयांच्या फरकांविषयी आपली समज वाढविण्यासाठी आपल्या गटामध्ये खालील प्रश्नांवर विचार करा:

१. निरीक्षण क्षमता विस्तृत आणि सखोल होणे याचा अर्थ काय? काही उदाहरणांद्वारे आपल्या विचारांचे स्पष्टीकरण देऊ शकता काय? ——————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

२. किशोरवयीन युवकांच्या बौद्धिक क्षमता, बालकांच्या बौद्धिक क्षमतेपेक्षा कशाप्रकारे भिन्न असतात?

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

३. बाल्यावस्थेच्या कोणत्या मर्यादा किशोरवयीन युवकांच्या जोमाला फार काळ प्रतिरोध करु शकत नाहीत? ——————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

## विभाग ३

प्रत्येक व्यक्तीला वयाच्या पंधरा वर्षांच्या आधीच्या वर्षांमध्ये अशा प्रकारचे शिक्षण व संगोपन मिळणे आवश्यक आहे, जे युवकांमधील सुप्त नैपुण्य प्रकट करण्यास हितावह राहील. असे शिक्षण विशेषत: महत्त्वाचे आहे कारण वयाच्या पंधराव्या वर्षापर्यंत, व्यक्तीच्या विचारांच्या आणि वागणुकीच्या बऱ्याचशा तऱ्हा घट्ट रुजलेल्या असतात. जसे की अब्दुल–बहा स्पष्ट करतात,

> **"एकदा तारुण्यारंभाचे वय ओलांडल्यानंतर व्यक्तीला शिकविणे आणि त्याचे वर्तन सुधारणे अतिशय अवघड असते. अनुभवाने दर्शविल्याप्रमाणे, त्या वेळी त्याच्या काही अवधारणा बदलविण्यासाठी जरी हरएक प्रयत्न केले, तरी त्या सर्वांची निष्पत्ती काहीच नसते. कदाचित आज तो काहीसा सुधारला असेल; परंतु काही दिवस जाऊ द्या मग तो विसरतो आणि तो त्याच्या स्वभावजन्य स्थितीत आणि शिरस्त्याच्या मार्गावर माघारी फिरतो."[३]**

आपण "पौगंडावस्था" या शब्दासोबत परिचित आहात, जो साधारणपणे बारा वर्षापासून ते अठरा वर्षांच्या वयापर्यंतच्या तरुण लोकांच्या संदर्भासाठी वापरण्यात येतो. काही वेळा "प्रारंभिक पौगंडावस्थेतील" हा शब्दप्रयोग ज्या वयाच्या श्रेणीत आहे त्यांना ओळखण्यासाठी वापरला जातो ज्यांना आपण सामान्यत: "युवाकिशोर" म्हणून संबोधित करतो. येथे आम्ही या संदर्भात जास्त विशेष शब्दांवर जोर देणार नाही आणि बारा ते पंधरा वयोगटातील तरुणांना संदर्भ देण्यासाठी अदलाबदल करण्यायोग्य संज्ञा वापरतो. पौगंडावस्थेतील शिक्षणाच्या महत्त्वाचा विचार करण्यासाठी, खालील विधाने खरी आहे का हे ठरवा:

—— जरी बाल्यावस्थेमध्ये योग्य शिक्षणाचा अभाव असला, तरी या वयाच्या कालावधीतील उचित संगोपन हे बाल्यावस्थेतील अनिष्ट वर्तणुकीला सुधारण्यास मदत करेल.

—— फक्त ज्यांना त्यांच्या बाल्यावस्थेमध्ये आध्यात्मिक आणि नैतिक शिक्षण मिळाले आहे, तेच त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यास समर्थ असतात.

—— पौगंडावस्थेमध्ये योग्य लक्ष आणि काळजी न घेतल्यास, एखादी व्यक्ती भरकटू शकते, जरी त्याला संपूर्ण बालपणात नैतिक आणि आध्यात्मिक शिक्षण मिळाले असले तरीही.

—— पौगंडावस्थेमध्येच व्यक्ती आपले जीवन समाजाला पुढे नेणाऱ्या शक्तींशी संरेखित करू शकतात किंवा सामाजिक विघटनाच्या शक्तींद्वारे स्वत:ला भरकटू देऊ शकतात.

## विभाग ४

पौगंडावस्थेतील वाढती जागरूकता दोन विरुद्ध दिशांनी प्रवाहित केली जाऊ शकते: एक प्रवाह ईश्वरी इच्छेच्या अधीनतेकडे आणि स्वत्यागातून मानवतेच्या सेवेकडे तर दुसरा प्रवाह हा स्वत्व व भावनांच्या बंदिवासाकडे नेतो. अब्दुल–बहा स्पष्ट करतात:

> **"प्रत्येक निर्मित वस्तूचे स्वत्व दैवी प्रज्ञेवर आधारित आहे, कारण ईश्वराच्या निर्मितीमध्ये कोणताही दोष नाही. तथापि, व्यक्तिमत्त्वामध्ये कायमतेचे तत्त्व नाही. मनुष्यामध्ये ते एक अल्पसे परिवर्तनीय तत्त्व**

**आहे, जे कोणत्याही दिशेने वळविता येते. जर तो प्रशंसनीय सद्‌गुण अर्जित करेल, तर त्याचे स्वत्व बलशाली होते आणि त्याच्या दडलेल्या शक्ती प्रकट होतात; तथापि जर तो वैगुण्ये अर्जित करेल, तर त्याच्या स्वत्वाचे सौंदर्य आणि साधेपणा गमावला जाईल आणि अहंतेच्या दुर्गंधी वातावरणात त्याला परमेश्वराने प्रदान केलेल्या गुणांचे हनन होईल."[४]**

आपण त्या युगात राहत आहोत, जेव्हा आक्रमक भौतिकवादी संस्कृती समाजाच्या प्रत्येक अंगाला ग्रस्त करीत आहे. युवाकिशोरांना त्यांच्यातील क्षमतांचा विकास करण्यास मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करताना या व्यापक संस्कृतीच्या ताणाबाणात भिनलेला आत्मसंतुष्टीचा अवास्तव सोस आम्हापुढे अनेक आव्हाने उभी करतो, असेही प्रयत्न की जे युवकांमधील क्षमता मुक्त करण्यासाठी प्रामाणिकपणे केले जात आहेत आणि त्यांची शक्ती समाजाच्या प्रगतीसाठी निर्देशित केली जात आहे, ते मुळात स्वार्थवादी असलेल्या जागतिक दृष्टिकोणाच्या विपरित प्रभावामुळे क्षती पाऊ शकतात. समस्या गुंतागुतीची आहे. सध्याची आजची जागतिक व्यवस्था उद्देशपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या बळापासून मोठ्या संख्येने मानवांना वंचित करत आहे; म्हणूनच आत्मविश्वास हा एक असा विषय आहे, ज्याची दखल घेणे आवश्यक आहे. हे लोकांच्या उच्च विचारप्रक्रियेला अंधुक करते; म्हणून, एखाद्याच्या उदात्त आकांक्षांची पूर्तता ही एक न्यायसंगत निकड झाली आहे. ती बहुसंख्य लोकांना आत्म्याच्या जीवनाविषयी बेखबर बनविते; म्हणून आत्मशोधनाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तथापि, "आत्म" यावर भर देणारे कार्यक्रम परिस्थिती सुधारतातच असे नाही. वारंवार असे घडते की, आत्म–साक्षात्कार, आत्म–शोध आणि आत्म–सन्मानाच्या नावाखाली असे कार्यक्रम, व्यक्तीच्या कल्पना विलसित करतात आणि त्याचा अहंकार वाढवतात. आपणापुढे जे आव्हान आहे, ते म्हणजे तरुणांमध्ये खऱ्याखुऱ्या आध्यात्मिक संवेदनांचे पोषण करणे; जेणेकरुन त्यांची कोमल अंत:करणे अत्युच्च सौंदर्याच्या आकर्षणाने आंदोलित व्हावीत आणि त्यांनी मानवतेच्या नि:स्वार्थ सेवेच्या उच्च आदर्शांकडे वळावे. त्यांच्या जीवनातील या रचनात्मक टप्प्यातील शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याच्या आपल्या प्रयत्नांनी आग्रही अहंतेला डोके वर काढण्यापासून रोखले पाहिजे. या आव्हानाचे स्वरुप पडताळून घेण्यासाठी, आपणास पुढील काही विभागांमध्ये पवित्र लेखांमधील "आत्म" या संदर्भातील काही उद्धरणांवर विचार करण्यास सुचविण्यात येते. तथापि, प्रथम आपण आपल्या गटामध्ये "आग्रही अहंतेने डोके वर काढणे" या वाक्यांशाच्या अर्थावर चर्चा करणे आपणास उपयुक्त वाटेल. हे एखाद्याला कसे सुनिश्चित करता येईल, की सेवा हे असे क्षेत्र बनू नये ज्यात अहंतेला बळ मिळेल?

## विभाग ५

खालील उद्धरणांचा पहिला संच आपल्या "व्यक्तित्वाच्या" अशा पैलूंशी संबंधित आहे, जी ईश्वराला प्रिय आहेत आणि ज्यांचा विकास होणे अगत्याचे आहे:

**"हे माझ्या सेवकांनो! तुमच्या आत्म्यांना माझ्या दानशौर्याच्या आणि औदार्याच्या ज्या रहस्यांनी विभूषित करण्याचे मी इच्छिले आहे हे तुम्ही आकलन करू शकलास, तर सत्यत:, तुम्ही स्वत:ला समस्त निर्मित वस्तूंच्या आसक्तीपासून मुक्त कराल आणि तुम्ही आपल्या स्वत:बद्दलचे खरे ज्ञान अर्जित कराल –असे ज्ञान, जे माझ्या स्वत:च्या अस्तित्वाची ओळख करण्यासमान आहे. तुम्ही स्वत:ला माझ्या**

**व्यतिरिक्त अन्य सर्वांपासून स्वतंत्र पाहाल आणि तुमच्या अंतर्बाह्य चक्षूने माझ्या उज्ज्वल नामाच्या प्रकटीकरणाइतकेच स्पष्टपणे, माझ्या प्रेमळ दयेचे आणि औदार्याचे सागर तुमच्यात संचार करताना पाहाल."[५]**

**"मर्त्य मानव तुझ्याविषयी हे निश्चयपूर्वक म्हणू शकतो अथवा ज्याचे श्रेय तुला देऊ शकतो किंवा ज्या प्रशंसेने तो तुजला महिमामंडित करू शकतो ते तुझ्या वैभवापासून दूर, अतिदूर असो! तुझ्या महिमेचे आणि वैभवाचे कमाल गुणगान करण्याचे जे कोणते कर्तव्य, तू तुझ्या सेवकांसाठी निर्धारित केले आहेस ते केवळ त्यांचेवरील तुझ्या कृपेचे द्योतक आहे, जेणेकरून ते त्यांच्या स्वत:च्या अंतरतम अस्तित्वाला जे पद प्रदान करण्यात आलेले आहे त्यापर्यंत उन्नत होण्यास समर्थ बनविण्यात यावे, जे आहे त्यांच्या स्वत:च्या स्वत्वाच्या ज्ञानाचे पद."[६]**

**"मातृग्रंथाच्या क्षितिजावरुन जी प्रथम तराझ (निर्मळ अलंकार) आणि दीप्ती प्रकट झाली आहे, ती म्हणजे मनुष्याने आपले स्वत:चे स्वत्व जाणावे आणि जे उच्चत्वाकडे किंवा हीनत्वाकडे नेते, जे वैभवाकडे किंवा तुच्छतेकडे नेते, जे संपन्नतेकडे किंवा विपन्नतेकडे नेते, त्याची ओळख करुन घ्यावी."[७]**

**"हे चैतन्य पुत्रा! मी तुला धनवान निर्मिले असताही तू स्वत:वर दारिद्र्य का ओढवून घेतोस? मी तुला प्रतिष्ठित केले असूनही तू स्वत:स हीन का करतोस? ज्ञानाच्या सारतत्त्वातून मी तुला अस्तित्व दिले असताही माझ्याशिवाय इतरांकडून तू ज्ञान प्रकाश का शोधतोस? मी तुला प्रेमाच्या मातीतून आकार दिला तरी तू इतरांबरोबर स्वत:स कसे गुंतवून घेतोस? तू अंतर्मुख हो ज्यायोगे सामर्थ्यशाली, शक्तिशाली आणि स्वयंभू म्हणून तू मला आपल्या अंतर्यामी पहावेस."[८]**

वरील उद्धरणांच्या आधारे खालील वाक्ये पूर्ण करा:

क. आपल्या आत्म्यांना ईश्वराच्या दानशौर्याच्या आणि औदार्याच्या रहस्यांनी आपणास विभूषित करण्याचे इच्छिले आहे हे आपण आकलन करत असताना, तुम्ही स्वत:ला ––––––––– –––––––– ––––––––––– –––––––––––––– ––––––– कराल आणि तुम्ही –––––––– ––––––––– –––– ––––––– अर्जित कराल.

ख. तुम्ही स्वत:ला परमेश्वरा व्यतिरिक्त ––– ––––––––– ––––– ––––––– आणि तुमच्या –––––––– –––––––– ईश्वराच्या ––––––––––––– ––––––––– ––––––––––––––– स्पष्टपणे, त्याच्या –––––––––––– –––––––– आणि –––––––– ––––––––– तुमच्यात ––––––– –––––––– पाहाल.

ग. परमेश्वराच्या महिमेचे आणि वैभवाचे कमाल गुणगान करण्याचे जे कोणते कर्तव्य, त्याने त्याच्या सेवकांसाठी निर्धारित केले आहेस ते केवळ त्यांचेवरील तुझ्या कृपेचे द्योतक आहे, जेणेकरून ते त्यांच्या ———————— ————————— ———————————— जे पद ————————— ———————— आलेले आहे ———————— ———————— ———————— ———————— ——————————— यावे, जे आहे ————————— ————————— ————————— ———————— पद.

घ. मनुष्याने आपले स्वतःचे स्वत्व जाणावे आणि जे ——————————— किंवा ————————————— नेते, जे —————————— किंवा —————————— नेते, जे ————————————— किंवा ————————— नेते, त्याची ——————— —————— घ्यावी.

च. आम्हास —————————— निर्मिले आहे आणि ———————— केले आहे. ————————— सारतत्त्वातून परमेश्वराने आपणास अस्तित्व दिले आहे, आणि ईश्वराच्या प्रेमाच्या ———————— आकार दिला आहे. ईश्वर आपणास अंतर्मुख होण्यास सांगतो ज्यायोगे ————————, ———————————————, आणि ——————————— म्हणून ईश्वरास आपण आपल्या —————————— पहावे.

वरील सर्व उद्धरणे आपले खरे स्वत्व व त्याचे स्वरुप समजून घेण्याच्या महत्त्वाशी संबंधित आहेत. अर्थातच, आपण हे जाणून घेतले पाहिजे, की आमच्या अस्तित्वाच्या थोरवीचे ज्ञान आम्हास आत्मप्रौढीकडे नाही तर ईश्वर आणि त्याच्या सेवकांपुढच्या विनम्रतेकडे नेईल. आपल्या गटात चर्चा करा की आपल्या खऱ्या स्वत्वाचे ज्ञान आपल्याला अहंकाराविरुद्धच्या संघर्षात कशी मदत करते.

## विभाग ६

उद्धरणांचा दुसरा संच आपल्याला स्वतःला “आत्म” ह्यात गुंतवण्याच्या परिणामांबद्दल चेतावणी देतो:

**“प्रत्येक अपूर्ण आत्मा आत्मकेंद्रित असतो आणि तो केवळ आपल्या स्वतःच्या कल्याणाचा विचार करतो.”**[९]

**“तथापि, जर तो वासनेच्या, इच्छेच्या, अवडंबराच्या किंवा स्वहिताच्या किंचितशा लवलेशाने मिश्रित झाला तर हे निश्चित, की त्याच्या सर्व प्रयत्नांचा परिणाम निष्फळ सिद्ध होईल, आणि तो वंचित आणि निराश बनेल.”**[१०]

**“विशेषत: तुला स्वाभिमानापासून मुक्तीची इच्छा आहे. हा गुण, जो अभिमान आहे, त्याने जगातील अनेक महत्त्वपूर्ण व्यक्तींचा नाश केला आहे. जर एखाद्या व्यक्तीमध्ये सर्व प्रशंसनीय गुण असले आणि तरीही तो अहंकारी असला, तर ते सर्व गुण आणि उत्तम वैशिष्ट्ये नष्ट होतील आणि सरतेशेवटी ती सर्वात वाईट दोषांमध्ये परिवर्तीत होतील.”**[११]

**“भोगासक्तीपासून इथे आणि परलोकी एकूण काय तर निराशा प्राप्त कराल; दुराग्रहीपणापासून मूर्ख ठराल व अक्कलशून्यतेवर विश्वास ठेवण्यापासून केवळ घृणा व दुर्गतीचे पीक पदरात पाडून घ्याल.”**[१२]

**“आज जगातील सर्व लोक स्वत:च्या फायद्यात गुंतवून घेत आहेत आणि स्वत:चा भौतिक फायदा करुन घेण्यासाठी अवास्तव प्रयत्न करीत आहेत. ते स्वत:ची पूजा करीत आहेत; ना दैवी वास्तवाची, ना मनुष्यमात्राच्या जगाची.”**[१३]

**“ह्या कसोट्या, ज्याबाबत तुम्ही लिहिले आहे, त्या, जोवर सत्याचा सूर्य त्यावर आपली किरणे टाकू शकेल, तोवर ह्दयाच्या आरशावरील अहंतेचे डाग पुसून काढतील; कारण अहंतेपेक्षा अधिक रोधक असा पडदा नाही, आणि तो पडदा कितीही पातळ असो, शेवटी तो व्यक्तीला पूर्णत: झाकाळून टाकतो आणि शाश्वत कृपेच्या त्याच्या वाट्यापासून त्यास वंचित करतो.”**[१४]

**“पहा, सूर्य कसा समस्त निर्मितीवर प्रकाशित होतो, परंतु केवळ ते पृष्ठभाग जे शुद्ध आणि चकचकीत आहेत तेच त्याचे वैभव आणि प्रकाश परावर्तित करतात. काळवंडलेल्या आत्म्यास सत्याच्या वैभवशाली दीप्तीच्या प्रकटीकरणाचा हिस्सा प्राप्त होणार नाही आणि अहंतेची भूमी जी त्या प्रकाशाचा फायदा घेण्यास असमर्थ आहे, ती वृद्धी निर्माण करु शकत नाही.”**[१५]

**“तो आत्मा किती अधम असेल, जो या अंध:कारात आनंदी राहू शकतो, स्वत:त मशगूल झालेला आहे, अहंता आणि विकाराचा दास बनला आहे, भौतिक जगाच्या दलदलीत लोळत आहे!”**[१६]

“आत्मकेंद्रीपणा,” “स्वहित”, “आत्मपूजा”, “स्वाभिमान”, “स्वत:च्या फायद्यात गुंतणे”, “अहंता आणि विकाराचे दासत्व” हे असे वातावरण तयार करतात जे परमेश्वराने दिलेल्या आपल्या व्यक्तिमत्त्वातील गुणधर्मांना दडपून टाकते. वरील उद्धरणांच्या संदर्भात अहंतेमध्ये गुंतणे कशाप्रकारे आध्यात्मिक व नैतिक विकास खुंटविते आणि सेवेचा प्रभावीपणा कमी करते, ह्याचे काही वाक्यांत वर्णन करा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## विभाग ७

उद्धरणांचा तिसरा संच 'हेकेखोर अहंतेला' कसे हाताळावे, याविषयी पवित्र लेखांमध्ये आढळणाऱ्या अनेक मार्गदर्शनांचा एक छोटासा नमुना दर्शवतो:

"आजच्या दिनी आभा साम्राज्याची स्वीकृती अशांना आहे, जे स्वत:चा त्याग करतात, आपले स्वत:चे कयास विसरतात, व्यक्तिमाहात्म्य बाजूला सारतात आणि जे इतरांच्या कल्याणाचा विचार करतात. जो कोणी स्वत:ला विसरला, त्याला विश्वाचा आणि त्याच्या निवासियांचा लाभ झाला. जो कोणी स्वत:मध्ये व्यापलेला आहे, तो असावधानतेच्या आणि पश्चात्तापाच्या वाळवंटात भटकत आहे. स्वस्वामित्वाची 'गुरुकिल्ली' आत्मविस्मरण ही होय. जीवनाच्या राजप्रासादाचा मार्ग त्यागाच्या वाटेवरुन जातो."[१७]

"वस्तूंच्या वास्तविकतेला भेदण्याची शक्ती परमेश्वराने आपल्याला दिली आहे; तथापि आपण आत्मत्यागी असले पाहिजे, आमचे आत्मे व हेतू शुद्ध असले पाहिजेत, आणि मानवी जगात वावरत असताना शाश्वत वैभव प्राप्त करुन घेण्यासाठी अंत:करण व आत्म्यापासून झटले पाहिजे."[१८]

"म्हणूनच सैतानी अहंतेचे पटल प्रेमाच्या अग्नीत जाळायला हवे; जेणेकरुन आत्मा विशुद्ध व स्वच्छ व्हावा, आणि अशाप्रकारे त्याने परमेश्वराच्या सर्वोच्च स्थानाची ओळख करावी ज्याच्याशिवाय या जगताची निर्मिती झाली नसती."[१९]

"अहंतेचे सर्व विचार सोडा आणि केवळ ईश्वरी इच्छेपुढे आज्ञाकारी आणि विनम्र होण्यासाठी झटा. केवळ याच मार्गाने आम्ही ईश्वराच्या साम्राज्याचे निवासी बनू आणि शाश्वत जीवन प्राप्त करु."[२०]

"अहंतेचा सर्वस्वी कंटाळा यावा असे करण्यासाठी तुम्ही सर्व काही करा, आणि वैभवाच्या मुखमंडलाशी तुम्हास संलग्नित करा; आणि दासतेच्या अशा पातळीवर तुम्ही एकदा का पोहचलात, तर तुम्ही पहाल की सर्व निर्मित वस्तू तुमच्या सावलीमध्ये एकवटल्या आहेत. तो असीम कृपाप्रसाद आहे; ती सर्वश्रेष्ठ सार्वभौमता आहे; हे असे जीवन आहे, ज्यास मृत्यू नाही. हे वगळता इतर सर्वकाही स्पष्टत: नरकवास आणि सर्वनाश आहे."[२१]

"म्हणून हे मित्रा, तुझ्या अहंतेचा त्याग कर, जेणेकरून तुला अद्वितीय एकमेव दृष्टित्पत्तीस होईल; आणि या नश्वर जगाच्या पलीकडे भरारी घे, जेणेकरून तुला नभोमंडळातील तुझ्या घरट्यात निवारा मिळेल. शून्यासारखा हो, जर तू अस्तित्वाचा अग्नी चेतवण्यासाठी इच्छित असेल आणि स्वत:ला प्रेमाच्या मार्गासाठी सुपात्र करीत असेल."[२२]

"अहंतेचे सर्व विचार आपण बाजूला ठेवूया; पृथ्वीवरील सर्वांकडे आपले डोळे बंद करुया, आपण आपल्या यातना उघड करु नयेत तसेच आपल्यावरील अन्यायाबद्दल गाऱ्हाणे गाऊ नये. उलट, आपण आपल्या स्वत:बद्दल बेखबर असावे, आणि स्वर्गीय कृपाप्रसादाच्या अमृताचे प्राशन करीत, आपण

**आपला आनंद हर्षोल्हासाने व्यक्त करावा आणि सर्व–वैभवशाली ईश्वराच्या सौंदर्यात स्वत:स हरवून घ्यावे."**[२३]

**"हे जगातील लोकहो! आपल्या स्वत:च्या अहंतेच्या प्रेरणांचे अनुसरण करु नका, कारण त्या वारंवार हट्टाने तुम्हाला दुष्टपणा आणि वासना यांकडे घेऊन जातील; त्यापेक्षा, त्या परमेश्वराचे अनुसरण करा जो सर्व निर्मित वस्तूंचा धारणाकर्ता आहे, जो पावित्र्य दाखविण्याची तुम्हांला आज्ञा करतो आणि परमेश्वराचे भय बाळगा."**[२४]

वरील उद्धरणांमध्ये सुचविलेल्या अभिवृत्ती, आजच्या समाजाचे वैशिष्ट्य बनलेल्या अहंतेच्या दैवतीकरणाच्या आणि बेछूट आत्मतुष्टीकरणाच्या अगदी विरुद्ध आहेत. या उद्धरणांमधील काही अशा अभिवृत्ती ओळखा, ज्यांचा विकास करण्यास आम्ही शिकले पाहिजे. आपणास मदत करण्यासाठी दोन उदाहरणे दिली आहेत.

– आपण स्वत:चा त्याग करण्यास, आपले स्वत:चे कयास विसरण्यास, व्यक्तिमाहात्म्य बाजूला सारण्यास आणि इतरांच्या कल्याणाचा विचार करीत राहण्यास शिकले पाहिजे.

– आपण आत्मत्यागी बनण्यास शिकले पाहिजे.

– आपण ————————————————————————————

———————————————————————— शिकले पाहिजे.

– आपण ————————————————————————————

———————————————————————— शिकले पाहिजे.

– आपण ————————————————————————————

———————————————————————— शिकले पाहिजे.

– आपण ————————————————————————————

———————————————————————— शिकले पाहिजे.

– आपण ————————————————————————————

———————————————————————— शिकले पाहिजे.

– आपण ———————————————————————————————————————————

——————————————————————————————————— शिकले पाहिजे.

आपण ओळखलेल्या अभिवृत्ती उत्कृष्ट व्यक्तित्वाचा विकास करण्यास आणि शक्तीनिशी सेवाकार्य करण्यास कशाप्रकारे साह्य करतात, ह्याची आपल्या गटात चर्चा करा.

## विभाग ८

सरतेशेवटी, अब्दुल–बहांची खालील उद्धरणे आत्मत्याग आणि सामाजिक परिवर्तनास हातभार लावण्याची क्षमता या दोहोंच्या परस्परसंबंधांचे स्मरण करुन देतात:

**"जगातील बहुतांश लोक स्वत: व भौतिक लालसांमध्ये गुंतलेले आहेत, निम्नतर जगाच्या महासागरात बुडाले आहेत आणि नैसर्गिक जगाचे कैदी आहेत, अशा आत्म्यांना वगळता, अन्य लोक भौतिक जगाच्या श्रृंखला व जोखडातून मुक्त झालेले आहेत आणि सहज उड्डाण करणाऱ्या पक्ष्याप्रमाणे असीम साम्राज्यात विहार करीत आहेत. असे मुक्त लोक जागे व दक्ष आहेत, ते नैसर्गिक जगाच्या भुलाव्यापासून दूर राहतात, त्यांची अत्युच्च इच्छा मानवमात्रांमधील जीवनसंघर्ष समूळ नष्ट करण्यावर केन्द्रित असते, त्यांच्यात आध्यात्मिकतेचे तेज आणि उच्च साम्राज्यातील प्रेम आढळून येते, लोकांमध्ये ते अत्यंत दयाळूपणाने वागतात, धर्मपद्धतीतील घनिष्ट आणि जवळच्या संबंधांची त्यांना जाणीव असते आणि आत्मत्यागाच्या आदर्शाचे ते पालन करतात. तद्नंतरच मानवमात्रांचे जग ईश्वरी साम्राज्यात परिवर्तित होईल."**[२५]

**"हे ईश्वराच्या सैनिकांनो! आजच्या दिनी, या जगात प्रत्येकजण आपल्या कल्पनांच्या आणि लहरींच्या तालावर पथभ्रष्ट होऊन आपल्या वाळवंटात इथेतिथे भटकत आहे आणि आपल्या विशिष्ट चंचलतेचा पाठपुरावा करीत आहे. पृथ्वीवरील ह्या समस्त लोकांमध्ये, सर्वश्रेष्ठ नामाचा केवळ हा समुदाय मानवी योजनांपासून मुक्त व अलिप्त असून त्यास स्वार्थी उद्देश साधावयाचा नाही. त्या सर्व लोकांमधील केवळ हे लोक, स्वार्थापासून विशुद्ध अशा उद्देशाने पुढे आले आहेत, ईश्वरी शिकवणुकीचे पालन करीत, अत्यंत उत्सुकतेने परिश्रम करीत आणि एकमेव उद्दिष्टाचा पाठपुरावा करीत आहेत: या क्षुद्र धुळीचे उच्च स्वर्गात परिवर्तन करण्यास, या जगाला दैवी साम्राज्यासाठी आरसा बनविण्यास, या जगाचे वेगळ्या जगात रुपांतर करण्यास, आणि सर्व मानवजातीने पावित्र्याचे मार्ग चोखाळावे व जीवनाची नवीन नीती अंगीकारण्यास."**[२६]

**"हे ईश्वराच्या प्रियजनहो! या बहाई युगामध्ये, ईश्वराचे धर्मकार्य म्हणजे विशुद्ध चैतन्य होय. त्याचे धर्मकार्य या जगाचे नाही. ते कलह किंवा युद्धासाठी, खोडकरपणा किंवा शरमेच्या कृत्यांसाठी; इतर धर्ममतांशी भांडण्यासाठी किंवा राष्ट्रांशी संघर्ष करण्यासाठी आलेले नाही. ईश्वरप्रेम ही त्याची सेना आहे, ईश्वरी ज्ञानाचे विशुद्ध अमृत हीच केवळ प्रसन्नता आहे, त्याचा एकमेव संघर्ष सत्याचा पाठपुरावा**

**करणे आहे; त्याचे एकमेव धर्मयुद्ध अहंतेच्या विरुद्ध, मानवी अंत:करणाच्या दुष्ट प्रेरणांविरुद्ध आहे. त्याचा विजय समर्पण, शरणता आणि चिरंतन वैभवात स्वार्थरहित राहणे हा आहे."**[२७]

वरील उद्धरणे अशा लोकांच्या काही विशिष्ट गुणांचे वर्णन करतात, ज्यांना अब्दुल–बहा "ईश्वराच्या सेनेत" असल्याचे मानतात, ज्यांना ते "ईश्वराचे प्रियजन" असे संबोधतात आणि जे "भौतिक जगाच्या श्रृंखला व जोखडापासून मुक्त आहेत." खालील वाक्ये पूर्ण करताना या वैशिष्ट्यांविषयी विचार करा.

क. जगातील बहुतांश लोक ––––– व ––––––– लालसांमध्ये गुंतलेले आहेत, ––––––––– ––––––– ––––––––––– बुडाले आहेत आणि ––––––––– ––––– कैदी आहेत.

ख. जे अन्य लोक भौतिक जगाच्या श्रृंखला व जोखडातून मुक्त झालेले आहेत आणि सहज उड्डाण करणाऱ्या पक्ष्याप्रमाणे असीम साम्राज्यात विहार करीत आहेत, ते ––––– ––– –––––– व ––––– आहेत, ते ––––––––– ––––––––– –––––––––––––––– दूर राहतात, त्यांची अत्युच्च इच्छा ––––––––––––––– –––––––––––––––– ––––––– ––––– करण्यावर केन्द्रित असते, त्यांच्यात आध्यात्मिकतेचे तेज आणि उच्च साम्राज्यातील प्रेम आढळून येते, लोकांमध्ये ते अत्यंत ––––––––––––– वागतात, धर्मपद्धतीतील ––––––––– आणि ––––––––– ––––––––– त्यांना जाणीव असते आणि ––––––––––––––––– ––––––––– ते ––––––––– करतात.

ग. आजच्या दिनी, या जगात प्रत्येकजण आपल्या ––––––––– आणि ––––––––– तालावर ––––––––– ––––––––– आपल्या ––––––––– इथेतिथे ––––––––– आहे आणि आपल्या ––––––––– ––––––––––– ––––––––––– करीत आहे.

घ. सर्वश्रेष्ठ नामाचा केवळ हा समुदाय ––––––––– ––––––––––––––– ––––––– व ––––––– असून त्यास ––––––– ––––––––– ––––––––––––– नाही. त्या सर्व लोकांमधील केवळ हे लोक, –––––––––––––– ––––––––– अशा ––––––––– पुढे आले आहेत, ––––––––– ––––––––––––––– पालन करीत, अत्यंत उत्सुकतेने ––––––––– करीत आणि ––––––––– ––––––––––––––– ––––––––––––––– करीत आहेत: या ––––– ––––– ––––– ––––––––– परिवर्तन करण्यास, या जगाला ––––– ––––––––––––– –––––– बनविण्यास, या

जगाचे ——————— ——————— ——————— करण्यास, आणि सर्व ———————————— ——————— मार्ग ——————— व ——————— ————
———— अंगीकारण्यास.

च. ईश्वराचे धर्मकार्य म्हणजे ——————— ——————— होय. त्याचे ——————— या —————— नाही. ———————— ही त्याची सेना आहे, ————————— ——————— ——————— ——————— हीच केवळ प्रसन्नता आहे, त्याचा एकमेव संघर्ष ——————— ——————— ——————— आहे; त्याचे एकमेव धर्मयुद्ध ——————— ———————, ——————— ———————— ——————— ————————————— आहे. त्याचा विजय ———————, ——————— आणि ——————— ——————— ——————— राहणे हा आहे.

## विभाग ९

बहाउल्लाह ह्यांनी प्रकट केलेल्या काही प्रार्थनांमधील खालील उतारे आपण मुखोद्‌गत करावे:

**"हे माझ्या स्वामी, जो तुझ्या स्वत्वाचा प्रकटीकरण आहे, त्याचे पुढे त्यांना त्यांच्या स्वतःच्या शक्तिहीनतेच्या भावनेची अंतःप्रेरणा होऊ दे आणि तुझ्या स्वयंपूर्णतेच्या आणि समृद्धतांच्या अनेक चिन्हांच्या तुलनेत त्यांच्या स्वतःच्या स्वरुपाची दारिद्र्यता ओळखण्याची त्यांना शिकवण दे, जेणेकरून ते तुझ्या धर्मकार्याच्या सभोवती एकत्र येवोत आणि तुझ्या दयेच्या किनारीला बिलगोत आणि तुझ्या इच्छेच्या सुप्रसन्नतेच्या दोराला घट्ट पकडोत."**[२८]

**"हे माझ्या ईश्वरा, तुझ्या सेवकांच्या अहंतेच्या व आसक्तीच्या पोषाखांचे हरण कर किंवा असे कर की तुझ्या जनांची दृष्टी अशा उंचीप्रत उन्नत व्हावी, की त्यांनी त्यांच्या आसक्तीमध्ये तुझ्या शाश्वत वैभवाच्या मंद वाऱ्याच्या सळसळीव्यतिरिक्त अन्य काही पाहू नये, आणि त्यांना आपल्या स्वत्वामध्ये तुझ्या दयामय सारत्वाच्या प्रकटीकरणाव्यतिरिक्त इतर कशाची ओळख होऊ नये, पृथ्वी आणि त्यातील सर्व काही जे तुला परके आहे किंवा तुझ्या सारतत्त्वाशिवाय इतर कशाचेही प्रदर्शन करते, त्या सर्वांपासून पूर्णतः मुक्त कर."**[२९]

## विभाग १०

जसजसा युवाकिशोरांचे संगोपन करण्याविषयी आपला उत्साह वाढेल, तसतसा पौगंडावस्थेचे वर्णन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक सिद्धांताशी आपण परिचित व्हाल. आपणासमोर वारंवार येणाऱ्या शब्दांपैकी एक शब्द राहील "संभ्रमावस्था" —जी ओळख, भावना, पालकांशी संबंध, शासकीय अधिकाऱ्यांशी संवाद इत्यादींशी संबंधित आहे. आपण या सिद्धांताकडे चिकित्सेने पाहणे आवश्यक आहे, जेणेकरुन संभ्रमावस्था ही

प्रत्येक युवाकिशोराच्या बाबतीत आवश्यक आहे असे आपण गृहीत धरणार नाही. प्रत्येक युवाकिशोराचे जीवन मूलत: एका किंवा दुसऱ्या प्रकारच्या उलथापालथीने चित्रित असणे खरेच आवश्यक आहे काय? मानवजातीच्या संपूर्ण इतिहासात युवाकिशोर अशा प्रकारच्या संभ्रमांनी ग्रस्त राहिलेत काय आणि सध्यादेखील प्रत्येक सांस्कृतिक वातावरणात व समाजात ते अशाच अवस्थेतून जात आहेत काय?

या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नात आपण जागरुक असले पाहिजे, की युवाजनांवरील बहुतांश प्रचलित शोधकार्ये अशा आकृतिबंधांमध्ये पार पाडली जातात, ज्यांमध्ये व्यक्तित्व, संतुष्टीकरण, जैविक बदल, लैंगिक जागरुकता आणि भौतिक सफलता, जसे की नौकरी–धंदा, कमाई आणि सामाजिक स्थिती, यावर अवास्तव भर दिला जातो. त्यात प्राय: मानवी आत्म्यास ईश्वराकडून मिळालेल्या गुणांकडे दुर्लक्ष करुन वर्ग, वंश आणि लिंग या गौण बाबी केंद्रस्थानी धरल्या जातात. अर्थातच, अशा अभ्यासकार्यापासून आपणास काही अंतर्दृष्टी प्राप्त होतील, ज्या आपण मदत करण्यास इच्छुक असलेल्या युवकांच्या गटाचे गुणधर्म समजून घेण्याच्या आपल्या प्रयत्नात सहाय्यक राहतील. तथापि, अशा अभ्यासांमधून प्रोत्साहित झालेले प्रयत्न युवाजनांच्या आजच्या समाजाच्या, ज्याचा भौतिक दृष्टिकोन आध्यात्मिक संवेदनशीलता नष्ट करण्याकडे असल्याचे आम्ही जाणतो, रीतिभातींशी तडजोड करण्यास मदत करण्यापलीकडे काही विशेष करु शकतील, याविषयी संदेह आहे. उलटपक्षी, युवाकिशोरांची जी संकल्पना आपण स्वीकारता, ती “सतत प्रगतिशील सभ्यतेला पुढे नेणाऱ्या” व “एकतेचे शिल्पकार” बनणाऱ्या, “न्यायाचे समर्थक” असणाऱ्या व्यक्तींच्या आध्यात्मिक वैशिष्ट्यांच्या विकासाचे निदर्शन करते.

या संदर्भात हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, युवाजनांना इतर लोक ज्याप्रकारे पाहतात त्याचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडतो. अशाप्रकारे समाजात प्रचलित असलेले युवावस्थेबद्दलचे गडद चित्र वागणुकीच्या अवांछनीय पद्धतींचा फैलाव करण्यास अनुकूल स्थिती निर्माण करण्यास मदत करते. उदाहरणार्थ, सिगमंड फ्रेऊडशी संबंधित असलेल्या एका वक्तव्याचा विचार करा, की किशोरावस्था म्हणजे तात्पुरता मानसिक आजार होय, किंवा आना फ्रेऊडचा हा प्रस्ताव, की किशोरावस्थेच्या काळात सामान्य असणे ही बाबच मुळात असामान्य आहे. अशी वक्तव्ये लोकांना युवाकिशोरांची खरी क्षमता पाहण्यापासून परावृत्त करणारे अडसर निर्माण करीत नाहीत काय? कोणत्या पुराव्यांनी वैज्ञानिकांना अशा बेछूट अनुमानांप्रत नेले आहे? अर्थातच, असे बरेचसे शिक्षाविद् आहेत, ज्यांनी किशोरावस्थेचे वर्णन बऱ्याच सकारात्मक शब्दांमध्ये केले आहे, परंतु त्यांच्या संकल्पनांना या विषयाच्या चर्चेमध्ये प्राधान्य दिले जात नाही. पालक आणि शिक्षक यांच्या मनामध्ये किशोरांविषयी समानतेने बंडखोरी, अतार्किकता, चंचलतेचे मानचित्र रेंगाळत असते. आपण विचारु शकतो, की असा समाज की ज्याच्या रक्तप्रवाहात ह्या अनिष्ट संकल्पना भिनल्या आहेत, तो युवकांना या पुस्तकाच्या पहिल्या घटकात वर्णन केल्याप्रमाणे युवक बनण्यास कशाप्रकारे मदत करु शकतो?

## विभाग ११

वरील चर्चेच्या संदर्भात, आम्हास असे सुचवावेसे वाटते की आपण खालील मत अंगीकारावे: जेव्हा जेव्हा युवाकिशोरांचा कोणताही गट वाईट वागणूक विकसित करतो —त्यापलीकडे, जे नैसर्गिकरित्या एकापाठोपाठ संकट आणि विजयाच्या क्रमिक टप्प्यांमधून, सामान्य वाढीच्या प्रक्रियेच्या वैशिष्ट्यामुळे उद्‌भवते—

तेव्हा याची कारणे सामाजिक परिप्रेक्ष्यात शोधली जावी. कदाचित ज्या ज्येष्ठ लोकांवर त्यांनी आधी पूर्ण विश्वास ठेवला होता, त्या लोकांच्या जीवनातील उघड विसंगती तरुणांच्या जागृत होत असलेल्या मनाच्या दृष्टीस आल्यामुळे किंवा बाल्यावस्थेच्या सवयी सोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीची तार्किकता समजून घेण्याच्या ज्येष्ठ लोकांच्या असमर्थतेमुळे युवाकिशोरांची वागणूक बिघडू शकते.

अर्थातच, हे मत किशोरावस्थेच्या वागण्यात उतावीळपणा अथवा बंडखोर प्रवृत्तीचा सपशेल अभाव असतो, असा प्रतिवाद करीत नाही. जे सुचवायचे आहे ते असे, की सांप्रत काळात दिसून येणाऱ्या बऱ्याचशा अनिष्ट बाबींसाठी प्राय: सामाजिक वातावरण आणि ज्येष्ठ लोकांचे आचरण जबाबदार आहे. आम्ही केलेल्या या दाव्याच्या निहित परिणामांचा अंदाज घेण्यासाठी, आपणास खालील वक्तव्यांच्या वैधतेबाबत आपल्या गटात चर्चा आणि ही संकल्पना अधिक स्पष्ट करणारी काही वक्तव्ये तयार करावी असे वाटेल:

- युवाकिशोर अशा ज्येष्ठ लोकांविरुद्ध बंड करतात, जे त्यांना अशा गोष्टींचे अनुसरण करण्यास सांगतात, ज्यांचे अनुसरण ते स्वत: करीत नाहीत.
- युवाकिशोर बंडखोर असे दिसून येतात, जेव्हा त्यांना दिलेला उपदेश नैतिक सुधारणेच्या आविर्भावात प्रदर्शित केलेला असतो.
- जेव्हा जग त्यांना त्यांच्या बौद्धिक क्षमतेच्या विकासात अडथळा आणणाऱ्या वरवरच्या कार्यकलापांव्यतिरिक्त अन्य काहीही सामायिक करीत नाही, तेव्हा ते त्यांच्याकडे तुच्छतेने पाहू लागतात.
- जेव्हा वडिलधारी मंडळी त्यांच्यावर कडक निर्बंध लादतात, विशेषत: अशा वेळी की बालके म्हणून त्यांना अनिर्बंध स्वातंत्र्य दिलेले असते, तेव्हा शिस्तीबद्दल ते तिरस्कार दर्शवितात.
- जेव्हा त्यांच्या सभोवतालच्या प्रौढांना त्यांच्या निर्णयांच्या परिणामांवर विचार करण्यास मदत कशी करावी हे माहित नसते तेव्हा ते आवेगपूर्ण दिसतात.
- जेव्हा त्यांना समाजाच्या सेवेसाठी नि:स्वार्थी सेवेऐवजी अहंकाराचे धडे दिले जातात, तेव्हा त्यांच्यात गर्व निर्माण होतो.
- जेव्हा सततची जाहिरातबाजी त्यांच्या भौतिक असक्तींची तुष्टी करण्यास त्यांना प्रवृत्त करते, तेव्हा ते भोगासक्त होतात.

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

————————————————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————————————————

## विभाग १२

विश्व न्याय मंदिराने "शिथिल समाजा" च्या "हलगर्जीपणा आणि भ्रष्टतेबद्दल" आणि तरुणांनी त्याच्या प्रभावापासून स्वत:चे संरक्षण करण्याच्या आवश्यकतेबाबत टिप्पणी केली आहे:

> **"...प्रभूधर्माला प्रचंड लाभ प्राप्त होईल जेव्हा हे निरीक्षणात येईल की बहाई श्रद्धावंत आणि विशेषत: बहाई युवा, शिथिल समाजाच्या हलगर्जीपणा आणि भ्रष्टतेच्या विरोधात उभे आहेत, ज्या उत्तुंग आचरणाचे ते पालन करण्याचा प्रयत्न करतात ते आध्यात्मिक तत्त्वांमध्ये दृढतापूर्वक रुजलेले आहेत, ज्यामुळे त्यांना आत्मविश्वास, स्वाभिमान आणि खरा आनंद मिळेल. दुसरीकडे, जर श्रद्धावंत सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीत गुरफटले असतील तर प्रभूधर्माला मोठ्या प्रमाणावर हानी होऊ शकेल."**[३०]

खालील परिच्छेदात, धर्मसंरक्षक आम्हाला अशा समाजाचे स्वरूप आणि त्याचा आपल्या सर्वांवर काय प्रभाव होतो, याविषयी गहन अंतर्दृष्टी प्रदान करतात:

> **"खरेच, सध्या समाजात प्रचुरतेने आढळणाऱ्या विपत्तींचे प्रमुख कारण आध्यात्मिकतेची उणीव हे होय. आपल्या काळातील भौतिकवादी संस्कृतीने मानवजातीची शक्ती व अभिरुचीचे एवढे मोठे शोषण केले आहे, की सर्वसाधारण लोकांना त्यांच्या दैनंदिन भौतिक अस्तित्वाच्या शक्तीपलीकडे व स्थितीपलीकडे स्वत:स उंचावून घेण्याची मुळीच आवश्यकता वाटत नाही. ज्या गोष्टींना आपण आध्यात्मिक असे म्हणतो त्यांना, आपल्या भौतिक अस्तित्वाच्या गरजा आणि आवश्यकतांपासून वेगळे करण्यासाठी, पुरेशी मागणी नाही."**[३१]

आज समाजात कार्यरत असलेल्या विध्वंसक शक्तींचे वर्णन करताना, धर्मसंरक्षक नैतिक पतनाच्या अनेक चिन्हांचे वर्णन करतात. त्यांच्या संभाषणात ठळकपणे समाविष्ट आहेत, विवाहाप्रती बेजबाबदार वृत्ती आणि परिणामी घटस्फोटाची वाढती लाट; कौटुंबिक ऐक्य क्षीण होणे आणि मातापित्यांचे नियंत्रण उत्तरोत्तर शिथिल होणे; ऐहिक व्यर्थता, श्रीमंती व सुखसोयींचा झपाटल्यागत पाठलाग; विलासलोलुपतेकडे घसरण; कला व संगीताचा ऱ्हास; साहित्य व प्रसारमाध्यमांच्या स्तराची अवनती; आणि वांशिक वैरभाव आणि राष्ट्रप्रेमाचा उन्माद. या अनिष्टांच्या प्रभावापासून कुणीही उन्मुक्त नसला, तरी युवाकिशोरांना ते विशिष्ट प्रकारे प्रभावित करतात. उदाहरणार्थ, घटस्फोटाच्या काही परिणामांचा विचार करा. निर्विवादपणे, जेव्हा त्यांचे पालक घटस्फोट घेतात तेव्हा लहान मुलांना खोलवर दु:ख होते कारण ते संयुक्त घराच्या संरक्षणाची व सुरक्षिततेची आकांक्षा बाळगतात. परंतु किशोरावस्थेतच ते आपल्या पालकांचे लग्न मोडल्यावर अपराधीपणा, राग, लज्जा आणि अपमान यासारख्या भावनांनी गांगरुन जातात. जरी ते आपल्या मातापित्यांना जबाबदार धरत असले, तरी कौटुंबिक दुर्दैवासाठी स्वत:ला दोष देण्याव्यतिरिक्त त्यांना प्रत्यवाय नसतो. विवाह आणि कौटुंबिक जीवनाबद्दल संशयी वृत्तीची बीजे त्यांच्या मनात पेरली जातात आणि त्यांच्या सभोवारच्या समाजात ते पाहत असलेल्या घटस्फोटाच्या वाढत्या भरतीमुळे त्यांच्या निराशेला बळकटी मिळते.

१. वर उल्लेखिलेल्या काही बाबी युवाकिशोरांच्या मनातील सत्याच्या संकल्पनांना, उदा. ते स्वत:विषयी कशाप्रकारे विचार करतात, त्यांचे जीवनविषयक दृष्टिकोन, त्यांचे विचार व भावना, योग्य आणि अयोग्य यांमध्ये भेद करण्याची त्यांची क्षमता, इतरांसोबत त्यांची वागणूक, आणि समाजातील संस्थांवरील त्यांचा विश्वास इत्यादींना कशाप्रकारे आकार देतात, यावर विचार करणे आपणास साह्यभूत वाटेल. नमूद केलेल्या विविध अटी खाली दिल्या आहेत आणि आपले विचार लिहिण्यासाठी काही जागा उपलब्ध करून दिली आहे.

क. स्वच्छंदी समाजातील नैतिक बेपर्वाई आणि भ्रष्टता: ————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

ख. कौटुंबिक ऐक्य क्षीण होणे व मातापित्यांचे नियंत्रण उत्तरोत्तर शिथिल होणे: ——————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

ग. ऐहिक व्यर्थता, श्रीमंती व सुखसोयींचा झपाटल्यागत पाठलाग आणि विलासलोलुपतेकडे घसरण:

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

घ. कला व संगीताचा ऱ्हास, आणि साहित्य व प्रसारमाध्यमांच्या स्तराची अवनती: ——————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

च. वांशिक वैरभाव आणि राष्ट्रप्रेमाचा उन्माद: ——————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

२. युवाकिशोरांच्या जीवनावर या बाबींच्या प्रभावाचा विचार करताना आपल्या मनात कोणत्या भावना उत्पन्न होतात? या बाबींविषयी माहिती असणे हे त्यांच्यातील खऱ्या क्षमतेचा विकास करण्यास त्यांना मदत करताना आपणास कशाप्रकारे सहाय्यक ठरेल?

## विभाग १३

भग्नावस्थेकडे जाणाऱ्या जगातील नकारात्मक बाबींकडे लक्ष आकर्षित करणे म्हणजे आज समाजात कार्यरत असणाऱ्या सकारात्मक शक्तींचे महत्त्व नाकारणे नव्हे. जे करणे आवश्यक आहे ते हे, की युवाकिशोर योग्य अशा सामाजिक शक्तींनी प्रभावित व्हावेत याची खातरजमा करणे आणि असे वातावरण निर्माण करणे, ज्यामध्ये त्यांच्या आध्यात्मिक बलाचे संगोपन होऊ शकेल. त्यांना समाजातील विघातक तत्त्वांपासून पूर्णपणे वेगळे करण्याचे प्रयत्न निष्फळ ठरतील. त्याऐवजी त्यांच्या सभोवतालचे जग त्यांच्या विचारांवर आणि भावनांवर कसे परिणाम करते याचे मूल्यांकन आणि विश्लेषण करण्यात त्यांना मदत केली पाहिजे. अशा विश्लेषणामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या प्रचारांकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. या संदर्भात, प्रचारतंत्र नीतिमूल्यांच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, कारण, बहुतेक समाजांमध्ये, प्रचारतंत्र युवाकिशोरांची मूल्ये, दृष्टीकोन आणि विचारांना आकार देत आहे. जाहिरातबाजीच्या काही पैलूंकडे ओझरता दृष्टिक्षेप हा मुद्दा स्पष्ट करण्यास पुरेसा ठरेल.

प्रचारावर प्रभुत्व गाजविणाऱ्या भौतिक शक्ती सत्याचा विपर्यास करतात. उदाहरणार्थ, जाहिरातींमध्ये दाखविलेल्या परिपूर्ण परंतु प्राप्त न होण्यासारख्या प्रतिमा तरुणांच्या वाढत्या स्वयंजाणिवेच्या काळात त्यांच्या भावनांशी चाळा करतात. बहुसंख्य जाहिरात संदेशांमध्ये मुलींचा प्रमुख उद्योग पुरुषांना आकर्षित करण्याचा आहे असे दर्शविले जाते. शिवाय, शारीरिक शक्तीच्या दृष्टीने पुरुषत्वाची व्याख्या करण्याची प्रवृत्ती अतिशयोक्तीपूर्ण असते, बहुतेकदा हिंसक कृत्ये आणि धोका पत्करणे आणि लैंगिक साहस आणि विजयांना प्रोत्साहन देण्यापर्यंत. ज्या कशाला निर्बलता समजण्यात येते, त्याचा निर्दयतेने अव्हेर केला जातो आणि आक्रमक वागणुकींचा पाठपुरावा केला जातो. विशेष म्हणजे, मुलींना ते अंगीकारण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने, कठोरपणाचा विशिष्ट ब्रँड आकर्षक म्हणून प्रक्षेपित केला जातो.

ह्यात काही शंका नाही, की तरुण लोकांकडे निर्देशित बहुतांश जाहिरातींचा प्राथमिक उद्देश अशी संस्कृती निर्माण करण्याचा असतो, जिच्याशी संलग्न होण्याची उत्कंठा त्यांच्यात निर्माण व्हावी. अशा संस्कृतीत ते एक समान भाषा बोलण्यास शिकतील, एका प्रकारे वागतील आणि सर्वांत मुख्य म्हणजे अमर्याद प्रकारच्या उत्पादनांचे उपभोक्ते बनतील. अर्थातच उत्पादनांच्याही पलीकडे तरुणांना एका अशा सर्वंकष

आचारपद्धतीत नेतील, जी त्यांच्या उर्वरित आयुष्यात भोगवस्तूंच्या तऱ्हेचे नियमन करील. ऐतिहासिक दृष्ट्या "युवाकिशोर" हा शब्दच यासाठी शोधून काढला गेला, की समाजाच्या ज्या अंगांचे तो प्रतिनिधित्व करतो, त्यातील हमखास बाजारपेठेचा फायदा घेता यावा.

जागृत होत असणाऱ्या इच्छावृत्तीचा पूर्ण लाभ घेण्यासाठी जाहिरात तंत्र जी एक संस्कृती निर्माण करीत आहे, ती युवाकिशोरांच्या जीवनात लैंगिकतेला केंद्रस्थानी ठेवते. लैंगिकतेशी कोणताही संबंध नसलेल्या शीतपेयासारख्या उत्पादनांचा वापर तरुणांच्या मनात रोमांचक नातेसंबंधांचा आभास निर्माण करण्यासाठी केला जातो. सौंदर्यप्रसाधने बाजारात आणण्यासाठी किंवा लैंगिक आकर्षण निर्माण करण्यासाठी आणि लाजीरवाणेपणापासून मुक्ती देण्याच्या नावावर लैंगिक अपूर्णतेच्या भावना, शरीराच्या दुर्गंधीमुळे टाळले जाण्याबद्दलची निराशा, त्वचादोष, फॅशनरहित पोषाख यांबद्दलची व्यग्रता तीव्र केली जाते. मोटारगाड्यांचे वर्णनदेखील "गरम", "सुडौल", "हाताळण्यास मधाप्रमाणे" अशा लैंगिकतेशी संबंधित शब्दांनी केले जाते. गेल्या काही दशकांमध्ये नैतिक पातळीची जशी जशी अधोगती झाली आहे, तसे तसे जाहिरातींमधील नैतिकदृष्ट्या आपत्तिजनक मजकूर अधिकाधिक ढळढळीत होत आहेत. असे दिसते की उपभोक्तावादाचे काही पैलू हळूहळू स्वतःच लैंगिकतेची रुपे धारण करीत आहेत.

"युवाकिशोरांच्या" वाढत्या वैश्विक बाजारपेठेत ब्रॅन्ड–इमेजेसच्या भूमिकेचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. ह्या वाढत्या बाजारपेठेचा फायदा कसा घ्यावा, ह्याचा अंदाज घेणाऱ्या अभ्यासांमधून असे सूचित होते, की ब्रॅन्ड चिन्हांविषयी आसक्तिभाव हे अनिर्बंध उपभोक्तावादाचे महत्त्वाचे अंग आहे. बाह्यतः, ब्रॅन्ड हे युवाकिशोरांच्या अस्थिर विश्वात स्थिरतेचा आभास निर्माण करतात. इतकेच काय, जाहिरातींद्वारे आकर्षक बनवलेल्या जागतिक युवा संस्कृतीचा परवाना असल्याचे म्हणून त्यास गृहीत धरले जाते. हे अभ्यास ज्या संस्कृतीचा पुरस्कार करतात, ती अर्थातच राष्ट्रांमधील वाढत्या गरिबीकडे डोळेझाक करते; ती, प्रत्येक पार्श्वभूमीच्या तरुणांना उपभोक्ता–उत्पादने अमर्याद आनंदाची साधने आहेत हे पटवून देण्यासाठी, मानवजातीच्या एका लहानशा भागाद्वारे उपभोगल्या जाणाऱ्या विपुलतेची प्रतिमा पुढे करते.

"युवाकिशोरांच्या" बाजारपेठेच्या काही अभ्यासांमध्ये, तरुणांना विशिष्ट प्रकारच्या उत्पादनांच्या वापराकडे प्रवृत्त करणाऱ्या गुणधर्मांनुसार श्रेणींमध्ये टाकले जाते –श्रेण्या ज्या जाहिरातींना त्यांना अधिक परिणामकारकतेने लक्ष्य करू देतात. उदाहरणार्थ, एका अभ्यासात त्यांना सहा गटांत वर्गीकृत केले आहे: "सहिष्णू", ज्यांना वाटते की त्यांच्या नशिबावर शिक्कामोर्तब झालेले आहे आणि जे कमीत कमी श्रमांत जगण्याचा प्रयत्न करतात; "चंगीभंगी" (थ्रील्स ॲन्ड चिल्स), जे सुखासीनतेच्या शोधात असतात आणि ज्यांचे मन सामाजिक अथवा राजकीय बांधीलकीपासून मुक्त असल्याने बाजारु प्रतिकांनी सहजपणे भारले जाऊ शकते; "बूटस्ट्रॅपर्स", ज्यांचा मागील गटाशी केवळ यात फरक आहे, की त्यांच्यात कठीण परिश्रमासाठी जोम व क्षमता असते आणि ज्यांच्यासाठी बाजारु माल आणि सेवा पुढे जाण्यासाठी व चढाओढीतील वरचष्मा टिकविण्याची साधने असतात; "शांतपणे साध्य करणारे" जे स्थितिसंगत प्रवृत्तीचे असतात, राजकीय आणि सामाजिक बंडखोरी टाळतात, जे कुटुंबाशी निकट संबंध ठेवणारे असतात आणि खरेदी करताना उत्पादनाचा दर्जा व फायद्याचा विचार करणारे असतात; "अनुमोदक" (अपहोल्डर्स), जे शैक्षणिक कलाचे नसतात आणि ज्यांच्या मनात खेळांची सांख्यिक

माहिती, टीम व खेळाडूंच्या नावांची इतकी माहिती असते की राजकीय व आर्थिक प्रश्नांना ते त्यांच्या मनात शिरकाव करु देत नाही आणि सरतेशेवटी "जगवाचवे" (वर्ल्ड सेव्हर्स), जे जगात सकारात्मक बदल करण्याची इच्छा बाळगतात आणि ज्यांचे महत्त्व सामाजिक कारणांना विक्रीयोग्य वस्तूंमध्ये बदलविण्याची संधी विक्रेत्यांना प्रदान करण्यामध्ये सामावलेले आहे.

असे दिसते की सर्व गोष्टी ब्रँडिंग आणि उपभोगवादासाठी संवेदनाक्षम आहेत. विशेषतः, सामाजिक माध्यमाच्या (सोशल मीडिया) वेगाने बदलणाऱ्या क्षेत्रात, व्यक्तीच्या जीवनातील प्रत्येक पैलू उपभोगासाठी साहित्य बनू शकतो. बाह्यतः, जगाला एक चांगले स्थान बनवण्यासाठी व्यासपीठ तयार केले जात आहेत, जेथे "सामायिक करणे", "मैत्रीत्व" आणि "संबंध स्थापित करणे (नेटवर्किंग)" अशा व्यांख्यांद्वारे, खरं तर जाहिरातींच्या विस्मयकारक श्रेणीसाठी एक मार्ग म्हणून काम पार पाडत आहेत, त्यांची पोहोच वाढवली आहे आणि त्यांचा प्रभाव अधिक खोलपणे होत आहे. अर्थातच, येथे प्रस्तुत केलेले संक्षिप्त विश्लेषण म्हणजे खुद्द जाहिरातबाजीची निंदा नव्हे. त्याचा उद्देश व्यापारी, राजकीय, वांशिक किंवा सांस्कृतिक प्रचाराचे काटेकोर परीक्षण करण्याची आपली क्षमता वाढावी हा आहे, जेणेकरुन आपण युवाकिशोरांना त्यांच्या विचारांवरील व वागणुकीवरील प्रभाव जाणून घेण्यास मदत करु शकाल. या गुंतागुंतीच्या विषयावर अधिक चिंतन करण्यासाठी खालील सराव आपणास उपयोगी ठरेल:

१. जाहिराततंत्र साधारण उत्पादनांना उत्तेजनास्त्रोतांमध्ये परिवर्तित करण्यासाठी भाषेचा व प्रतिकांचा वापर करते. वस्तू व घटनांना त्यांच्या वास्तविकतेपेक्षा कितीतरी जास्त महत्त्व देण्यासाठी प्रतिकांचा उपयोग केला जातो. उदाहरणार्थ, पेयाचे साधारण वर्णन की ते काय आहे —तहान शमवणारे पेय— असे वास्तविक वर्णन करण्याऐवजी ते आनंद आणि तृप्तीचे आश्रयदाता म्हणून चित्रित केले जाते. फॅशन व सौंदर्याची प्रतिके पोषाख आणि सौंदर्यप्रसाधनांना भपकेबाज बनवितात. तारुण्याच्या उल्हासाच्या प्रतिकांनी कँडी बार विकले जातात. साहस व खेळाडूपणाची प्रतिके मद्यपानाच्या वाढीसाठी मदत करतात. एखाद्या वस्तूस ती जशी नाही अशाप्रकारे दाखविण्यास जाहिरातकार ज्या वाक्प्रचारांचा व प्रतिमांचा उपयोग करतात, अशा काही विशिष्ट जाहिरातींचा आपण विचार करु शकता काय?

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

२. कोणत्याही उत्पादनाच्या खरेदीमुळे निर्माण झालेला आनंदाचा भ्रम अल्पकाळ टिकला पाहिजे, नाहीतर आपल्याजवळ जे काही आहे, त्यातच आपण संतुष्ट राहू. यासाठी जाहिरातबाजीला सातत्याने इच्छाआकांक्षांची पुनर्निर्मिती करुन आपल्याजवळ जे काही आहे, त्यात आपण पूर्णतः समाधानी व

संतुष्ट राहणार नाही, याची खातरजमा करावी लागते. हे कसे साध्य केले जाते? ——————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

३. आम्ही उल्लेख केला आहे, की कधी कधी सामाजिक मुद्देदेखील उपभोक्तावस्तूंमध्ये परिवर्तित केले जातात. अशा प्रकारची काही उदाहरणे आपण देऊ शकता काय? ————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

४. दुर्दैवाने, वर्तमान माध्यमाच्या वातावरणात, उदात्त आकांक्षांचा व्यावसायिक हेतूंसाठी वापर केला जात आहे. आपल्यामध्ये उदात्त भावना जागृत करणारे शब्द आणि वाक्प्रचार, उत्पादनांच्या जाहिरातीसाठी वापरले जात आहेत आणि मानवतेच्या आध्यात्मिक वारशाच्या विविध पैलूंना विक्रीच्या वस्तू म्हणून मानले जात आहे. आपण काही उदाहरणे देऊ शकाल का? ——————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

५. आपल्या क्षेत्रातील युवाकिशोर ज्या सामाजिक माध्यमाच्या (सोशल मीडिया) व्यासपीठात भाग घेतात त्याबद्दल विचार करा. अशा व्यासपीठावरील त्यांचा सहभाग त्यांनी बनवलेल्या मैत्रीचे स्वरूप, त्यांचा स्वत:बद्दलचा दृष्टिकोन आणि त्यांच्या आशा व आकांक्षांवर कसा परिणाम करतो? या प्रकाशात, खालील विधानाची वैधता विचारात घ्या: सामाजिक माध्यमामध्ये त्यांच्या सहभागामुळे, युवाकिशोर नकळतपणे स्वत:ला उत्पादन म्हणून ओळखू शकतात आणि सादर करू शकतात. —————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

## विभाग १४

येथे सावध असणे आवश्यक आहे. तरुणांवर सध्याच्या समाजाचे काही प्रभाव अनिष्टकारी असू शकतात; परंतु आपल्या स्वत:च्या प्रयत्नांमध्ये त्यांच्यावर अवास्तव भर देणे चुकीचे ठरेल. युवाकिशोरांना नाजूक समजून त्यांना वातावरणाच्या दुष्प्रभावांपासून सातत्याने वाचविणे आवश्यक आहे, ह्या विचारांच्या आहारी जाणे फार सोपे आहे. अशी विचारसरणी त्यांना त्यांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणाकडे कधीही नेणार नाही. सामाजिक परिवर्तनाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून कार्य करण्याची आणि समाजाच्या सुधारणेसाठी योगदान देण्याची त्यांची क्षमता ओळखणे हे आपल्या प्रयत्नांचे केंद्रबिंदू असले पाहिजे. आजच्या समस्याग्रस्त जगामध्येदेखील प्रत्येक सभ्यतेमध्ये अशा युवाकिशोरांची पुष्कळशी उदाहरणे आहेत, ज्यांनी ते ज्या वातावरणात राहतात त्या दयनीय परिस्थितींवर मात केली आहे आणि सातत्याने सेवेसाठी उत्साह, शिकण्याविषयी तत्परता, न्यायाबद्दल तीव्र भावना, इतरांच्या हिताविषयी जबरदस्त ओढ इत्यादी गुणांचे प्रदर्शन केले आहे.

असे बरेचसे शिक्षाविद् आहेत ज्यांनी युवावस्थेच्या संक्रमणकाळात व्यक्त होणाऱ्या काही अंगभूत बौद्धिक आणि आध्यात्मिक शक्तींचा संदर्भ दिला आहे. उदाहरणार्थ, असे काही आहेत जे सैद्धांतिक प्रश्नांमध्ये युवाकिशोराचे स्वारस्य रेखांकित करतात. एक शिक्षाविद् सामाजिक बदल घडवून आणण्यात युवाकिशोर जी भूमिका वठवू शकतात, त्याची महत्ता सांगत असताना, नवयुवकांच्या प्रत्येक पिढीला “उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील ओजस्वी पुनर्निमितीकार” जी “जे सत्य वाटत राहणार आहे त्याच्या संवर्धनासाठी आणि ज्याने आपले पुनर्जागरणाचे औचित्य गमावले आहे त्यात क्रांतिकारक सुधारणा करणे या दोहोंसाठी आपली बांधीलकी व शक्ती प्रदान करु शकणारी आहे” असे म्हटले आहे. अधिक एक विचारवंत, जे पौगंडावस्था अवस्थेत आहेत त्यांना “सजीव पात्रे, जी पूर्णत: तयार झालेली तरीपण अद्याप विकासमान,” त्यांच्या सर्व “अस्तित्वासह” प्राप्त करण्यास सक्षम आहे असे म्हणतो. तो त्यांच्या परिवर्तन क्षमतेकडे लक्ष वेधतो आणि शिक्षणाने विविध आकलनशक्तिंचा फायदा घेतला पाहिजे असे प्रतिपादन करतो तसेच जो उन्मेष युवा कोणत्याही अनुभवात निर्माण करु शकतात, असा उन्मेष “अस्तित्वाच्या निष्ठेसोबत”, मानवसमाजाला “निष्क्रीय, यंत्रवत्, पोकळ सैद्धांतिक संकल्पना बनविण्याऐवजी एक जागृत, प्रगतिशील, खरे प्रेम करणारा, आनंदाने ओतप्रोत, प्रसन्न असा सजीव समूह” बनवू शकेल. त्याचे शब्द आहेत “ती आहे परिवर्तनाची किमया” आणि “ती आहे युवाकिशोरावस्थेची क्षमता.”

मागील बऱ्याचशा विभागांतील विश्लेषणासहित हे थोडके संदर्भ दर्शवितात, की युवाकिशोरावस्थेबाबतची संकल्पना सुस्पष्ट करुन घेताना आपण किती दक्ष असणे आवश्यक आहे. पुढील वर्षांमध्ये या विषयांवरील विविध दृष्टिकोन निर्विवादपणे आपण चिकित्सकतेने तपासालच, तथापि, मानवी जीवनातील या निर्णायक कालखंडाच्या महत्तेबाबतची आपली स्वत:ची समज बव्हंशी या आणि मागील विभागांमध्ये उद्घृत केलेल्या उद्धरणांवरुन आकार घेईल. यात शंका नाही की आपल्या दृढ धारणा युवाकिशोरांसोबतच्या आपल्या स्वत:च्या अनुभवाद्वारे खऱ्या सिद्ध होतील.

## विभाग १५

युवाकिशोरांच्या समूहांमध्ये अभ्यास करण्यासाठी रुही संस्थेने विकसित केलेल्या पुस्तकांचा संच, ते वरवर पाहता बव्हंशी मुख्य अभ्यासक्रमातील पुस्तकांप्रमाणेच सुरवातीला सोपे असते, विशेषत: पहिली काही पुस्तके. हा साधेपणा मुख्यत्वेकरुन वापरल्या जात असलेल्या भाषेत व संबंधित सरावांमध्ये आहे. तथापि ज्या संकल्पना हाताळल्या जात आहेत, त्या प्रत्येक स्तरावर जटील आणि गहन आहेत. सुचविलेल्या साहित्यावरील चर्चा, ही बाळबोधपणापासून बरीच वेगळी असून, खरेतर तिचा अभ्यास करणाऱ्या बऱ्याचशा युवाकिशोरांना ती आव्हानात्मक वाटत असल्याचे सिद्ध होईल. या स्तराच्या संभाषणामध्ये आपणास सहजपणा वाटावा ह्यासाठी या आणि पुढील काही विभागांमध्ये कित्येक युवाकिशोरांनी स्वत: प्रदर्शित केलेल्या विचारांचे बरेचसे नमुने सादर करीत आहोत. ती वक्तव्ये अशा तरुण लोकांची आहेत, जे एका किंवा दुसऱ्या प्रकारे हिंसाचाराने प्रभावित झाले आहेत. अशा युवाकिशोरांच्या हिंसक वागणुकीच्या कित्येक प्रतिमा प्रसारमाध्यमांमध्ये सादर केल्या जात आहेत, त्यामुळे त्यांच्या हानी आणि आशेच्या काही न सांगितल्या जाणाऱ्या कथा ऐकणे आवश्यक आहे.

वक्तव्यांची पहिली शृंखला एका तेरा वर्षाच्या मुलाची आहे. त्याची खरी ओळख लपविण्यासाठी त्याला पीटर हे नाव देऊ या, ज्याने हिंसा आणि युद्धाचे परिणाम वयाच्या आठव्या वर्षापासून पाहिले होते. जेव्हा तो तेरा वर्षांचा झाला, तेव्हापासून त्याने परिणामांचा स्वीकार करीत, ज्यामध्ये त्याच्या काही सवंगड्यांद्वारे होत असलेल्या जळजळीत उपहासांचा अंतर्भाव होता, शाळा व युवासंघटनांमध्ये शांतीप्रसाराचे कार्य सुरु केले:

> *त्या कशानेही मी चिंतित झालो नाही. माझ्या कुटुंबाचा विश्वास होता, की समुदायाची काळजी घेणे महत्वाचे आहे आणि यासाठी मदत करण्यास आम्हास जे शक्य आहे ते करावे. जरी मी केवळ तेरा वर्षांचा होतो, तरी मी जाणू शकत होतो, की आम्हापुढील सर्वांत मोठ्या समस्या हिंसा आणि युद्ध ह्या होत्या. इतर कशापेक्षाही शांतीची अधिक आवश्यकता होती. अर्थात एका बालकासाठी शांतीस्थापनेचे प्रयत्न करणे कठीण असते; परंतु कोणतीही गोष्ट घडावयाची असेल, तर प्रयत्न हाच एकमेव मार्ग असतो....*
>
> *माझ्या देशात गेली अनेक वर्षे एवढ्या असत्य गोष्टी सांगण्यात आल्या, की लोकांना कशावर आणि कोणावर विश्वास ठेवावा, हेच कळेनासे झाले आहे. ते नेहमी वृत्तपत्रांवर, रेडिओ अथवा टेलिव्हिजनवर, राजकारण्यांवर, शस्त्रधारी गटांवर विश्वास ठेवू शकत नाहीत, तथापि, जेव्हा लहान मुले हिंसेबद्दल आणि ती आम्हास कशी प्रभावित करते आणि आम्हास शांतीची कशी आवश्यकता आहे याविषयी बोलताना ऐकतात, तेव्हा त्यांना कसेबसे जाणवते, की ते काहीएक सत्य ऐकत आहेत....*
>
> *काही लोक म्हणतात, की ते गरिबांसाठी लढत आहेत, परंतु युद्धामध्ये इतर कुणापेक्षा गरिबांनाच अधिक अपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत. मला वाटते, की काही लोक प्रतिशोधासाठी किंवा सत्तेसाठी किंवा त्यांच्याजवळ इतर कोणता पर्याय नाही असे वाटून देखील युद्धास प्रवृत्त होतात. काही युवा त्यांचे परिवार गरीब असल्यामुळे आणि त्यांना त्यातून बाहेर निघण्याचा अन्य मार्ग दिसत नसल्याने सशस्त्र गटांमध्ये सामील होतात.*

पीटर आणि त्याचे कुटुंब देशाच्या अंतर्गत हिंसाचाराच्या वेळी संकटात सापडले आणि त्यांना त्यांचे गाव सोडावे लागले. त्याचे वडील ते राहत असलेल्या शेताच्या व त्यांच्या काम करण्याच्या ठिकाणाच्या दरम्यान जाणेयेणे करीत, परंतु ही वरवरची शांतता टिकविता आली नाही. शांतीप्रयत्नांना असणाऱ्या त्यांच्या सक्रिय समर्थनाचे पर्यवसान त्यांच्या हत्येत झाले:

*मी युद्धाच्या रणधुमाळीत राहिलो असल्यामुळे मला युद्धाविषयी कळले आहे, असे मला वाटले. रात्रीच्या वेळी लढाया होत होत्या. बऱ्याचदा बंदुकींच्या फैरींमुळे मी जागा होई. जेव्हा मी सकाळी शाळेत जाई, तेव्हा मला पुरावे दिसायचे —रस्त्यांच्या बाजूला सांडलेले रक्त, गोळ्यांनी चाळण झालेल्या इमारती. माझ्या वडिलांच्या कार्यालयापासून फार दूर नसलेल्या प्रेतागारामध्ये बळी पडलेल्यांना मी पाहिले होते.*

*याबद्दल मी आत्मविश्वासाने बोललो होतो, जणू काही युद्ध म्हणजे काय, हे मी जाणले होते —परंतु जेव्हा माझ्या वडिलांची हत्या करण्यात आली, तेव्हा केवळ दु:खामुळेच नव्हे तर त्या वेळी मला युद्ध कळल्यामुळे माझा थरकाप उडाला. लढण्यासाठी उद्युक्त होताना कसे वाटते, हे मला कळले. तुम्हास शांतीची आवश्यकता कितीही वाटो, पण ज्या वेळी व्यक्तिश: तुम्हास युद्धाची झळ लागते, त्या वेळी आपण हिंसेकडे वळता, याची जाणीव मला झाली. हाच तो सापळा आहे, ज्याने माझ्या देशातील अनेकांना अडकविले आहे....*

*त्यानंतर काहीही पूर्वीसारखे राहिले नव्हते. घर हे मृत कोषासारखे वाटे. जे रस्ते माझ्या अगदी परिचयाचे होते, ते सर्व अपरिचित वाटायचे. कधीही आणि कुठेही सुरक्षित वाटेना. मला वाटले की शांतीसाठी केलेले माझे सर्व कार्य व्यर्थ होते, कारण ते माझ्या वडिलांना वाचवू शकले नव्हते. ज्या विक्राळ हिंसेने आमच्या गावाला ग्रासले होते, तिने शेवटी माझ्या कुटुंबाच्या हृदयावर घाव घातला होता आणि ते थांबविण्यास मी अपयशी ठरलो होतो. मी मलाच दोष दिला. मी स्वत:स विचारले, "मी असे काय केले, की माझ्या पित्याला अशा हिंसक मार्गाने मरावे लागले?"*

कुटुंबाला धमक्या मिळत राहिल्या आणि पीटरने आपल्या प्रियजनांचे रक्षण करण्यासाठी एक बंदूक विकत घेतली. त्याच्या वडिलांच्या हत्त्येनंतर दहा दिवसांनी एके सायंकाळी पीटरच्या कुटुंबातील सर्व सदस्य त्यांच्या घराच्या वरच्या मजल्यावरील एका खोलीत जमले होते. पीटर जेव्हा खाली स्वयंपाकघरात आला, तेव्हा त्याने बगिच्यात हाती बंदूक घेऊन दुसऱ्या मजल्यावरील खिडक्यांकडे पाहणाऱ्या एका घूसखोराला पाहिले:

*मला ठाऊक होते, की मी माझी बंदूक घेऊन ह्या माणसास ठार मारु शकतो.... ते माझ्या वडिलांच्या हत्येचा बदला घेण्यासारखे होते. मी माझ्या कुटुंबाचे रक्षण करणार होतो. बहुधा कुणीही त्याला मारण्याबद्दल मला दोषी धरणार नव्हता... जरी हे सर्व खरे होते, तरी मी काहीही केले नाही.... मी शांतीसाठी काम करावे हे माझ्या वडिलांना हवे होते. तेव्हा आता मी हिंसक कसा होऊ शकतो? माझ्या वडिलांप्रति आदर व प्रेम दाखविण्याचा एकमेव मार्ग, माझ्या कुटुंबाला वाचविण्यास मदत करण्याचा एकमेव मार्ग, शांतीस्थापनेसाठी प्रयत्न करणे हा होता. त्याला मारण्याने मला किंवा माझ्या*

*कुटुंबाला किंवा माझ्या देशाला शांती मिळणार नव्हती. खरेतर त्याला मारण्याने मी सर्वस्व गमावणार होतो. मी त्याच्यापेक्षा अधिक चांगला व्यक्ती ठरणार नव्हतो.*

पीटर शांतपणे घूसखोराकडे पाहत राहिला, जो काही वेळाने आणि सकृद्दर्शनी काहीएक कारण नसताना मागे वळला आणि निघून गेला. त्यानंतर लवकरच पीटरने बंदुकीला तिलांजली दिली आणि पुन्हा कधीही हाती बंदूक न घेण्याचे ठरविले.

पुढील कहाणी वाचण्यापूर्वी पीटरमधील काही गुण शोधणे आणि गहन विषयाबाबत विचार करण्याच्या त्याच्या क्षमतेविषयी काही शब्द सांगण्याची आपली इच्छा असू शकते. ——————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

## विभाग १६

मेरी —तसेच एक गृहित नाव— संघर्षाचा सतत धोका असलेल्या वातावरणात मोठी झाली; तिला लहान वयातच मित्रांच्या गटाशी असहमत होण्याची किंमत कळून आली:

*मी जेव्हा अकरा वर्षांची होते, तेव्हा माझ्याकडूनच मला एक नि:शब्द धडा मिळाला, कारण बाचाबाचीमध्ये बाजू घेण्याचे मी नाकारले. माझ्या मित्रांच्या गटाने आमच्या वर्गातील एका मुलीवर चोरीच्या आरोपाखाली आळ आणला आणि मोठा वाद निर्माण झाला. तुम्हास एकतर त्या मुलीच्या बाजूने किंवा तिच्या विरुद्ध असणे आवश्यक होते आणि माझे सर्व मित्र तिच्या विरुद्ध होते. प्रत्येकाने गृहीत धरले, की मी त्यांच्या बाजूने राहीन, परंतु ती मुलगी चोर आहे याविषयी कोणताच पुरावा नव्हता. मला त्याविषयी खात्री नव्हती. तथापि मला माझ्या मित्रांना विरोध करावयाचा नव्हता, म्हणून मी मुळीच बोलले नाही. प्रत्येकजण त्यामुळे अचंबित झाला आणि संपूर्ण वर्षभर एकहीजण माझ्याशी बोलला नाही.*

मीराची एका युवा मुलाशी मैत्री होती आणि इतर मुलींनी जरी त्या मुलाविषयी तिला चिडविले, तरीही तिच्या मनात त्या मुलाविषयी प्रेमभावना वाढली. ते दोघे तोपर्यंत लांब फिरायला जात असत आणि भविष्याविषयी बोलत असत, जोपर्यंत एके दिवशी तिने त्याला बंदूक साफ करताना पाहिले, जी त्याच्या मालकीची आहे, हे तिला माहित नव्हते:

*जेव्हा मी आत आले तेव्हा त्याने माझ्याकडे बघून स्मितहास्य केले, जणूकाही तो एक सर्वसाधारण गोष्टीपेक्षा काहीही वेगळे करीत नव्हता. मी नेहमी हिंसेचा तिटकारा करीत आले, बंदूक आणि युद्धाविषयी मला घृणा होती. त्याने बतावण्या करण्याचा प्रयत्न केला, जे त्याच्यासारखे लोक करीत*

*असतात, परंतु मी तात्काळ त्याला सांगितले, की आपणा दोघांतील संबंध संपले आहेत. "मला माझ्यासाठी आणि माझ्या मुलांसाठी अशा प्रकारचे जीवन नको आहे," मी म्हणाले. मी बरेच अल्पवयीन होते आणि आता तो प्रसंग मला एक विनोद वाटतो, परंतु त्या वेळी मला वाटले होते, की माझे जग दुभंगत आहे."*

या प्रसंगानंतर मीराच्या शालेय गुणांमध्ये घसरण सुरु झाली आणि तिच्या आईला काळजी होऊ लागली. नंतर मेरी तिच्या एका शिक्षकाशी बोलली:

*मी माझ्या मित्राच्या बंदुकीची, माझ्या मित्रांच्या अबोल्याची, मुलींच्या चिडविण्याविषयीची, माझ्या लाजीरवाणेपणाची आणि भंगलेल्या हृदयाची समग्र कहाणी कथन केली. तो माझ्यावर हसला नाही किंवा मला अज्ञानी व खुळी वाटावे, असे तो वागला नाही....*

*तो म्हणाला, "तू हे समज की तुझे स्वतःचे भविष्य तुझ्या स्वतःच्या हातात आहे. तुझ्या भविष्यावर कोणा एकाची, तुझ्या आईवडिलांची आणि विशेषतः त्या मुलाची मालकी नाही. ते सर्वस्वी तुझे आहे आणि ते तुला जसे पाहिजे, तसे तू घडवू शकतेस."*

वयाच्या चौदाव्या वर्षी मेरी तिच्या शाळेत विद्यार्थि—नेता बनली होती व ती आपल्या सवंगड्यांमध्ये शांतीप्रसार करीत होती. त्या दिवसांमध्ये तिच्या मनात वसत असलेल्या विचारांपैकी काही असे आहेत:

*आम्ही जाणत होतो, की गरिबीचा अंत युद्धाचा अंत करण्यास सहाय्यक होऊ शकतो, परंतु त्याबद्दलही आम्ही काही करु शकत नव्हतो. आम्हाला माहित होते की बेरोजगारी कमी केल्याने मदत होईल, परंतु आम्ही त्याबद्दलही काहीही करू शकत नव्हतो. आम्ही बंदुकीच्या गोळ्या आणि सुरामारी थांबवू शकत नव्हतो. आम्ही हिंसा थांबवू शकत नव्हतो. तथापि आम्हास विश्वास होता, की आम्ही आमच्यात शांतीस्थापनेची सुरुवात करु शकतो....*

*मला माहित होते की शांततेसाठी काम करणे धोकादायक असू शकते आणि मी सामान्य नसलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल संवेदनशील होते. कधीकधी काहीतरी वाईट घडेल, विशेषतः माझ्या कुटुंबाविषयी, केवळ या भीतीने मला रडावे आणि दूर पळून जावे असे वाटे. तथापि, इतर मुले माझ्यावर विसंबून होती आणि एक प्रकारे मला वाटे, की माझी स्वतःची जन्माला न आलेली मुलेदेखील माझ्यावर विसंबून आहेत. मी कितीही भ्याले असले, तरी त्यांच्याकडे पाठ फिरवू शकत नव्हते. मी केवळ सतर्क राहून सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करु शकत होते.*

मेरीचे श्रेष्ठ असे काही गुण कोणते आहेत? ————————————————————

————————————————————————————

————————————————————————————

————————————————————————————

————————————————————————————

## विभाग १७

इथे तीन युवा तरुणांची वक्तव्ये दिली आहेत, ज्यांपैकी प्रत्येक अत्यंत उदात्त विचार आणि अत्यंत कोमल भावना प्रदर्शित करतो. यातील पहिले एका सोळा वर्षे वयाच्या मुलीचे आहे, जिने बारा वर्षांची असताना आपल्या सर्वांत चांगल्या मित्राला टोळक्यांच्या हाणामारीत अडकून भोसकल्याने मरताना पाहिले. ती आपल्या मित्राला कधीही विसरली नाही आणि तिने स्वत:ला शांतीप्रसाराच्या कामाला वाहून घेण्याचे ठरविले. नंतर तिने हिंसेमुळे प्रभावित झालेल्या मुलांना मदत करणे सुरु केले:

*आठ नऊ वर्षांची कोवळी मुले टोळक्यांमध्ये सामील होत, कारण त्यांना ते मस्त वाटत होते किंवा त्यांना वाटत होते की अशी टोळकी त्यांना रस्त्यावर संरक्षण देतील. पुष्कळशा बाबतीत ते केवळ घरामधील हिंसेपासून पलायन करण्याचा प्रयत्न करीत असत, परंतु त्यांना रस्त्यावर त्याहूनही काहीतरी अधिक वाईट आढळून आले.*

*मला..., येथे जाणाऱ्या बसने प्रवास करायचा असतो, परंतु बऱ्याचशा बसचालकांना मी प्रयत्न करीत असलेल्या कार्याविषयी माहिती आहे. ते केवळ मला परवडेल एवढेच पैसे घेतात आणि पुष्कळदा मला विनाशुल्क प्रवास करु देतात. माझ्या गंतव्यस्थानाला जाणारा रस्ता उंच सुळक्यांच्या अगदी जवळ असणाऱ्या ओबडधोबड झोपड्यांना पार करीत वर वळण घेतो. टेकड्यांवर बांधकामात उपयोग करण्यासाठी जेथे खडक काढण्यात आले आहेत, तेथे त्यांच्या खोल खुणा आहेत. असले काम कष्टाचे, कंबरडे मोडणारे आणि कमी मिळकतीचे असते, परंतु विस्थापित कुटुंबांतील बरीचशी मुले त्या ठिकाणी काम करतात. त्यांची कुटुंबे अशा गाढ दारिद्र्यावस्थेत सापडली आहेत, की मुले शाळा सोडतात आणि पैसे मिळविण्यासाठी जे शक्य असेल ते काहीही करतात.*

*रस्त्यावरुन एका दुर्गंधीयुक्त दुषित पाण्याच्या नदीवरील तात्पुरत्या पुलावरुन पाय बुडणारे निसरडे चिखल तुडवीत मी चालू लागते. शाळेमध्ये टिनाच्या पत्र्याखाली बांधलेल्या अर्धा डझन पडक्या खोल्या आहेत. लाकडी बाके जीर्ण व मोडकी आहेत. वर्गखोल्यांच्या लगतच कचरा पडलेला आहे. तेथे वीज नाही. एका वर्गखोलीत छतातून प्रकाश येतो आणि इतर खिडकी नाही. जमीन धुळीने झाकली आहे. छतावर पडणाऱ्या पावसाचा एवढा आवाज होतो, की ऐकू येण्यासाठी प्रत्येकाला ओरडावे लागते आणि जागोजाग पाणी गळते. एका वर्गाच्या भिंतीवर मुलांनी काढलेली चित्रे सजविली आहेत, ज्यांत सभोवतालच्या दृष्यांशी अगदी विपर्यस्त वाटणारी सुंदर घरे दाखविली आहेत. कदाचित कधीकाळी जशा घरात ती मुले राहिली आहेत किंवा भविष्यात जशा घरांमध्ये त्यांना राहावेसे वाटते, अशांच्या त्या प्रतिमा आहेत....*

*पुष्कळशा पालकांच्या चेहऱ्यांवर उदासीनता आहे. ते त्यांच्या मुलांशी शिव्या देत आक्रमकरीत्या बोलतात. परंतु कार्यक्रमाच्या वेळी कधीकधी ते बदलताना दिसतात. त्यांच्यापैकी काहींना वाटते, की त्यांच्या मुलांना चांगले बनविण्यासाठी त्यांना मार द्यावा लागेल, पण नंतर त्यांना जाणवते, की मार दिल्यामुळे त्यांचे मुल पळू देखील शकतो आणि रस्त्यावर येऊ शकतो.*

पुढील परिच्छेदात अकरा वर्षांचे वय असताना घरातून पळून गेलेल्या एका तरुण मुलीचे विचार आहेत, जी मादक द्रव्यांच्या व्यसनाच्या आहारी गेली, एका मित्राच्या सततच्या मदतीमुळे वाचविली गेली, आणि जी सरतेशेवटी शांतीसाठी वाहिलेल्या युवाचळवळीत सामील झाली:

*आमचे जीवन खरेच कसे होते, हे स्पष्ट करणे फारच कठीण होते. मला हे मान्य करताना भीती वाटत असे, की आपण शांतीस्थापनेसाठी कितीही प्रयत्न केले, तरीही आपण हिंसाचारामध्ये परत ओढले जाऊ शकता.... ह्या जीवनापासून सुटका व्हावी अशी आशा मी सतत बाळगली आहे. हे मान्य करणे कठीण आहे, की मी पुन्हा एकदा या शांतीचळवळीपासून दूर जात आहे. मी स्वत:शी खोटे बोलत होते आणि बतावणी करीत होते, की सर्वकाही ठीक आहे. हे खरे नाही. कधी कधी मला संताप येतो. प्रत्येक रात्री घरात भांडणे होत असतात. जर ते माझ्यावर ओरडत नसतील, तर माझी आई आणि सावत्र पिता एकमेकांवर ओरडत असतात. मला ते सहन होत नाही, म्हणून मी रस्त्यावर निघून येते आणि तेथे बरेच काही असे असते, जे युवांना हानी पोहचवू शकते.... मी एकाच वेळी दोन मार्गांवर चालत आहे आणि तरीही मला वाटते, की मी सर्वदा शांतीमार्गावर चालावे. मला वाटते की माझा संघर्ष आणि ज्या रीतीने मी वाचले आहे, त्याला काही किंमत असावी.... मला विश्वास वाटतो, की जर वयस्क मंडळी अधिक संख्येने सहकार्य देण्यास, आम्ही काय शिकलो हे जाणून घेण्यास आणि आम्हासोबत काम करण्यास तयार होतील, तर तरुण लोक शांतीस्थापनेत बरीच मदत करु शकतील. जर घरामध्ये आम्हास शांती लाभली, तर ती एक चांगली सुरुवात राहील.*

शेवटचा परिच्छेद एका पंधरा वर्षांच्या मुलाच्या अनुभवाचे वर्णन करतो ज्याच्या भावाचे क्रांतिकारी गटाने अपहरण केले होते. कालांतराने, तो बंदिवासात असताना कुटुंबाला त्याच्याकडून बातमी मिळाली आणि त्यांना त्याच्याशी पत्रव्यवहार करण्याची परवानगी देण्यात आली:

*तो आत्मविश्वासी आणि आशावादी राहावा यासाठी त्याला प्रोत्साहन देण्यास मी त्याला कविता पाठविल्या आहेत. मी त्याला सांगतो, की मी त्याच्या उपदेशाकडे लक्ष देतो आणि चांगला अभ्यास करतो. नुकतेच जेव्हा त्याने प्रत्युत्तर दिले, तेव्हा मला आनंद झाला, ज्यात तो म्हणाला, "तू शाळेत एवढी प्रगती करतो आहेत, त्यामुळे मी आनंदात आहे.... इथे मी चूक केली होती. मी माझ्या अभ्यासाचे आकलन करु शकलो नव्हतो, याचा मला पश्चात्ताप होतो.... उदाहरणार्थ, मला खरेच वाचनाची आवड नव्हती, तरी इथे मी संपूर्ण वेगवेगळ्या प्रकारची तीस पुस्तके वाचली आणि अजून बरीच वाचायची आहेत. मला इथे शब्दकोषदेखील मिळतो आणि मला माहीत नसणारे विचित्र शब्द मी धुंडाळतो.... मी स्वत:हून आधी हे कधीच केले नसते...."*

*जरी तो सुरक्षित आहे असे वाटत असले तरी मी काळजी करतो. ज्यांनी माझ्या भावाला धरुन ठेवले आहे, त्यांच्याशी मी बोलू शकलो तर त्यांना मी करुणा बाळगण्याबद्दल आणि त्यांच्यामुळे ज्या हालअपेष्टा होत आहेत त्या समजून घेण्याबद्दल सांगेल.*

*मला वाटते की आपणास शांती मिळवायची असेल, तर क्षमा ही मूलभूत बाब आहे. क्षमेशिवाय युद्ध शेवटाला येऊ शकत नाही. हे विशेषत: आम्हासारख्या लोकांसाठी महत्त्वाचे आहे, ज्यांनी क्षमेसाठी हालअपेष्टा सहन केल्या आहेत.*

*मला वाटते हेच ते आहे, ज्यासाठी मी काम करतो आहे —मी क्षमेसाठी काम करत आहे.*

या विभागात उद्धृत केलेल्या तरुणांनी दिलेल्या काही वैशिष्ट्यांची आपल्या गटात चर्चा करा आणि आपले काही विचार लिहा. ————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

## विभाग १८

सरतेशेवटी अगदी संक्षेपाने का होईना, किशोरावस्थेच्या स्वरुपात विचार करताना प्रभुधर्माच्या रुहुल्लाह या युवानायकाचे जीवन दुर्लक्षिता येणार नाही, ज्याने वयाच्या बाराव्या वर्षी आनंदाने हौतात्म्य पदाचा चषक प्राशन केला. सात वर्षाच्या बालवयात रुहुल्लाहला त्याचे वडील, धर्मभुजा वर्का आणि त्याच्या मोठ्या भावासह पवित्र भूमीची यात्रा करण्याचा मान मिळाला होता. त्या पवित्र वातावरणात रुहुल्लाहची आध्यात्मिक प्रगती झाली आणि बहाउल्लाह यांच्या सूर्यप्रकाशात तो न्हाऊन निघाला. असे सांगण्यात येते, की एके दिवशी बहाउल्लाह यांनी रुहुल्लाहला विचारले, "आज तू काय केलेस?"

तो म्हणाला, "मी .......(एका शिक्षका) कडून धडे घेत होतो."

बहाउल्लाह ह्यांनी पुढे विचारले, "तू कोणता विषय शिकत होतास?"

"(दैवी अवतारांच्या) पुनरागमनाविषयी", रुहुल्लाहने उत्तर दिले.

"ह्याचा अर्थ काय आहे हे तू स्पष्ट करशील का?" बहाउल्लाह ह्यांनी पृच्छा केली.

त्याने उत्तर दिले, "पुनरागमन म्हणजे सत्य व सद्‌गुणांचे पुनरागमन."

बहाउल्लाह पुढे प्रश्न करीत म्हणाले, "हे तुझ्या शिक्षकाचे जसेच्या तसे शब्द आहेत. मला या विषयांची तुझी स्वत:ची समज तुझ्या स्वत:च्या शब्दांत सांग."

रुहुल्लाह उत्तरला, "हे या वर्षी एका झाडावरील फूल तोडण्यासारखे आहे. पुढील वर्षाचे फूल हुबेहूब असे दिसेल, परंतु ते हेच राहणार नाही."

बहाउल्लाह ह्यांनी रुहुल्लाहच्या चातुर्यपूर्ण उत्तरासाठी त्याची तारीफ केली आणि बऱ्याचदा त्याला "जनाब—ई—मुबल्लिघ" (सन्माननीय बहाई शिक्षक) असे संबोधले.

इतर अनेक आख्यायिका आहेत, ज्या रुहुल्लाहचे श्रेष्ठ गुण उजेडात आणतात. हे निश्चितपणे खरे आहे, की तो एक सामान्य बालक नव्हता, ज्याने कोमल वयाच्या बाराव्या वर्षी त्यागाची उंची गाठली. धर्मकार्याची प्रतिष्ठा वाढविणे किंवा प्रियतमाच्या मार्गात त्याग करण्याची परिणती हौतात्म्यातच होणे आवश्यक नाही. तरीही, हौतात्म्याच्या रहस्याची सत्यता, रुहुल्लाह याने खाली उद्धृत केलेल्या सुप्रसिद्ध कवितेच्या काही भागात, प्रदर्शित केलेल्या प्रबल इच्छेद्वारे वर्णिली आहे.

दैवी औदार्याच्या चषकामधुनि करु दे मजला प्राशन
पाप आणि निर्बलतेतुन करी माझी तू सोडवण;
यद्यपि माझी पापे असती खरीच जरी महान,
मम स्वामींची करुणा असो त्याहुनही अधिक महान.

स्वागत तुझे चषकधारका दैवी प्रीतिभोजाच्या!
सत्वर ये तू करी प्रफुल्लित माझ्या आत्म्याला
आणिक करी मज सुपात्र करण्या बलिदान
त्याच्या मार्गी आहे जो प्रिय अति महान.

आपण लवकरच संघटित कराल त्या गटातील युवाकिशोर तरुण रुहुल्लाहचे जीवन जगणार नाहीत. तथापि, मागील काही भागांमध्ये उद्धृत केलेले परिच्छेद, लहानपणापासूनच व्यक्तीमध्ये कोणती अभिजातता दिसून येते याचे संकेत दर्शवितात. हे आम्हास या विभागातील सुरवातीच्या वक्तव्याची आठवण करून देते, की युवाकिशोरांमध्ये जागृत होणारी जाणीव दोन दिशांमध्ये प्रवाहित केली जाऊ शकते —ईश्वरी इच्छेच्या समर्पणाकडे व  मानवजातीच्या आत्मत्यागपूर्ण सेवेकडे किंवा अहंता व वासनेच्या तुरुंग बंदिवासाकडे. आपल्या चर्चेचा ओघ त्यानंतर किशोरावस्थेची प्रकृती, युवाकिशोरांची क्षमता आणि सामाजिक वातावरणाचा त्यांच्या जीवनावरील प्रभाव याकडे गेला आहे. युवाकिशोरांचे अंगभूत गुणविशेष आणि त्यांचा आध्यात्मिक व बौद्धिक विकास सुनिश्चित करण्यासाठी काय करणे आवश्यक आहे, याबद्दल आता आपणास काय वाटते, याविषयी थोडा विचार करुन काही परिच्छेद लिहिण्यासाठी हा क्षण योग्य असावा. ————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

## विभाग १९

हा घटक बव्हंशी किशोरावस्थेतील क्षमतांचा शोध घेण्यासाठी उपयोगात आणल्यानंतर, युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणाच्या कार्यक्रमात आपल्या सहभागाविषयी आम्ही आता काही शब्द बोलतो. युवाकिशोरांच्या अत्यंत प्रबल अभिलाशांपैकी एक आहे, समकक्ष लोकांच्या गटामध्ये अंतर्भूत होण्याची. तरुणांना त्यांना समजून घेणाऱ्या व त्यांच्याविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या मित्रांकडे मार्गदर्शनासाठी वळणे विश्वासदायक वाटते. म्हणून युवाकिशोरांच्या गटासाठी, ज्याचे सहभागी नियमितपणे एकत्र भेटावेत व ज्यांना शोध घेण्यास व शिकण्यास पद्धतशीरपणे मार्गदर्शन व्हावे, या संकल्पनेभोवती रुही संस्थेतर्फे पुरस्कृत होत असलेला कार्यक्रम आयोजित करणे हा एका वाजवी आवश्यकतेस नैसर्गिक प्रतिसाद ठरतो. बैठकीचे वातावरण आनंदी, मैत्रीपूर्ण आणि जवळकिचे असले तरी चंचलतेचे नसावे. त्याऐवजी अशा बैठकांत, धर्मश्रद्धा आणि मानवतेच्या सेवेसाठी जीवनासाठी आवश्यक असलेल्या गुण आणि वृत्तींच्या वाढीसाठी योगदान दिले पाहिजे. त्यांच्या संमेलनांमध्ये गटांचे सहभागी निंदा व उपहासाच्या भयापासून मुक्त होऊन त्यांचे विचार व्यक्त करण्यास आणि त्यांच्या शोधक प्रश्नांची उत्तरे धुंडाळण्यास समर्थ राहावेत. ते लक्षपूर्वक ऐकण्यास, बोलण्यास, चिंतन करण्यास, विश्लेषण करण्यास, ठराव घेण्यास आणि त्यांच्या ठरावाप्रमाणे कृती करण्यास शिकावेत.

प्रत्येक गटामध्ये वयस्क व्यक्तीची आवश्यकता असते, जी युवकांची खरे मित्र असतात आणि त्यांच्या क्षमतांची वृद्धी करण्यास त्यांना मदत करु शकतात. जे असे कार्य करु शकतात, त्यांना युवाकिशोरांच्या गटाचे “अनुप्रेरक” म्हणून ओळखले जात आहे. अनुप्रेरकाची उपस्थिती प्रत्येक गटाच्या सहभागींना याविषयी आशावान आणि आश्वस्त राहण्यास मदत करते, की त्यांच्या भोवतीच्या विखंडित होत असणाऱ्या समाजाच्या नकारात्मक प्रभावांपासून ते स्वतःचे संरक्षण करु शकतात आणि सोबतच समाजाच्या उन्नतीसाठी योगदान देखील देऊ शकतात. या क्षमतेमध्ये सेवा करणे हा कोणत्याही विशिष्ट वयोगटाचा विशेष विशेषाधिकार नसला तरी, सतरा वर्ष आणि त्यावरील तरुण उत्कृष्ट “अनुप्रेरक” बनू शकतात, ज्यांना किशोरांना बालके म्हणून नव्हे तर समवयस्क म्हणून मानणे, त्यांना प्रश्न विचारायला लावणे, स्पष्टता शोधणे आणि सत्यशोधन करण्यात गुंतविणे सोपे वाटते. खालील उद्धरणात अब्दुल–बहा आशा व्यक्त करतात, की तारुण्यपूर्व आत्म्यांना अशाप्रकारे संगोपित करावे:

> **“अब्दुल–बहांची ही आशा आहे, की सखोल ज्ञानाच्या शालेय कक्षांमध्ये ह्या तारुण्यपूर्ण आत्म्यांचा सांभाळ अशाकडून होईल, जो त्यांना प्रेम करण्यास प्रशिक्षित करेल. ते सर्व चैतन्याच्या आवाक्यात असलेली निगूढ रहस्ये जाणोत; एवढ्या चांगल्या प्रकारे, की सर्वसुंदराच्या साम्राज्यात त्यांच्यापैकी प्रत्येकजण, वाचा प्राप्त असलेल्या कोकिळेसमान स्वर्गीय साम्राज्यातील गुपिते उच्चरवाने सांगेल आणि एका आशाळभूत प्रेमिकासमान आपली आर्त निकड आणि प्रियतमेची नितान्त अभिलाषा प्रदर्शित करेल.”**[३२]

किशोरांचा गट हा लहान मुलांचा वर्ग नव्हे. त्याची काही वैशिष्ट्ये अध्ययन वर्गाप्रमाणे असतात, परंतु त्याचा प्राथमिक उद्देश त्याच्या सहभागींना पारस्परिक साहाय्यासाठी पोषक वातावरण प्रदान करण्याचा असतो,

ज्यामध्ये ते अशा प्रकारची आध्यात्मिक दृष्टी, विचारपद्धती आणि वर्तणुकीचा विकास करु शकतील, जे त्यांना आयुष्यभर विशेषत्व बहाल करील. रुही संस्थेच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये सहभागी झाल्यामुळे, आपल्यास अध्ययन वर्गाचे सहभागी म्हणून प्रथमच अनुभव आला आहे आणि कदाचित आपण तिसऱ्या रुही पुस्तकाच्या अध्ययनानंतर काही लहान मुलांच्या वर्गात शिकवले असेल. खालील वैशिष्ट्यांची यादी बघा. प्रत्येकासाठी, लहान मुलांचा वर्ग, किशोरांचा गट आणि अध्ययन वर्ग यांच्यात आपणास कोणते साम्य आणि फरक मिळणे अपेक्षित आहे यावर या अभ्यासक्रमाच्या गटाच्या आपल्या सहभागींसोबत चर्चा करा:

- क्रियाकलापाचे स्वरूप
- सहभाग्यांदरम्यानचे संबंध
- सम्मेलनातील वातावरण
- जे सेवेचे कार्य पार पाडत आहे त्यांची भूमिका —म्हणजे, शिक्षक, अनुप्रेरक किंवा सहशिक्षक

## विभाग २०

जेव्हा आपण युवाकिशोरांच्या संगोपनाच्या पवित्र कार्यात स्वत:ला समर्पित करता, तेव्हा आपणास लवकरच दिसेल की आपल्या प्रयत्नांच्या यशासाठी, आपण ज्या युवाकिशोरांचा गट स्थापित करण्यास मदत केली आहे, त्याच्या सहभागींसोबत आपण ज्या प्रकारचे संबंध स्थापित करता, ते अत्यंत महत्त्वाचे आहे. अर्थातच आपण त्यांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि आवश्यक असेल तेव्हा सांत्वन करण्यासाठी सदैव तत्पर राहाल. त्यांच्या सचोटीवरील आपला जबर विश्वास आणि त्यांच्या प्रत्येकाप्रति आपला आदर व खरेखुरे प्रेम त्यांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यास प्रवृत्त करेल. पितृसत्तावृत्ती, आत्मप्रौढी किंवा हुकूमशाही आधिपत्य, ज्या प्रवृत्ती युवाकिशोरांना प्रगती करण्यास मुळीच वाव देत नाहीत, त्यांचा मुळीदेखील लवलेश न ठेवता त्यांचे योगक्षेम व प्रगती याविषयी तुमची कर्तव्यनिष्ठा कृतीने दाखविणे आपल्यासाठी आवश्यक राहील. त्यांच्या अंत:करणात आणि मनात खऱ्या श्रद्धेचा पाया मजबूत करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये उज्ज्वल भविष्याची आशा निर्माण करण्यासाठी आपणास प्रत्येक संधीचा फायदा घ्यावा लागणार आहे. अब्दुल—बहा आम्हास उपदेश देतात:

> **"सर्वप्रथम, एकमेकांसाठी तुमचे जीवन त्यागण्यास, वैयक्तिक कल्याणापेक्षा सार्वत्रिक कल्याणास प्राधान्य देण्यास तत्पर राहा. असे संबंध निर्माण करा जे कशानेही डळमळीत होणार नाहीत; असा संघ निर्माण करा, जो कशानेही भंगणार नाही; असे मन ठेवा, जे अशी संपत्ती प्राप्त करणे कधीच थांबविणार नाही, जी कशानेही नष्ट होणार नाही. जर प्रेम अस्तित्वात नसते तर वास्तवाचे काय उरणार आहे? तो ईश्वराच्या प्रेमाचाच अग्नी होय, जो मनुष्यमात्राला प्राण्यांहून श्रेष्ठ ठरवितो. या उच्च कोटीच्या शक्तीला प्रबळ बनवा, ज्याद्वारे जगामध्ये सर्व प्रगती प्राप्त केली जाऊ शकते."**[३३]

खालील प्रवृत्ती एखाद्या युवाकिशोर गटाच्या सहभागींना कशाप्रकारे अनिष्टकारी राहतील आणि अशा प्रवृत्तींचा प्रतिकार करण्यासाठी अनुप्रेरकास कोणते विचार, भावना आणि आचरण मदत करतील याविषयी चर्चा करा.

पितृसत्तावृत्ती: ——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

आत्मप्रौढी: ——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

हुकूमशाही आधिपत्य: ——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

## विभाग २१

किशोरांच्या कोणत्याही गटातील सहभागींशी आपले नातेसंबंध देखील आपण मांडलेल्या उदाहरणामुळे प्रभावित होतील. युवाकिशोरांच्या जीवनात उदाहरणाचा प्रभाव कमी प्रमाणात मोजला जाऊ शकत नाही. तेव्हा, आपले अंत:करण शुद्ध करण्याचे आपले स्वत:चे प्रयत्न या संबंधात अधिक महत्त्वपूर्ण असतात. “सर्वंकष भौतिकवाद”, “माणसाच्या आत्म्यांना अवगुंठित करणारी भौतिक गोष्टींविषयीची आसक्ती”, “त्यांच्या अंत:करणांना विचलित करणाऱ्या भीती आणि व्यग्रता”, “त्यांच्या वेळेचा अपहार करणारे विलास आणि दुराचार, त्यांची दृष्टी काळवंडणारे पूर्वग्रह आणि वैरभाव, त्यांच्या आध्यात्मिक क्षमतांना अपंग बनविणारी उदासीनता आणि आळस”, हे “असे काही प्रचंड अडथळे असतात”, धर्मसंरक्षक म्हणतात, “जे बहाउल्लाह यांच्या सेवेतील प्रत्येक संभाव्य सैनिकाच्या मार्गात उभे राहतात”. पुढे त्यांनी आम्हाला स्मरण करुन दिले आहे, की हे अडसर दूर करण्याची आमची क्षमता आम्ही स्वत:ला “या अशुद्धींपासून” किती शुद्ध केले आहे, “या तुच्छ तन्मयता आणि चिंताजनक व्यग्रतांपासून” किती मुक्त केले आहे, “या पूर्वग्रह आणि वैरभावांपासून” किती पृथक् केले आहे, किती “अहंता बाहेर काढली आहे” आणि “ईश्वराच्या निवारक आणि जीवनदायी शक्तीने किती भारले आहे” यांच्या प्रमाणावर अवलंबून राहणार आहे.

युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणास योगदान करण्यासाठी आपण जे प्रयास करणार आहात, त्यांवर धर्मसंरक्षकांच्या या प्रबोधनाचे काही प्रभाव कोणते आहेत? ————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

## विभाग २२

युवाकिशोरांचा एक खरा मित्र म्हणून, तद्वतच त्यांचा विवेकी मार्गदर्शक म्हणून, आपणास त्यांच्या आनंदाच्या समयात आणि संकटकाळात साथ करणे अनिवार्य राहील. उत्कृष्टतेची अधिकाधिक उंची गाठण्यासाठी त्यांना सदोदित प्रोत्साहनाची आवश्यकता राहील. उणिवा आणि चुकांऐवजी आपण त्यांच्या यशावर लक्ष केंद्रित कराल तरच आपण त्यांना मदत करू शकाल. आपण त्यांना प्रोत्साहन द्याल, पण अर्थातच त्यांच्या अहंकाराला चालना मिळेल अशाप्रकारे नाही. आपण उपलब्धींवर लक्ष केंद्रित कराल, तरीही आपण त्यांच्या नैतिक सचोटीशी तडजोड करू शकतील अशा परिस्थितीत ते आढळल्यास, त्यांना सल्ला देण्यास संकोच करू नका.

आपल्या गटाशी असलेल्या मैत्रीच्या स्वरूपाचा विचार करण्यासाठी, धर्मसंरक्षकांच्या वतीने लिहिलेल्या पत्रातील खालील उतारा वाचा. जरी ते भाविकांचे धर्मश्रद्धेच्या संस्थांच्या वैयक्तिक नातेसंबंधाचे वर्णन करत असले तरी, ते किशोर गटाचे अनुप्रेरक म्हणून आपल्या प्रयत्नांशी संबंधित आहे:

> **"बहुतांश भाविक प्रभुधर्मामध्ये नवखे असतात आणि ते जर चुका करीत असतील, तर ते त्यांना हे कर, ते करु नकोस, असे वारंवार म्हणून त्यांच्या चैतन्यास चिरडून टाकण्यापेक्षा ते अर्धे पण महत्त्वाचे नाही."**[३४]

वारंवार त्याच्या किंवा तिच्या चुकांची जाणीव करुन दिल्यामुळे आणि सतत हे कर ते नको करु असे म्हटल्याने तरुण व्यक्तीचे चैतन्य का चिरडले जाऊ शकते, यावर चर्चा करा. आपले काही विचार इथे लिहा.

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

प्रोत्साहन देणे म्हणजे अफाट स्तुती करणे नव्हे; ते सच्चे आणि दांभिकतेपासून मुक्त असावे, अन्यथा ते एकतर अहंतेकडे किंवा अविश्वासाकडे नेते. अब्दुल—बहा भाविकांना धर्मकार्याची सेवा करण्यास कसे प्रोत्साहित करीत, याची काही उदाहरणे खाली दिली आहेत:

> **“सत्यतः मी ईश्वराची स्तुती करतो, की त्याच्या द्राक्षबागेत ईश्वरी धर्मकार्याच्या सेवेसाठी त्याने तुला प्रमाणित केले आहे.”[३५]**
>
> **“लोकांमध्ये त्याचा नामोच्चार करण्यासाठी, सर्व वैभवशाली सौंदर्याकडे तुला आकर्षित करण्यासाठी आणि त्याचे धर्मकार्य यशस्वी करण्यास तुला बलवान बनविण्यासाठी तुझी निवड केली, यासाठी मी सत्यतः माझ्या सर्वोच्च स्वामींची स्तुती करतो.”[३६]**
>
> **“सत्यतः, जेव्हा परमेश्वराने तुला त्याच्या दयेच्या सागरात डुबविले होते आणि तुला श्रद्धेच्या आणि ज्ञानाच्या शुद्ध अमृताचा चषक प्यावयास लावला, तेव्हा ईश्वराने तुला दुष्टतेपासून परिशुद्ध केले होते. शाब्बास, शाब्बास! कारण तू तुझ्या इच्छेची क्षणभंगुरता ईश्वरी इच्छेसाठी वांछिली आहेस आणि ईश्वरी प्रेमाची वृद्धी, ईश्वरी ज्ञानाचा विकास आणि ईश्वराच्या मार्गावर स्पष्टवादिता धुंडाळली आहेस.”[३७]**
>
> **“हे माझ्या आध्यात्मिक प्रियजनहो! ईश्वराचे गुणगान असो, कारण तुम्ही पडदे बाजूला सारले आहेत आणि करुणामय ईश्वराला ओळखले आहे आणि या वसतिस्थानापासून स्थानरहित साम्राज्याकडे त्वरा केली आहे. तुम्ही तुमच्या राहुट्या ईश्वरी जगात उभारल्या आहेत आणि त्या स्वयंभू परमेश्वराची महिमा गाण्यासाठी तुम्ही मंजुळ स्वर उंचावून गीत गायिले आहे, ज्याने हृदय भेदिले आहे. शाबास! सहस्त्रवार शाब्बास! कारण तुम्ही प्रकट झालेला प्रकाश पाहिला आहे आणि तुमच्या पुनर्जीवित अस्तित्वामध्ये तुम्ही घोषणा उंचावली आहे, ‘धन्य असो तो परमस्वामी, सकल निर्म्यात्यांपेक्षा सर्वश्रेष्ठ!’”[३८]**
>
> **“हे तुम्ही प्रामाणिक लोकांनो, आशाळभूत जनहो, तुम्ही जे लोहमण्यागत आकर्षिले गेले आहात, तुम्ही जे ईश्वरी धर्मकार्याच्या सेवेप्रती, त्याचा शब्द उन्नत करण्यास आणि त्याचा मधुर सुगंध दूरवर पसरविण्यास उभे झाला आहात! मी तुमचे उत्कृष्ट पत्र वाचले आहे. त्याची शैली सुंदर आहे, शब्द बोलके आहेत, अर्थ सारगर्भित आहे, आणि तो परमस्वामी तुमच्या मदतीला धावून आल्याबद्दल आणि त्याच्या विस्तारित होत असलेल्या द्राक्षबागेत त्याची सेवा करण्यास तुम्हास समर्थ केल्याबद्दल, मी त्याची स्तुती करतो आणि त्याचे आभार मानतो.”[३९]**
>
> **“तुझे पत्र सर्वत्र ओतलेल्या धर्मश्रद्धेच्या आणि आश्वस्ततेच्या सुगंधी पुष्पगुच्छासमान होते. शाब्बाश! शाब्बाश! कारण तू आपला चेहरा अदृश्य साम्राज्याकडे वळविला आहेस. फारच छान! फारच छान! तू त्या महामहीम सर्वसमर्थाच्या सौंदर्याकडे आकृष्ट झाला आहेस! अप्रतिम! अप्रतिम! तू किती भाग्यवान आहेस, की तू परमेश्वराच्या सर्वश्रेष्ठ देणगीस सुपात्र झाला आहेस!”[४०]**

अब्दुल—बहांनी ज्या प्रकारे मित्रांची स्तुती केली आहे, त्याने प्रेरणा घेऊन आपण संगोपन करीत असलेल्या गटाच्या सहभागींना प्रोत्साहन देण्याबद्दल आपण काय कराल, याचे काही वाक्यांत वर्णन करा.

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

## विभाग २३

सरतेशेवटी, आपणास ह्याचे स्मरण ठेवले पाहिजे, की युवाकिशोरांच्या गटाच्या सहभागींसोबत मित्रत्वाचे खोल असे प्रेमळ संबंध स्थापित करण्यासाठी आणि त्यांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आपण केलेले प्रयत्न आपल्या आनंदमय वातावरण तयार करण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे.

> **"आनंद आम्हाला पंख देतो! आनंदाच्या काळात आमची शक्ती अधिक सजीव असते, आमची बुद्धी तीक्ष्ण असते आणि आमची आकलनशक्ती कमी धूसर असते. आम्ही जगाशी तादात्म्य साधण्यास आणि आमच्या उपयुक्ततेचे क्षेत्र पाहण्यास अधिक सक्षम असल्याचे दिसते."[४१]**

गटासाठी आनंदी वातावरण निर्माण करण्यासाठी आपणास आनंदाची अनुभूती करणे आवश्यक आहे. काही युवाकिशोरांचा विचार करा ज्यांना आपण आधीच ओळखता, जे त्या गटाचा भाग बनू शकतील, ज्यात आपण लवकरच स्वत:ला गुंतवणार अशी आशा आहे. त्यांच्याविषयी आपणास आनंद देणारे कोणते विचार आपल्या मनात येतात? ————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

युवाकिशोर गटाच्या सभांना उथळ न होऊ देता, त्यास अधिक आनंदी बनविण्यासाठी आपण कोणते प्रत्यक्ष उपाय करू शकता? ————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

__________________________________________________________

__________________________________________________________

__________________________________________________________

हे विचार लक्षात घेऊन, विश्व न्याय मंदिराच्या वतीने लिहिलेल्या पत्रातील खालील उतारा वाचा:

**“प्रत्येक व्यक्ती ज्या आंतरिक आनंदाचा साधक असतो, एखाद्या संपुष्टात येणाऱ्या भावनांप्रमाणे, बाह्य प्रभावांवर अवलंबून नसतो; ही एक स्थिती आहे, जी निश्चित आणि जाणीवपूर्वक ज्ञानाने जन्मलेली आहे, शुद्ध अंत:करणाने जोपासलेली आहे, जी कायमस्वरूपी आणि वरवरची परिस्थिती यातील भेद ओळखण्यास सक्षम आहे.”** [४२]

अब्दुल—बहांच्या पुढील शब्दांवर चिंतन करून आपण या घटकाचे अध्ययन संपन्न करूया:

**“मानवाची उदात्त देणगी म्हणजे वैश्विक प्रेम —असा एक लोहमणी जो अस्तित्वास शाश्वत रूप देतो. ते वास्तवांना आकर्षित करते आणि जीवनाला अनंत आनंदाने विखुरते. जर हे प्रेम मानवाच्या हृदयात भेदून गेले तर त्याच्यामधील विश्वातील सर्व शक्त्या जागृत होतील, कारण ही एक दैवी शक्ती आहे जी त्याला दैवी स्थानापर्यंत पोहोचवते आणि जोपर्यंत तो प्रकाशित होत नाही तोपर्यंत त्याची कोणतीही प्रगती होणार नाही. वास्तविकतेची प्रेम—शक्ती वाढवण्यासाठी, तुमची हृदये अधिक आकर्षणाची केंद्रे बनवण्यासाठी आणि नवीन आदर्श आणि नातेसंबंध निर्माण करण्यासाठी अथक प्रयत्न करा.”** [४३]

## संदर्भ


१. विश्व न्याय मंदिर – रिझवान २०१० संदेश
२. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
३. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
४. अब्दुल–बहा, दैवी तत्त्वज्ञान
५. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे क्र. १५३
६. वरीलप्रमाणे क्र. १
७. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
८. रहस्यमय शब्द (अरेबिक क्र. १३)
९. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
१०. वरीलप्रमाणे
११. अब्दुल–बहा
१२. अब्दुल–बहा, दैवी संस्कृतीचे रहस्य
१३. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
१४. वरीलप्रमाणे
१५. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
१६. वरीलप्रमाणे
१७. अब्दुल–बहा
१८. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
१९. बहाउल्लाह, दैवी प्रियतमाची हाक: बहाउल्लाह ह्यांची निवडक गूढ उद्धरणे
२०. अब्दुल–बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
२१. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२२. बहाउल्लाह, दैवी प्रियतमाची हाक: बहाउल्लाह ह्यांची निवडक गूढ उद्धरणे
२३. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२४. बहाउल्लाह, किताब–ए–अकदस
२५. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२६. वरीलप्रमाणे
२७. वरीलप्रमाणे
२८. बहाउल्लाह ह्यांच्या प्रार्थना आणि चिंतने क्र. ३६
२९. वरीलप्रमाणे क्र. १८४
३०. विश्व न्याय मंदिर – २३ नोव्हेंबर १९८३ पत्रातून
३१. शोघी एफेंदी – ८ डिसेंबर १९३५ पत्रातून
३२. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
३३. अब्दुल–बहा, दैवी तत्त्वज्ञान
३४. शोघी एफेंदी – ३० जून १९५७ पत्रातून
३५. अब्दुल–बहा
३६. वरीलप्रमाणे
३७. वरीलप्रमाणे
३८. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
३९. वरीलप्रमाणे
४०. अब्दुल–बहा
४१. अब्दुल–बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
४२. विश्व न्याय मंदिर – १९ एप्रिल २०१३ पत्रातून
४३. अब्दुल–बहा, दैवी तत्त्वज्ञान



# अनुप्रेरकाच्या भूमिकेत सेवाकार्य करणे

उद्देश

किशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमाला
आकार देणाऱ्या संकल्पनांवर विचार करणे

## विभाग १

या पुस्तकाच्या दुसऱ्या घटकामध्ये आम्ही युवाकिशोरांच्या पौगंडावस्थेत त्यांच्या जीवनातील सामाजिक वातावरणाचे महत्त्व यावर चर्चा केली. युवाकिशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रम, त्यानुसार, “युवाकिशोर गट” या संकल्पनेभोवती आयोजित करण्यात आला आहे. आम्ही म्हटले आहे, की युवाकिशोरांचा गट हा बालवर्ग नव्हे. त्यात अध्ययन वर्गाची काही गुणवैशिष्ट्ये आहेत, परंतु त्याचा प्राथमिक उद्देश त्याच्या सहभागींना पारस्परिक सहकार्याचे वातावरण पुरविण्याचा आहे, ज्यामध्ये ते आध्यात्मिक जाणीव, विचार आणि वागणुकीच्या पद्धती विकसित करू शकतील जे त्यांच्या संपूर्ण आयुष्यात वैशिष्ट्यपूर्ण असतील.

एक युवाकिशोरांचा गट नियमितपणे आठवड्यातून किमान एकदा भेटतो आणि तीन वर्षांच्या कालावधीत दरवर्षी आयोजित केलेल्या अनेक शिबिरांमध्ये उपस्थित राहतो. सहभागींनी एक गट म्हणून एकत्र घालवलेला वेळ बारा ते पंधरा वयोगटातील किशोर युवांसाठी विशेषत: विकसित केलेल्या सामग्रीच्या अभ्यासावर केंद्रित आहे. युवाकिशोर विचारविमर्श करतात, योजना आखतात आणि समाजातील सेवा प्रकल्प राबवतात, खेळ खेळतात आणि त्यांच्या जवळच्या परिसराला अनुकूल असलेले नाट्य आणि कलाकुसर यासारखे सांस्कृतिक उपक्रम राबवतात. अनेक दिवस चालणाऱ्या शिबिरांमध्ये, ते वैयक्तिक गट म्हणून गहन अभ्यासात भाग घेतात आणि त्यांच्या प्रभागाच्या किंवा गावातील इतर गटांसह सामूहिक कार्यक्रम आणि उपक्रमांमध्ये सहभागी होतात. या घटकामध्ये, आम्ही आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमाच्या विविध पैलूंचे परीक्षण करू ज्यांच्याशी आपणास परिचित व्हायला हवे.

## विभाग २

प्रथम या गटाच्या सहभागींचा विचार करूया. जेव्हा समाजातील युवाकिशोर या कार्यक्रमात रुची दाखवतात, तेव्हा साधारणपणे दहा ते पंधरा सहभागींचा गट तयार करणे शक्य होते. जरी बहुसंख्य सहभागींचे वय बारा ते तेरा दरम्यान असेल, तरी सहभागींपैकी काही बारा वर्षाखालील तर काही चौदा वर्षांपेक्षा मोठे असतील. अनुभव असे सूचित करतो की जेव्हा सहभागी, त्यांचे वय काहीही असो, संपूर्ण तीन वर्षांच्या कालावधीसाठी एकत्र येऊन आणि एक गट म्हणून अध्ययन पूर्ण करतात तेव्हा हा कार्यक्रम सर्वात प्रभावी ठरतो. त्या वेळी, ज्यांची इच्छा आहे ते शैक्षणिक प्रक्रियेच्या पुढील टप्प्यावर एकरूपतेने जाऊ शकतात, संस्थेच्या अभ्यासक्रमांच्या मुख्य पाठ्यक्रमाचा अभ्यास करू शकतात आणि त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या सेवेच्या मार्गांचे अनुसरण करू शकतात.

काही ठिकाणी या गटात सामील झालेल्या युवाकिशोरांनी लहान मुलांच्या बहाई वर्गात भाग घेतला असेल, परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की, अनेक परिस्थितींमध्ये, ज्या युवाकिशोरांनी या कार्यक्रमात भाग घेतला असेल त्यांचा बहाई धर्मश्रद्धेसोबत पूर्वीचा संपर्क नसेल. वयाच्या भिन्नताव्यतिरिक्त, पार्श्वभूमी आणि अनुभवाच्या बाबतीत अनेकदा काही फरक असेल. कोणतेही गट कधीही एकजिनसी नसतो आणि अनुप्रेरकाला सतत युवकांच्या विविध

रुची लक्षात घेण्याच्या आव्हानास सामोरे जावे लागते. या संदर्भात मोठ्या प्रमाणात लवचिकता आणि कल्पकतेची आवश्यकता असते आणि प्रत्येक वेळी जेव्हा आपण एखाद्या गटासह एकत्र येता तेव्हा या आव्हानाचा सामना करण्यासाठी आपणास तत्पर असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, खालील परिस्थिती आपण कशा रीतीने हाताळाल?

- आपण मदत करीत असलेल्या युवाकिशोरांच्या गटांतील काही सहभागींना त्यांच्या वाचन आकलनात अडचणीचा अनुभव येतो.
- जेव्हा आपण गटातील लहान सहभागींसोबत स्वतंत्रपणे काम करण्याचा प्रयत्न करता, तेव्हा त्यांना लाजिरवाणे वाटते.
- एक किंवा दोन वयस्कर सहभागींना गटातील काही क्रियाकलाप पुरेसे आव्हानात्मक वाटत नाहीत.
- गटातील काही सहभागी एखाद्या विशिष्ट कार्यकृतीत भाग घेण्यास नकार देतात.
- गटातील काही सहभागी इतरांपेक्षा सामग्रीचा अभ्यास जलद गतीने करण्याविषयी क्षमता दाखवितात.
- गटातील मुले व मुली काही कार्यकृतींमध्ये एकत्र सहभागी होण्यास संकोच दाखवितात.
- अनेक सहभागींकडे योगदान देण्यास पुरेशी साधने नसतात, जसे की, गटाच्या सहलींसाठी.
- सहभागींपैकी एक किंवा दोन उपस्थितीच्या बाबतीत अनियमित आहेत.
- बैठकीच्या वेळी एक सहभागी अशोभनीय विनोद करतो.
- गटाचे काही सहभागी त्यांच्या धाकट्या भावंडांना सोबत बैठकींना घेऊन येतात.
- एक किंवा दोन सहभागी सामूहिक चर्चेमध्ये भाग घेत नाहीत.

या आणि तत्सम परिस्थितींबद्दल आपल्या गटात चर्चा करा. अर्थातच, सेवेच्या या क्षेत्रामध्ये आपणास अनुभव मिळत असताना, आपण आपल्या सहकारी अनुप्रेरकासोबतच्या नियतकालिक चिंतन बैठकांमध्ये अशा आव्हानांवर विचारविमर्श कराल आणि नवीन अंतर्दृष्टी प्राप्त कराल.

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

## विभाग ३

ज्या पुस्तकांचा अभ्यास हा कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी आहे त्यांची —ज्यापैकी काही, पुस्तक २ मध्ये असे सूचित केल्यानुसार, आपण वाचले असतील; दोन्ही भाषा आणि संकल्पनांच्या संदर्भात, अडचणीच्या पातळीनुसार सैलपणे वाटणी केली आहे. त्या दोन भागांमध्ये विभाजित केल्या आहेत. ज्या प्रथम आहेत त्या बहाई दृष्टीकोनातून विषय संबोधित करतात, परंतु धार्मिक निर्देशांच्या पद्धतीमध्ये नाहीत. या अर्थाने त्यांना "बहाई प्रेरित" म्हटले जाऊ शकते. ते या कार्यक्रमाचा एक प्रमुख घटक आहेत. इतर विभागात उद्धरणांचा समावेश आहे, संख्येने कमी असलेले, जे स्पष्टपणे बहाई घटक प्रदान करतात. आपण त्या घटकाचे परीक्षण पुढील भागात करूया आणि बहाई—प्रेरित उद्धरणांच्या स्वरूपावर येथे लक्ष केंद्रित करूया.

सर्वसाधारणपणे, या प्रकारची शैक्षणिक सामग्री या खात्रीने तयार केली जाते की, बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाच्या महासागरात, ज्ञानाचे असंख्य मोती दडलेले आहेत जे स्वारस्य असलेल्या व्यक्तींना अर्पण केले पाहिजेत, जरी त्या व्यक्तींनी अद्याप बहाउल्लाह ह्यांचे उच्चतम स्थान ओळखले नाही तरी. आपण या संकल्पनेशी आधीच परिचित आहात कारण, रुही पुस्तक २ चा दुसरा घटक "उन्नत वार्तालाप" मध्ये, आपण अब्दुल—बहांची वक्तव्ये आणि त्यांच्या पत्रिकांवर आधारित, दैनंदिन संभाषणांमध्ये प्राप्त झालेले आपले आध्यात्मिक ज्ञान आणि अंतर्दृष्टी एकत्रित करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी आपण अध्ययन केले आहे.

आपणास आपल्या स्वतःच्या अनुभवावरून जाणीव आहे की, त्या घटकामध्ये असलेल्या विषयांबाबत इतरांशी चर्चा करताना, प्रत्येक परिस्थितीनुसार, काही प्रसंगी आपल्या प्रेरणेच्या स्त्रोताचा नैसर्गिकपणे उल्लेख करू शकता, तथापि, काही वेळा, आपणास असे न करणे उपयुक्त वाटेल. हेच तत्त्व बहाई प्रेरित साहित्याच्या बाबतीतही लागू होते. याबाबत विश्व न्याय मंदिराच्या वतीने लिहिलेल्या एका पत्रात नोंद केले आहे:

> **"बहाई सामाजिक आणि आर्थिक विकासाचे नियमन करणाऱ्या मूलभूत तत्त्वांपैकी एक म्हणजे, मित्रांनी बहाउल्लाह ह्यांच्या शिकवणी उदारपणे आणि बिनशर्त मानवतेसोबत सामायिक कराव्या जेणेकरून, समस्त जगातील नागरिक या तत्वांचा उपयोग गंभीर सामाजिक समस्यांचे समाधान करण्यास, भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही परिमाणांमध्ये तसेच त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक जीवनात सुधारणा करण्यासाठी उपयोगात आणतील. परमेश्वराच्या दैवी वचनास उपलब्ध करण्यासाठी, बहाउल्लाह हे आजच्या युगासाठी अवतार आहेत हे स्वीकारने आवश्यक आहे अशी अट घालू नये. याशिवाय, जर काही परिस्थितीत आवश्यक असेल तर, बहाउल्लाह ह्यांच्या शिकवणींच्या आधारे विकसित केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या अंतर्गत प्रेरणा स्त्रोताचा स्पष्टपणे उल्लेख करण्यापासून परावृत्त करणे, अयोग्य ठरणार नाही. या प्रकाशात, धर्मश्रद्धेच्या शिकवणी आणि तत्त्वांवर आधारित शैक्षणिक साहित्य तयार करताना, मित्र विचारात घेऊ शकतील असे अनेक पर्याय आहेत."[१]**

विश्व न्याय मंदिराच्या वतीने लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रात लिहिले आहे:

> **"आम्हास तुम्हाला कळवण्यास सांगितले गेले आहे की बहाई–प्रेरित अभ्यासक्रम सामग्रीमध्ये बहाई लेखनातील उद्धरणांचा वापर करत असताना, त्या उद्धरणांच्या लेखकाचा संदर्भ देण्याची आवश्यकता नाही, जर परिस्थितीनुसार असे न करणे सुज्ञ असेल तर."**[२]

अशाप्रकारे, जरी बहाई–प्रेरित सर्व साहित्य बहाउल्लाह ह्यांच्या पवित्रतम प्रकटीकरणाच्या थेट प्रभावाखाली विकसित होत असेल, तरी साहित्याच्या प्रत्येक संचाचे स्वरूप आणि त्याचा अभिप्रेत वापर, हे विश्वधर्माचा किती प्रमाणात स्पष्टपणे उल्लेख करावा हे ठरवते. काहींमध्ये, पवित्र ग्रंथांमधील वचने समाविष्ट करणे योग्य आहे. इतर प्रसंगी, बहाई शिकवणी कोणत्याही उद्धरणांचा उपयोग न करता स्पष्ट केल्या जाऊ शकतात. दोन्ही बाबतीत, मूळ स्त्रोतांचे संदर्भ समाविष्ट केले जाऊ शकतात किंवा नाही. तथापि, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, विश्वधर्माचा स्पष्ट उल्लेख नसलेल्या प्रकरणांमध्येही, प्रचार–प्रसाराच्या अनुभवाचा संदर्भ हे स्पष्ट करतो की हे साहित्य खरोखरच बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र प्रकटीकरणाने प्रेरित आहे.

ज्या बहाई–प्रेरित साहित्याचा आपण येथे विचार करत आहोत, ते थेट पवित्र लिखाणातून उद्धृत करून आणि बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक विषयांच्या सादरीकरणामध्ये विश्वधर्माच्या शिकवणी जुळवून, परमेश्वराच्या शब्दाच्या सामर्थ्यावर विस्तृतपणे केंद्रित करतात. साहित्य स्पष्टपणे संदर्भ देत नाहीत, आणि गटाची कल व स्वारस्ये आणि त्याच्या परिस्थितीच्या प्रकाशात, सामान्यत: अनुप्रेरकाला हे ठरवायचे असते की उद्धरणांच्या स्त्रोतांचा उल्लेख करावा किंवा नाही आणि त्याचा उल्लेख करणे योग्य असल्यास, ते कोणत्या टप्प्यावर करायचे. खाली *संपुष्टीची झुळूक*, जे सामान्यत: किशोर युवांच्या गटांनी अभ्यासलेले पहिले पुस्तक असते, त्यामध्ये असलेल्या पाठातील एक उतारा आहे. ते वाचा आणि पुढील प्रश्नांवर चर्चा करा.

---

गॉडविनचा एक वर्गसोबती आणि घनिष्ठ मित्र आहे ज्याचे नाव आहे चिशिंबा. तो नेहमी मुलेंगा परिवाराला भेट देत असतो आणि आज तो रात्रीच्या जेवणासाठी थांबणार आहे. जेवताना विविध विषयांवर चर्चा होत आहे. मुसोंडा संपुष्टीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी अत्यंत अधीर आहे. शेवटी तेथे काही क्षणाकरीता शांतता पसरते आणि ही संधी घेऊन मुसोंडा म्हणते, "रोझ आणि मी संपुष्टीबद्दल बोलत होतो."

"झाला माझ्या छोट्या बहिणीचा संवाद सुरु," गॉडविन आपला घसा साफ करीत म्हणतो. परंतु त्याला आश्चर्य होते कारण चिशिंबा या विषयाबद्दल उत्सुक आहे.

"तुला या शब्दाचा अर्थ काय आहे असे वाटते?" गॉडविन मुसोंडाला विचारतो.

मुसोंडादेखील आश्चर्यचकित होते, आणि रोझ काहीतरी उत्तर देईल अशी अपेक्षा करत तिच्याकडे बघते.

"संपुष्टी... आपण जे काही करतो, त्यामध्ये परमेश्वर आपणास पुष्टी देतो आणि आपली मदत करतो," रोझ म्हणते.

चिशिंबा थोडा वेळ काहीच बोलत नाही. त्याच्या डोळ्यांमध्ये खिन्नता आहे. "काही महिन्यांपुर्वी," तो हळूहळू बोलण्यास सुरुवात करतो, "माझ्या वडिलांनी नोकरी गमावली. ते प्रामाणिक आणि जबाबदार आहेत आणि हे सर्वांना माहीत आहे. अठरा वर्षे पहारेकरी म्हणून त्यांनी एका कंपनीत काम केले आणि नंतर एकाएकी त्यांना नोकरीवरुन काढण्यात आले. आम्हा सर्वांना त्याचे कारण माहीत आहे. जर त्यांना नोकरीवर अधिक दोन वर्षे ठेवले गेले असते, तर ते निवृत्त झाल्यानंतर, कंपनीला त्यांना निवृत्तीवेतन द्यावे लागले असते. आमच्याजवळ जास्त काही बचत केलेले नाही. माझा थोरला भाऊ जरी आम्हास मदत करीत असला, तरी असे वाटत आहे की पुढील वर्षी मी शाळेत परत जाऊ शकणार नाही कारण मी माझ्या राहण्याचा आणि जेवणाचा खर्च करू शकणार नाही. मी शाळेवर खरोखरच प्रेम करतो. मला आश्चर्य वाटते, की परमेश्वर मला मदत का करीत नाही."

सर्वजण श्री. मुलेंगा या प्रश्नाचे उत्तर देतील, या अपेक्षेने त्यांच्याकडे पाहतात.

श्री. मुलेंगा स्मितहास्य करतात व म्हणतात, "जेव्हा आपण प्रयत्न करतो, तेव्हा परमेश्वर आपणास संपुष्टी देतो, याचा अर्थ असा नाही, की जीवन सोपे आहे. आपले जीवन अनेक अडचणींनी भरलेले असेल आणि दुर्दैवाने त्यांतील बरीच दु:खे अन्यायामुळे उत्पन्न होतात. तथापि आपणास कठीण परिश्रम करावे लागतील आणि जरी काही काळाकरीता गोष्टी आपल्या इच्छेनुरुप घडल्या नाहीत, तरी आपण परमेश्वराच्या संपुष्टीविषयी आश्वस्त असले पाहिजे. आपण अन्यायनिवारणार्थ करीत असलेल्या प्रयत्नांमध्ये परमेश्वर आपणास अवश्य संपुष्टी देईल." ते चिशिंबाकडे वळतात आणि म्हणतात, "तुझे कुटुंब एकीचे आणि कष्टाळू आहे. मला मन:पूर्वक असे वाटते, की तुझ्यासाठी ही स्थिती नक्कीच बदलेल. तू तुझे शिक्षण पूर्ण करशील. तू माझा शब्द लक्षात ठेव."

विभाग २० आणि २१ मध्ये आम्ही *संपुष्टीची झुळूक* या पुस्तकाकडे काही तपशीलाने बघू, परंतु सध्या आपण आपल्या गटासोबत खालील प्रश्नांवर चर्चा करू शकता:

१. वरील संभाषणात मुख्य आध्यात्मिक संकल्पना कोणती आहे?

२. युवाकिशोरांना समजेल अशा पद्धतीने ही संकल्पना मांडण्यात आली आहे का?

३. या पुस्तकाच्या दुसऱ्या घटकात आम्ही "स्व" वर जास्त जोर देण्याच्या धोक्यांबद्दल विचार केला. प्रयत्न करण्याच्या आणि परमेश्वराची संपुष्टी आकर्षित करण्याच्या महत्त्वावर भर देणारी शैक्षणिक प्रक्रिया, त्या घटकात वर्णन केल्याप्रमाणे आत्म–प्राप्ती, आत्म–शोध आणि आत्म–सन्मान या संकल्पनांच्या संबंधात आयोजित केलेल्या प्रक्रियेपेक्षा कशाप्रकारे वेगळी आहे?

४. सर्व युवाकिशोरांना, त्यांची पार्श्वभूमी काहीही असो तसेच बहाई कुटुंबातील सहभागींसह, येथे विचारात घेतलेल्या बहाई–प्रेरित साहित्याच्या अभ्यासाचा फायदा होतो का? हे असे का?

## विभाग ४

दुसऱ्या विभागात समाविष्ट असलेली सामग्री, बहाई बालकांच्या वर्गात मिळालेल्या आध्यात्मिक शिक्षणास पुढे नेण्याचे कार्य करतात. ही पाठ्यपुस्तके मूलभूत बहाई श्रद्धांच्या विवरणांविषयी सुस्पष्ट असतात आणि समुदायाच्या जीवनाच्या संदर्भात त्या श्रद्धा कशाप्रकारे प्रत्यक्षात उतरविल्या जातात, याचे विवेचन करतात. या पुस्तकामध्ये हाताळले गेलेले विषय जसे की बहाउल्लाह हे या युगातील दैवी प्रकटीकरण आहेत याची स्वीकृती, मानवतेसाठी त्यांच्या उद्देशासंबंधात संपूर्ण विश्वास, त्यांच्या कायद्यांच्या आज्ञापालनाद्वारे आपणास प्राप्त होत असलेले अमर्याद स्वातंत्र्य आणि आनंदाची हमी, त्यांच्या कराराच्या सामर्थ्यात असलेली दृढश्रध्दा –ही माहिती आम्हास विश्वासपूर्वक प्रदान करतात.

या विभागातील सामग्रीचा विचार करताना, आपणास धर्मसंरक्षकांच्या वतीने लिहिलेला खालील परिच्छेद साह्यभूत वाटेल:

> **“...आधुनिक युवकांच्या समोर असणारे धोके अधिकाधिक गंभीर होत आहेत आणि त्यासाठी तात्काळ उपाय योजणे आवश्यक आहे. तथापि, जसे अनुभव स्पष्टत: दर्शवितो, की या खचितच दु:खद आणि जटील परिस्थितीवरील उपाय पारंपरिक व पुरोहितपरंपरेच्या धर्मपद्धतींमध्ये मिळणे दुरापास्त आहे. धर्मपीठांची मतांधता ही एकूणच नाकारली गेली आहे. युवकांना जे काही नियंत्रित करु शकेल आणि या युगाच्या सपशेल भोगवादाच्या गर्तेपासून वाचवू शकेल ती आहे खऱ्याखुऱ्या, रचनात्मक आणि जिवंत विश्वासाची शक्ती; अशी जी बहाउल्लाह यांनी जगाला प्रकट केली आहे. भूतकाळाप्रमाणेच अद्यापही धर्म हीच जगाची एकमेव आशा आहे. परंतु धर्माचे ते स्वरुप नव्हे, जे आमचे पोथीनिष्ट धार्मिक नेते निष्फळतेने प्रचारित करण्याचा प्रयत्न करतात. खऱ्या धर्मापासून विभक्त झाल्यावर नीतितत्त्वे त्यांचा प्रभाव गमावतात आणि वैयक्तिक व सामूहिक जीवनाचे मार्गदर्शन करण्यास व नियंत्रण करण्यास अपयशी ठरतात. परंतु जेव्हा खऱ्या धर्माचा खऱ्या नीतिमत्तेशी संयोग होतो, तेव्हा नैतिक उत्कर्ष केवळ कल्पनादर्श नव्हे, तर ती एक शक्यता बनते.”**[३]

वरील परिच्छेद स्पष्ट करतो की, पारंपारिक धर्माचा ढासळता प्रभावाच्या उलट, जिवंत विश्वासाची शक्ती तरुणांना आज समाजात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेल्या “सपशेल भोगवादाच्या गर्तेपासून” वाचवू शकते. ही शक्ती युवाकिशोर काय अभ्यास करतात आणि त्यांची आध्यात्मिक क्षमता विकसित करण्यासाठी त्यांना ज्याप्रकारे मदत केली जाते त्या दोन्ही गोष्टींमध्ये प्रतिबिंबित झाली पाहिजे. या संकल्पनांचा पुढे विचार करण्यासाठी, आपण *श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकातील एका उताऱ्यावर लक्ष केंद्रित करूया –येथे अभ्यासित होत असलेल्या विभागातील मजकुरांपैकी एक.

*श्रद्धेचे चैतन्य* हे पुस्तक अशा बाबींचा अंतर्भाव करतो, ज्या तत्वज्ञानाच्या स्वरुपाच्या आहेत, कारण या वयोगटातील युवाकिशोर नेहमीच अस्तित्वाच्या मूलभूत प्रश्नांशी संभ्रमित असतात, आणि जर त्यांच्या नंतरच्या आयुष्यात संभ्रम व धार्मिक विश्वासाचे हनन टाळायचे असेल तर अशा प्रश्नांची उत्तरे योग्यरित्या दिली गेली

पाहिजेत. मानवी मनाला गोंधळात टाकणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे बहाई शिकवणींमध्ये आहेत: मनुष्यमात्राचे खरे स्वरुप, इष्ट व अनिष्ट, इच्छास्वातंत्र्य व प्रारब्ध, मानवी चैतन्याचे अवतरण व त्याची उत्क्रांती, मानवी बुद्धी आणि श्रद्धेचे चैतन्य. या विषयांवर प्रकाश टाकण्यासाठी, हे पुस्तक पवित्र लेखांपासून प्राप्त होत असलेल्या अंतर्दृष्टीवर निर्भर आहे, विशेषत: अब्दुल–बहा यांचे *"काही उत्तरित प्रश्न"* या पुस्तकातील वेधक स्पष्टीकरणांवर. प्रत्येक विषय युवाकिशोरांच्या गटाच्या नियमित साप्ताहिक बैठकीमधील संभाषणातून विकसित करतो, तसेच नंतर जेव्हा ते शनिवार व रविवारी होणाऱ्या अभियानात एकत्र येतात. खालील भाग त्या पाठामधून घेतलेला आहे, जेथे युवक त्यांची अनुप्रेरिका नतालिया पेट्रोव्हना हिच्याशी नशिबाच्या प्रश्नावर चर्चा करीत आहेत:

नतालिया पेट्रोव्हना म्हणते, "आपण आतापर्यंत काय समजलो आहोत, ते आपण पाहू या. चांगले अथवा वाईट करण्याचे आम्हाला इच्छास्वातंत्र्य असते आणि उदात्त जीवन जगण्यासाठी आम्हास आपल्या इच्छाशक्तीचा वापर करावा लागतो. तथापि आपणास इच्छास्वातंत्र्य आहे याचा अर्थ असा नाही, की आपण प्रत्येक गोष्टींवर नियंत्रण करु शकतो. अशाही गोष्टी आहेत, ज्या आमच्या बाबतीत अटळपणे घडतात, ज्यांच्यावर आमचे फार थोडे नियंत्रण असते. आता मला आपणास एका दुसऱ्या कल्पनेविषयी विचारायचे आहे. "नशीब" या शब्दाद्वारे आपणास कोणता बोध होतो?

"मला वाटते, नशीब हे असे काहीसे आहे, जे कसेही असले तरी आम्ही त्यास बदलू शकत नाही," इगोर म्हणतो.

"बरोबर बोललास. आपल्यापैकी कुणी थोडकी उदाहरणे देऊ शकता काय?" नतालिया विचारते.

"आम्ही आमच्या मातापित्यांची निवड करीत नसतो," नाडीया म्हणते.

"आपण कुठे जन्म घ्यावा हे आपण ठरवू शकत नाही," अँटॉन सांगतो.

"माझे आईवडील सांगतात, की थोर पियानोवादक बनणे हे माझ्या नशीबी आहे," वाडीक म्हणतो.

"पण तू तो पियानोवादक बनावे असे नाही. काही वेगळे बनण्याची निवड तू करु शकतोस," मरीना म्हणते.

"बरोबर आहे, नशीब हे तेवढेसे सोपे नाही. नशीब कशाप्रकारे कार्य करते, हे स्पष्ट करण्यासाठी एक चांगला दृष्टांत आहे. गालिचा कसा विणला जातो हे आपणापैकी कुणी पाहिले आहे काय?" नतालिया विचारते.

सर्वांच्या चेहऱ्यावर ओत्सुक्याचा भाव दिसतो म्हणून नतालिया पुढे बोलते: "बरे, एक चौकट असते. या चौकटीवर एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सुताचे समांतर तंतू घट्टपणे ताणलेले असतात. विणकर नक्षीकारी निर्माण करण्यासाठी या तंतूंच्या आरपार निरनिराळ्या रंगांच्या आणि नाना प्रकारच्या सुतांचा वापर करतो. सुरवातीच्या काळातील भाविकांपैकी एकाने अब्दुल–बहांना असे बोलताना ऐकले होते, की आपण सर्व विणकरांसमान आहोत. आम्हाला चौकट आणि तंतू दिलेले आहेत. विणकामासाठी आम्हास सूत (दोरे) देखील

दिलेले आहे, जे जन्मत: प्राप्त होणाऱ्या सर्व कुशलता व शक्ती आहेत असे आपण म्हणू शकता. हे आपले नशीब आहे. परंतु विणण्याच्या चौकट यंत्रावर जे विणायचे आहे, ती नक्षी आम्ही निवडतो. आमच्या कृतीविषयी आम्हाला स्वातंत्र्य असते. प्रत्येक कृती ही नक्षीकारीचा लहानसा भाग तयार करते. आपण कशाप्रकारे विकसित होतो ते म्हणजे पूर्ण विणकाम होय. स्वातंत्र्य आणि इच्छाशक्तीच्या द्वारे परमेश्वराने आम्हास प्रदान केलेल्या शक्तींचा आणि कुशलतांचा आम्ही विकास करतो."

---

**चिंतन:**

परमेश्वराने आम्हास निश्चित क्षमता दिल्या आहेत. कुणी जीवशास्त्रात हुशार असेल तर एखाद्याजवळ संगीताबाबत कुशलता असेल. परंतु थोर व्यक्ती म्हणून विकसित होण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते आम्हा सर्वांना देण्यात आले आहे. म्हणून आपल्या उणिवांसाठी नशीबाला दोष देणे योग्य नाही. जेव्हा आपण असे करतो, तेव्हा आपल्या सुधारण्याच्या प्रयत्नाला विराम देत असतो. खालील प्रत्येक परिस्थितीमध्ये अशा विचाराची निवड करा, जो त्याच्या किंवा तिच्या स्थितीत बदल करण्यास उपकारक राहील.

क. एखादी व्यक्ती वारंवार आजारी पडते, कारण ती बहुतांशी अपायकारक अन्न सेवन करते. ती विचार करते:

—— अशक्त व आजारी असणे हे माझे नशीब आहे.

—— मी पळवाट व्यक्त करणे थांबवावे आणि माझी आहारपद्धती बदलावी.

ख. एखादी व्यक्ती अभ्यास करीत नाही आणि परिक्षेत कमी गुण प्राप्त करते. ती विचार करते:

—— मी अग्रक्रमाचा विद्यार्थी नसेन; परंतु कठीण परिश्रमाने मी सुधारेन.

—— शाळेत यश मिळविणे माझ्या नशीबी नाही.

ग. एखाद्या व्यक्तीपुढे जेव्हा जेव्हा अडचणी येतात तेव्हा तो मद्यसेवन करतो. जेव्हा ती व्यक्ती भानावर असते, तेव्हा ती विचार करते:

—— जीवन माझ्यावर मद्यप्राशनाची वेळ आणते.

—— मी माझ्या जीवनात समस्या हाताळू शकतो. मला मद्याची आवश्यकता नाही.

घ. एखाद्या व्यक्तीला तिच्या मैत्रिणींवर टीका करण्याची सवय आहे. म्हणून तिचे मित्र तिला टाळतात. तिला वाटते:

—— मी कुणालाच आवडत नाही.

—— मी टीका करणे टाळावे आणि माझ्या मित्रांमध्ये चांगले ते पाहावे.

च. एखादी व्यक्ती परीक्षेत गैरमार्गाचा वापर करते व पकडली जाते. ती विचार करते:

—— हे माझ्या नशिबातच आहे! इतर विद्यार्थी पण गैरमार्गाचा वापर करतात तथापि ते पकडले जात नाहीत.

—— मी अशाप्रकारची वागणूक का बरे करत आहे? मी स्वत:ला प्रामाणिकतेच्या पोशाखाने सुशोभित करावे हे अपेक्षित आहे.

---

“आपण सर्व असे म्हणत आहोत काय, की गुन्हेगार बनणे हे कुणाच्याही नशिबात नाही?” इव्हान विचारतो.

“अर्थातच असे नाही,” नतालिया उत्तर देते. “मी नुकत्याच वापरलेल्या दृष्टांतामध्ये प्रत्येकजण त्याला दिल्या गेलेल्या चौकटीच्या व दोऱ्यांच्या सहाय्याने सुंदर नक्षीकारी विणू शकतो. इतरांपेक्षा वेगळे का होईना, एक नीतिमान व्यक्ती म्हणून विकसित होण्याची क्षमता आम्हा सर्वांजवळ आहे.”

जे काही सांगितले जात आहे, त्या सर्वांशी इव्हान सहमत आहे. तथापि, काहीतरी त्याला सतावीत आहे, आणि ते निश्चितपणे काय आहे, हे त्याला कळत नाही. नंतर एकाएकी त्याला स्वत:चे बोल ऐकू येतात, “परंतु, हे एकूण बरेच कठीण आहे.”

इव्हानला काय म्हणायचे आहे, हे कुणालाही नेमके कळत नाही.

“काय एवढे कठीण आहे?” नतालिया विचारते.

“खंबीर आणि नीतिमान असण्यासाठी सतत एवढा मोठा प्रयत्न करणे,” इव्हान उत्तर देतो.

“तू बरोबर आहेस इव्हान,” नतालिया सस्मित चेहऱ्याने म्हणते. “परंतु स्मरणात ठेव, की परमेश्वर आम्हाला सदोदित मदत करीत असतो. तो आम्हास कधीही एकटे सोडत नाही. हे जलप्रवास करणाऱ्या नौकेसमान आहे. गती देण्याची शक्ति वाऱ्यापासून येते, ती स्वत: नौकेपासून येत नाही. परंतु तो नौकेचा कप्तान असतो, जो वाऱ्याचा उपयोग नौकेला तिच्या गंतव्य स्थानावर नेण्यासाठी करतो. सर्व शक्ति परमेश्वरापासून येते. त्याच्या मदतीशिवाय आम्ही शक्तिहीन आहोत. जेव्हा आम्ही केवळ आपणाकडे पाहतो, तेव्हा आम्ही सर्व शक्तिहीनता पाहतो. परंतु जेव्हा आम्ही परमेश्वराकडे वळतो आणि त्याची मदत व सहाय्याची विनवणी करतो, तेव्हा परमेश्वराला जे प्रिय आहे ते करण्यास शक्तिचा आढळ होतो.”

नंतर खालील उद्धरण मुखोद्‌गत करण्यासाठी युवक आपल्या गटाची जोड्यांमध्ये विभागणी करतात:

> **“त्या अतुलनीय निर्मात्याने सर्व मनुष्यमात्रांना एका समान घटकापासून निर्माण केले आहे आणि त्यांच्या सत्य स्थितीला त्याच्या इतर सर्व निमिर्तीहून उन्नत केले आहे. म्हणून यश किंवा अपयशप्राप्ती अथवा नुकसान सर्वथा मनुष्याच्या स्वत:च्या श्रमावर अवलंबून आहे. जर तो अधिक प्रयत्न करेल, तर त्याची प्रगती अधिक राहील.”**

> **“हे माझ्या परमेश्वरा! हे माझ्या परमेश्वरा! तू मला माझ्या नम्रतेत व असमर्थतेत, सर्व महान उपक्रमात व्यापलेला, जनसमुदायांमध्ये तुझे पवित्र वचन फडकावण्यास आणि तुझ्या पावन शिकवणींचा**

**लोकांमध्ये प्रचार—प्रसार करण्यास कटिबद्ध असलेला पाहतोस. तू मला पावन चैतन्याच्या सामर्थ्याने सहाय्य केल्याशिवाय, तुझ्या वैभवशाली साम्राज्याच्या भक्तगणांद्वारे मदत केल्याशिवाय, तुझ्या संपुष्टीचा वृष्टी—वर्षाव केल्याशिवाय, जे सामर्थ्य चिलटाला गरुडामध्ये, पाण्याच्या एका थेंबाला नद्या व समुद्रामध्ये, आणि एका अणूला महान प्रकाश व सूर्यामध्ये परिवर्तीत करू शकते, तुझ्या अशा समर्थनाशिवाय मी कसा यशस्वी होऊ शकेल? हे माझ्या परमस्वामी! तुझ्या विजयी आणि प्रभावी सामर्थ्याने मला सहाय्य कर, जेणेकरुन माझी जिव्हा सर्व लोकांमध्ये तुझी स्तुती व गुणगान करू शकेल आणि माझा आत्मा तुझ्या प्रेम व ज्ञानाच्या दिव्य अमृताने व्यापून जाईल."**

**"तू आहेस सर्वशक्तिमान आणि आहेस तुझ्या इच्छेचा कर्ता."**

जरी आपणास विभाग २२ मधील *श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकाच्या संपूर्ण मजकुराचा अभ्यास करण्याची संधी मिळेल, तरीही येथे थोडे थांबून आणि खालील मुद्द्यांवर चर्चा करून वरील उताऱ्यामधील सामग्रीचे परीक्षण करणे सहाय्यभूत ठरेल:

१. वरील मजकूर नशिबाची संकल्पना कशाप्रकारे सादर करतो? ते हठधर्मी स्वरुपाचे आहे काय?

२. संकल्पनेचे हठधर्मी प्रकारचे प्रस्तुतीकरण कशा पद्धतिचे राहतील?

३. मजकूर युवाकिशोरांना आध्यात्मिक संकल्पनांचा शोध घेण्यास मदत करण्यावर योग्य भर देतो काय, किंवा विचार ताठरतेने प्रस्तुत केले आहेत काय?

४. नशिब आणि इच्छास्वातंत्र्य यासंबंधीच्या पवित्र लेखांचा त्यांच्या जीवनावरील प्रभाव समजून घेण्यासाठी मजकूर त्यांना कशाप्रकारे सहाय्यक ठरतो?

५. जे युवाकिशोर संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांच्या दृष्टिकोनांच्या व भावनांच्या भिन्नतेसाठी पुरेशी मुभा आहे काय? जर असे असल्यास, ती कशाप्रकारे दर्शविली गेली आहे?

६. या बाबतीत जर युवाकिशोरांना त्यांचे विचार मुक्तपणे प्रदर्शित करु दिले गेले नाहीत, तर काय घडेल?

७. नतालिया पेट्रोव्हना युवाकिशोरांना त्यांच्या विचारांच्या स्पष्टतेचा विकास करण्यास कशी मदत करते?

८. गटातील सहभागींच्या दरम्यान चर्चिले गेलेले प्रश्न, त्यांच्या विविध पार्श्वभूमी लक्षात घेता सर्वच युवाकिशोरांचा लागू पडतात काय?

## विभाग ५

किशोरावस्थेची सुरुवात हा जीवनातील असा काळ आहे, जेव्हा आम्ही बाह्य देखाव्याच्या पलीकडे जाण्याची आमची क्षमता बऱ्याच प्रमाणात वाढवितो; जे काही आपण पाहतो किंवा अनुभवतो, त्याचा खोल अर्थ

जाणून घेण्याचा मागोवा घेतो. याचा अर्थ असा होतो, की युवाकिशोरांना आध्यात्मिक दृष्टीची आवश्यकता असते; त्यांना त्यांची आध्यात्मिक शक्ती ओळखण्यास, प्रत्येक परिस्थितीविषयी आध्यात्मिक सत्य पाहण्यास आणि संबंधित आध्यात्मिक तत्त्वे जाणण्यास सहाय्य केले गेले पाहिजे. विश्वधर्माच्या पवित्र लेखांमध्ये "आत्म्याच्या डोळ्यांनी" पाहण्याबद्दल, "आंतरिक दृष्टी" उघडण्याबद्दल आणि "अंतर्दृष्टी" विकसित करण्याबद्दल अनेक संदर्भ आहेत. उदाहरणार्थ, खालील उद्धरणामध्ये अब्दुल—बहा तेहरान येथील तर्बियत विद्यालयास हे मार्गदर्शन देतात:

> **"अल्पतम कालखंडात त्यांना जास्तीत जास्त प्रगती करु द्या, त्यांना त्यांचे डोळे विस्तृतपणे उघडू द्या आणि सर्व गोष्टींचे आंतरिक सत्य धुंडाळू द्या, प्रत्येक कलेत आणि कौशल्यात निष्णात होऊ द्या आणि सर्व गोष्टींची रहस्ये, ती जशी आहेत त्यांची जाणीव करण्यास शिकू द्या —ही दृष्टी स्पष्टपणे पवित्र उंबरठ्याप्रति दासतेच्या स्वयंसिद्ध प्रभावांपैकी एक आहे."[४]**

अब्दुल—बहा आध्यात्मिक दृष्टीस मनुष्यमात्राला प्राणिमात्रांपासून भिन्न करणाऱ्या शक्तींपैकी एक असल्याचे संबोधतात:

> **"हे स्पष्टत: सिद्ध आहे, की मनुष्य जरी प्राण्यांमध्ये समानतेने असलेल्या शक्ती धारण करतो, तरी तो बौद्धिक प्राप्तीमुळे, आध्यात्मिक जाणिवेमुळे, सद्‌गुणांच्या अर्जनामुळे, प्रतापी उदारता मिळविण्याच्या क्षमतेमुळे, दैवी आशीर्वाद आणि स्वर्गीय दयेच्या उत्सर्गामुळे प्राणिमात्रांपासून वेगळा आहे. हे माणसांचे अलंकार, त्याचा गौरव आणि त्याची महानता आहे. मानवजातीने ह्या उच्चतम पदासाठी प्रयत्नशील असायला पाहिजे."[५]**

दुसऱ्या उद्धरणामध्ये ते आपल्या अंतर्दृष्टीला आणि आंतरिक श्रवणाला आध्यात्मिक भूषण असे संबोधतात:

> **"त्याने आम्हाला भौतिक देणग्या आणि आध्यात्मिक भूषणे दिली आहेत, सूर्यप्रकाश पाहण्यासाठी बाह्यदृष्टी आणि अंतर्दृष्टी ज्याद्वारे आम्ही ईश्वराच्या वैभवाचा मागोवा घ्यावा. त्याने आवाजाच्या माधुर्याचा आनंद घेता यावा म्हणून बाह्य कर्णाची रचना केली आहे आणि आंतरिक श्रवण प्रदान केले आहे ज्याद्वारे आम्ही आमच्या निर्मात्याचा आवाज ऐकावा."[६]**

दुसऱ्या प्रसंगी अब्दुल—बहा आम्हास स्मरण करुन देतात की आपली अंतर्दृष्टी उघडणे किती महत्त्वाचे आहे:

> **"आपली आध्यात्मिक जाणीव, आपली अंतर्दृष्टी जागृत झालीच पाहिजे, जेणेकरुन आपण सर्व वस्तूंमध्ये ईश्वरी चैतन्याची चिन्हे व अंश पाहू शकू. प्रत्येक वस्तू आपणाकडे चैतन्याचा प्रकाश परावर्तित करु शकते."[७]**

आणि खालील उद्धरणात, अब्दुल—बहा आपल्यासाठी एका घटनेचे वर्णन करतात ज्यामुळे आपली आध्यात्मिक धारणा समजूत वाढवते:

**“विनाशाची कल्पना ही मानवी अधोगतीचे, हीनतेच्या व निकृष्टतेच्या कारणाचे, मानवी भीतीच्या व अधमपणाच्या उगमाचे अंग आहे. ती मानवी विचार खंडित व कमकुवत होण्यास पोषक ठरली आहे, जेव्हा की अस्तित्वाच्या आणि सातत्याच्या जाणिवेने मनुष्याला उदात्ततेच्या आदर्शांकडे उन्नत केले आहे, मानवी प्रगतीचा पाया स्थापित केला आहे आणि स्वर्गीय सद्गुणांच्या विकासास चालना दिली आहे; म्हणून, मानवासाठी हे उचित आहे, की त्याने अस्तित्वहीनतेच्या व मृत्यूच्या विचारांचा, जे सर्वथा काल्पनिक आहेत, त्याग करावा आणि स्वतःला त्याच्या उत्पत्तीच्या दैवी उद्देशामध्ये सदा चैतन्यमय, सदा चिरंतन असे पाहावे. मानवी आत्म्याला अवनत करणाऱ्या कल्पनांपासून त्याने दूर व्हावे, जेणेकरुन तो दिनप्रतिदिन आणि पलप्रतिपल मानवी सत्याच्या सातत्याच्या आध्यात्मिक जाणिवेकडे उन्नत होत अग्रेसर व्हावा.”**[८]

आध्यात्मिक धारणेमुळे मानवी आकलनाला नवनवीन आयाम कशाप्रकारे मिळतात, जे केवळ मानसिक शक्तींच्या जोरावर प्राप्त होत नाही, याविषयी काही शब्द सांगू शकाल का?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## विभाग ६

आध्यात्मिक दृष्टी अंगीकरण्याच्या आवश्यकतेचा अंदाज घेतल्यानंतर, आता आम्ही स्वतःस विचारायला हवे की आम्ही तिचा विकास कसा करु शकतो? अर्थातच, या प्रश्नाला साधे उत्तर अपेक्षित नाही आणि इथे आम्ही केवळ काही अनुषंगिक मुद्द्यांचा विचार करु शकतो.

हे स्पष्ट आहे, की आध्यात्मिक दृष्टी हा एका शुद्ध अंतःकरणाचा गुणधर्म आहे. अब्दुल–बहा म्हणतातः

**“मानवाचे अंतःकरण जसजसे अधिक शुद्ध आणि पवित्र बनते, तसतसे ते ईश्वरासमीप जाते आणि सत्यसूर्याचा प्रकाश त्यामध्ये प्रकट होतो. हा प्रकाश ईश्वरी प्रेमाच्या अग्नीने अंतःकरणांना आकर्षित करतो, त्यामध्ये ज्ञानाचे द्वार उघडतो आणि दैवी रहस्ये अनावृत करतो, जेणेकरुन आध्यात्मिक शोध शक्य होतात.”**[९]

ईश्वराचे ज्ञान आध्यात्मिक दृष्टीच्या विकासासाठी महत्वाचे आहे हे देखील उघड आहेः

**“भौतिक वास्तवाच्या ज्ञानामध्ये भौतिक फायदा आहे आणि त्याद्वारे बाह्य सभ्यतेची प्रगती होते, तथापि ईश्वराचे ज्ञान हे आध्यात्मिक प्रगती व आकर्षणांचे कारण आहे आणि त्याद्वारे सत्य दृष्टी आणि अंतर्दृष्टी, मानवतेची उन्नती, दैवी सभ्यतेचे स्वरूप, योग्य नैतिकतेची सुधारणा आणि सद्‌विवेकबुद्धी प्राप्त होते.”**[१०]

**“हे माझ्या मित्रा! सत्यतेचा सूर्यापासून पसरलेल्या तेजस्वी किरणांनी तुमची दृष्टी प्रकाशित केल्याबद्दल ईश्वराचे आभार माना, आणि तुम्हास चेतना प्रदान केल्यामुळे आणि जीवनाच्या जलाने तसेच परमेश्वराच्या प्रेमाच्या अग्नीने तुला आच्छादित केल्याबद्दल.”**[११]

**“परमेश्वराचे प्रेम हे अग्निसमान असते, कारण ते पडदे जाळून टाकते आणि जलासमान ते जीवनाचा स्त्रोत आहे. थोडक्यात, ईश्वरावरील प्रेम हे मानवतेच्या जगाच्या सद्‌गुणांचे सर्वात अंतरंग वास्तव आहे. त्यातून मानवी स्वभाव शुद्ध होतो. परमेश्वराच्या प्रेमाने मनुष्य जगाच्या दोषांपासून मुक्त होतो. ईश्वराच्या प्रेमाने, मनुष्य सद्‌गुणांच्या क्षेत्रात प्रगती करतो. ईश्वराचे प्रेम हे जगाच्या प्रकाशाचे कारण आहे.”**[१२]

वरील सल्ल्यांचे महत्त्व लक्षात घेता आपणास खालील सराव उपयुक्त वाटू शकेल.

१. खालीलपैकी प्रत्येक आध्यात्मिक धारणा कशी वाढते याचे वर्णन करणारी काही वाक्ये लिहा:

क. हृदयाची शुद्धता: ________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

ख. ईश्वराचे ज्ञान: ________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

ग. ईश्वराचे प्रेम: ________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

२. खालील विधाने सत्य आहेत की नाही ते ठरवा:

—— केवळ तर्काने आणि ईश्वरी शिकवणींच्या सहाय्याशिवाय, आपण योग्य व अयोग्य हे ओळखू शकतो.

—— ईश्वराच्या अवतारांची ओळख आणि त्यांच्या शिकवणींचे पालन हे आपल्याला सत्याचा मागोवा घेण्यासाठी सक्षम करते.

—— हृदयाची पवित्रता माणसाला भोळा बनविते.

—— अंत:करण अधिक शुद्ध असेल, तर ते अधिक स्पष्टपणे दैवी सद्‌गुण परावर्तित करते, ज्याचा प्रकाश त्यास वस्तूंची आंतरिक सत्यता जाणण्यास समर्थ बनविते.

—— ईश्वरी प्रेमाचा अग्नी अहंतेचा पडदा जाळून टाकतो, अशा प्रकारे ते अंतर्दृष्टीला सत्य पाहण्यास समर्थ करीत असते.

—— ईश्वराच्या प्रेमाची शक्ती आपल्याला त्याच्या इच्छेचे पालन करण्यासाठी आणि त्याचा उद्देश पूर्ण करण्यासाठी स्पष्ट दृष्टीसह प्रयत्न करण्यास मदत करते.

—— नामशेष होण्याच्या भीतीमुळे आपली बौद्धिक आणि आध्यात्मिक क्षमता कमकुवत होते आणि म्हणून जेव्हा आपल्याला आपल्या अस्तित्वाच्या निरंतरतेबद्दल खात्री असते तेव्हा आपली आध्यात्मिक धारणा प्रबळ होत असते.

—— दैवी उंबरठ्यावरील नि:स्वार्थी सेवा, वस्तूंची आंतरिक सत्यता पाहण्यास आम्हास मदत करील.

—— अंतर्दृष्टीने आम्ही दैवी स्वीकृती पाहू शकतो.

## विभाग ७

मागील विभागातील शेवटचे उद्धरण आपल्या शोधप्रयत्नांना विशेष प्रकारे लागू असलेल्या मूलभूत संकल्पनेकडे म्हणजे अंत:चक्षूला वस्तूंची सत्यता पाहण्यापासून असंख्य पडदे बाध आणतात याकडे निर्देश करते. आध्यात्मिक जाणीव वाढविण्यासाठी असे पडदे दूर सारणे आवश्यक असते. अब्दुल—बहा दर्शवितात:

> **“संपूर्ण दृश्य जीवनात निहित असलेल्या ईश्वरी देणग्या कधीकधी मध्ये येणाऱ्या मानसिक व मर्त्य दृष्टीच्या पडद्यांमागे दडलेल्या असतात, जे पडदे मानवास आध्यात्मिकदृष्ट्या अंध व असमर्थ बनवत असतात, तथापि, जेव्हा ते पापुद्रे दूर केले जातात आणि पडदे छिन्नभिन्न केले जातात, तेव्हा ईश्वराची महान चिन्हे दिसू लागतात आणि मानव संपूर्ण जग सनातन प्रकाशाने भरलेले पाहतो. सर्व ईश्वरी देणग्या नेहमी व्यक्त असतात. स्वर्गीय अभिवचने सदैव असतात. ईश्वराची अनुकंपा सर्वांभोवती आहे. परंतु मानवी आत्म्याचा दृश्य डोळा जर पडद्याने आच्छादला किंवा काळवंडला असेल, तर तो विश्वव्यापी चिन्हे नाकारण्यास प्रवृत्त केला जाईल आणि दैवी देणग्यांच्या अभिव्यक्तींपासून तो वंचित राहील. म्हणून, अंतर्दृष्टीच्या डोळ्यास झाकणारा पडदा हटावा यासाठी, ईश्वरी चिन्हांची अभिव्यक्ती नजरेस यावी यासाठी, त्याच्या रहस्यमय देणग्या समजता याव्यात यासाठी आणि भौतिक देणग्या आध्यात्मिक आशीर्वादांच्या**

**तुलनेत नगण्य आहेत याची जाणीव व्हावी यासाठी, आम्ही आत्मा व अंत:करणापासून प्रयत्नशील राहिले पाहिजे."[१३]**

**"प्रत्येक आत्म्याने अविरत प्रयत्न केले पाहिजेत, जेणेकरून मानवाच्या नेत्रांना झाकणारे पडदे नष्ट होऊन जावेत आणि लगेचच सत्य सूर्य दिसावा आणि त्याद्वारे हृदय व दृष्टी प्रकाशित व्हावी."[१४]**

शाब्दिक प्रस्तुतीकरण, भ्रष्ट कल्पना, दृष्टीहीन अनुकरण, अहंभाव, विषयवासना व इच्छांच्या नादी लागणे, लोभ व मत्सर, आणि पूर्वग्रह –हे पवित्र लिखानांत नमूद केलेल्या पडद्यांपैकी काही आहेत. तशाचप्रकारे, आपल्या भौतिक संवेदनाही पडद्यासारखे परिणाम करू शकतात.

**"माझी तुम्हासाठी प्रार्थना आहे की, तुमच्या आध्यात्मिक क्षमता व प्रयत्न दैनंदिन वाढोत आणि तुम्ही स्वर्गीय प्रकाशाच्या वैभवांना तुमच्या डोळ्यांपासून दूर ठेवण्यास भौतिक इंद्रियांना कधीही संधी न देवो."[१५]**

**"शाब्दिक प्रस्तुतीकरण हा अनेकांपैकी एक पडदा आहे. आंतरिक महत्तांचा ठाव घेण्यासाठी भरभक्कम प्रयत्न करणे आवश्यक असते."[१६]**

**"तू ईश्वराचे स्तुतीगाण कर की, तू तुझी वाट महिमांच्या साम्राज्यात धुंडाळलीस आणि व्यर्थ कल्पनांचे पटल छिन्नभिन्न केलेस आणि आंतरिक रहस्यांचा गाभा तुझ्याप्रत व्यक्त करण्यात आला."[१७]**

**"मी संपूर्ण नम्रतेने ईश्वराला विनवितो, की त्याने तुझ्या अंतर्दृष्टीवरुन आवरण हटवावे; तुझ्याप्रत त्याने आपली महान चिन्हे उघड करावीत; आणि ईश्वराशिवाय अन्य सर्वांपासून मुक्त करुन, त्याच्या प्रेमाग्नीने प्रज्वलित करुन, त्याच्या स्तुतीत निमग्न करुन आणि वस्तूंचे वास्तव समजावून तुला मार्गदर्शनाची ध्वजा बनवावे, जेणेकरुन तू तुझ्या स्वत:च्या नेत्राने पाहावे, तुझ्या कर्णाने ऐकावे आणि तुझ्या पूर्वजांचे अनुकरण करणे टाळावे. तू तुझ्या ईश्वराच्या धर्मकार्याकडे अंतर्दृष्टीने पहा, कारण लोक गडद अंधाराच्या पडद्यांमध्ये बद्ध आहेत."[१८]**

**"...कारण अहंतेपेक्षा अधिक रोधक असा पडदा नाही, आणि तो पडदा कितीही पातळ असो, शेवटी तो व्यक्तीला पूर्णत: झाकाळून टाकतो आणि शाश्वत कृपेच्या त्याच्या वाट्यापासून त्यास वंचित करतो."[१९]**

**"वासना आणि इच्छेचा पाठलाग डोळ्यांना हजार पडद्यांमध्ये गुंडाळून ठेवील, जे मनुष्याच्या अंत:करणापासून प्रकट होऊन आमची दृष्टी व अंतर्दृष्टीदेखील आंधळी करुन सोडतात."[२०]**

**"हे समजदारीच्या बालकांनो! जर नेत्रपटळ, कितीही नाजूक असेल तरी, माणसाच्या बाह्यनेत्राला जग आणि त्यात जे सारे काही आहे त्यास पाहण्यापासून वंचित करू शकते, तेव्हा विचार करा जर त्याच्या अंत:चक्षूवर लोभीपणाचे पटल पडले तर काय ओढवले जाईल. म्हणा: हे लोकहो! लालच आणि द्वेषाचा कोळोख आत्म्याच्या तेजाला झाकाळतो, जसे की ढग सूर्याच्या प्रकाशाला अडसर उत्पन्न करतात. जो**

**कुणी विवेकशील कर्णांने हे उद्‌बोधन लक्षपूर्वक ऐकतो तो अनासक्तीचे पंख उघडेल आणि खऱ्या समजदारीच्या वातावरणामध्ये सहजतेने भरारी मारेल."[२१]**

**"मला आशा आहे की पृथ्वीतलावरील गोष्टींकडे लक्ष न देता, तुम्ही अखंड डोळ्यांनी त्या सत्यस्वरूपी सूर्यप्रकाशाकडे वळाल, जेणेकरून तुमची अंत:करणे जगाच्या निरर्थक आणि विनाशकारी सुखांकडे आकर्षित होणार नाहीत; त्या सत्यतेच्या सूर्याला त्याची पावन शक्ती तुम्हास प्रदान करू द्या, ज्यामुळे पूर्वग्रहाचे ढग तुमच्या डोळ्यांना त्या ईश्वराच्या प्रकाशापासून वंचित होऊ देणार नाहीत! तेव्हाच तो सत्यस्वरूपी सूर्य तुमच्यासाठी ढगांशिवाय तेजस्वीपणे चमकेल."[२२]**

वर उद्‌घृत केलेल्या पहिल्या लेखांशामध्ये अब्दुल–बहा आम्हास सांगतात की "सर्व ईश्वरी देणग्या नेहमी व्यक्त असतात", "स्वर्गीय अभिवचने सदैव असतात" आणि "ईश्वराची अनुकंपा सर्वांभोवती आहे". ते पुढे स्पष्ट करतात की "परंतु मानवी आत्म्याचा दृश्य डोळा जर पडद्याने आच्छादला किंवा काळवंडला असेल", तर त्याची परिणती ईश्वराच्या देणग्यांची आणि स्वर्गीय अभिवचनांची वैश्विक चिन्हे नाकारण्यात येईल.

१. अब्दुल–बहा ज्यांचा संदर्भ देत आहेत त्यापैकी काही देणग्या आणि अभिवचने काय आहेत असे आपणास वाटते? ——————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

२. आता वर्णन करा, की खाली नमूद केलेले पडदे त्या देणग्या आणि अभिवचने पाहण्यापासून आम्हास कशाप्रकारे वंचित करतात.

क. पवित्र ग्रंथांचे शाब्दिक प्रस्तुतीकरण: ——————————————————

——————————————————————————————

ख. भ्रष्ट कल्पना: ——————————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

ग. दृष्टीहीन अनुकरण: ——————————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

घ. अहंभाव: ———————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

च. विषयवासना व इच्छांच्या नादी लागणे: ——————————————————————————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

छ. लोभ व मत्सर: —————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

ज. पूर्वग्रह: ——————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————

३. खालील विधाने सत्य आहेत की नाही ते ठरवा:

—— आपली अंतर्दृष्टी, आपल्या मानसिक किंवा चर्मचक्षूंच्या मदतीशिवाय देखील जाणू शकते.

—— आपले भौतिक इंद्रिय आणि मनाच्या प्रक्रिया, आध्यात्मिक वास्तव जाणून घेण्यास नेहमी बाधा आणतात.

—— जे ईश्वराशी संबंधित नाही, त्या सर्वांपासून आमच्या भौतिक इंद्रियांना परिशुद्ध करणे, आमच्या आंतरिक शक्तींना सत्याची जाणीव करुन देण्यास सहाय्यक ठरते.

४. सरतेशेवटी, आध्यात्मिक जाणिवेला बाधा आणू शकतात अशा पडद्यांच्या स्वरुपाबाबत अधिक जाणिव करुन घेण्यासाठी अब्दुल–बहांच्या खालील वक्तव्यावर चिंतन करा. इच्छा असल्यास ते कंठस्थ करा.

**“सत्यत: तू हे जाण, की ज्यामध्ये सत्य झाकलेले असते असे अनेक पडदे असतात: निराशेचे पडदे; नंतर नाजूक आणि पारदर्शी पडदे; नंतर प्रकाशाचे आवरण, ज्यांचे दर्शन डोळ्यांना दिपविते, ज्याप्रकारे सूर्य जो केवळ आपल्याच प्रकाशात झाकोळला असतो आणि जेव्हा आपण त्याकडे पाहतो, तेव्हा दृष्टी आंधळी होते आणि डोळे दिपविले जातात.**

**“मी परमेश्वराला याचना करतो, की त्याने सर्व पटले दूर करावीत आणि सर्व डोळ्यांशी प्रकाशाला परिचित करावे. जेणेकरुन मनुष्य सत्याच्या सूर्याला पाहण्यापासून वंचित राहू नये.”**[२३]

## विभाग ८

युवाकिशोरांद्वारे *आशेची किरणे* या अभ्यासल्या जात असलेल्या बहाई—प्रेरित पुस्तकातील पाठांपैकी एक खाली दिला आहे. ती किबोमी या बारा वर्षाच्या मुलाची गोष्ट आहे, जो त्याच्या मातापित्यांच्या मृत्यूनंतर त्याच्या बहिणीच्या शोधार्थ प्रवासास निघतो. किबोमी हा अडूंबू जमातीतील आहे. त्याचे आईवडील नागरी कलहाच्या धुमश्चक्रीत कुंगू जमातीद्वारे मारले जातात. आधीच्या पाठात कुंगू जमातीतील एका वृद्ध व्यक्तीशी त्याच्या भेटीचे वर्णन केलेले आहे, जी व्यक्ती त्यास अत्यंत दयाळूपणे वागविते. ह्या पाठामध्ये तो त्याच्याच जमातीतील सैनिकांच्या एका टोळीला भेटतो.

किबोमीने थोडं अन्न सेवन केल्यामुळे त्यास जोम येतो व तो वेगाने पुढे चालतो. जेव्हा त्याने आपल्या खेड्यातून पलायन केले, तेव्हा बहुधा त्याच्यात भीती व राग होता. आता त्याच्या मनात लोकांविषयी ज्या चांगल्या भावना होत्या, त्या पुन्हा परत येण्यास सुरुवात होत आहे. तो वृद्ध व्यक्ती कुंगू होता, तरीही तो दयाळू व सुज्ञ होता. त्याने किबोमीला आपल्या अन्नाचा वाटा दिला. त्याचे शब्द सुंदर आणि आशेने ओतप्रोत होते. “आम्हाला निवड करावयाची असते. आपली निर्मिती प्रेम करण्यासाठी झाली आहे, द्वेषासाठी नव्हे.”

किबोमी नदीकाठाने ननगाता गावाकडे जाणे सुरु ठेवतो. थोडे चालल्यानंतर तो काही आवाज ऐकतो आणि त्वरेने मोठ्या झाडामागे लपतो. तरुण व्यक्तींचा एक गट जवळ येतो आहे. ते अडूंबू बोलीत बोलत आहेत. किबोमी आपली भाषा ऐकून आनंदित होतो आणि हळूहळू झाडामागून पुढे येतो. त्यांनी सैनिकासारखे गणवेश घातलेले आहेत. ते अडूंबू बंडखोरसेनेचे सैनिक आहेत. त्यांच्यापैकी काही अगदी तरुण आहेत आणि एक किबोमीचा समवयस्क दिसतो. ते त्याला पाहिल्याबरोबर थांबतात व बंदुकी ताणतात. “थांबा!” किबोमी म्हणतो, “मी तुम्हासारखाच अडूंबू आहे!”

“तू इथे एकटा काय करत आहेस?” त्यांचा नायक अधीरतेने विचारतो.

“कुंगू जमातीने आमच्या गावावर हल्ला केला व माझ्या मातापित्यास ठार मारले. त्यामुळे मला गाव सोडून जावे लागले,” किबोमी उत्तरतो.

“मग ये आणि आमच्यात सामील हो,” सैनिकांचा प्रमुख म्हणतो. “आपण कुंगू जमातीच्या लोकांना धडा शिकवायलाच हवा. तुझ्या कुटुंबावर त्यांनी जे अत्याचार केले, त्याची किंमत त्यांना द्यायला लावू.”

किबोमीला मोह होतो. तो थोडा विचार करतो आणि मान्य करण्याच्या स्थितीत येतो. त्याचक्षणी एक बालसैनिक पुढे येतो आणि किबोमीकडे हात पुढे करतो. किबोमी त्याच्या डोळ्यात पाहतो आणि त्यांत दिसलेली निराशा बघून व्यथित होतो. तो संकोच करतो. “मी कदाचित नंतर तुम्हासोबत सामील होईन,” किबोमी थरथरत्या आवाजात सांगतो. “परंतु आता जाऊन मला माझ्या बहिणीला शोधायलाच हवे.”

जेव्हा सैनिक पुढे जाऊ लागतात, तेव्हा त्यातील एकजण पाठीमागे वळतो व म्हणतो, “लक्षात ठेव! लढाईने प्रत्युत्तर देणे हाच एकमेव मार्ग आहे.” किबोमी यावर उत्तर देत नाही.

**प्रश्न**

१. किबोमीने ज्या वेळी गाव सोडले, त्या वेळी त्यास काय वाटले होते?
२. त्या वृद्ध व्यक्तीला पाहिल्यानंतर किबोमीची भावना का बदलली?
३. किबोमी झाडामागे का लपून राहिला?
४. सैनिकासारखे गणवेश घातलेल्या ज्या तरूणांना तो भेटला ते तरूण कोण आहेत?
५. सैनिकांच्या प्रमुखाने किबोमीला काय करायला सांगितले?
६. किबोमी बालसैनिकांच्या डोळ्यांमध्ये काय पाहतो?

**क्रियाकलाप**

१. किबोमी बालसैनिकाच्या डोळ्यांमध्ये दु:ख बघतो, जो त्याच्याप्रमाणेच भयभीत आणि संतापलेला असतो आणि ज्याने लढण्याचा व हत्या करण्याचा मार्ग निवडलेला असतो. आपण सर्वांच्या जीवनामध्ये दु:ख आणि निराशेचे क्षण येतात. अशावेळी आपण अंध:कारमय मार्ग निवडू नयेत आणि आपण आशा जागविणाऱ्या प्रकाशाचा शोध करावा. खालील प्रार्थना वाचा आणि तिच्या शब्दांवर चिंतन करा:

**“तो आहे करुणामय, सर्वदयानिधी! हे परमेश्वरा, माझ्या ईश्वरा! तू मला पहातोस व तू मला जाणतोस, तू माझा निवारा व माझे आश्रयस्थान आहेस. मी कोणासही इच्छिले नाही किंवा तुझ्याव्यतिरिक्त मी काहीही इच्छिणार नाही; मी कोणताही दुसरा मार्ग स्वीकारला नाही आणि तुझ्या प्रेममार्गाव्यतिरिक्त कोणताही स्वीकारणार नाही. निराशेच्या अंधाऱ्या रात्री, माझे नेत्र आशापूर्ण व अपेक्षतेने तुझ्याकडे वळतात, आणि अरुणोदयसमयी माझा जीर्ण आत्मा तुझ्या सौंदर्य व पूर्णत्वाच्या स्मृतीने ताजातवाना व बलवान होतो.”**

आता ही प्रार्थना कंठस्थ करायचा प्रयत्न करा.

२. खालील परिस्थितीमध्ये कोणती कृती निराशा आणि कोणती आशा पल्लवीत करील, हे ठरवा.

| क. परीक्षेतील एका विषयाच्या उत्तरांविषयी आपण असमाधानी असतात. | *आशा* | *निराशा* |
|---|---|---|
| – आपण अभ्यासाला तिलांजली देता आणि बहुतांश वेळ खेळण्यात घालविता. | ☐ | ☐ |
| – आपण स्वत:लाच म्हणता, की आपण मूर्ख आहात. | ☐ | ☐ |
| – आपण दुसऱ्या विद्यार्थ्याची मदत घेता. | ☐ | ☐ |
| – आपण स्वत: धीर धरता व विषय समजून घेण्यासाठी अधिक प्रयत्न करता. | ☐ | ☐ |
| – आपण आपल्या शिक्षकाला मदत न केल्यामुळे दोष देता. | ☐ | ☐ |

| | *आशा* | *निराशा* |
|---|---|---|
| ख. आपणास  एकटेपणा वाटतो आणि असे दिसते, की आपले कुणीही मित्र नाही. | | |
| — आपण स्वत:मध्येच गुंतून राहता आणि बहुतांश  वेळी आपणास निराशा वाटते. | □ | □ |
| — आपण स्वत:बद्दल विचार करण्यात कमी वेळ घालवता आणि इतरांविषयी अधिक काळजी करता. | □ | □ |
| — आपण नेहमी इतरांच्या दोषांविषयी विचार करता. | □ | □ |
| — आपण इतरांमध्ये चांगले गुण शोधता. | □ | □ |
| — आपण इतरांशी बोलण्यासाठी व मित्रत्वाने असण्यासाठी पहिले पाऊल उचलता. | □ | □ |
| ग. आपण आपल्या काही नातलगांच्या दरम्यान मत्सर व भांडाभांडी पाहता. | *आशा* | *निराशा* |
| — आपणास देखील मत्सर वाटतो आणि आपण त्यांच्यासोबत भांडण करता. | □ | □ |
| — आपण त्यांच्याविषयी अधिक उदार असण्याचा प्रयत्न करता. | □ | □ |
| — आपण आपल्या कुटुंबाच्या सदस्यांत एकी  निर्माण व्हावी, यासाठी प्रार्थना करता. | □ | □ |
| — आपण आपल्या कुटुंबातील मुलांना प्रेम आणि औदार्याबद्दल शिकवण देता. | □ | □ |
| — आपण स्वत:सोबत बतावणी करता, की आपल्या नातलगांना बदलविण्यासाठी आपल्याजवळ करण्यालायक काहीही नाही. | □ | □ |
| घ. आपणास इजा पोचविण्यासाठी आपला एक मित्र काहीतरी करतो. | *आशा* | *निराशा* |
| — आपण बदला घेण्याचे ठरविता व आपल्या मित्रास इजा पोहचविता. | □ | □ |
| — आपण आपल्या मित्रास क्षमा करता. | □ | □ |
| — आपण  ठरविता, की आपण कुणालाही त्याप्रकारे इजा करणार नाही. | □ | □ |
| — आपण इतरांना आपला मित्र किती वाईट आहे, हे सांगता. | □ | □ |
| — आपण आपली त्याच्यासोबतची मैत्री संपविता. | □ | □ |

युवाकिशोर या पाठात शोधू शकतील असे काही आध्यात्मिक सत्य नमूद करा. आशा आणि निराशेच्या बाबी, ज्यांची तुलना प्रकाश आणि अंधाराशी केलेली आहे, त्या कशाप्रकारे हाताळल्या आहेत? कथा आणि त्यासोबतच्या कृती युवाकिशोरांना आध्यात्मिक जाणीव विकसित करण्याच्या प्रयत्नात सहाय्यक  राहतील काय?

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

## विभाग ९

युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणाच्या असंख्य बाबींपैकी “आशा” आणि “संपुष्टी” ही दोन उदाहरणे आहेत, ज्यांचा अंतर्भाव कार्यक्रमात होणे आवश्यक आहे. या बाबींवरील काळजीपूर्वक चर्चा आध्यात्मिक जाणीव निर्माण करते आणि समज वाढविण्यासाठी उपकारक असते. अब्दुल—बहा म्हणतात:

> **“असे काही स्तंभ आहेत, जे ईश्वराच्या धर्मश्रद्धेचे अचल आधार म्हणून स्थापित झाले आहेत. यांपैकी सर्वांत भक्कम आहेत ते म्हणजे ज्ञानार्जन आणि मनाचा वापर, जाणीव विस्तृत करणे, आणि विश्वाच्या वास्तवाबाबत व सर्वशक्तिमान ईश्वराच्या दडलेल्या रहस्यांबद्दल अंतर्दृष्टी असणे.”**[२४]

जाणिवेचे अनेक स्तर आहेत, ज्यांत मनुष्यमात्र जीवन जगू शकतो. दैवी इच्छेच्या व उद्देशाच्या प्रति सजग असणे, आपणास व आपल्या समुदायांना प्रभावित करणाऱ्या शक्तींना समजून घेणे, आणि नवीन जग उभारण्यासाठी आपल्या मानसिक व आध्यात्मिक शक्ती पणाला लावण्यासाठी झटणे —हे भौतिक चिंतेवर केंद्रित जीवनापेक्षा उच्च चेतनेची स्थिती दर्शवते. युवाकिशोरांच्या गटाच्या अनुप्रेरकासमोरील प्रमुख आव्हानांपैकी एक आहे, ते म्हणजे युवाकिशोरांना उच्च व अधिक उच्च जाणिवेच्या पातळीवर पोहचण्यास साहाय्य करणे. त्यांना तसे करायचे असल्यास, युवाकिशोरांना त्या संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे ज्या आध्यात्मिक जीवनाच्या केंद्रस्थानी असलेल्या विषयांशी संबंधित आहेत. म्हणून, त्यांनी देखील अशा संकल्पनांवर चिंतन आणि विश्लेषण करण्याची आणि त्यांच्या वास्तविकतेवर लागू करण्याची त्यांची क्षमता वाढविली पाहिजे. आशा आणि संपुष्टीकरणाव्यतिरिक्त, काही विषय आणि संबंधित संकल्पना कोणत्या आहेत ज्या युवाकिशोरांनी त्यांचे प्रतिबिंब बनवल्या पाहिजेत?

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

## विभाग १०

मागील काही विभागांमध्ये आपण आध्यात्मिक धारणेच्या प्रश्नाचे आणि त्याच्याशी संबंधित काही गुणधर्मांचे परीक्षण केले आहे —अंत:करणाची शुद्धता, ईश्वराचे ज्ञान आणि परमेश्वराचे प्रेम. आम्ही “पडद्यांबद्दल” देखील विचार केला आहे जो आम्हाला आमच्या “आंतरिक नेत्रांनी” पाहण्यापासून रोखू शकतो आणि काही संकल्पनांची समज आपली आध्यात्मिक धारणा मजबूत करण्यास आणि आपल्या चेतनेचा विस्तार करण्यास कशी मदत करू शकते याचा विचार केला आहे.

किशोरावस्थेमध्ये मानवी आत्म्यात निहित असलेल्या शक्ती स्वत:ला अधिकाधिक व्यक्त करतात. त्यामध्ये विचाराची व अभिव्यक्तींची शक्ती या विशेष महत्त्वाच्या असतात आणि त्यांचे संगोपन जाणिवेच्या वाढीसाठी आवश्यक आहे. भाषा आणि विचार यांच्यात जवळचा अन्योन्य संबंध आहे. विचाराची शक्ती ही उच्चारांद्वारे (शब्दांद्वारे) व्यक्त होते आणि उच्चारशक्तीची वृद्धी, समजदारी वाढविण्यासाठी अनिवार्य असते. अभिव्यक्तीच्या शक्तीचा विकास करणे आणि वास्तवाविषयीच्या स्वत:च्या समजुतीचे दृढीकरण करणे, हे परस्परपूरक आहेत. समजून घेण्यासाठी, शेवटी, खोल विचार आणि चिंतन आवश्यक आहे, क्रियाकलाप अविभाज्यपणे भाषेशी जोडलेले आहेत. बहाउल्लाह म्हणतात:

> **“हे बहाच्या जनांनो! हस्तकौशल्य, विज्ञान व कलांचा स्त्रोत चिंतनशक्तीत आहे. तुम्ही असे सर्व प्रयत्न करा, ज्यांद्वारे या अत्युत्तम खाणीमधून विद्वत्ता व शब्दांचे असे मोती बाहेर पडावेत, जे पृथ्वीवरील सर्व सहोदरांचे योगक्षेम व सद्‌भावना वाढवतील.”**[२५]

मानवी समज आणि अभिव्यक्तीच्या शक्तींना अर्थातच दैवी वचनातून प्रकाशाची आवश्यकता आहे. बहाउल्लाह आम्हास सांगतात:

> **“तो तुमच्या मुक्तीसाठी प्रकटीत झाला आहे, आणि तुम्ही शब्दांच्या सोपानावर उन्नत होत समजदारीच्या शिखराप्रत जावे, यासाठी त्याने यातना सोसल्या आहेत.”**[२६]

अभिव्यक्तीच्या शक्तीच्या वाढीमध्ये केवळ वाचणे, लिहिणे व बोलणे यांविषयी थातुरमातुर कौशल्य मिळविण्यापेक्षा अधिक गोष्टींचा अंतर्भाव असतो. त्यासाठी चांगल्या आकलनाने वाचणे, कल्पनांचे स्पष्टपणे व वाक्पटुतेने वर्णन करणे आणि यथायोग्य अचूकतेने संकल्पना स्पष्ट करण्याच्या क्षमतेची आवश्यकता असते. या क्षमतांचा वापर करताना युवाकिशोर आपल्या भोवतीच्या जगाचे पृथक्करण करण्यासाठी आवश्यक अशा वैज्ञानिक, नैतिक व आध्यात्मिक संकल्पनांचा वापर करण्यास आणि ज्यावर भविष्यातील सामाजिक विचारधारा तयार करु शकता येईल, त्याविषयीच्या वैयक्तिक मतांची जुळवणी करण्यास शिकतो.

अब्दुल–बहांनी म्हटले आहे की, “लोकसंख्येचा बहुतांश भाग या अत्यंत महत्त्वाच्या माध्यमांविषयी अनभिज्ञ आहे, जे समाजाच्या जटील रोगांसाठी तात्कालिक उपाय ठरु शकतात.” “सध्या,” ते असेही सूचित करतात, “त्यांच्या अपुऱ्या शिक्षणामुळे बहुतांश लोकांजवळ त्यांना काय हवे आहे, हे सांगण्यासाठी शब्द देखील नाहीत.” तर मग, ते किती भाग्यवान आहेत, जे त्यांच्या तारुण्याच्या प्रथमावस्थेत अभिव्यक्तीची शक्ती विकसित करण्यास सक्षम आहेत, मनुष्यमात्राच्या जटील रोगावरील दैवी उपायाविषयी जागरूक आहेत, त्यांचे मन स्वर्गीय विचारांनी भरलेले आहेत, अशा प्रकारे त्यांची समज वाढत आहे आणि त्यांच्या जाणीवेचा विस्तार होत आहे.

*शब्दाच्या सामर्थ्याकडे अग्रेसर होणे* या पुस्तकामधील खालील पाठात, बहाई–प्रेरित पाठ्यपुस्तकातील मजकूर जो वारंवार युवाकिशोरांद्वारे अभ्यासला जातो ज्यांनी आधीच्या अनेक पुस्तकांमधून यापूर्वी प्रगती केली आहे, युवाकिशोरांचा एक गट “शब्द” या संकल्पनेविषयी चर्चा करीत आहे. खालील पाठाचा अभ्यास करा आणि तो कशाप्रकारे युवाकिशोरांची जाणीव वाढवितो आणि चेतना निर्माण करतो हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करा.

अलेग्रियास युवागटाने त्यांच्या अस्तित्वाच्या सुरुवातीच्या महिन्यांमध्ये हाती घेतलेल्या अत्यंत उत्साहवर्धक कार्यक्रमांपैकी एक होता वृक्षलागवडीचा प्रकल्प. त्यांच्या शाळेच्या भोवती जमिनीवर त्यांनी पन्नास फळझाडे लावल्यानंतर त्यांनी आपल्या आई–वडिलांना, मित्रांना आणि शेजाऱ्यांना एका कार्यक्रमास बोलविले, ज्यामध्ये एलिसाने वातावरणाच्या सुधारणेच्या महत्त्वावर भाषण दिले. समुदायाने या प्रकल्पाची वाखाणणी केली, कारण युवकांनी लावलेल्या झाडांना फळे येणार होती आणि त्यामुळे त्यांचे खेडे सुंदर दिसणार होते.

कार्यक्रमानंतरच्या दिवशी, अलेग्रियास सोडण्यापूर्वी एलिसाने युवकांसोबत विशेष बैठक घेण्याविषयी विचारणा केली. “आज मला आपण या विषयावर बोलावे असे वाटते, जो येणाऱ्या महिन्यांमध्ये आपल्या चर्चेच्या केंद्रस्थानी राहणार आहे,” मोठ्या उत्साहाने ती बोलली. “त्याची प्रस्तावना करण्यासाठी मला आपणास एक प्रश्न विचारु द्या: “ईश्वराने आम्हाला का निर्माण केले असे आपणास वाटते?”

मॅरिएलाने तात्काळ उत्तर दिले, “ईश्वराने आम्हाला निर्मिले कारण तो आमच्यावर प्रेम करतो. ‘तुझी निर्मिती मला प्रिय होती, यास्तव मी तुला निर्मिले.’ हे वचन जेव्हा मी बालिका होते तेव्हा शिकले होते व ते मी कधीच विसरत नाही.”

“अति उत्तम,” एलिसा उद्‌गारली. “ईश्वराने त्याच्या आमच्या वरील असीम प्रेमापोटी आम्हास निर्मिले आहे आणि या प्रेमामुळे त्याने आमच्यापैकी प्रत्येकाला अत्यंत अद्‌भुत देणग्या बहाल केल्या आहेत. आपणास दिलेल्या अतिश्रेष्ठ देणग्यांपैकी एक आहे, “शब्दा”चा वापर करण्याची क्षमता. इतर कोणत्याही प्राणिमात्रास शब्द बोलण्याची, शब्द वाचण्याची, शब्द लिहिण्याची आणि ते समजण्याची क्षमता दिलेली नाही. शब्दांद्वारे आम्ही एकमेकांशी संभाषण करतो आणि आम्ही काय विचार करतो व आम्हास काय वाटते, ते एकमेकांना समजू देतो. सर्वांपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते शब्दच असतात ज्यांच्याद्वारे दैवी शिकवणी व्यक्त केल्या जातात. ह्या शिकवणी आपण ईश्वरी संदेशवाहकांद्वारे प्रकट केलेल्या ईश्वरी शब्दांचे स्तवन करुन आणि वाचन करुन जाणून घेतो. म्हणून आपल्या चर्चेसाठी माझ्या मनात जो विषय आहे तो आहे शब्दाची शक्ती.”

“मी ऐकले आहे, की शब्द हा तलवारीपेक्षाही अधिक शक्तिशाली आहे,” कारलोता म्हणाली.

“हे खरे आहे,” अँटोनिओ पुस्ती करतो. “परंतु शब्दांना शक्ती असण्यासाठी त्यांना कृतीची जोड असायला हवी. तसे नसेल तर शब्द पोकळ असतात आणि ते वाऱ्याने सहजतेने उडून जातात. माझ्या आवडत्या उक्तींपैकी एकीत म्हटले आहे, आपण सावधान असले पाहिजे, अन्यथा, ज्यांची वचने त्यांच्या कृतींहून भिन्न आहेत अशा त्या लोकांच्या मार्गावर तुम्ही वाहत जाल.”

“होय,” आना मरिया म्हणाली. “आपण एखाद्यास सांगू शकता, की ती तुमची सर्वोत्तम मैत्रीण आहे, परंतु जेव्हा तिला तुमची आवश्यकता असते तेव्हा जर तिला आपण मदत करीत नाही, तेव्हा बहुधा आपण कधीच तिचे अस्सल मित्र होऊ शकणार नाही.”

आना मरियाच्या वक्तव्याने प्रत्येकाच्या कल्पनाशक्तीस चेतविले आणि त्या सर्वांनी पोकळ शब्द व कृतीची जोड असणारे शब्द या दोहोंबाबत उदाहरणे देण्यास सुरुवात केली.

शेवटी एलिसा म्हणाली, "छान, आपणा सर्वांना खात्री झाली आहे, की कृतींची जोड असलेले शब्द अत्यंत शक्तिशाली असतात. शब्दांना अकल्पित अशी शक्ती असते —ते जग बदलू शकतात. म्हणूनच आपण, ज्यांना नवीन जग निर्माण करावेसे वाटते, त्यांनी चांगल्या प्रकारे शब्दांचा वापर करण्यास शिकावे. याचा अर्थ होतो शब्दांचा विचार करणे, शब्द समजून घेणे, शब्द उच्चारणे, शब्दाचा प्रसार करणे आणि शब्द व्यवहारात उपयोगी आणणे."

एलिसा जे बोलली, त्यावर क्षणभर चिंतन करीत तरुण शांत राहिले. नंतर डिएगोला एकाएकी कल्पना सुचली. त्याने गटाच्या समोर उडी घेतली व म्हणाला, "मला आता समजले, की आम्ही भौतिक व आध्यात्मिक प्रगती कशी करु शकू: शुद्ध कृतींची जोड असणाऱ्या शब्दांच्या शक्तीद्वारे!"

शांतता. कुणीही काही बोलले नाही. अस्वस्थ वाटून डिएगो शेवटी नुसता तेथे उभा राहिला. खाली बसावे की उभे राहावे, हे त्याला समजेनासे झाले. त्याने मदतीसाठी एलिसाकडे पाहिले. एलिसा हळुवारपणे उठली. त्याच्याकडे गेली आणि त्याचा हात हातात घेतला. "तू एक अत्यंत भव्य असे सत्य शोधले आहेस," ती त्याला म्हणाली. "कालांतराने तुला समजेल, की ते किती महत्त्वाचे आहे."

**सराव**

१. कंसातील शब्दांचा खालील वाक्ये पूर्ण करण्यासाठी उपयोग करा.

(सोबत असणे, कल्पनाशक्ती, व्यक्त करणे, कृती, संवाद करणे, सुधारणा होणे, प्रदान करणे, निर्माण करणे, पर्यावरण संरक्षण, सभोवताली, देणगी, उघड करणे, मन वळवणे, गाढ)

क. आपण शब्दांच्या शक्तीद्वारे स्वत:स ——————— करण्यास योग्य होता.

ख. ज्युलीयाला त्याच्या धाकट्या भावाने एकटे दुकानावर जावे असे वाटत नव्हते, म्हणून तिने त्याचे ——————— जाण्याचे ठरविले.

ग. डॉक्टरला हे पाहून आनंद झाला, की त्या तरुण मुलीच्या तब्येत ——————— होत होती.

घ. तिला केवळ कित्येक वेळा विचारुन लुईस इनरिकने शेवटी तिला सभेत बोलण्यास ——— वळवले.

च. देवाने आम्हाला जीवनाची —————— दिली आहे आणि आम्ही ती वाया दवडू नये.

छ. जेव्हा जेव्हा जुआन कार्लोस वचन देतो, तेव्हा ते पूर्ण करण्याचा तो पूर्ण प्रयत्न करतो. त्याच्या शब्दांच्या मागोमाग नेहमी ————— होत असते.

ज. आपल्याविषयीच्या प्रेमामुळे ईश्वराने आम्हाला पुष्कळ देणग्या दिल्या आहेत. शब्दांचा उपयोग करण्याची क्षमता ही महान देणग्यांपैकी एक आहे, जी त्याने आम्हाला ––––––––– आहे.

झ. ती लघुकथा सर्वस्वी लेखकाच्या ––––––––– तून लिहिण्यात आली होती.

ट. इतरांशी –––––– करण्याच्या दृष्टीने आम्ही लक्षपूर्वक ऐकणे शिकले पाहिजे.

ठ. सेसिलिया ––––––––– ––––––––– च्या विषयी चिंतित आहे आणि तिने तिच्या समाज केंद्रामध्ये आरोग्य या विषयावर अध्ययन आयोजित करण्याचे ठरविले आहे.

ड. जेव्हा जेव्हा एखादा प्रकल्प राबवायचा असतो, तेव्हा डिएगो त्याविषयी प्रत्येकास उत्तेजित करण्यास यशस्वी असतो. तो उत्तेजना –––––––– ––––––––– समर्थ असतो.

ढ. संपूर्ण दिवसभर कठीण परिश्रम केल्यामुळे रॉबर्टो एवढा थकला होता, की तो बिछान्यावर झोपला आणि कुणीही त्याला जागे करु शकला नाही. तो –––––– झोपेत होता.

त. माझ्या आजीला ती किती वयाची आहे हे कुणाला सांगणे कधी आवडत नसे, परंतु जेव्हा ती १०० वर्षांची झाली तेव्हा शेवटी तिने आपले वय –––––– ––––––.

थ. ॲनाने घराभोवती सर्वत्र बगीचा लावला म्हणून त्याच्या ––––––––––––– निरनिराळ्या रंगांची व आकाराची सुंदर फुले उगवली होती.

२. खालीलपैकी प्रत्येक वाक्यांशाचा उपयोग करुन वाक्य लिहा.

शुद्ध कृती: ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

पर्यावरण सुधारणे: ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

मोठ्या उत्साहाने: ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

शब्दांना व्यवहारात उपयोगी आणणे: ––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

जे सांगितले आहे त्यावर मनन करणे: ————————————————————————————————

————————————————————————————————————————

३. शब्दांना चांगल्या किंवा वाइट परिस्थितीकडे नेण्याची शक्ती असते आणि आपण वापरत असलेल्या शब्दांवर अवलंबून आपण इतरांना योग्य किंवा अयोग्य सल्ला देत असतो. खालील वक्तव्यांपैकी जो चांगला सल्ला असेल, त्यापुढे "योग्य" लिहा व जो वाईट सल्ला असेल त्यापुढे "अयोग्य" लिहा.

———— आपण एकोप्याने असावे व कधीही भांडू नये.

———— आपणास एखाद्या वस्तूची आवश्यकता असेल तर ती घे. जरी त्या वस्तूच्या मालकाचा आक्षेप असेल तरी पण.

———— एखाद्याची पाठीमागे निंदा करू नये.

———— आम्हा सर्वांना केव्हातरी आळसवाणे वाटते; आपणास जर असे एखाद्या दिवशी वाटले तर त्यावेळी काही न करणे उत्तम असेल.

———— जे आपण आज करु शकता ते उद्यावर ढकलू नका.

———— जर आपण सभेला थोडे उशिरा जात असाल, तरी काही हरकत नाही.

———— काम केवढेही शुल्लक असो, ते उत्कृष्टपणे केले पाहिजे.

———— कधीतरी थोडेसे शुद्ध खोटे बोलणे हे योग्य आहे.

———— कुणासाठी काहीदेखील करु नये; त्यापासून काही फायदा नसतो.

———— जीवनाचा एकमेव उद्देश मौजमस्ती करणे आहे.

———— आपण स्वत:स सुधरविण्याचा दैनंदिन प्रयत्न केला पाहिजे.

———— काम करणे ही शिक्षा आहे.

———— आपण कायद्याचे पालन का करावे; आपणा स्वत:साठी सर्वोतम काय आहे हे आपण जाणतो.

———— या जगात आपला उद्देश आहे ईश्वराला जाणणे व त्याची आराधना करणे.

———— जेव्हा आपण आपले काम सेवेच्या भावनेने करीत असतो, तेव्हा आपण ईश्वराची आराधना करीत असतो.

———— आपण प्रत्येकाने आपल्या स्वत:च्या जीवनाची काळजी घ्यावी आणि इतरांच्या समस्यांची तमा बाळगू नये.

———— आपले मातापिता वयोवृद्ध आहेत, ते आजच्या जीवनाविषयी काय जाणतात?

———— कधी कधी थोडेसे मद्यप्राशन कुणास कधीही इजा पोचवीत नाही.

———— जीवन क्षणभंगुर आहे. तू स्वत:स कामापायी का मारतोस?

१. हा पाठ युवाकिशोरांना “शब्द” या संकल्पनेवर चिंतन करण्यास साहाय्य करुन त्यांची चेतना वाढवण्याचा प्रयत्न करतो. हे कशाप्रकारे साध्य करण्यात येते? ——————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

२. वरील पाठाचे परीक्षण केल्यानंतर, विचारशक्ती व उद्‌गाराची शक्ती या दोहोंमध्ये कोणत्या प्रकारचा संबंध आहे, असे आपणास वाटते? ——————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

## विभाग ११

युवाकिशोरांनी ज्या क्षमतांचा विकास करणे आवश्यक आहे, त्यांपैकी एक आहे सहजतेने वाचन करणे आणि जे लेखांश ते वाचतात त्यांचा अर्थ चांगल्या प्रकारे समजून घेणे. जगाच्या पुष्कळशा भागात, या वयोगटासाठी वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य आहे, ज्यात शैक्षणिक पाठ्यपुस्तकांपासून विनोदी मासिकांपर्यंतच्या साहित्याचा अंतर्भाव आहे. या साहित्याची बरीचशी तत्त्वे युवाकिशोरांच्या विकासासाठी पोषक आहेत, तथापि त्यांच्या प्रभावाची तुलना, पवित्र लेखांमध्ये आढळणारी सत्याची रत्ने ज्याप्रकारे युवकांच्या आत्म्यांना प्रभावित करतात, त्यांच्या सोबत करणे शक्य नाही. आम्ही जाणतो की या युगामध्ये बहाउल्लाह यांनी प्रत्येक शब्दाला नव्या सामर्थ्याने भारले आहे. ते म्हणतात:

> **“आमच्या वैभवाच्या लेखणीच्या गतीद्वारे, सर्वसमर्थ विधात्याच्या आदेशानुसार, आम्ही प्रत्येक मानवी आकृतीत नवा प्राण फुंकला आहे आणि प्रत्येक शब्दामध्ये नूतन सामर्थ्य संचारित केले आहे. समस्त निर्मित वस्तू या विश्वव्यापी नवचैतन्याचे पुरावे घोषित करतात.”**[२७]

युवाकिशोरांमध्ये अभिव्यक्तीची शक्ती विकसित करण्यास वापरल्या जाणाऱ्या साहित्यामध्ये कोणतीही संकल्पना किंवा विषय हाताळला गेला असला तरी, व्यक्त केलेल्या अर्थात जवळजवळ धर्मश्रद्धेच्या पवित्र लेखांचे प्रतिबिंब असावेत. उदाहरणार्थ, जर न्यायाच्या संकल्पनेबद्दलची आमची समज बहाउल्लाह ह्यांच्या शिकवणींद्वारे प्रकाशित करण्यात आली, तर आध्यात्मिक वास्तविकतेशी संपर्क गमावलेल्या जगाला, अप्राप्य अशा खोल अर्थाचा ठाव घेणारी असेल. ईश्वरी शब्दांमध्ये निहित असलेली अर्थसंपदा जेव्हा कल्पकतेने पाठ्यपुस्तकात प्रस्तुत केली

जाते, तेव्हा ती युवाकिशोरांची मने प्रकाशित करते आणि त्यांच्या अंत:करणात आनंदाची निर्मिती करते. अब्दुल–बहा स्पष्ट करतात:

> **"तुमचे आत्मे ईश्वराच्या शब्दांच्या प्रकाशाने प्रकाशित होओत आणि तुम्ही ईश्वरी रहस्यांचे भांडार व्हावे, कारण कोणतीही सांत्वना आणि कोणताही आनंद दैवी शिकवणींच्या आध्यात्मिक आकलनापेक्षा श्रेष्ठ नाही. जर मनुष्य शेक्सपियरसारख्या कवीच्या कवितांचे खरे अर्थ समजला, तर तो आनंदित व आल्हादित होतो. मग जेव्हा तो पवित्र ग्रंथांची सत्यता अनुभवतो आणि साम्राज्याच्या रहस्यांचा त्यास उलगडा होतो, तेव्हा त्याचा आनंद आणि उल्हास केवढा असेल!"**[२८]

खाली प्रस्तुत केलेले वाक्यांश *शब्दाच्या सामर्थ्याकडे अग्रेसर होणे* या पुस्तकातील आहेत. संपूर्ण पाठ्यपुस्तकात "प्रगतीची" विषयवस्तू प्रवाहित होते. हे साहित्य धर्मश्रद्धेच्या शिकवणींशी सुसंगत अशा प्रगतीच्या संकल्पनेची तरुण मनांना जाणीव करुन देण्यास मदत करते. आपण प्रगतीच्या अर्थामधील भेद जाणून घेण्याचा प्रयत्न करावा, असे सांगण्यात येते, जसे की, आजकाल प्रचारमाध्यमांमधून ध्वनित होणारा अर्थ आणि खालील सारांशामध्ये व्यक्त होत असलेले तिचे महत्त्व:

काही वेळापूर्वी, खेड्यातील लोकांना एका सन्मान्य शिक्षकाने भेट दिली, ज्याने त्यांना सांगितले, "अलेग्रियास एक आदर्श समुदाय बनू शकतो, जेथे आपण भौतिक व आध्यात्मिक प्रगती प्राप्त करु शकतो." सुरुवातीला, "भौतिक व आध्यात्मिक प्रगतीचा" अर्थ काय, हे डिएगो स्पष्टपणे समजू शकला नाही, तरीही तो संपूर्ण समुदायाच्या उत्तेजनेत सहभागी झाला. तेव्हापासून या विषयासंबंधी तो बरेच काही शिकला. त्याला याची जाण आली, की शारीरिकदृष्ट्या तो लहान असला, तरी तो आता बालक नाही आणि त्याच्या खेड्याने अपेक्षित अशी भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती प्राप्त करावी, यासाठी मदत करण्यास तो सक्षम आहे.

अशाच संभाषणांपैकी एकामध्ये डिएगोने ते भौतिक व आध्यात्मिक प्रगतीविषयी काय विचार करतात याबद्दल प्रत्येकाला विचारण्याचे ठरविले. मॅरिएला, जिच्याजवळ सांगण्यासाठी नेहमी काहीतरी रंजक असे असते ती एकदम उत्तरते, "भौतिक प्रगती म्हणजे नेमके काय हे मला माहीत आहे. त्याचा अर्थ होतो की आम्ही गरीब आहोत आणि आम्हास सुखी करतील अशा वस्तू प्राप्त करण्यास समर्थ होण्यासाठी आम्हास अधिक पैशाची आवश्यकता आहे."

मॅरिएलाच्या वक्तव्याने प्रत्येकजण उत्तेजित झाला आणि त्यांनी आपापली मते सांगण्यास सुरुवात केली. ते सर्वसाधारणपणे जे बोलले, ते असे आहे:

अँटोनिओ: "सुखी असण्यासाठी आपणास श्रीमंत असणे आवश्यक आहे यावर माझा विश्वास नाही. मला असे अनेक गरीब लोक माहीत आहेत, जे सुखी आहेत."

कारलोता: “माझा भाऊ विद्यापीठातून सुट्टीवर आला आहे आणि तो म्हणतो, की श्रीमंतांनी ‘सुखी गरीब’ ही कल्पना आम्ही त्यांच्यासाठी काम करण्यात समाधानी असावे, यासाठी शोधून काढली आहे.”

आना मारिया: “ते खरे असेल, परंतु मला माहीत आहे की सुख हे अंतर्मय असते आणि व्यक्ती किती वस्तूंचा मालक असतो, यावर ते अवलंबून नसते.”

डिएगो: “तरीही पण, गरीब असणे ही काही फारशी चांगली गोष्ट नाही. आपले जीवन सुधारण्यास आपण सर्वतोपरी प्रयत्न करावा.”

अँटोनिओ: “तथापि, हे करण्यास प्रयत्न करताना आम्ही आनंदी असावे. मला माझ्यासाठी व माझ्या समुदायासाठी कठीण परिश्रम करावयाचे आहेत, परंतु हे करताना मला आनंद वाटावा, असेही मला वाटते. मला कारलोताच्या भावासोबत वेळ घालविण्यात आनंद वाटत असे, परंतु जेव्हापासून त्याने श्रीमंत व गरिबांविषयी बोलणे सुरु केले, तेव्हापासून त्याच्याकडे लक्ष देणे मला आवडेनासे झाले आहे. त्याचे मन संतापाने भारून गेले आहे.”

रॉबर्टो: “मला माहीत आहे, की खरा आनंद ईश्वरासमीप असण्यापासून आणि त्याच्या न्याय नियमांच्या पालनापासून मिळतो.”

डिएगो: “हे खरे आहे परंतु आपण हे विसरु नये, की ईश्वरावर प्रेम करणे म्हणजे आम्ही आपल्या सहयोगी मनुष्यांवर प्रेम करणे व त्यांना मदत करणे.”

कारलोता: “आणि आम्ही लक्षात ठेवावे, की ईश्वराचे नियम पाळण्याचा अर्थ हादेखील आहे, की जेथे लोक मुळीच गरीब राहणार नाहीत, असे चांगले जग निर्माण करण्यासाठी आम्ही एकोप्याने कार्य करावे.”

नंतर एकाएकी डिएगोच्या लक्षात आले, की आतापर्यंत ते बहुतांश भौतिक प्रगतीबाबतच बोलले. “आध्यात्मिक प्रगतीचे काय झाले?” तो उद्‌गारला. परंतु आतापर्यंत ते सर्व थकले होते आणि ही चर्चा पुढील वेळी सुरु ठेवण्याचे त्यांनी ठरविले.

तरुणांनी भौतिक आणि आध्यात्मिक प्रगतीच्या चर्चेसाठी अनेक बैठका घेतल्या. एका महिन्यानंतर आणि एलिसाच्या भेटीच्या थोडे आधी, त्यांच्या निष्कर्षाचा उपयोग करण्यासाठी त्यांनी विशेष बैठकीचे आयोजन केले. जेव्हा युवकांनी आपली मते एलिसापुढे मांडली, तेव्हा तिला आनंद झाला. तिने त्यांच्या निष्कर्षाची सुस्पष्ट जुळवणी करण्यास आणि खालील जाहीरनामा शब्दबद्ध करण्यास मदत केली.

**तरुणांचा जाहीरनामा**

आम्ही आता बालके राहिलो नाहीत आणि आपल्या भविष्याविषयी आम्ही गंभीरपणे विचार करायला हवा. ज्या जगात आम्ही राहतो, ते यातनेने भरले असून ते फुटीमुळे जर्जर झाले आहे. आम्हास नवीन जगाची उभारणी करावयाची आहे, जिथे लोक सद्भावात राहतील आणि युद्ध व गरिबी अस्तित्वात राहणार नाही. नवीन जग उभारण्यासाठी आम्ही आमच्या स्वत:च्या समुदायापासून सुरुवात केली पाहिजे. म्हणूनच, आम्ही आता आपल्या लहानशा गावात, अलेग्रियासमध्ये, भौतिक व आध्यात्मिक प्रगतीविषयी बोलतो. भौतिकदृष्ट्या प्रगती करण्यासाठी आम्ही आपल्या शेतीची सुधारणा करायला हवी, आमच्या आरोग्याची अधिक काळजी घ्यायला हवी, जास्त शाळा असायला हव्यात आणि व्यापार व उद्योगात सक्रिय असायला हवे. आपल्या कष्टाच्या फळांनी आम्ही आपली घरे, आपले खेडे आणि आपला आसमंत चांगल्या सुंदर स्थळामध्ये परिवर्तित करावयास हवा, जेथे आम्ही सर्व स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणाचा आनंद घेऊ शकू.

जर आपण आध्यात्मिक प्रगती साधली नाही, तर सर्व लोकांसाठी भौतिक प्रगती प्राप्त करणे दुरापास्त आहे. आध्यात्मिकतेच्या अभावी काही लोक धनवान बनतात, तर बाकीच्यांना गरिबीत खितपत राहावे लागते. एक समुदाय म्हणून आपल्या उद्दिष्टाप्रत पोहचण्यासाठी आम्ही एकोप्याने असावे, न्यायाने वागले पाहिजे, एकमेकांशी सहकार्याने व मित्रभावनेने राहिले पाहिजे, उदार, प्रामाणिक आणि विश्वासपात्र असले पाहिजे. न्यायप्रियता, उदारता, प्रेम आणि दया, प्रामाणिकता आणि विश्वासपात्रता हे आध्यात्मिक गुण असून त्यांच्याद्वारे आम्ही भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती साध्य करतो.

केवळ चांगल्या जगाची उभारणी करण्यास आम्हाला आध्यात्मिक गुणांची आवश्यकता नसते, त्यांची आमच्या आत्म्याच्या जीवनासाठीदेखील आवश्यकता आहे, जे या पृथ्वीवर समाप्तीस येत नाही. भौतिक आणि आध्यात्मिक प्रगतीचा अर्थ हा, की प्रतीदिन आम्ही आमच्या जीवनाच्या भौतिक व आध्यात्मिक बाबींच्या उत्कृष्टतेसाठी झटावे, न्यायी व शांतिपूर्ण जगाच्या उभारणीसाठी आम्ही कठोर परिश्रम करावे आणि आम्ही स्वत:ला उल्हास व आनंदाच्या सनातन जीवनासाठी तयार करावे.

डिएगोने त्याच्या भाषणाविषयी विचार करण्यात अनेक तास घालविले होते. स्वाभाविकपणे, “अलेग्रियासची भौतिक व आध्यात्मिक प्रगती” या विषयावर बोलण्याची त्याची इच्छा होती. तथापि त्याला या विषयावर एक भारदस्त भाषण द्यावयाचे नव्हते आणि त्यास त्याच्या मित्रांना उपदेश करावयाचा नव्हता. म्हणून त्याने आपली मते अशा प्रकारे व्यक्त केली:

अलेग्रियासच्या तरुण गटाचा एक भाग असणे ह्याचा अर्थ मजसाठी फार मोठा आहे. त्यातील सहभागी मला आतापर्यंत लाभलेल्यांमध्ये सर्वोत्तम मित्र आहेत आणि मी जेव्हा त्यांच्या सोबत असतो, तेव्हा ते क्षण माझ्या जीवनातील सर्वांत आनंदी क्षणांपैकी काही आहेत. मला वाटते, जेव्हापासून आपण भेटणे व एकत्रितपणे कामे करण्यास सुरवात केली, तेव्हापासून आपल्यात परिवर्तन झाले आहे. जेव्हा सुरवात केली तेव्हा आपण जवळजवळ बालके होतो आणि आपल्या एकत्र येण्याने आपल्या जीवनाच्या दुसऱ्या टप्प्यात अर्थपूर्णरीत्या प्रवेश करण्यास मदत झाली आहे. आपल्या कार्यकृती आणि चर्चांच्या माध्यमाने, आपण तारुण्याच्या अवस्थेत संभ्रम व असहाय्यतेच्या दशेत प्रवेश करणार नाही आहोत. आपण जाणतो, की आमच्या जीवनात काही उद्देश आहे आणि आपले उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी आम्ही एकमेकांस मदत करणार आहोत. मला वाटते, आम्ही कायम मित्र राहू.

जेव्हापासून आपण आपला गट तयार केला, तेव्हापासून बऱ्याचदा ज्या गोष्टींवर विचार केला, त्यांपैकी एक आहे अलेग्रियासची आध्यात्मिक व भौतिक प्रगती. मला वाटते, की सुरवातीला आपण त्याचा अर्थ काय होतो, याविषयीच उत्सुक होतो. तथापि, आता आपणापैकी बहुतेकांसाठी आपल्या समुदायाची प्रगती हे असे काहीतरी आहे, ज्यासाठी आपण आपली शक्ती समर्पित करण्याची इच्छा बाळगतो. आम्ही आशा बाळगतो की आमच्या उत्साहाची लागण खेड्यातील प्रत्येकाला होईल.

जिने आम्हास प्रेमळपणे मार्गदर्शन केले, त्या एलिसाचे मन:पूर्वक आभार, कारण या मार्गदर्शनामुळे आम्ही प्रगतीविषयी काही महत्वाच्या गोष्टी जाणतो. आम्ही जाणतो, की आम्ही सर्वदा एकीने असावे, अन्यथा आमचे सर्व प्रयत्न वाया जातील. आम्ही जाणतो, की आम्ही उत्कृष्टतेसाठी प्रयत्नरत राहावे; प्रत्येक दिवस हा मागील दिवसापेक्षा अधिक चांगला असावा. आम्हाला हे देखील माहीत आहे, की प्रकाशित शब्द आणि शुद्ध कृतींत, बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य असते. परंतु शब्दांना अशी शक्ती का म्हणून असते? अत्यंत महत्वाच्या कारणांपैकी एक आहे, की त्याचे द्वारे आम्ही ज्ञानाचा शोध घेतो, ते मिळवितो व त्याचे आदानप्रदान करतो. ज्ञान हे प्रगतीच्या केंद्रस्थानी असते.

एके दिवशी माझ्या घराजवळील कुरणात चरणाऱ्या गायींकडे मी बघत होतो. मनोमन मी विचार केला, “या गायींना आवश्यक असणारी प्रत्येक गोष्ट त्यांच्याजवळ आहे. कदाचित जेवढ्या गवताची त्या इच्छा करु शकतात, ते सारे गवत त्यांच्या खाण्यासाठी तेथे आहे. कुरणातून वाहणारा एक ओढा आहे, ज्यातून जेव्हाही त्यांना इच्छा होईल, तेव्हा त्या पाणी पिऊ शकतात. जेव्हाही त्यांना हवे असेल, तेव्हा त्या उन्हात किंवा छायेखाली विसावा घेऊ शकतात. त्यांना अधिक कशाची आवश्यकता आहे?” परंतु नंतर माझ्या लक्षात आले, की त्यांच्याजवळ फक्त एवढेच काही आहे. त्यांच्याजवळ ज्ञान नाही किंवा त्या काय करीत आहेत, हे त्यांना समजून घेता येत नाही. त्या निसर्गाच्या गुलाम आहेत. मी ठरविले, की निश्चितच मला गायींप्रमाणे जगावयाचे नाही. नंतर मी स्वत:ला म्हणालो, “जर मी खूप श्रीमंत आणि शक्तिमान झालो, परंतु अज्ञानी राहिलो तर काय? त्यापासून काय भले होणार? त्या संपूर्ण संपत्ती आणि शक्तीनिशी मी इतर काही नाही पण गुलामच राहीन —माझ्या वासनांचा गुलाम, ज्या मला त्या गोष्टी करावयास लावतात ज्या मी समजत नाही, माझ्या आपलपोटेपणाचा गुलाम, इतरांचा गुलाम जे माझ्यापेक्षा अधिक धनवान आणि अधिक शक्तिशाली आहेत.” म्हणूनच, ज्ञान हे प्रगतीच्या केंद्रस्थानी आहे. ज्ञान आम्हास स्वातंत्र्य देते.

खाली दिलेल्या जागेत, प्रगतीच्या संकल्पनेविषयी युवाकिशोरांना काय समजले पाहिजे असे आपणास वाटते याचे वर्णन करणारे काही परिच्छेद लिहा.

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

## विभाग १२

धर्मश्रद्धेच्या पवित्र लिखाणांमध्ये, “उद्‌गाराचे” विशेषत्व “स्फटिकाप्रमाणे स्पष्ट”, “वाक्पटुतेचे”, “भेद घेणारे”, “प्रभावकारी” अशा शब्दांनी दर्शविले जाते आणि सोबतच “संयम”, “सुज्ञपणा” आणि “उत्कृष्ट अर्थाने” अशा वाक्यांशांच्या आवश्यकतेकडे निर्देश करतात. हे विशेषत्व असलेल्या शब्दांचा असा असामान्य प्रभाव अपेक्षित असतो, की जो “अहंता व विकाराचे पडदे नष्ट करतो” आणि “शत्रूता व द्वेषाच्या अग्नीचे शमन करतो.” याशिवाय शब्द, उच्चारणाऱ्याच्या स्थितीनुसार आणि आध्यात्मिक गुणवत्तेनुसार आपला प्रभाव पाडतात.

> **“म्हणा: मानवी उद्‌गार हे असे सार आहे, जे आपला प्रभाव पाडण्यासाठी झटत असते आणि त्यासाठी संयमाची आवश्यकता असते. त्याच्या प्रभावाविषयी सांगायचे, तर ते शुद्धतेवर अवलंबित असते आणि शुद्धता अनासक्त व पवित्र अंत:करणांवर आधारित असते.”**[२९]
>
> **“तसेच, शब्द आणि उद्‌गार हे प्रभावकारी व भेद घेणारे असे दुहेरी असावेत. तथापि, त्या शब्दांमध्ये, ते संपूर्णपणे ईश्वराच्या सार्थकी उद्‌गारल्याशिवाय आणि परिस्थिती व लोकांच्या आवश्यकतांचे योग्य भान ठेवून उच्चारल्याशिवाय, या दोन विशेषतांचा संचार होणार नाही.”**[३०]

**"मी ईश्वराला याचना करतो, की तुमचे शीर त्याने त्याच्या कृपेच्या मौक्तिकांनी सुशोभित करावे; तुमच्या हृदयात ईश्वराप्रति प्रेमाग्नी प्रज्वलित करावा; पवित्र लोकांच्या समूहात वाक्पटुतेच्या शब्दांचे आणि उत्कृष्ट अर्थाचे व रहस्यांचे उद्‌गार काढण्यासाठी तुमची जिव्हा मुक्त करावी; तुम्हास आभाच्या नंदनवनातील गुलाबपुष्पे आणि स्वर्गातील देवदूत, विचारांमध्ये व मतांमध्ये एकसारखे बनवावे; आणि लोकांमध्ये तुमच्या चेहऱ्यावर त्याच्या दैवी साम्राज्यातील पवित्रतेची चिन्हे प्रकट करावीत."**[३१]

**"जर कठोर झालेल्या हृदयांवर तुमच्या भाषणांनी व उद्‌गारांनी प्रभाव पाडावा अशी इच्छा करीत असाल, तर तुम्ही या जगाच्या सर्व पाशांपासून मुक्त व्हावे आणि ईश्वराच्या अधिराज्याकडे उन्मुख व्हावे."**[३२]

१. वरील लेखांशांमध्ये काही अशी वैशिष्ट्ये शोधून काढा, जी मानवी शब्दांना शक्ती प्रदान करतात: ——————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

२. आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमात युवाकिशोरांनी अभ्यासलेल्या ग्रंथांमधील संकल्पनांचा शोध, त्यांना हे गुणवैशिष्ट्यांचा विकसित करण्यास कशी मदत करते असे आपणास वाटते? ————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

## विभाग १३

पवित्र लेखांमध्ये आम्हास सांगितले आहे, की वक्तृत्वाच्या शक्तीची दिशा उदात्त ध्येयांच्या प्राप्तीकडे असावी:

**"आत्ताच तो क्षण आहे, ज्यामध्ये तुम्ही सर्वोच्च लेखणीपासून प्रवाहित झालेल्या अनासक्तीच्या जलाने स्वत:ला शुद्ध करावे, आणि सर्वस्वी ईश्वराच्या कार्यासंबंधी अशा गोष्टींविषयी, ज्या वेळोवेळी पाठविण्यात आल्या आहेत किंवा प्रकट केल्या आहेत, त्यांविषयी विचार करावा आणि तद्‌नंतर तुम्हामध्ये जेवढी प्रयत्नशक्ती असेल, त्यानिशी विवेकाच्या शक्तीद्वारे व तुमच्या वक्तृत्वाच्या जोरावर जगातील लोकांच्या हृदयांत धगधगणाऱ्या शत्रुत्वाच्या व विद्वेषाच्या अग्नीचे शमन करण्यास झटावे."**[३३]

**"हा सेवक प्रत्येक परिश्रमी व उद्यमी आत्म्यास आवाहन करतो, की त्या एकमेव, अनुपम, सर्वशक्तिशाली, कृपाळू परमेश्वराविषयीच्या त्याच्या प्रेमापोटी, त्याने विवेकाच्या व वक्तृत्वाच्या सजीव जळाने सर्व प्रदेशी सुस्थितीचे पुनर्वसन करण्यास आणि मृतांना अनुप्राणित करण्यास आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करावी."**[३४]

**"प्रत्येक शब्द हा चैतन्याने युक्त असतो, म्हणून वक्त्याने किंवा व्याख्यात्याने शब्दांचे प्रयोजन काळजीपूर्वक, योग्य वेळी व स्थळी करावे, कारण प्रत्येक शब्द जो प्रभाव निर्माण करतो, ते स्पष्टतः दिसते व दृष्टिगोचर होते. 'महान अस्तित्व' म्हणतातः एक शब्द अग्निसमान असू शकतो तर दुसरा प्रकाशासमान आणि दोन्ही शब्द जे प्रभाव पाडतात, ते जगात दिसून येतात. म्हणून प्रकाशित झालेल्या विवेकशील मनुष्याने प्राथमिकतः दुधाप्रमाणे सौम्य शब्दांनी बोलावे, जेणेकरुन मनुष्याच्या बालकांचे संगोपन व्हावे व त्याद्वारे ते उपदेशित व्हावेत आणि मानवी अस्तित्वाचे अंतिम ध्येय त्यांनी गाठावे, जे आहे खऱ्या जाणिवेचे आणि श्रेष्ठत्वाचे पद. त्याचप्रमाणे 'महान अस्तित्व' म्हणतातः एक शब्द वसंतऋतूप्रमाणे असतो, जो ज्ञानाच्या गुलाबवाटिकेतील नाजुक रोपट्यांना हिरवेगार व जोमदार बनवितो, तर दुसरा शब्द कालकूट विषासारखादेखील असू शकतो. दूरदर्शी विवेकशील मनुष्याला हे आवश्यक आहे, की त्याने अत्यंत नम्रतेने आणि सहिष्णुतेने बोलावे, जेणेकरुन त्याच्या शब्दांचे माधुर्य प्रत्येकाला ते प्राप्त करण्यासाठी उद्युक्त करेल, जे मनुष्याच्या पदासाठी हितावह आहे."**[३५]

१. खालील विधाने खरी आहेत का हे ठरवा. अभिव्यक्तीच्या शक्तीची दिशा या गोष्टींकडे असावी.

—— तर्क जिंकण्यासाठी.

—— स्पष्ट तर्क मांडून सत्याचे प्रतिपादन करण्यासाठी.

—— लोकांच्या अंतःकरणातील शत्रुत्वाच्या व द्वेषाच्या अग्नीचे शमन करण्यासाठी.

—— दुसऱ्यांचा बुद्धिभेद करण्यासाठी.

—— सत्य लपविण्यासाठी.

—— विश्वातील रहस्ये स्पष्ट करण्यासाठी.

—— जटील विषय स्पष्ट करण्यासाठी.

—— गैरसमजुतींचे निरसन व दृष्टीमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी.

—— आपल्या मतांची श्रेष्ठता दाखविण्यासाठी.

—— प्रशंसा आणि स्तुती मिळवण्यासाठी.

—— सत्यशोधन करण्यासाठी.

—— लोकांची स्थिती सुधारण्यासाठी.

—— शोषितांच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी.

२. अभिव्यक्तीच्या शक्तीचा विकास युवाकिशोरांना त्यांच्या व्यक्तिगत परिवर्तनाच्या मार्गात तसेच सामाजिक परिवर्तनास साहाय्य करण्याच्या त्यांच्या प्रयत्नात कशाप्रकारे मदत करु शकतो, याविषयी काही शब्द सांगा. ———————————————————————————————

———————————————————————————————————

———————————————————————————————————

———————————————————————————————————

———————————————————————————————————

## विभाग १४

युवाकिशोरांना अभिव्यक्तीच्या शक्तीचा विकास करण्यासाठी मदत करताना आपण हे कधीही विसरु नये, की ते ईश्वरी शब्दच आहेत, जे मनुष्याच्या वाणीत शक्तिसंचार करतात आणि माणसाच्या अंत:करणास व मनास खरी समज प्रदान करतात. आपणास इथे अल्पविराम घेऊन खालील लेखांशांवर चिंतन करण्यास सांगण्यात येते.

**"दैवी प्रकटीकरणाच्या निर्झरापासून दीप्तीने चकाकणाऱ्या उच्चारणाच्या दिननक्षत्राने, पवित्र लेख व पत्रिकांना एवढे प्रकाशित केले आहे, की उच्चारणाचे साम्राज्य आणि जाणिवेचे उन्नत अधिराज्य आनंदाने व हर्षातिरेकाने कंपायमान होत आहे व ईश्वरी प्रकाशाच्या तेजाने झळाळत आहे..."**[३६]

**"म्हणा: आम्ही आमच्या सिंहासनापासून दैवी उच्चारणाच्या सरिता प्रवाहित केल्या आहेत, जेणेकरुन तुमच्या अंत:करणाच्या भूमीतून विवेकाची व जाणिवेची नाजूक रोपटी प्रस्फुटित व्हावीत."**[३७]

**"तुझ्या उच्चाराच्या नि:श्वासाद्वारे विवेकाचा स्वर्ग अलंकृत झाला आहे आणि तुझ्या लेखणीच्या प्रवाहांद्वारे प्रत्येक ढासळत असलेली अस्थी चलायमान झाली आहे."**[३८]

**"म्हणून हे स्पष्ट व स्वयंसिद्ध आहे की शब्द हे ईश्वराचे प्रथम देणे आहे आणि त्याच्या शोधक व प्राप्तकर्त्या जाणिवेची शक्ती होय. हा शब्द अस्तित्वाच्या शाळेमधील अग्रगण्य प्रशिक्षक आणि जो सर्वशक्तिमान आहे, त्याचा प्रकटनकर्ता होय. जे काही दिसत आहे ते केवळ त्याच्या विवेकाच्या प्रकाशाद्वारे दृश्यमान होते. जे काही व्यक्त झाले आहे, ते केवळ त्याच्या ज्ञानाचे द्योतक आहे. सर्व नामे ही केवळ त्याचे नाम असून सर्व वस्तूंचा आरंभ व अंत त्याच्यावर निर्भर आहे."**[३९]

आपणास वरीलपैकी जास्तीत जास्त अवतरण कंठस्थ करण्याची इच्छा असेल.

## विभाग १५

आपण अशा कालखंडात राहतो, जेव्हा मानवजात नैतिक दिवाळखोरीचा सामना करीत आहे. मानवजातीला शतकानुशतके मार्गदर्शन करणारी नीतितत्त्वे हळूहळू आपला प्रभाव गमावीत आहेत आणि त्याऐवजी सर्रासपणे

भौतिकवादाची मूल्ये, टोकाच्या सापेक्षवादावर उभारलेल्या संकल्पना आणि बेछूट व्यक्तिवादाच्या मागण्या स्थानापन्न होत आहेत. या गोष्टींचा युवाकिशोरांवर होणाऱ्या परिणामांचा विचार करण्यापूर्वी या परिस्थितीविषयी अधिक विचार करूया.

गेल्या काही शतकांच्या इतिहासाच्या ओघात, मानवतेने अनेक साखळ्यांपासून हळूहळू मुक्ती मिळवली आहे, ज्यांनी तिला दीर्घकाळ छळले आहे —जसे की हटवाद, जुलूमशाही, अंधश्रद्धा इत्यादी. जरी बरेच काही साध्य करायचे असले तरी, खोलवर रुजलेल्या पूर्वग्रहांवर मात केली गेली आहे, न्याय व्यवस्थापित करण्यासाठी कायदे तयार केले गेले आहेत आणि व्यक्ती व विविध गटांचे अधिकार मान्य केले गेले आहेत. दुर्दैवाने, ही मौल्यवान ऐतिहासिक चळवळ आता त्रस्त आहे, आणि वाढत्या प्रमाणात, असहनशिलतेमुळे. या सर्वांच्या केंद्रस्थानी प्रगत आहेत अत्यंत सापेक्षतावाद आणि बेलगाम व्यक्तिवाद, ज्यामुळे निरपेक्षतेचे अस्तित्व बाजूला ढकलले जात आहे. एखाद्याच्या वैयक्तिक आवडीनिवडींचा पाठपुरावा करण्यास मोकळे राहणे हा सर्वोच्च आदर्श मानला जातो आणि परिणामी योग्य आणि अयोग्य यातील भेद धूसर होत चालला आहे. अधिकाधिक ठिकाणी, मोठ्या प्रमाणावर भिन्न मूल्यांच्या संचावर आधारित वर्तनाचे आकृतीबंध, समतुल्य मानले जात आहेत, आणि पारंपारिकपणे समुदायाच्या सदस्यांना एकत्रित करत असलेल्या बंधनांनी त्यांचे सामर्थ्य गमावले आहे.

या वातावरणात, युवाकिशोर नैतिक मार्गदर्शनापासून अधिकाधिक वंचित होत आहेत आणि योग्य व अयोग्य यांमध्ये भेद करणे त्यांना कठीण होत आहे. ईश्वराच्या शब्दाशिवाय अन्य काहीही आध्यात्मिक ज्ञानेंद्रिये पुनर्जीवित करु शकत नाहीत, जी मनुष्यास हा भेद करण्यास सक्षम करतात. ईश्वरी शब्द, विचारांचे व नैतिकतेचे क्षेत्र प्रकाशित करतात हे अब्दुल—बहा आम्हास सांगतात:

> **“... ज्ञान आणि आदर्शाच्या आध्यात्मिक क्षेत्रात प्रकाशित करणारे एक केंद्र असायला हवे आणि ते केंद्र आहे सनातन, कायम प्रकाशणारा सूर्य म्हणजे ईश्वराचा शब्द. त्याचा प्रकाश वास्तवाचा प्रकाश आहे, जो मानवजातीवर प्रकाशिला आहे, ज्याने विचाराचे व नैतिकतेचे क्षेत्र प्रकाशित केले आहे आणि दैवी जगाचे कृपाप्रसाद मानवजातीस प्रदान केले आहेत.”**[४०]

नीतितत्त्वांची निवड करण्यास सक्षम होण्यासाठी नियमांच्या संचापलीकडे काही अधिक आवश्यक आहे; युवाकिशोरांच्या मनात आणि अंत:करणात मजबूत सामाजिक उद्दिष्टांसहित एक संपूर्ण नैतिक संरचना तयार करावयाची असते —एक अशी संरचना जी आध्यात्मिक संकल्पना, आचरणाचे आकृतिबंध आणि परिणामांचे ज्ञान यांना जोडते आणि जे संकल्प आणि धैर्यशक्तीच्या बळावर आधारित असते. अशी नैतिक संरचना व्यक्तीच्या मनात कार्यरत असणाऱ्या भाषेच्या संरचनेशी अगदी निकटतेने संबंधित असल्याचे दिसते. ही भाषा, आधीच्या काही विभागात नमूद केल्याप्रमाणे, या विघटनशील जगात लोकांच्या नीतिमूल्यांना आकार देत असणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक प्रवाहांना समजण्यास तसेच त्यांच्यात बदल घडवून आणण्यास आवश्यक असणाऱ्या आध्यात्मिक शक्तींना समजून घेण्यास, युवकांना सक्षम करण्याइतपत पुरेपूर समृद्ध असावी.

मनुष्य आपले विचार ज्या भाषिक संरचनेत व्यक्त करतो आणि त्याच्या किंवा तिच्या विचारांना व आचरणाला जी नैतिक संरचना नियंत्रित करते, यामधील घनिष्ट संबंधाचा महत्त्वपूर्ण प्रभाव भाषा व नैतिकता ह्या दोन्ही कशाप्रकारे शिकवाव्या, यावर पडतो. भाषा शिकविण्यासाठी वापरलेल्या साहित्याची विषयवस्तू निश्चितपणे जे ते तयार करतात, त्यांच्या नीतिमूल्यांप्रमाणे बदलेल. ती स्पष्ट नैतिक संकल्पना निर्देशित करु शकते, नैतिकदृष्ट्या द्विधा मन:स्थिती निर्माण करू शकते किंवा आध्यात्मिक हानीला कारणीभूत असू शकते. नैतिक शिक्षणाची विषयवस्तूदेखील, प्रचारित करण्यात येणाऱ्या नीतीमत्तेच्या संकल्पनेप्रमाणे बदलू शकते. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती असे भाराभर शैक्षणिक साहित्य ओळखू शकते, ज्यामध्ये नैतिक संकल्पना ह्या आचरण सुधारण्याच्या दृष्टीने सद्‌गुण, जबाबदाऱ्या, नियम आणि तथ्ये यांच्या यादीच्या स्वरुपात प्रस्तुत केलेल्या असतात, तथापि त्यामध्ये आध्यात्मिक जाणीव वाढविणाऱ्या किंवा सामाजिक परिवर्तनासाठी कटिबद्धता निर्माण करणाऱ्या भाषेचा आणि विचारांचा लवलेशदेखील नसतो. आपण असे नैतिक शिक्षणाचे कार्यक्रम देखील बघू शकतात जे विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या आवडी आणि प्राधान्यांबद्दल चर्चा करण्यास सांगतात, या समजुतीने की हे स्पष्ट करताना, विद्यार्थी स्वत:चे स्थान शोधून काढतील आणि त्यांची क्षमता ओळखतील. नैतिक शिक्षण या दोन पध्दतींपैकी, एका पध्दतीकडे कमी करणे अनुचित आहे. किशोर आध्यात्मिक सशक्तीकरणासाठी समर्पित कार्यक्रम, अर्थातच, उच्च नैतिक मानकांपासून दूर जाऊ शकत नाही किंवा असे मानक व्यक्तीकडून नि:संदिग्धपणे मागणी करतात त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. त्याच क्षणी, जसे की आम्ही आधी नमूद केले आहे, आध्यात्मिक संकल्पनांची पुरेशी चर्चा करण्यासाठी अशा कार्यक्रमास संधी देणे आवश्यक आहे. तथापि, या कार्यक्रमास अजून पुढे जाण्याची आवश्यकता आहे. विशेषत:, नैतिक संरचनेच्या निर्मितीमध्ये भाषेच्या भूमिकेकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि आम्ही पुढील दोन विभागांमध्ये या भूमिकेबद्दल विचार करू.

## विभाग १६

आध्यात्मिक सशक्तीकरणाशी संबंधित शैक्षणिक कार्यक्रमात नियोजित केलेली सामग्री अशा भाषेत लिहिली गेली पाहिजे जी मोकळी आणि शोधदृष्टीची असली तरीही, सांप्रतच्या दशकांमधील नैतिक शिक्षण ज्या एक प्रकारच्या सापेक्षवादाने प्रदूषित झाले आहे, त्यापासून ती संरक्षण करेल.

*सरळ मार्गावर चालणे* हा आणखी एक बहाई–प्रेरित मजकूर आहे जो युवाकिशोरांच्या कार्यक्रमाचा भाग बनतो. त्यामध्ये वीस गोष्टी असून प्रत्येक गोष्ट नैतिक विषयाशी संबंधित आहे. बहुतेक सभ्यतांमध्ये एका पिढीतून दुसरीत ज्ञान संप्रेषित करण्यासाठी गोष्टींना साधन म्हणून उपयोगात आणले जाते. या पाठ्यक्रमात काही सुपरिचित गोष्टींचे अशा प्रकारे पुनर्लेखन करण्यात आले आहे, की परंपरेने त्यांच्याद्वारे दिल्या जाणाऱ्या संदेशाबरोबर संलग्न असणारे काही विरोधाभास दूर सारले आहेत. प्रत्येक पाठात सरावदेखील अशा भाषेत आहेत, जे भाषाकौशल्य आणि नैतिक संरचनेच्या निकोप वाढीसाठी अत्यंत उपयुक्त कुशलतांचा विकास करतात. खालील पाठ आपण ज्या बोधकथेशी चांगले परिचित आहात, तिच्यापासून सुरु होतो. विचारांची एक पद्धत आणि जे स्पष्टत: नीतिसंगत

आहे असे आचरण अंगी बाणावे या उद्देशाने तिचे पुनर्लेखन करण्यात आले आहे. ती वाचा आणि देत असलेला नैतिक संदेश सापेक्षवादाच्या नीतिमत्तेपासून आणि नकारात्मक सांस्कृतिक परंपरा अंगीकारण्याच्या प्रवृत्तीपासून कशाप्रकारे मुक्त आहे, याची चर्चा करा.

*विवेकशील व्यक्ती कोणत्याही चापलुसीने फसविल्या जात नाहीत. तथापि, प्रत्येकजण, प्रशंसेने प्रोत्साहित होतो. परंतु आपण लक्षात ठेवावे, की स्तुतीची अभिलाषा आपली निर्णयक्षमता कमकुवत बनविते.*

एक लांडग्याने एका कावळ्याला चोचीमध्ये पनिरचा तुकडा घेऊन उडताना पाहिले. "मला ते पनीर मिळवायलाच हवे," लांडगा स्वत:शीच बोलला आणि म्हणून तो कावळा एका झाडाच्या फांदीवर बसेपर्यंत त्याने त्याच्या सावलीचा पाठलाग केला.

"शुभ दिवस, माझ्या प्रिय मित्रा," आपले अतिशय उत्तम वागणे प्रदर्शित करीत लांडगा म्हणाला. "आज तू अत्यंत सुंदर दिसतो आहेस. तुझे पंख चकचकीत आहेत आणि तुझे डोळे रत्नासारखे चमकत आहेत. खरेच तुझी वाणीदेखील फार गोड असेल. आहा! जर मी तुला गाताना ऐकू शकलो तर."

हे शब्द कावळ्याची स्तुतितृष्णा शमविणाऱ्या ताज्या जलाप्रमाणे होते. म्हणून त्याने आपली मान गर्वाने उंचावली आणि आपल्या लोभसवाण्या मित्राच्या सन्मानार्थ गाणे गाण्यास तो सरसावला.

नक्कीच, ज्या क्षणी कावळ्याने आपली चोच उघडली, पनिरचा तुकडा खाली पडला. जमिनीवर पडण्यापूर्वीच लांडग्याने तो टिपला आणि पळून गेला, जेव्हा की सभोवतील वातावरण कावळ्याच्या कर्कश आवाजाने भरले.

**आकलन:**

खालील प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यांमध्ये द्या.

१. लांडग्याने काय पाहिले होते? ––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

२. कावळ्याच्या चोचीत काय होते? ––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

३. पनीर मिळविण्यासाठी लांडग्याने काय केले? ––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

४. कावळ्याची वाणी खरोखरच मधुर होती काय? –––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

५. कावळ्याची स्तुती करण्यात लांडगा प्रामाणिक होता काय? ––––––––––––––––––––––––

——————————————————————————————————————————————————

६. ही कहाणी शहरात, खेड्यात की अरण्यात घडली? ————————————————————————————

——————————————————————————————————————————————————

**शब्दसंग्रहः**

खाली दिलेल्या शब्दांपैकी एकाचा उपयोग करुन खालील प्रत्येक वाक्य पूर्ण करा:

प्रोत्साहित करणे, अभिलाषा करणे, मनोरंजक, सावली, स्तुती करणे,
समाधानी असणे, गर्व असणे, सुखद, निर्णयक्षमता दर्शविणे, अशक्त होणे

१. शिक्षिकेला तिचे विद्यार्थी कष्टाळू वाटत असे आणि ती नेहमी त्यांची पुरेपूर ———————— करीत असे.

२. अरमान्डो आणि त्याच्या भावाने शेतात काम करीत आणि त्यांच्या भविष्यातील योजनांविषयी बोलत एक ———————— दिवस एकत्र घालविला.

३. हॉंग मे ला प्रवास करणे आवडत असे आणि नवीन स्थळे पाहण्याची त्याला ———————————— होती.

४. तिचा आवाज मधुर होता आणि तिच्या शिक्षकाने तिला संगीत शिकण्यासाठी ———————————— केले.

५. अगदी पहिल्या पावसानंतर बियांची पेरणी करण्यात शेतकऱ्याने चांगली ———————————— दर्शविली.

६. चंदू परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांविषयी ——————————— नव्हता, म्हणून त्याने अधिक अभ्यास करायचे ठरविले.

७. झॉंग जिआंग वर कठीण प्रसंग ओढवला, परंतु त्याच्यात फारच ——————— असल्यामुळे तो कुणासही त्यास मदत करु देईना.

८. दिवसाच्या शेवटी झाडाची लांब ———————— बगिच्यावर पडते.

९. ती एक ———————————— गोष्ट होती आणि मुलांना ती वारंवार ऐकावी असे वाटे.

१०. तो आजारामुळे बराच ———————— झाला होता, परंतु तो सशक्त होईल हे जाणून त्याने लवकरच काम करण्यास सुरुवात केली.

**चर्चा**

आपण चापलुसीने मूर्ख बनणार नाही, ह्याची खात्री आपण कशाप्रकारे करू शकतो?

**पाठांतर**

**“फसवणूक व कपटकारस्थानाच्या सापळ्यात आपण अडकू नये यासाठी आपण स्वत:चे संरक्षण अतिशय दक्षतेने करा.”**

आपल्या गटात खालील प्रश्नांची चर्चा करा:

१. एखादा दक्ष नसेल तर, ही कहाणी सांगितली जाऊ शकते —आणि ती अशा प्रकारे सांगितली गेली आहे— ज्यामध्ये लांडग्याच्या तथाकथित हुशारीविषयी कौतुक दर्शविले असते. गोष्टीचे वरील स्वरुप असे चित्रण कशाप्रकारे टाळते? ——————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

२. कथेचा नैतिक संदेश काय आहे? ——————————————————————————

——————————————————————————————————

३. संदेशाशी संबंधित काही संकल्पना काय आहेत? ————————————————————

——————————————————————————————————

४. युवाकिशोरांना नैतिक संकल्पना समजून घेण्यास मदत व्हावी, यासाठी अशा प्रकारची नीतिकथा कितपत एक प्रभावी साधन ठरते? ——————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

५. हे सराव युवाकिशोरांमध्ये कोणत्या क्षमता निर्माण करतात? ————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

६. चर्चेचा सराव —जेव्हा पोकळ परीस्थित नाही तर कथेत दिलेल्या नैतिक संदेशाच्या संदर्भात संबोधतो— तेव्हा विचार आणि चिंतनशक्ती वाढविण्यास कशाप्रकारे साहाय्य करतो? तो अभिव्यक्तीची क्षमता कशाप्रकारे वाढवितो? ——————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

७.	पाठाच्या अखेरीस असलेले उद्धरण कंठस्थ केल्यास या शक्तींना बळकटी कशी मिळते? ———————

————————————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————————————

## विभाग १७

युवाकिशोर ज्या निवडी करतात, त्यांखालील नैतिक बाबींची ओळख करण्यास त्यांना मदत करण्यासाठी त्यांच्या वास्तवाशी मिळत्याजुळत्या परिस्थिती त्यांच्यापुढे सादर करणे महत्त्वाचे असते. याचा अर्थ असा नाही, की वास्तववादी असण्याच्या नावावर मनुष्याच्या निम्न मानसिकतेच्या अभिव्यक्तीकडे लक्ष दिले जावे. तपासलेल्या परिस्थिती जरी युवाकिशोरांना समजण्यालायक असल्या तरी, त्या पतनशील समाजात अगदी सामान्य असल्याच पाहिजेत असे नाही, त्याऐवजी, त्या विचाराच्या व आचरणाच्या अशा स्तरांच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या असाव्यात, ज्यामुळे त्यांना उत्कृष्टतेसाठी झटण्याबद्दल प्रोत्साहन मिळावे. या हेतूने, त्यांच्या आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमात वापरल्या जाणाऱ्या साहित्याने एकीकडे पितृत्ववाद, पोरकट संवाद आणि दुसरीकडे चांगल्या आचरणावर प्रवचनसदृश भाषा टाळली पाहिजे. *उत्कृष्टतेसंबंधी शिकणे* या नावाच्या बहाई—प्रेरित पाठ्यक्रमातील खालील पाठाचा विचार करा. खालील पाठामध्ये, श्रीमती चेन आपल्या नातवंडांना शुद्धतेच्या संकल्पनेचे वर्णन करत आहेत आणि काही सरावांच्या सहाय्याने, त्याचे महत्त्व अधिक समजून घेण्यासाठी त्यांना मदत करत आहेत.

श्रीमती चेन सांगतात, की उत्कृष्टतेची दुसरी अट आहे निष्कलंक आणि पवित्र जीवन, ज्यात विनयशीलता, शुद्धता, सभ्यता, शालीनता आणि निर्मल अंत:करण ह्यांचा अंतर्भाव होतो. त्या शुद्धतेपासून स्पष्टीकरणास सुरूवात करतात, ज्या आधारे निष्कलंक जीवनाची निर्मिती व्हायला हवी:

"आरशाची कल्पना करा. जर आपण त्यावरील धूळ स्वच्छ कराल, तर तो प्रकाश परावर्तित करेल. तद्वतच जेव्हा हृदय द्वेष, मत्सर आणि गर्व अशा अपूर्णतांपासून स्वच्छ केले जाते, तेव्हा ते शुद्ध बनते आणि स्वर्गीय प्रकाश परावर्तित करु शकते. मेन्सिअस (चिनी तत्वज्ञानी) म्हणतात, की एखादा थोर मनुष्य त्याचे बालसुलभ हृदय गमावीत नाही. हे अगदी खरे आहे, तथापि, आपण लक्षात ठेवावे, की बालकाचे पवित्र हृदय हे अज्ञान आणि निर्बलतेपोटी असते आणि हे की बालकाच्या पवित्रतेची अद्याप पडताळणी केलेली नसते. आपण आता अशा वयात आहात, जेव्हा आपणास कदापिही बालके समजता येणार नाही. जसजसे आपण मोठे होता तसतसे हुशार व सशक्त व्हाल. तरीपण, आपणा प्रत्येकाला जागृत राहावे लागेल आणि हृदयाची शुद्धता न गमावण्यासाठी पूर्ण काळजी करावी लागेल. आपण आपल्या हृदयाच्या आरशाला या जगाच्या अशुद्धतांनी मलीन होण्यासाठी अनुमती देऊ नये. तथापि, आपण हे तर्काच्या व श्रद्धेच्या शक्तीद्वारे करावे. आपण केवळ प्रयत्न व इच्छाशक्तीच्या वापराद्वारे शुद्ध राहू शकता."

श्रीमती चेन नंतर स्पष्ट करतात, की शुद्धतेच्या संकल्पनेविषयी बहुधा गैरसमज करुन घेतले जातात आणि त्यांच्या युवा नातवंडांना खालील वैशिष्ट्यांच्या यादीतून जी शुद्धता सूचित करतात आणि जी चुकीने तिच्याशी जोडली जातात अशी वैशिष्ट्ये ओळखण्यास सांगतात.

— खरे असणे
— प्रामाणिक असणे
— भोळसट असणे
— पाखंडापासून मुक्त असणे
— स्वच्छ मनाचा असणे
— स्वच्छ शरीराचा असणे
— मूर्ख असणे
— गर्वमुक्त असणे
— धर्मांध असणे
— साध्या मनाचा असणे
— फसवेगिरीपासून मुक्त असणे
— नि:स्वार्थी असणे
— निर्बल असणे
— भावनाप्रधान असणे
— बुद्धिमान असणे
— दयाळू असणे
— बहाणेबाज नसणे

युवक खालील वचन मुखोद्‌गत करतात आणि त्यावर दिलेल्या प्रश्नांची त्यांच्या आजी–आजोंबासोबत चर्चा करतात:

**“माझा आद्य उपदेश हा आहे: एक पवित्र दयाळू आणि तेजस्वी हृदय धारण कर, ज्यायोगे तू अनादि अनंत आणि अनंत सत्तेचा धारक व्हावे.”**

**“मनुष्यमात्राच्या जीवनपथात सर्वप्रथम शुद्धता असायला हवी, नंतर ताजेपणा, स्वच्छता व चैतन्याचे स्वातंत्र्य. प्रथम प्रवाहाचा तळभाग स्वच्छ करायला हवा, नंतर त्यात गोड नदीचे पाणी सोडले जाऊ शकेल.”**

१. पाखंडी तो असतो जो प्रामाणिक असल्याचे भासवितो, तथापि, प्रत्यक्षात मात्र तो तसा नसतो. पाखंडी असणे किंवा अत्यंत कमकुवत असणे यापैकी सगळ्यांत वाईट कोणते आहे?
२. अशा कोणत्या अशुद्धता आहेत, ज्यांपासून आपण आपले विचार स्वच्छ केले पाहिजेत?
३. या जगात कोण अधिक सिद्धीस जातो? शुद्धहृदयी की अप्रामाणिक?

खालील प्रश्नांची आपल्या गटात चर्चा करा:

१. हा पाठ निष्कलंकतेच्या संकल्पनेविषयी सामान्य गैरसमज दूर करण्यास कशाप्रकारे मदत करतो? ———

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

२. श्रीमती चेन यांच्याद्वारे उपयोगात आणलेल्या भाषेची काही वैशिष्ट्ये कोणती आहेत? —————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

३. हा पाठ युवाकिशोरांना आध्यात्मिक उत्कृष्टतेसाठी प्रयत्नरत राहण्यास कशाप्रकारे मदत करतो? —————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

## विभाग १८

जरी फक्त थोडक्यात, मागील दोन विभागात, आम्ही नैतिक संरचनेच्या निर्मितीमध्ये भाषेच्या भूमिकेबाबतीत विचार केला आहे. आमच्या दोन पाठांच्या अभ्यासात, प्रथम *सरळ मार्गावर चालणे* आणि दुसरा *उत्कृष्टतेसंबंधी शिकणे*, काही विषय आणि संकल्पनांची चर्चा, भाषा कौशल्ये आणि क्षमता वाढवण्यासाठी रचित केलेल्या सरावांच्या संयोजनात, नैतिक निवडींसाठी अनुकूल विचारांचे आकृतिबंध कसे मजबूत करू शकतात हे पाहण्यास आम्हाला मदत केली आहे. अशाप्रकारे भाषेचे प्राविण्य वाढवणे महत्त्वाचे असले तरी, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की एखाद्या व्यक्तीचे नैतिक रूप अनेक परस्परसंवादी घटकांवर अवलंबून असते. विशेषत:, येथे चर्चेत असलेल्या विचारसरणीचे आकृतिबंध वैज्ञानिक विचारांपासून वेगळे करणे कठीण आहे. वैज्ञानिक पद्धतीने वास्तविकतेचे अन्वेषण करण्यासाठी युवाकिशोरांनी तयार असणे आवश्यक आहे. त्यानंतर, ते ज्या अनेक साहित्याचा अभ्यास करतील, ते गणित आणि विज्ञानाच्या क्षेत्रात प्रवेश करतील —त्यांना विषय म्हणून शिकवण्याच्या प्रयत्नात नाही तर ते ज्या प्रकारची तर्कशुद्धता निर्माण करतात ते मजबूत करण्यासाठी. या पुस्तकातून शाखान्वित झालेल्या अभ्यासक्रमांमध्ये, अनेक वर्षांच्या विस्तारित कालावधीत युवाकिशोरांसोबत कार्य करण्यासाठी स्वत:ला समर्पित करू इच्छिणाऱ्यांसाठी हेतू, या साहित्यावर काही प्रमाणात चर्चा केली जाईल. या वेळी, युवाकिशोर ज्या शैक्षणिक प्रक्रियेत सहभागी होतील त्या शैक्षणिक प्रक्रियेच्या या घटकाची फक्त जाणीव असणे आपल्यासाठी पुरेसे आहे.

## विभाग १९

आध्यात्मिक जाणीव वाढविणे, अभिव्यक्तीची शक्ती वाढविणे आणि मजबूत नैतिक संरचना निर्माण करणे, हे सर्व आध्यात्मिक सशक्तीकरणाकडे नेतात. दुर्भाग्यवश, शक्ती असणे हे बहुधा अशा मूल्यांशी जोडले जाते, जी मनुष्यमात्राच्या आध्यात्मिक स्वरुपांच्या विपरीत असतात. ही संकल्पना जेव्हा सादर केली जाते, त्या वेळी मनात ज्या प्रतिमा येतात, त्या अधिकार गाजविणे, जोडतोड करणे, हुकूमशाही करणे, सत्ता, सर्वाधिकार आणि स्वामित्व गाजविणे याविषयी असतात. तथापी, आपला उद्देश युवाकिशोरांना वेगळ्या प्रकारच्या शक्तीचा विकास करण्यास मदत करण्याचा आहे. नैतिक शक्ती प्रेम, न्याय, ज्ञान, समजूतदारी, सूक्ष्म अनुभूतिक्षमता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नम्रतेतून उदयास येते. खरोखरच, नम्रता ही सशक्तीकरणाच्या प्रक्रियेची एक आवश्यक अट आहे ज्याचा आपण येथे विचार करत आहोत, कारण केवळ सर्वोच्च दैवी साम्राज्याच्या सहाय्यानेच एक शुल्लक कीटक गरुड बनू शकतो, पाण्याच्या थेंबास नद्या व सागरात रुपांतरीत आणि अणूला प्रकाशपुंज व सूर्यात परिवर्तित करते. बहाउल्लाह आणि अब्दुल–बहांच्या काही प्रार्थना, ज्यांमध्ये काही गुणांसाठी आम्ही ईश्वराची आराधना करतो, त्यांच्या लेखांशांवर चिंतन केल्यास आध्यात्मिक व नैतिक सशक्तीकरणाच्या स्वरुपाविषयी आम्हास महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी प्राप्त होते:

> **“मी तुला आळवितो, हे तू जो सर्व नामांचा स्वामी आहेस आणि पृथ्वी व स्वर्ग या दोहोंचा अधिपती आहेस, जे कोण सर्व तुला प्रिय आहेत, त्यांतील प्रत्येक तुझ्या दिनामध्ये तुझ्या दयेचा चषक होओ असे कर, जेणेकरुन त्यांनी तुझ्या सेवकांची अंत:करणे अनुप्राणित करावीत. हे माझ्या ईश्वरा, तुझ्या दयेच्या ढगांपासून खाली कोसळणाऱ्या पर्जन्यासमान असण्यासाठी आणि तुझ्या दयेचा वासंतिक सुगंध पसरविणाऱ्या वाऱ्यासमान असण्यासाठी त्यांना शक्तीदेखील प्रदान कर, जेणेकरुन त्यांच्याद्वारे तुझ्या प्राणिमात्रांच्या अंत:करणाची भूमी हिरवळीने व्यापली जाओ आणि ते अशा गोष्टी पुढे आणोत, ज्या त्यांचा सुगंध तुझ्या संपूर्ण साम्राज्यावर पसरवोत, ज्याद्वारे तुझ्या प्रकटीकरणाच्या पोषाखाच्या गोड सुवासाची अनुभूती प्रत्येकास येओ.”[४१]**
>
> **“हे माझ्या परमेश्वरा, नंतर आम्हास तुझ्या प्राणीमात्रांमध्ये तुझ्या यशचिन्हांचा सर्वत्र प्रसार करण्यास आणि तुझ्या अधिराज्यात तुझ्या धर्मश्रद्धेची रक्षण करण्यास आम्हास सशक्त कर.”[४२]**
>
> **“हे माझ्या ईश्वरा, आपले नेत्र तुझ्या मुखारविंदावर केंद्रित करुन, केवळ एकमेव तुझ्यासाठी जे तुझ्या नियमांशी व आदेशांशी एकनिष्ठ राहिले आहेत, त्यांच्यामध्ये माझी गणना व्हावी यासाठी मला शक्ती प्रदान कर.”[४३]**
>
> **“हे माझ्या ईश्वरा, आम्हास स्वत:ला विसरण्यास आणि जो अतिप्रशंसित, अतिउन्नत, तुझ्या स्वत्वाचे प्रकटीकरण आहे, त्यास निष्ठापूर्वक घट्ट बिलगण्यास आम्हास शक्ती प्रदान कर.”[४४]**

**"जो तुझ्या नामांचा दिननिर्झर आहे आणि तुझ्या गुणांचा उदयस्थळ आहे, त्याद्वारे तुझा अनुनय करतो की जे मला तुझी सेवा करण्यास उद्युक्त होण्यास आणि तुझ्या गुणांची प्रशंसा करण्यास सक्षम करील, ते माझ्यासाठी आदेशित कर."[४५]**

**"ज्या सेविकांनी तुझी प्रसन्नता साध्य केली आहे त्यांच्यापैकी एक होण्यास मला योग्य कर."[४६]**

**"ह्या बालकांचे संरक्षण कर, शिक्षण घेण्यासाठी त्यांना कृपाळूपणे सहाय्य कर आणि मानवतेच्या विश्वासाठी सेवा देण्यास त्यांना सुयोग्य कर."[४७]**

**"हे माझ्या प्रियतमा, तुझ्या धर्मकार्यात एकनिष्ठ राहण्यास जे मला सक्षम बनवेल, त्याचा अनुग्रह मजवर होऊ दे, जेणेकरुन विश्वासघात्यांचे संशय मला तुझ्याकडे वळण्यापासून प्रतिरोध करणार नाहीत."[४८]**

**"तेव्हा तुझ्या उपस्थितीत सत्याचे स्थान मिळविण्यास मला सक्षम कर, तुझ्या दयेच्या चिन्हाचा मजवर अनुग्रह कर आणि ज्यांना भय राहणार नाही की ज्यांना दु:ख भोगावे लागणार नाही अशा तुझ्या सेवकांमध्ये मला सम्मिलित होऊ दे."[४९]**

**"हे माझ्या परमेश्वरा, तुझ्या सेवकास दैवी वचन प्रसारित करण्यासाठी, आणि जे व्यर्थ आणि खोटे आहे त्याचे खंडन करण्यासाठी, सत्याची स्थापना करण्यासाठी, पवित्र पदे सर्वत्र जागी प्रसारित करण्यासाठी, तेजस्वितेला प्रकट करण्यासाठी आणि सत्यनिष्ठांच्या हृदयांत प्रभातकाळच्या प्रकाशाचा उदय करण्यास तू सहाय्य कर."[५०]**

**"तुझ्या लोकांदरम्यान त्यांना स्वत:ला विशेष बनविण्यास सक्षम कर, जेणेकरून त्यांनी तुझा शब्द उन्नत करावा आणि तुझ्या धर्मकार्यास पुढे न्यावे. हे माझ्या ईश्वरा, तुझी इच्छा आणि प्रसन्नता फलिभूत करण्यास त्यांना सहाय्य कर."[५१]**

## विभाग २०

मागील अनेक विभागांवरील चर्चा लक्षात घेऊन —आध्यात्मिक धारणेच्या स्वरूपाचे आपले निरीक्षण, जे वास्तविकतेचे आकलन करण्यासाठी आवश्यक आहे; अभिव्यक्तीच्या सामर्थ्यांमध्ये आमचे अन्वेषण, जे उदात्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अत्यावश्यक आहेत; भाषा आणि नैतिक संरचना यांच्यातील संबंधांचे आमचे विश्लेषण, जे आपल्या जीवनात निवड करताना अत्यंत महत्वाचे आहे; आणि नैतिक सशक्तीकरणाच्या प्रक्रियेवर आपले प्रतिबिंब— आता आपण युवाकिशोरांनी अभ्यासलेल्या दोन पुस्तकांचा तपशीलवार विचार करूया. या आणि पुढील विभागात आपण *संपुष्टीची झुळूक* या पुस्तकाकडे पाहू या, आणि विभाग २२ आणि २३ मध्ये आपण *श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकाचे परीक्षण करू.

बहाई—प्रेरित पाठ्यपुस्तक *संपुष्टीची झुळूक* मध्ये मुसोंडा, जी नुकतीच तेरा वर्षांची झालेली तरुण मुलगी आहे आणि शाळेच्या सुट्टीसाठी भेटायला आलेली तिची मोठी चुलत बहीण रोझ यांची कथा आहे. मुसोंडाचा

भाऊ गॉडविन आणि त्याचा मित्र चिशिंबा यांच्यासोबत या दोन मुली एकत्र येऊन, त्यांच्या भविष्याविषयी विचार करतात व त्यांच्या आशा व शक्यता यांवर चर्चा करतात. या पुस्तकाविषयी बऱ्याचशा बाबी आहेत, ज्यांवर आपल्या गटात चर्चा होणे आवश्यक आहे. परंतु, तत्पूर्वी, आपण संपूर्ण पुस्तक वाचायला हवे आणि नंतर पुन्हा ते काळजीपूर्वक वाचावे व सरावांचा अभ्यास करावा. एकदा आपण पुस्तकाशी चांगले परिचित झालात, की खालील गोष्टींचा विचार करा.

जसे नि:संदेह आपल्या लक्षात आले आहे, की संपूर्ण पाठ्यपुस्तकात जी एक भूमिका वसते, ती आहे “संपुष्टी”. खाली पुस्तकातील ते लेखांश आहेत, जे एकतर कहाणीतील प्रमुख पात्रांच्या दरम्यानच्या चर्चेद्वारे किंवा दैवी संपुष्टी कार्य करीत असल्याचे दर्शविणाऱ्या प्रसंगांच्या द्वारे भूमिकेचा निर्देश करतात. प्रत्येक विभागातून घेतलेले परिच्छेद, पुस्तकात ज्या क्रमाने आहेत त्याच क्रमाने सादर केले आहे. प्रत्येकात संपुष्टीची संकल्पना कशाप्रकारे विशद केली आहे आणि सहभागी जेव्हा धड्यांचा क्रमवार अभ्यास करतात, तेव्हा त्यांची विषयाची समज कशी वाढते, हे खाली दिलेल्या मोकळ्या जागेत लिहा.

“मी सेवेबद्दल विचार करत असते. मला असे काही करावयाचे आहे, जे दुसऱ्या लोकांच्या उपयोगी येईल. मला परिचारिका (नर्स) व्हायचे आहे, पण त्यासाठी भरपूर अभ्यास करावा लागेल. त्याला खर्चही फार मोठा येतो आणि मला वाटत नाही, की माझ्या आईवडिलांकडे इतके पैसे असतील.” मुसोंडा स्पष्ट करते.

“होय, पण तू प्रयत्न करू शकतेस मुसोंडा,” रोझ म्हणते. “एक शब्द आहे, ‘संपुष्टी’, जो काही आठवड्यांपूर्वी मी माझ्या एका वर्गात शिकले. माझे शिक्षक म्हणतात की, जे काही आपण करू त्याला परमेश्वर संपुष्टी देतो व मदत करतो. मला हा शब्द खूप आवडतो. मला खात्री आहे, की जर तू परिचारिका होण्याचा मनापासून निश्चय केलास, तर परमेश्वर नक्कीच तुला संपुष्टी देईल व मदत करेल.”

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

नंतर त्या रात्री जेव्हा मुली बिछान्यात असतात, मुसोंडा रोझशी कुजबुजते, “रोझ, तु ‘संपुष्टी’ हा शब्द बोलली होतीस. याचा अर्थ असा होतो का, की मी जर माझा शाळेचा अभ्यास लक्षपूर्वक केला तर परमेश्वर मला परिचारिकेचा कोर्स करण्यासाठी पैसे पाठवेल?”

रोझ आपली कुस बदलते व मुसोंडाकडे पाहते, “अगं, अगदी तसेच नाही. मला म्हणायच आहे की मला माहित नाही. आपण प्रयत्न करायला हवेत आणि कोणते द्वार उघडते हे पाहावे. तथापि, मला हे माहित आहे

की, परमेश्वर प्रत्येकाला प्रतिभा देतो. आपण आपल्यामध्ये कोणत्या प्रतिभा आहेत हे शोधले पाहिजे आणि नंतर त्यांचा उपयोग कसा करावा हे शिकले पाहिजे," रोझने उत्तरते.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

गॉडविनचा एक वर्गसोबती आणि घनिष्ठ मित्र आहे ज्याचे नाव आहे चिशिंबा. तो नेहमी मुलेंगा परिवाराला भेट देत असतो आणि आज तो रात्रीच्या जेवणासाठी थांबणार आहे. जेवताना विविध विषयांवर चर्चा होत आहे. मुसोंडा संपुष्टीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी अत्यंत अधीर आहे. शेवटी तेथे काही क्षणाकरीता शांतता पसरते आणि ही संधी घेऊन मुसोंडा म्हणते, "रोझ आणि मी संपुष्टीबद्दल बोलत होते."

"झाला माझ्या छोट्या बहिणीचा संवाद सुरु," गॉडविन आपला घसा साफ करीत म्हणतो. परंतु त्याला आश्चर्य होते कारण चिशिंबा या विषयाबद्दल उत्सुक आहे.

"तुला या शब्दाचा अर्थ काय आहे असे वाटते?" गॉडविन मुसोंडाला विचारते.

मुसोंडादेखील आश्चर्यचकित होते, आणि रोझ काहीतरी उत्तर देईल अशी अपेक्षा करत तिच्याकडे बघते.

"संपुष्टी... आपण जे काही करतो, त्यामध्ये परमेश्वर आपणास पुष्टी देतो आणि आपली मदत करतो," रोझ म्हणते.

चिशिंबा थोडा वेळ काहीच बोलत नाही. त्याच्या डोळ्यांमध्ये खिन्नता आहे. "काही महिन्यांपुर्वी," तो हळूहळू बोलण्यास सुरुवात करतो, "माझ्या वडिलांनी नोकरी गमावली. ते प्रामाणिक आणि जबाबदार आहेत आणि हे सर्वांना माहीत आहे. अठरा वर्षे पहारेकरी म्हणून त्यांनी एका कंपनीत काम केले आणि नंतर एकाएकी त्यांना नोकरीवरुन काढण्यात आले. आम्हा सर्वांना त्याचे कारण माहीत आहे. जर त्यांना नोकरीवर अधिक दोन वर्षे ठेवले गेले असते, तर ते निवृत्त झाल्यानंतर, कंपनीला त्यांना निवृत्तीवेतन द्यावे लागले असते. आमच्याजवळ जास्त काही बचत केलेले नाही. माझा थोरला भाऊ जरी आम्हास मदत करीत असला, तरी असे वाटत आहे की पुढील वर्षी मी शाळेत परत जाऊ शकणार नाही कारण मी माझ्या राहण्याचा आणि जेवणाचा खर्च करू शकणार नाही. मी शाळेवर खरोखरच प्रेम करतो. मला आश्चर्य वाटते, की परमेश्वर मला मदत का करीत नाही."

सर्वजण श्री. मुलेंगा या प्रश्नाचे उत्तर देतील, या अपेक्षेने त्यांच्याकडे पाहतात.

श्री. मुलेंगा स्मितहास्य करतात व म्हणतात, “जेव्हा आपण प्रयत्न करतो, तेव्हा परमेश्वर आपणास संपुष्टी देतो, याचा अर्थ असा नाही, की जीवन सोपे आहे. आपले जीवन अनेक अडचणींनी भरलेले असेल आणि दुर्दैवाने त्यांतील बरीच दु:खे अन्यायामुळे उत्पन्न होतात. तथापि आपणास कठीण परिश्रम करावे लागतील आणि जरी काही काळाकरीता गोष्टी आपल्या इच्छेनुरुप घडल्या नाहीत, तरी आपण परमेश्वराच्या संपुष्टीविषयी आश्वस्त असले पाहिजे. आपण अन्यायनिवारणार्थ करीत असलेल्या प्रयत्नांमध्ये परमेश्वर आपणास अवश्य संपुष्टी देईल.” ते चिशिंबाकडे वळतात आणि म्हणतात, “तुझे कुटुंब एकीचे आणि कष्टाळू आहे. मला मन:पूर्वक असे वाटते, की तुझ्यासाठी ही स्थिती नक्कीच बदलेल. तू तुझे शिक्षण पूर्ण करशील. तू माझा शब्द लक्षात ठेव.”

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

येत्या सोमवारी दोन्ही मुली श्रीमती फिरीसोबत आरोग्य केंद्रात जातात. ज्यावेळी तेथे जमलेल्या बालकांच्या मातांचा वर्ग सुरु होण्याची वेळ होते, त्यावेळी मुसोंडा व रोझ त्या सर्व बालकांना बाहेर नेतात अणि त्यांच्याबरोबर झाडाच्या सावलीत बसतात. ते एकत्र गाणी गातात व खेळ खेळतात, आणि रोझ त्यांना एक गोष्ट सांगते. गोष्ट संपत असतानाच बालकांच्या माता त्यांना घेऊन जायला येतात. प्रत्येकजण आनंदी असतो. श्रीमती फिरी आणि इतर आरोग्यसेविका प्रसन्न होतात व ते मुलींना पुढच्या आठवड्यात परत येण्यास सांगतात.

घरी परत जात असताना, मुसोंडा बरीच विचारमग्न दिसते. शेवटी ती शांतताभंग करते व रोझला म्हणते, “तुला असे वाटते का, की आज जे घडले ते ‘संपुष्टीशी’ जोडलेले आहे? तुला शिक्षिका व मला परिचारिका बनायचे आहे, आणि आज आपण या आरोग्य केंद्रात बालकांना शिकवत होतो व त्यांची देखभाल करत होतो.”

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

रोझ मुसोंडासोबत राहण्यासाठी आल्यापासून, गेले कित्येक आठवडे दोन्ही मुली बऱ्याच गोष्टींबद्दल चर्चा करत आहेत आणि मुसोंडाच्या डोक्यात भरपूर कल्पना आहेत. म्हणून एके सकाळी ती तिच्या आवडत्या ठिकाणी जायचे ठरविते. जेव्हा ती खडकावर पहुडते, तेव्हा तिला आरोग्य केंद्राच्या त्या दिवसाची आठवण येते. "काहीतरी उपयोगी करणे खरेच चांगले होते," ती स्वत:च विचार करते. तिचे वडील वारंवार जे बोलतात की झाडाने फळे धारण करावीत, ते तिला आठवते. नंतर ती विचार करू लागते की, "माझे आयुष्य चांगली फळे धारण करील, हे मी कशाप्रकारे सुनिश्‍चित करू शकेल?" ती लगेचच "संपुष्टी" या शब्दाचा विचार करते.

तेव्हाच वाऱ्याचा जोरदार झोत येतो. त्यामुळे हवेत काही पाने उडतात. पानांमध्ये मुसोंडाला एक लहानसा पिवळा पक्षी दिसतो. वारा शांत झाल्यानंतर, पाने पाण्यात पडतात, परंतु पक्षी उडत राहतो. जेव्हा ती पक्ष्याचे निरिक्षण करते, तेव्हा तिच्या मनात एक विचार येतो. वाऱ्याच्या झोताने लहानग्या पक्ष्याला सौम्य धक्का दिला होता आणि तो पक्षी उंच उंच भरारी घेत आहे. कदाचित याचाच अर्थ संपुष्टी होतो. पक्ष्याने उडण्याचा प्रयत्न केला आणि वाऱ्याच्या झोताने त्यास मदत केली.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

"गॉडविन, तू तुझ्या भविष्याचा विचार करतोस का? तुला काय व्हावेसे वाटते?" मुसोंडा विचारते.

गॉडविन सायकल दुरूस्तीचे काम करणे सुरु ठेवतो. "मला माहीत नाही. मला पैसे कमवायचे आहे. मला माझ्या आई–वडिलांना मदत करायची आहे व केव्हातरी माझे स्वत:चे कुटुंब प्रारंभ करायचे आहे," तो उत्तर देतो.

"परंतु, तू कधीतरी तुझ्या प्रतिभेविषयी आणि तू त्यांचा उपयोग कसा करू शकतोस, याविषयी विचार करतोस काय?" मुसोंडा विचारते. "रोझ आणि मी याविषयी बरेच बोलतो."

"मला माहीत आहे. मला माहीत आहे," तो दुरुस्ती अवजारे उचलत म्हणतो. "आणि तू *नेहमीच* 'संपुष्टी' बद्दल बोलत असतेस... 'जेव्हा आपण प्रयत्न करतो, तेव्हा परमेश्‍वर आपल्यास मदत करतो.'"

"परंतु गॉडविन, ते खरे आहे." नंतर ती त्याला त्या पिवळ्या पक्ष्याची व वाऱ्याची गोष्ट सांगते. ती रोझसोबत आरोग्य केंद्रात मुलांसाठी करत असलेल्या उपक्रमाबद्दलदेखील त्याला सांगते.

तेवढ्यात चिशिंबा तेथे येतो. “नमस्कार,” तो म्हणतो. “सायकल कशी काय आहे? तुला तिच्यातील बिघाड सापडला काय?” तो विचारतो.

“सायकलच्या गिअरमध्ये बिघाड होता. मी अजून तो दुरूस्त करीत आहे,” गॉडविन बोल्ट घट्ट करीत उत्तरतो.

“मला माहीत होते की तू दुरूस्त करू शकतील!” चिशिंबा म्हणतो व नंतर मुसोंडाकडे पाहतो. “तुला माहीत आहे का, की तुझा भाऊ मेकॅनिक आहे?”

रोझ घराबाहेर येते आणि संभाषणाचा काही भाग ऐकते. “गॉडविन,” ती म्हणते, “तुझ्या प्रतिभांपैकी ही एक आहे! वस्तू दुरुस्त करण्यात तुझा हातखंडा आहे. तू एक चांगला मेकॅनिक होऊ शकतोस!”

“मी सायकल दुरूस्त करू शकतो,” गॉडविन म्हणतो, “याचा अर्थ मी मेकॅनिक आहे, असा नव्हे. मला प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.”

इतर तिघे स्मितहास्य करून म्हणतात, “तेव्हा प्रयत्न कर!” सर्वजण हसतात, गॉडविन सुद्धा.

“गॉडविन, तू बाजाराजवळच्या चियेसू मेकॅनिकसोबत विचारपूस का करत नाहीस? कदाचित ते तुला शिकवतील,” उत्साही आवाजात चिशिंबा म्हणतो.

“खरेच, सुरवातीला तो एक मार्ग असू शकतो,” रोझ पुस्ती करते.

“काय?” गॉडविन विचारतो. “मी असाच जाऊन त्यांना विचारू शकत नाही. मी त्यांना ओळखत सुद्धा नाही.”

“मी त्यांना ओळखतो. मी तुझी ओळख करून देऊ शकतो. आपण उद्या दोघे एकत्र जाऊया,” चिशिंबा म्हणतो.

नंतर, जेव्हा त्या दोघीच एकट्या असतात, तेव्हा रोझ मुसोंडाला म्हणते, “उद्या गॉडविनला संपुष्टीचा अर्थ समजेल.” त्या हसतात, परंतु मुलांना काहीही न सांगण्याचे ते ठरवितात.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

श्री. चियेसू, एक ठेंगणे वयस्क गृहस्थ, आपल्या दुकानाबाहेर बसले आहेत. ते लहान इंजिनचे भाग स्वच्छ करत आहेत आणि काम करताना एक सुंदरसे गाणे गुणगुणत आहेत. त्यांचा चेहरा आनंदाने खुलतो, जेव्हा ते चिशिंबाला पाहतात, आणि ते हस्तांदोलन करतात.

चिशिंबा गॉडविनची अशी ओळख करून देतो, की तो वस्तू दुरूस्त करण्यामध्ये चांगला आहे. गॉडविन थोडा काळजीत आहे, परंतु तो बोलण्याचे धाडस करतो. तो स्वत:चा घसा साफ करतो आणि म्हणतो, “श्री. चियेसू, मला एक मेकॅनिक होण्याची इच्छा आहे. यामुळे मी विचार करीत होतो, की मी कदाचित आपणास आपल्या दुकानात मदत करावी आणि आपल्याकडून काही शिकावे.”

“ठिक आहे, मी तुझ्या मदतीचा उपयोग करू शकतो,” श्री. चियेसू यांनी प्रत्युत्तर दिले. “परंतु तुला वेतन देण्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत.”

“काही हरकत नाही, मला केवळ शिकायचे आहे,” गॉडविन म्हणतो. “मी कधी सुरूवात करू?”

“आता लगेचच. यापेक्षा चांगली वेळ नाही!” श्री. चियेसू उत्तरतात. “तू आज सकाळी थांबू शकतोस का? या भागांना तेल लावणे आवश्यक आहे व त्यानंतर इंजिनची एकत्र जुळवणी करावयाची आहे.”

“आता? मी लगेच काम सुरू करू शकतो?” गॉडविन आश्चर्यचकित होऊन विचारतो.

“अर्थातच!” श्री. चियेसू हसतात. “तुझ्या बाह्या वर कर आणि कामास लाग!”

गॉडविन अधीर होऊन त्याचे नवीन काम सुरू करतो. काही मिनिटांनी चिशिंबा जाण्यासाठी उभा राहतो. तो श्री. चियेसूंचा निरोप घेतो. तो थोडे खाली वाकून गॉडविनच्या कानात कुजबुजतो, “संपुष्टी.”

चिशिंबा घरी परत जातांना आरोग्य केंद्राजवळून जातो आणि तेव्हा रोझ व मुसोंडा मुलांना मदत करत असताना बघतो. काय घडले ते जाणून घेण्यासाठी त्या दोघी अतिशय उत्सुक होत्या. “गॉडविनविषयी काय झाले?” त्यांनी विचारले.

“गॉडविनने प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाला. आता तो तेथेच आहे. मला वाटते, श्री. चियेसूंना त्याचे काम तपासायचे आहे,” चिशिंबाने उत्तर दिले.

________________________________________

________________________________________

________________________________________

एके दिवशी सकाळी चिशिंबा त्याच्या आईसाठी मासे खरेदी करण्याकरिता बाजारात जात आहे. शाळेच्या शिक्षण खर्चासाठी पैसे कसे कमावावेत याविषयी तो कित्येक दिवस विचार करीत आहे. विकण्यासाठी एखादे पीक वाढविण्याचा विचार केला, परंतु पेरणीचा हंगाम संपला आहे. त्याने रस्त्याच्या कडेला कोळसा विकण्याचा विचार केला, परंतु बरेच लोक हा व्यवसाय करीत आहेत. "जे दुसरे इतर कोणी करीत नाही ते करण्याचा प्रयत्न कर," त्याला रोझचे उद्गार आठवतात.

ज्यावेळी तो मासे खरेदी करण्यासाठी श्रीमती मुसोले यांच्या दुकानावर पोहोचतो, त्यावेळी त्याला दिसून येते, की त्या तेथे नाहीत. "त्या शहरामध्ये मासे खरेदी करण्यासाठी गेल्या आहेत," शेजारच्या दुकानातील स्त्री उत्तरते. "त्या आठवड्यातून दोनदा जातात." चिशिंबाला माहीत आहे की श्री. चियेसूसुद्धा गाडीचे सुटे भाग विकत घेण्यासाठी कधी कधी शहरात जातात.

यावरुन त्यास कल्पना सुचते. "कदाचित लोकांच्या कामासाठी मी शहरात जाण्याची तयारी दाखवू शकतो," तो स्वत:शीच विचार करतो, "आणि त्यांना आवश्यक असलेल्या वस्तू आणू शकतो. इथे थांबून व काम करत राहल्यामुळे, त्यांना आर्थिक नुकसान होणार नाही."

चिशिंबा त्या रात्री घरी आपल्या आईवडिलांशी विचारविनिमय करतो आणि त्यांना ही कल्पना आवडते. म्हणून दुसऱ्या दिवशी तो परत बाजारात जातो आणि श्रीमती मुसोले आणि श्री. चियेसू यांच्याशी बोलतो. "जर आपण दोघेही साधारणपणे बसभाड्यापोटी जो खर्च करता तो मला दिल्यास, त्यातील अर्धे पैसे मी शहरात जाण्यास आणि तुम्हास जे काही आवश्यक आहे ते आणण्यासाठी वापरेन. उर्वरित अर्धे पैसे मी माझ्या शालेय शिक्षण खर्चासाठी करेन." ते यावर समहत होतात की प्रयत्न करायला काही हरकत नाही आणि त्याला दोन दिवसांनी परत येण्यास सांगतात. "जर ही कल्पना सफल झाली," श्री. चियेसू म्हणतात, "तर तुला तुझ्यासाठी एक व्यवसाय मिळाला आहे!"

आपल्या आई—वडिलांना ही शुभवार्ता सांगण्यासाठी घराच्या वाटेवर चिशिंबा गॉडविन व त्याच्या कुटुंबियांना भेटण्यास थांबतो. त्यांना आपली योजना सांगण्यासाठी तो उत्सुक आहे. त्याची गोष्ट ऐकल्यानंतर, श्रीमती मुलेंगा चिशिंबाला काही अधिक चांगल्या बातम्या ऐकवितात. त्या स्पष्टीकरण देतात, की आदल्या दिवशी श्री. मुलेंगा यांना काबवे इथे जावे लागले व तेथे ते त्यांच्या चुलत भावासोबत बोलले. तो म्हणाला, की चिशिंबा त्याच्या व त्याच्या कुटुंबासोबत राहू शकतो आणि त्यांचे घर शाळेपासून सुमारे एक किलोमीटर दूर आहे. "जेवणाच्या व झोपण्याच्या जागेच्या बदल्यात," त्या म्हणतात, "तू त्यांना त्यांच्या शेतामध्ये मदत करू शकतोस."

"अतिशय छान!" चिशिंबा म्हणतो. "श्रीमती मुलेंगा, मी तुमचा आभारी आहे."

"चिशिंबा," श्री. मुलेंगा म्हणतात, "असे दिसते, की तू लवकरच पैसे कमावणार आहेस. जरी कधी कधी अवघड वाटत असले तरी, तुला खात्रीने हे निश्चित करावे लागेल, की ते पैसे शालेय शिक्षण खर्चासाठी बचत करून ठेवावे. लहानसहान क्षुद्र गोष्टींवर हे पैसे खर्च करण्याची इच्छा होऊ देऊ नकोस."

"आपण काळजी करू नका, श्री. मुलेंगा," त्याच्या चेहऱ्यावर स्मित विलसत असताना चिशिंबा उत्तरतो. "मी वचन देतो, की मी असे घडू देणार नाही." जेव्हा तो निरोपासाठी हातवारे करीत निघण्यासाठी वळतो, तेव्हा रोझ व मुसोंडाकडे दृष्टिक्षेप टाकतो व म्हणतो, "दरवाजे उघडत आहेत!"

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

सुट्ट्या संपायला आल्या आहेत. रोझसाठी घरी परतण्याची व तिला शाळेत पुन्हा परत जाण्याची वेळ आली आहे. रोझ जाण्याची तयारी करत असताना ती व मुसोंडा संवाद करतात.

"मला वाटते, की तू जायला नकोस," मुसोंडा म्हणते.

"मला सुद्धा तसेच वाटते," रोझ म्हणते. खरेच ही मजेदार सुट्टी होती. इतक्या सर्व गोष्टी घडल्या आहेत, यावर माझा विश्वास बसू शकत नाही."

"होय," मुसोंडा म्हणते. "गॉडविनकडे बघ. त्याला त्याचे काम एवढे आवडले आहे, की तो आता शाळा शिक्षण पूर्ण केल्यानंतर तांत्रिक प्रशिक्षण घेण्याविषयी विचार करत आहे. चिशिंबाची कल्पना खरेच यशस्वी ठरली. त्याला इतके ग्राहक मिळाले आहेत, की जवळजवळ प्रत्येक दिवशी तो शहरात खरेदी करण्यास जात आहे."

"आणि आपल्याकडेच बघ ना," रोझ म्हणते. "आरोग्य केंद्रात काम करणे हा खरेच सुखद अनुभव होता. मला याची आता अधिक खात्री आहे की मला शिक्षिका व्हायचे आहे. आमची ग्रामपंचायत वेगवेगळ्या वयोगटांतील मुलांसाठी आठवडी वर्ग आयोजित करते आणि जवळजवळ सर्वच मुले त्या वर्गात जातात. या वर्षी कुठल्यातरी एका वर्गाला शिकवण्याचा माझा विचार आहे."

"आणि मी आरोग्य केंद्रात काम करणे सुरु ठेवण्याचा प्रयत्न करीन," मुसोंडा म्हणते. "यापुढे शाळेमुळे सोमवारी मी जाऊ शकणार नाही, परंतु कधीकधी दुपारच्या वेळी जावून त्यांना मदत करु शकेल. रोझ, तुला माहीत

आहे, की पहिल्या दिवशी आपण ‘संपुष्टीबद्दल’ बोललो, ते इतके महत्वाचे आहे आणि याची समज आपले आयुष्य कितपत बदलेल, याची कल्पना मी कधीच करु शकले नसते.”

“ते खरे आहे,” रोझ सहमत होते. “बघ, आपण सर्वजण किती बदललो आहोत, कारण आपण प्रयत्न करण्याविषयी आणि संपुष्टीची अपेक्षा बाळगण्याविशयी शिकलो आहोत.”

___________________________________________________________________

___________________________________________________________________

___________________________________________________________________

___________________________________________________________________

घरी परत जात असताना, ती नदीच्या मार्गाने जाऊ शकेल का असे मुसोंडा विचारते. ती तिच्या आवडत्या जागेकडे धावत जाते, एका दगडावर चढून तिच्या पाठीवर लेटते आणि व आकाशाकडे बघते. तिच्या मनात अनेक विचार येत आहेत. ती शाळेच्या सुट्ट्यांविषयी विचार करते आणि येणाऱ्या वर्षात काय होईल याबद्दल विस्मय करते. त्यावेळी वाहत्या वाऱ्याचा झोत येत आहे आणि तिला पिवळ्या पक्ष्याची आठवण येते. “जे काही करण्याचे प्रयत्न मी करेल,” ती स्वत:स हळुवारपणे म्हणते, “त्यात परमेश्वर मला सहाय्य करेल.” जेव्हा ती जाण्यासाठी उभी राहते, तेव्हा तिच्या पाठीला चाटून वाऱ्याचा झोत वाहतो आणि तिला शक्ति देतो.

___________________________________________________________________

___________________________________________________________________

___________________________________________________________________

___________________________________________________________________

___________________________________________________________________

___________________________________________________________________

## विभाग २१

सामान्यत:, पुस्तकातील विषयवस्तूशी चांगले परिचित असणे —या प्रकरणात, *संपुष्टीची झुळूक*— आणि ते कशाप्रकारे त्यांच्या उद्देशप्राप्तीसाठी प्रयत्न करतात याची चांगली समज, युवाकिशोरांच्या गटाचे अनुप्रेरक म्हणून आत्मविश्वासाने जबाबदारी सांभाळण्यास आपणास मदत करते. यासोबतच, पुस्तकांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यामध्ये संबोधित केलेल्या मुख्य संकल्पना समजून घेण्यासाठी, आपण गटाला मदत करण्यासाठी वापरलेल्या

पद्धतींवर विचार करणे आवश्यक आहे. आपणास या उद्देशासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आणि क्षमता, अर्थातच, आपणास अनुभव प्राप्त होताना हळूहळू विकसित होतील, परंतु खालील सराव, विशेषत: *संपुष्टीची झुळूक* या पुस्तकासंबंधित, आपणास या संदर्भात अनेक अंतर्दृष्टी प्रदान करतील:

१. या पुस्तकातील पाठ वाक्य रचना आणि त्यांचा प्रवाह ह्या संदर्भात एका स्तरापर्यंत सुगमता ठेवण्याचा प्रयत्न करतात. तथापि जेव्हा आवश्यक असते, तेव्हा कठीण शब्द व वाक्प्रचार सुलभरीत्या योजले आहेत. असे शब्द वेगवेगळ्या संदर्भात आणि सरावांमध्ये वापरुन पाठांमध्ये त्यांचा अर्थ स्पष्ट केला आहे. अशाप्रकारे व्यापक शब्द ज्ञानाचा उपयोग करुन गोष्ट बाळबोध किंवा दिखाऊ होण्याचा जो संभव असतो, तो टाळला आहे. उदा., अन्याय हा शब्द जरी सर्वसाधारण बोलण्यात बऱ्याचदा वापरला जातो, तरी ती एक जटील संकल्पना आहे. सहाव्या पाठातील संदर्भ आणि सराव युवाकिशोरांना ह्या संकल्पनेची काही समज मिळविण्यास मदत करतात. युवाकिशोरांसाठी हा दृष्टीकोन आपणास प्रभावी वाटतो किंवा त्यांच्यासाठी “कठीण” शब्दांची व्याख्या करणे आपणासाठी आवश्यक आहे असे आपणास वाटते का?

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

२. या पुस्तकातील पाठ उल्हासाच्या आणि वैचारिक चिंतनाच्या वातावरणात जलद गतीने शिकण्यासाठी लिहिले होते. असे गृहीत धरले जाते की युवाकिशोर हे पाठ वाचतील आणि सराव पूर्ण करतील, जे वेगवान गतीने परंतु आवश्यक काळजी घेऊन केले जाईल, जेणेकरून त्यांची भाषा कौशल्ये विकसित होईल आणि शब्द व संकल्पनांची समज अधिक मजबूत होईल. जर आपण प्रत्येक पाठाच्या अपेक्षित उद्दिष्टांपेक्षा जास्त प्राप्त करण्याचा प्रयत्न करता आणि त्यातील प्रत्येक मुद्द्यावर लांबलचक चर्चा करता, तर काय होईल? ————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

३. असे बऱ्याचदा गृहीत धरण्यात येते, की या युवाकिशोरांच्या एकाग्रतेचा अवधी लहान नसतो. जीवनातील साध्या गोष्टींत आनंद घेण्याची क्षमता राखण्यासोबतच, त्यांना आव्हान देणाऱ्या गोष्टींविषयी खोलवर विचार करण्यास ते समर्थ असतात. जर गटामधील वातावरण विश्वासाचे आणि समर्थनाचे असेल —स्पर्धेमुळे निर्माण झालेल्या तणावापासून आणि दबावापासून मुक्त— तर *संपुष्टीची झुळूक* मधील पाठांचा अभ्यास, युवाकिशोरांच्या गरजा आणि क्षमतांना अनुकूल अशा पातळीवर चर्चा आणि चिंतन घडवून आणेल. आवश्यक असे वातावरण निर्माण करण्यासाठी आपण कोणती पावले घेऊ शकता? —————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

४. पुस्तकाच्या अभ्यासामध्ये “गृहपाठ” अभिप्रेत नाही. सराव हे गटाच्या बैठकींमध्ये व अनुप्रेरकाच्या मदतीने होणाऱ्या चर्चेद्वारे करावयाचे असतात. युवाकिशोरांना घरी सराव पूर्ण करण्यासाठी सोडण्याऐवजी, हा दृष्टिकोन अंगीकृत करण्याचा काय फायदा आहे? ——————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

५. या पुस्तकातील बहुतेक पाठांमध्ये अशा कृतीचा अंतर्भाव आहे, ज्यांमध्ये सहभागींना एकतर त्यांनी शिकलेल्या पाठाच्या एखाद्या भागाविषयी किंवा दिलेला विचार त्यांच्या जीवनात कशाप्रकारे लागू करता येतो याविषयी काही वाक्ये लिहायची असतात. आपण युवाकिशोरांना त्यांना स्वत:ला स्पष्टपणे व्यक्त करण्याची क्षमता विकसित करण्यास मदत करुन, अशा प्रकारच्या कृती पूर्ण करण्यास कशाप्रकारे मदत करु शकता? ——————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

६. पुस्तकातील क्रमांक २, ५, ९, १०, १३ आणि १४ चे पाठ प्रत्येकी पवित्र लिखाणातील वचनाने समाप्त होतात, ज्यास युवाकिशोरांना कंठस्थ करण्यास प्रोत्साहित केले जाते. पाठात निर्देश केलेल्या संकल्पना, ही शेवटची कृती कशाप्रकारे बळकट करते, हे तपासून पाहण्यासाठी वरीलपैकी एक किंवा दोन पाठ पाहणे आपणास सहाय्यक ठरेल. ——————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

७. प्रमुख विषयवस्तूव्यतिरिक्त, हे पुस्तक अनेक नैतिक संकल्पनांना स्पर्श करते आणि स्तुत्य अशा गुणांना आणि अवधारणांना मजबूत करण्याचा प्रयत्न करते. उदाहरणार्थ, रोझ बसमध्ये आपल्या शिदोरीतील वाटा एका बालकाला देते. गॉडविन आणि चिशिंबा एका महिलेला सरपण नेण्यास मदत करतात. रोझ आणि मुसोंडा मुलांना शिकवतात जेव्हा त्यांच्या माता दवाखान्यात पोषण विषयाच्या वर्गात उपस्थित असतात. फुटबॉलचा खेळ हा मित्रभावनेचा प्रसंग असतो, ज्यामध्ये “जिंकणे” हा भर न देण्यालायक उद्देश असतो.

अशा मुद्द्यांवर किती लक्ष द्यायला हवे? काय त्यांपैकी प्रत्येकाची ओळख करुन त्यावर तपशिलाने चर्चा केली जावी? किंवा, चर्चेच्या वेळी नैसर्गिकरीत्या त्यांच्या लक्षात येऊ देणे पुरेसे आहे? ————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

८. ही कथा आफ्रिकेतील एका खेड्यात घडते. युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणाच्या कार्यक्रमासाठी शिफारस करण्यात आलेली पुस्तके निरनिराळ्या खंडांमधील अनेक सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमीतील वास्तविकता प्रदर्शित करतात. ह्यामुळे कार्यक्रमाची व्यापकता वाढते. काहीजण असे सुचवू शकतात की, उदाहरणार्थ, कथांमधील पात्रांची नावे बदलून "प्रत्येक देशातील तरुणांच्या वास्तवाशी पुस्तके जुळवून घेण्याची" आवश्यकता आहे. तरीही लोकांनी शतकानुशतके त्यांच्या संस्कृतीव्यतिरिक्त इतर संस्कृतींतील पुस्तके वाचली आहेत, त्यांचा आस्वाद घेतला आहे आणि त्यांच्यापासून ते शिकले आहेत. परंतु, त्यांनी हे अर्थातच जाणीवपूर्वक केले आहे. आपण युवाकिशोरांना कार्यक्रमाच्या या बाजूविषयी कसे जागरुक कराल? मुले आणि युवक केवळ त्यांच्या स्वतःच्या संस्कृतीच्या संदर्भात लिहिलेल्या साहित्यापासूनच शिकतात, ह्या काही लोकांनी बाळगलेल्या विश्वासाबद्दल आपले काय विचार आहेत? ————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

## विभाग २२

*श्रद्धेचे चैतन्य,* जसे की आम्ही आधी नमूद केले आहे, लहान मुलांच्या बहाई वर्गांना सातत्याने सुरू ठेवण्यासाठी सामग्री प्रदान करणाऱ्या अनेक साहित्यांपैकी एक आहे, ज्यामध्ये धर्मश्रद्धेच्या केंद्रीय महान व्यक्तिमत्वांचा संदर्भ स्पष्टपणे दिला आहे. आम्ही याआधीच नमूद केले आहे की, किशोरावस्था ही जीवनातील अशी अवस्था असते, ज्यावेळी व्यक्तीला तात्त्विक स्वरुपाच्या प्रश्नांचा विचार करण्यात बरेच स्वारस्य असते, विशेषतः अशा प्रश्नांचा, ज्यांचा संबंध मानव अस्तित्वाच्या उद्देशाशी व स्वरुपाशी आहे. *श्रद्धेचे चैतन्य,* ह्या पुस्तकाची सुरुवात "मानव असणे याचा अर्थ काय?" हा प्रश्न विचारण्याने होते. ह्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करताना, या पुस्तकाच्या पाठांतील निरनिराळे विभाग संबंधित विचारांच्या मालिकेची तपासणी करतातः मनुष्याचा थोरपणा; मनुष्याचा उदात्त व निम्न स्वभाव; वाईटाचे अस्तित्व नसणे; इच्छास्वातंत्र्य, संकल्पशक्ती, भाग्य ह्यांचे स्वरूप; बुद्धीमत्वेची शक्ती; वैज्ञानिक अन्वेषण; भौतिक उत्क्रांती; मानवी आत्मा आणि सरतेशेवटी, *श्रद्धेचे चैतन्य.*

*संपुष्टीची झुळूक* या पुस्तकाच्या बाबतीत जसे होते, त्याचप्रमाणे आपण एकदा पुस्तकाचे वाचन करणे आवश्यक आहे आणि नंतर “चिंतन” असे संबोधलेल्या विभागांकडे विशेष लक्ष देऊन पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करावे. हे केल्यानंतर, हे पुस्तक आपल्या उद्देशाची पूर्ती कशाप्रकारे करते, याची पडताळणी खालील प्रश्नांची उत्तरे देऊन करा:

१. पहिल्या पाठात उद्धृत केलेल्या, बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखांमधून ज्या प्रतिमा साकार होतात, त्यांपासून युवाकिशोरांना त्यांच्या खऱ्या स्वरुपाबद्दल अंतर्दृष्टी प्राप्त होतात. या संबंधात प्रत्येक प्रतिमा काय अंतर्दृष्टी देते? पाठातील प्रत्येक “चिंतन” त्यांची विषयाबाबतची समज कशाप्रकारे वाढविते? ––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

२. दुसऱ्या पाठाच्या पहिल्या भागापासून युवाकिशोर, ईश्वराच्या निर्मितीविषयी आणि मनुष्याच्या थोरपणाविषयी प्रशंसाभाव कसा प्राप्त करतो? ––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

३. या पाठाचे पहिले चिंतन थोरपणाच्या संकल्पनेचा त्यांच्या जीवनातील उपयोग समजून घेण्यास कशाप्रकारे मदत करते? ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

४. पाठाच्या पुढल्या भागामध्ये, लोक ज्या प्रमुख कारणासाठी स्वत:चे पतन करुन घेतात, ते शोधतात. ते कोणते आहे? ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

५. मनुष्यमात्राच्या उदात्त व निम्न स्वभावाच्या या संक्षिप्त अभ्यासापासून युवाकिशोरांना कोणती समज प्राप्त होईल, अशी आपणास आशा आहे? ––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

६. या पाठाच्या दुसऱ्या चिंतनाद्वारे, युवाकिशोर त्यांच्या उदात्त स्वभावाच्या विकासाविषयी काय शिकतात?

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

७. मनुष्यमात्राचा निम्न स्वभाव म्हणजे वाईट किंवा अनिष्ट नव्हे याची जाणीव, युवाकिशोर जेव्हा चुका करतात त्या प्रत्येक वेळी वाटणारी अपराधी भावना टाळण्यास, त्यांना कशाप्रकारे मदत करील? ह्या विषयाबद्दलची त्यांची समज बळकट होण्यास मदत करणारी कोणती उदाहरणे वापरली आहेत? —————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

८. दुसऱ्या पाठातील शेवटचा भाग, विशेषतः शेवटची दोन चिंतने, निम्न स्वभावाच्या हुकमतीचे नियंत्रण कसे करावे, यावर कोणती अंतर्दृष्टी प्रदान करतात? ——————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

९. तिसऱ्या पाठामध्ये इच्छाशक्तीच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण कसे केले आहे? पाठाच्या सुरुवातीला वर्णन केलेली परिस्थिती युवाकिशोरांच्या जीवनाशी संबंधित आहे असे आपणास वाटते का? ————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

१०. तिसऱ्या पाठामध्ये, युवाकिशोर त्यांच्या उदात्त स्वभावाच्या विकासामध्ये इच्छास्वातंत्र्याची भूमिका यासंबंधी काय शिकतात? ————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

११. युवाकिशोरांना, त्यांच्या जीवनातील कोणत्या क्षेत्राचा त्यांना शोध लागतो, ज्यात ते इच्छास्वातंत्र्याचा वापर करु शकतात? त्यांच्या इच्छास्वातंत्र्याच्या मर्यादा जाणून घेणे त्यांच्यासाठी महत्त्वाचे का आहे? ——

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

१२. या पाठाच्या दुसऱ्या चिंतनापासून, त्यांच्या इच्छास्वातंत्र्याच्या वापरासंबंधी अधिक कोणती अंतर्दृष्टी त्यांना प्राप्त होते? ————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

१३. इतरांवर प्रभुत्व गाजविणे आणि त्यांच्यावर सकारात्मक प्रभाव पाडणे, या दोहोंमधील फरक पाहणे हे युवाकिशोरांसाठी महत्त्वाचे का आहे? तिसऱ्या चिंतनामध्ये उद्‌भवलेल्या चर्चा युवाकिशोर त्यांच्या सभोवती सकारात्मक प्रभाव पाडण्याच्या प्रयत्नात कशाप्रकारे मदत करतात असे आपणास वाटते? —————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

१४. तिसरा पाठ युवाकिशोरांना नशिबाविषयी काय शिकवितो? ——————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

१५. हा पाठ नशिबाच्या संकल्पनेशी संबंधित कोणत्या गैरसमजुती दूर करण्याचा प्रयत्न करतो? ——————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

१६. नौका वल्हवण्याची उपमा, युवाकिशोरांना त्यांच्या जीवनात त्यांच्या स्वत:च्या प्रयत्नांचे व दैवी सहाय्याच्या शक्तीचे मूल्य, याविषयी यथार्थ दृष्टिकोन प्राप्त करुन देण्यास कितपत प्रभावी आहे? ——————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

१७. चवथ्या पाठाचा पहिला भाग, युवाकिशोरांना स्वभावाच्या मर्यादा शोधण्यास कशाप्रकारे मदत करतो? ——

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

१८. मानव ह्या मर्यादांवर कशी मात करू शकतो, याबद्दल ह्या पाठामध्ये काय सांगितले आहे? ————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

१९. विज्ञान हे सर्व मानवजातीच्या मालकीचे आहे असा युक्तिवाद पाठात मांडला आहे. हा युक्तिवाद काय आहे? ——————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

२०. चवथ्या पाठामध्ये उद्धृत केलेल्या विज्ञानाशी संबंधित उताऱ्यात असे विधान केले आहे, "हे वास्तवाचे प्रेम ईश्वराने मानवात निर्माण केले आहे किंवा संचित केले आहे." युवाकिशोरांमध्ये हे वास्तवाचे प्रेम वाढवणे किती महत्त्वाचे आहे? ——————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

२१. युवाकिशोरांसाठी निरीक्षणशक्तीचे वर्णन कशाप्रकारे केले आहे? ———————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

२२. चवथ्या पाठामध्ये दिलेले उदाहरण विज्ञानाच्या प्रगतीत, निरीक्षण व प्रयोगशीलता यांच्या भूमिकेचे महत्त्व जाणून घेण्यास युवाकिशोरांना कसे मदत करते? ——————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२३. हा पाठ असे सूचित करतो काय, की ते निरीक्षणशक्तीचा वापर जीवनाच्या प्रत्येक अंगात करु शकतात? तिसऱ्या चिंतनामध्ये विचारले जाणारे प्रश्न, जे त्यांना या शक्तीचा वापर करण्यास प्रोत्साहित करतात, ते सर्व मनुष्याच्या उच्च स्वभावावर केंद्रित आहेत असे आपणास का वाटते? ————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२४. चवथ्या चिंतनात दिलेली उदाहरणे सूचित करतात, की प्रायोगिकता जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वापरता येऊ शकत नाही. या तत्त्वाचे औचित्य ओळखण्यास ती उदाहरणे युवाकिशोरांना कशी मदत करतात? ———

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२५. पाचव्या व सहाव्या पाठांत दिलेली उदाहरणे युवाकिशोरांना, प्रजातींच्या उत्क्रांतीच्या अत्यंत जटिल सिद्धांताविषयी अंतर्दृष्टी प्राप्त करण्यास कशाप्रकारे मदत करतात? ——————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२६. या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मानवी चैतन्याच्या अवतरणाचे कसे वर्णन केले आहे? —————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२७. सहाव्या पाठात अनुप्रेरक, नतालिया पेट्रोव्हना, युवाकिशोरांच्या गटाला कथेतील अब्दुल–बहांच्या लेखनातील दोन अवतरण वाचते आणि नंतर त्यांचे अध्ययन तसेच ते समजून घेण्यास मदत करते. ती असे कशाप्रकारे करते याचे येथे कोणतेही संकेत नाहीत. आपण या उद्धरणांचे स्पष्टीकरण कसे कराल?

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२८. सातव्या पाठाच्या पहिल्या विभागात वर्णन केल्याप्रमाणे मानवी चैतन्याचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण कोणते आहे?

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२९. या पाठाच्या पहिल्या चिंतनात चेतनेची प्रस्तावना कशी केली आहे? या चिंतनातील दोन सराव युवाकिशोरांच्या जीवनाला कशाप्रकारे लागू आहेत? ——————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

३०. मानवी मनाची शक्ती कशाप्रकारे उन्नत स्वभावाचे एक साधन बनू शकते? विरोधाभास सादर करणे, जसे की दुसऱ्या चिंतनामध्ये केलेले आहे, हे मानवी बुद्धीला मार्गदर्शन करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्याचा एक उपयुक्त मार्ग आहे का? ——————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

३१. श्रद्धेचे चैतन्य म्हणजे काय? ——————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

३२. सातव्या पाठाच्या शेवटच्या दोन चिंतनांमधील उदाहरणे, युवाकिशोरांना त्यांच्या जीवनात श्रद्धेच्या चैतन्याचे कार्य पाहण्यास कशाप्रकारे मदत करतात? ————————————————————————————————

————————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————————

## विभाग २३

*श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकाच्या मजकुरात विज्ञान व धर्म यांची सुसंगतता हे एक मध्यवर्ती तत्त्व आहे. मानवतेच्या जीवनासाठी या तत्त्वाचे परिणाम गहन आहेत आणि आपण प्रत्येकाने त्याच्या कार्यात अंतर्दृष्टी मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थातच, विज्ञान आणि धर्माची अशी काही मते आहेत जी त्यांना थेट संघर्षात न ठेवता, स्पष्टपणे त्यांच्यातील सामंजस्यपूर्ण संबंधांची आवश्यकता पूर्ण करत नाहीत —उदाहरणार्थ, आज धर्माद्वारे जी काही रहस्ये संबोधित केली जातात ती विज्ञानाच्या प्रगतीमुळे नंतर स्पष्ट केले जाईल असा दावा किंवा, याविरुद्ध, ही समजूत की सर्व वैज्ञानिक सत्य हे शेवटी धार्मिक ग्रंथ वाचून शोधले जाऊ शकते, कारण ते सर्वज्ञानी ईश्वराकडून आलेले आहे. प्रत्येक प्रतिवादाच्या अंतर्निहित गैरसमजांमध्ये न जाता, आपण सहजपणे पाहू शकतो की, दोन्हीमध्ये, ज्ञानाचा एक स्त्रोत दुसऱ्याच्या भूमिकेस कमी लेखतो, ज्याला खरा सुसंवाद मानला जाऊ शकत नाही. परंतु, अशी मते नाकारतानाही, विज्ञान आणि धर्म एकमेकांना पूरक आहेत अशी कल्पना आपण कशी करतो हे आपण स्वत:ला विचारले पाहिजे. या संदर्भात, खालील विधान आपल्या विचारार्थ दिले जात आहे. ते वाचा आणि नंतर दिलेले सराव पूर्ण करा.

> *एक शक्यता ही आहे की विज्ञान आणि धर्मात निहित सत्ये अनुभवाच्या दोन स्वतंत्र आणि परस्पर अनन्य क्षेत्रांचा समावेश करतात. विज्ञान भौतिक विश्वाचा अभ्यास करते, केवळ नैसर्गिक गुणधर्माचाच नव्हे तर मानवी समुदाय, संस्था आणि परस्परसंवादांशी संबंधित काही घटनांचा देखील. त्यापासून जे ज्ञान उत्पन्न होते, ते तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे आधार बनते आणि तंत्रज्ञान एकतर मानवतेच्या भल्यासाठी किंवा विनाशासाठी राबविले जाऊ शकते. सामाजिक विज्ञान कितीही पुढे जात असले तरी, विज्ञानाची फलिते कोणत्या उपयोगासाठी वापरली जावीत, हे ठरविण्याची त्याची स्वत:ची क्षमता मर्यादित असते. उलटपक्षी, धर्म हा विवक्षितपणे मानवी अस्तित्वाच्या आध्यात्मिक बाजूशी संबंधित आहे. त्याचे कर्तव्य व्यक्तीच्या आंतरिक जीवनावर प्रकाश टाकण्याचे, प्रेरणेच्या मुळाला स्पर्श करण्याचे, मानवी वर्तणुकीला सुव्यवस्थितपणे मार्गदर्शन करु शकणारी नीतितत्त्वा निर्माण करणे आहे. सभ्यता निर्माण प्रक्रिया दोन्ही ज्ञानाच्या प्रणालींवर अवलंबून असते; जोपर्यंत प्रत्येक आपल्या स्वत:च्या प्रतिभेच्या वर्तुळात कार्यरत आहे, तोपर्यंत त्यांच्या दरम्यान संघर्ष उत्पन्न होण्याचे कोणतेच कारण नाही.*
>
> *विज्ञान व धर्म यांच्या सुसंगततेचा दृष्टीकोन वैध आहे; परंतु मुख्यत: व्यवहाराच्या पातळीवर. शेवटी, या प्रस्तावात विज्ञान व धर्म हे विभक्त केले जातात व प्रत्येकाला आपला मार्ग अनुसरण्याची मुभा दिली जाते, आणि महत्त्व कशाला येते ते म्हणजे तंत्रज्ञान व नीतिमत्ता यांदरम्यानच्या परस्परसंबंधाला. परंतु धर्म*

*आणि विज्ञान यांमधील संबंधाचे असे विश्लेषण लवकरच एका मर्यादेला पोचते, कारण, प्रत्यक्षात अशा अनेक घटना आहेत, ज्या ते दोन्ही समजून घेण्याचा व स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. जरी भौतिक जगाच्या संबंधात तुलनेने ते कमी लक्षात येते, तरी मनुष्यमात्र आणि समाजाच्या अभ्यासात ते स्पष्टपणे दिसून येते. तसेच, विज्ञान व धर्म ज्याप्रकारे वास्तवाचा विचार करतात, त्यांत बऱ्याच समानता आहेत. उदाहरणार्थ, दोन्ही बाजू निर्मितीमध्ये एक प्रकारे शिस्तबद्धतेचे अस्तित्व असल्याचे दृढतेने मानतात व विश्वास बाळगतात, की कमीत कमी काही प्रमाणात ही शिस्तबद्धता जाणून घेण्यास मानवी मन सक्षम आहे. विश्वातील घडामोडींचा शोध घेण्यास वैज्ञानिक पद्धती अतिशय प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे. तथापि, धर्मानेदेखील, मनुष्यमात्राला सतत प्रगतिशील सभ्यतेला हातभार लावण्यासाठी मार्गदर्शनाचा प्रयत्न करताना या पद्धतींचा वापर करणे आवश्यक आहे. विज्ञान आणि धर्म एकच नाहीत, परंतु एकमेकांशी संवाद साधण्याच्या तत्परतेसाठी, सुसंगत असण्यासाठी, एकमेकास प्रभावित करण्यासाठी आणि परस्परपूरक असण्यासाठी, दोहोंमध्ये पुरेशी समानतादेखील आहे. म्हणून, विज्ञान आणि धर्म या दोन ज्ञान आणि सरावाच्या पूरक प्रणाली म्हणून त्यांनी संबोधित केलेले प्रश्न आणि ते वापरत असलेल्या पद्धतींचे आकलन करून पाहणे वाजवी आहे.*

१. वरील वक्तव्यामध्ये विज्ञान व धर्म यादरम्यानच्या संबंधाचे वर्णन ते दोन्ही ज्या ज्ञानक्षेत्रांचा शोध घेतात, त्यावर दृष्टिक्षेप टाकते. त्यामध्ये मानवी मनाच्या शक्तीशी, मनुष्याच्या उत्पत्तीशी आणि बौद्धिक व नैतिक विकासाशी संबंधित विषय आहेत. विज्ञानाच्या वैधतेचा मान राखण्याच्या व त्याचबरोबर धर्माच्या प्रकाशाने समज उजळविण्याच्या पद्धतीने *श्रद्धेचे चैतन्य* हे पुस्तक अशा विषयांची कशाप्रकारे हाताळणी करतो, यावर चर्चा करा. ——————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

२. विज्ञान व धर्माच्या सुसंगततेच्या तत्त्वात असे अभिप्रेत आहे, की जेव्हा योग्य असेल तेव्हा शैक्षणिक साहित्यात आध्यात्मिक व वैज्ञानिक संकल्पनांचा संगम व्हावा, अर्थातच तो अशा प्रकारे, की ज्यात उथळपणा नसावा आणि तो धरसोडीचा नसावा. ज्ञानाचे असे संगम सहभाग्यांची समज वृद्धिंगत करते आणि खोटे द्विधा समज दूर करते. *श्रद्धेचे चैतन्य* पुस्तक ज्ञानसंगमाचे हे स्तर कसे प्राप्त करते, ह्याचे परीक्षण करा. आपण विशेषकरुन पाचव्या व सहाव्या पाठांतील चिंतनांचे अवलोकन करावे. ————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

——————————————————————————————————————

३. आपणास *श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकाचे पुन: अवलोकन करावेसे वाटेल आणि ते अशा व्यक्तीत, जिला सत्याचा शोधक आणि वास्तवाचा अन्वेषक व्हावयाचे आहे, तिच्यात आवश्यक समजल्या जाणाऱ्या काही प्रवृत्ती कोणत्या प्रमाणात निर्माण करते, याचा शोध घ्यावासा वाटेल. अशांपैकी काही प्रवृत्ती कोणत्या आणि प्रस्तुत साहित्य किती यशस्वीपणे त्यांचा शोध घेते? ————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

## विभाग २४

किशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमात अभ्यासलेल्या साहित्याबाबत आम्ही विभाग ३ मध्ये सुरू केलेली चर्चा येथे संपन्न करू. *संपुष्टीची झुळूक* आणि *श्रद्धेचे चैतन्य* या पुस्तकांचे आम्ही केलेले तपशीलवार विश्लेषण हे दर्शविते की कार्यक्रमामधील प्रत्येक मजकुराशी आपणास किती परिचिततेची आवश्यकता असेल. पुस्तक ५ मधून शाखान्वित अभ्यासक्रमांमध्ये, आम्ही इतर साहित्याची अशा प्रकारेच चर्चा करू, जे आपणास या संबंधात मदत करतील; तथापि, अशा अभ्यासाशिवाय, आपण साहित्य वाचण्यासाठी आणि ते त्यांची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी कसे प्रयत्न करतात याचे परीक्षण करण्यासाठी आवश्यक वेळ द्यावा. अनुप्रेरक म्हणून कार्य करणाऱ्या इतरांसह, नियतकालिक चिंतन बैठका या सामग्रीबद्दलची आपली समज वाढवण्यासाठी आपणास काही सर्वात फलदायी संधी उपलब्ध करून देतील. अशा प्रसंगी, आपणास आणि आपल्या सहकारी अनुप्रेरकांना सामायिक अनुभवाचा खजिना प्राप्त होईल जो उपयोगी ठरेल. कारण, अंतिम विश्लेषणात, असे केवळ परस्पर समर्थन आणि सहाय्याचे वातावरण तयार करणे, जिथे शिकण्याची बांधिलकी इतरांना त्यांच्या प्रयत्नात साथ देण्याच्या इच्छेमध्ये अभिव्यक्ती प्रकट होते, या साहित्याची क्षमता पूर्णपणे अन्वेषित केली जाऊ शकते आणि अखेरीस साकार केली जाऊ शकते.

## विभाग २५

या घटकामध्ये पूर्वी नमूद करण्यात आले होते की, साहित्याच्या अभ्यासाव्यतिरिक्त, युवाकिशोर सेवा उपक्रम, खेळ व कला आणि हस्तकलेच्या विविध प्रकारांमध्ये गुंततात, विशेषत: त्यांच्या स्थानिक संस्कृतीशी संबंधित. या पुस्तकाच्या दुसऱ्या घटकामध्ये, आपणास काही प्रमाणात, युवाकिशोरांवर सामाजिक वातावरणाचा प्रभाव विचारात करण्याची संधी मिळाली आणि आपणास विशेषत: त्याच्या काही नकारात्मक प्रभावांबद्दल सतर्क केले गेले.

आज समाजाच्या बिघडत चाललेल्या परिस्थितीवर तेथे दिलेला जोर दिला जाऊ नये, तथापि, ह्या भरामुळे हे सत्य दडले जाऊ नये, की प्रत्येक वातावरणात असे अनेक घटक आहेत, जे योग्यरित्या वापरल्यास, अभिव्यक्तीची शक्ती, सामाजिक प्रक्रियांच्या विश्लेषणाची क्षमता आणि समाजाची सेवा करण्याची इच्छा वाढवितात. खालील वृत्तपत्रातील लेख एक अशी एक घटना स्पष्ट करते की कशाप्रकारे प्रसारमाध्यमाचा उपयोग, उदाहरणार्थ, समाज कल्याणाचा प्रचार करण्यासाठी वापरला जाऊ शकतो:

## नि:शब्दांचा आवाज

पश्चिम आफ्रिकेमध्ये अद्यापही समुदायांबद्दल ट्रांझिस्टर रेडिओवर बोलले जाते.

गिनी देशाच्या वन्य क्षेत्रातील, एन्झेरेकोर ग्रामीण रेडिओ केंद्राच्या लहानशा स्टुडिओमध्ये, मायक्रोफोनभोवती बसलेले तीन तरुण मुलींच्या शिक्षणाविषयी चर्चा करीत आहेत.

“मुलींनी शाळेत जायला हवे, कारण एक दिवस त्या आई होतील आणि त्या सुशिक्षित असतील, तर त्या आपल्या मुलांना शिकवतील आणि त्यांचे चांगले संगोपन करण्यासाठी सक्षम बनतील,” मोरिको काके म्हणतात. “जेव्हा आपण मुलीला शिकविता, तेव्हा संपूर्ण देशाला शिकविता,” ते भर देऊन पुढे म्हणतात. जरी कार्यक्रमाचा यजमान सोळावर्षीय लॅन्सी टोर याच्या आईवडिलांना त्याने शाळा सोडावी व शेतात काम करावे असे वाटते, तरी तो मोरिकोच्या समर्थनार्थ मान हलवितो.

तरुण लोकांचे स्पष्ट आणि चपखल तर्क लायबेरिया व आयव्हरी कोस्ट देशांच्या सीमेलगतच्या शेजारच्या खेडेगावांमध्ये सजीवरीत्या प्रसारित केले जातात. सायंकाळची वेळ आहे आणि मातीच्या झोपड्यांमध्ये रॉकेलचे दिवे मिणमिणत आहेत. गावकरी शेतांमधून किंवा बाजारातून परतले आहेत. ते सर्व जेवण तयार करताना आणि रात्रीची तयारी करत असताना रेडिओ ऐकत आहेत....

गिनीसारख्या देशात –जेथे वयस्क लोकसंख्येचा मोठा भाग निरक्षर आहे, पुष्कळशा मुलांना शिक्षण दुर्लभ आहे आणि वीज क्वचितच उपलब्ध आहे– तेथे जनरेटरद्वारा संचलित ग्रामीण आणि सामुदायिक रेडिओ केंद्रे ही जीवनधारा आहेत.

“रेडिओ इथे सर्वस्व आहे,” एन्झेरेकोर ग्रामीण रेडिओ केंद्राचे कार्यक्रमसंचालक ग्नाउमा कमारा म्हणतात, जे केंद्र आठवड्यातून सहा दिवस पाच क्षेत्रिय भाषांपैकी एका भाषेत आणि फ्रेंचमध्ये १०० किलोमीटरच्या परिघामध्ये कार्यक्रम प्रसारित करते. या भागातील तीनपैकी दोन कुटुंबांजवळ ट्रान्झिस्टर आहे आणि केंद्र जेव्हा अगदी सकाळी व सायंकाळी कार्यक्रम प्रसारित करते, त्यावेळी संपूर्ण खेडेगाव ते ऐकते.

“आम्ही त्यांची स्वत:ची भाषा बोलतो, आम्ही त्यांच्या परंपरा आणि रीतिरिवाज जाणतो, आम्ही त्यांचे संदेश प्रसारित करतो, जन्म व मृत्यूंबद्दल माहिती देतो, शेतीविषयी व कृषिविषयक प्रश्न आणि सामुदायिक समस्यांवर चर्चा करतो,” कमारा म्हणतात. “आम्ही आहोत समुदायाचा आवाज, नि:शब्दांचा आवाज,”...

“मी कार्यक्रम लक्षपूर्वक ऐकतो, कारण जे ते सादर करतात, ती मुलेच आहेत आणि ती माझ्या स्वत:च्या भाषेत बोलतात,” ममाडू मलिक हा पंधरा वर्षांचा युवक स्थानिक बोली पुलारमध्ये सांगतो.... “म्हणून जेव्हा कार्यक्रम सुरु होतो, तेव्हा मी माझ्या सर्व भावांना व बहिणींना बोलावतो आणि आम्ही एकत्र ऐकतो. मी अशा प्रकारे बरेच शिकतो.”

“आईवडील आणि समाजाचे नेतेदेखील रेडिओ ऐकतात,” कमारा सांगतात. “आमच्या संस्कृतीत बहुधा मुलांचे बोलणे ऐकले जात नाही, परंतु आता वयस्क लोक त्यांना ऐकण्याची सुरुवात करतात. उदाहरणार्थ,

मुले त्यांच्या आईवडिलांना सामान्य आरोग्याविषयी सल्ला देतात.... जर वडील आपल्या मुलाला मारीत असेल, तर आता शेजारी म्हणतात, 'काय आपण रेडिओ ऐकत नाही काय?'"

ही कथा आजच्या सामाजिक वातावरणातील निरनिराळी अंगे, ज्या अनेक प्रकारांनी तरुण लोकांची प्रतिभा व क्षमता त्यांच्या समुदायाच्या सेवेकडे वळविण्याकरिता वापरली जाऊ शकतात, त्यांपैकी एकाकडे अंगुलिनिर्देश करते. संगीत, प्रसारमाध्यमे आणि तंत्रज्ञान हे जगाच्या प्रत्येक भागातील तरुण लोकांचे जीवन अधिकाधिक प्रभावी करीत आहे. गटाचे अनुप्रेरक म्हणून, उपयुक्त असे क्रियाकलाप निर्माण करण्यासाठी सामुदायिक वातावरणाची ही शक्तिशाली अंगे कशाप्रकारे वापरली जावी, हे विचारपूर्वक समजणे आपणास आवश्यक राहील. आपल्या स्वत:च्या सामाजिक वातावरणाचा विचार करा. युवकिशोरांना खालील गोष्टींसोबत कार्य करण्याची कोणती शक्यता आहे? आपल्या गटात या कल्पनांवर चर्चा करा आणि खाली दिलेल्या जागांमध्ये आपले काही विचार लिहा.

संगीत: ——————————————————————————

——————————————————————————

——————————————————————————

प्रसारमाध्यमे: ——————————————————————————

——————————————————————————

——————————————————————————

तंत्रज्ञान: ——————————————————————————

——————————————————————————

——————————————————————————

## विभाग २६

युवाकिशोरांना त्यांच्या स्वत:च्या विकासाची जबाबदारी घेण्यास आणि त्यांच्या समुदायाच्या प्रगतीमध्ये योगदान देण्यास सक्षम बनवायचे असेल, तर त्यांनी केवळ समूह म्हणून अर्थपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीतच नव्हे तर त्यांच्या संयोजनामध्येही सहभाग घेतला पाहिजे. सेवा प्रकल्प, कला आणि हस्तकला व्यतिरिक्त, अशा क्रियाकलापांमध्ये समाविष्ट असू शकते, उदाहरणार्थ, एक किंवा दुसरा मजकूर पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी विशेष मेळावे, ज्यामध्ये युवकिशोर नाटकीय सादरीकरण करतात, गाणी गातात, कविता पाठ करतात आणि भाषणे देतात. इतर अनुप्रेरकांसोबत चर्चा करण्यात आपणास नेहमीच रस असेल, की आपण आपल्या तरुण मित्रांना त्यांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक क्षमतांना प्रशिक्षित करणाऱ्या क्रियाकलापांच्या संयोजनात व

कार्यवाहीत भाग घेण्यासाठी कशाप्रकारे प्रेरित करू शकता, सेवेद्वारे त्यांचे काही आदर्श व्यवहारात व्यक्त करण्यात त्यांना कशी मदत करू शकता आणि उत्कृष्टतेच्या दिशेने प्रयत्न करण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांचे बळकटीकरण कसे करू शकता. आपणास आपल्या सहकारी अनुप्रेरकांसह ज्या प्रश्नांचा विचार करावा लागेल त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे: आपण युवाकिशोरांना सेवा प्रकल्प तयार करण्यात, तो पार पाडण्यास आणि तो प्रकल्प ज्याप्रकारे उलगडतो त्यावर विचार करण्यास कशी मदत करता? युवाकिशोरांना संवाद लिहिण्यास व साधे नाट्यप्रयोग बसविण्यासाठी कशी मदत करता? आपण कला व हस्तकलेच्या ऐवजी बालिश खेळप्रकार सादर केले जात नाहीत याची खात्री कशाप्रकारे करुन घ्याल, युवाकिशोरांना “कला, हस्तकौशल्ये आणि शास्त्रे” जे “मानवजातीचे जग उन्नत करतात आणि त्याच्या उच्चत्वासाठी ते पोषक आहेत” त्याविषयी खरी अभिरुची उत्पन्न करण्यास कशाप्रकारे मदत कराल?

कलात्मक क्रियाकलापांच्या चर्चेविषयी विचार करण्याचा हा प्रसंग नसला तरी, संस्कृतीची अभिव्यक्ती म्हणून अशा क्रियाकलापांमध्ये मूल्ये आहेत याची जाणीव ठेवणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. त्याच्या नैसर्गिक गुणस्वभावानुसार, तो शैक्षणिक प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकू शकतो. युवाकिशोर गटाचे अनुप्रेरक या नात्याने, आपणास आपल्या युवाकिशोरांना योग्य कलात्मक प्रतिभा ओळखण्यात मदत करण्याची काळजी घ्यायची आहे, ज्यात अनवधानाने अशी मूल्ये लादली जाणार नाहीत जी, सूक्ष्म मार्गांनी, ज्या शैक्षणिक प्रक्रियेत ते गुंतलेले आहेत त्या विरुद्ध आहेत.

## विभाग २७

अनुभव दर्शवितो की दहा ते पंधरा सहभागींसोबत बनलेला युवाकिशोरांचा गट, सहसा अशा काही व्यक्तींपासून सुरू होतो ज्यांच्यामध्ये ही अंगभूत क्षमता दिसून आली असते, की ते आपल्या मित्रांना धर्मकार्याभोवती एकत्र आणू शकतात. हे युवागण इतरांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत असताना, ते अनुप्रेरकासोबत नियमितपणे भेटू लागतील. प्रभागात किंवा गावात कार्यरत असणाऱ्या मित्रांच्या विस्तारित नाभिकांच्या सहाय्याने देखील समूहाचे सदस्यत्व एकत्रित केले जाऊ शकते, विशेषत: किशोरवयीन वयाच्या मध्यापासून ते थोड्या मोठ्या वयाचे युवा जे पहिल्या काही संस्थागत प्रक्रियेतील अभ्यासक्रमांच्या अध्ययनात प्रगती करत आहेत. जगाच्या काही भागात, गटांच्या रीतसर निर्मितीआधी गावातील किंवा प्रभागाच्या क्षेत्रातील युवासहभागींना क्रमवार कार्यक्रमात आमंत्रित करणे ही एक यशस्वी पद्धत सिद्ध झाली आहे. दुसरा प्रस्तावित मार्ग म्हणजे शाळेमध्ये त्या कार्यक्रमाची ओळख करुन देणे. जेव्हा शाळा या कल्पनेविषयी स्वीकृती दर्शविते, तेव्हा उचित वयोगटाच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना एक किंवा अधिक प्रात्यक्षिके दाखविणे बहुधा युवाकिशोरांच्या गटांच्या निर्मितीस कारणीभूत ठरते. त्यानंतर, ते शाळेच्या आवारात किंवा बाहेरच्या आवारात भेटत, हा कार्यक्रम एक अतिरिक्त क्रियाकलाप म्हणून हाती घेऊ शकतात. शाळादेखील, दोन्ही बाबतीत, त्यांच्या विद्यार्थ्यांच्या नैतिक व बौद्धिक क्षमतांच्या निकोप विकासासाठी कार्यक्रमाचे बहुमूल्य योगदान स्वीकारते.

आपण स्वत:च्या परिस्थितीचा विचार करा आणि एक महत्त्वाकांक्षी अनुप्रेरक म्हणून, युवाकिशोरांचा गट तयार करण्यास आपण अवलंबू शकता अशा काही पद्धतींचे वर्णन करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## विभाग २८

एक कार्यप्रवण किशोर गट जोपासण्याची महत्त्वाची आवश्यकता म्हणजे आई—वडिलांशी विश्वासाचे व मित्रत्वाचे नाते निर्माण करणे होय. अनुप्रेरकांनी एकतर आधी किंवा युवाकिशोरांनी त्यांचा गट तयार केल्यानंतर त्यांना भेटून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करणे अगत्याचे आहे. त्यांनी प्रत्येक घराला नियमित भेट देत राहावे आणि युवाकिशोरांच्या आकांक्षा आणि क्षमता तसेच त्यांच्या आध्यात्मिक सक्षमीकरणासाठी कार्यक्रमाला आकार देणाऱ्या संकल्पना आणि दृष्टीकोन याबद्दल कुटुंबियांशी चर्चा करावी —पुस्तक २ च्या तिसऱ्या घटकामध्ये वर्णन केलेले विषय, ज्याचे येथे अधिक तपशीलवार विश्लेषण केले आहे. अशा भेटीमुळे पालकांशी त्यांच्या मुला—मुलींच्या कल्याण आणि प्रगतीबद्दल विचारविमर्श करण्याची संधी देखील मिळू शकते. पुस्तक २ मध्ये सुचविल्याप्रमाणे अनेकदा, अनुप्रेरक सहभागींच्या पालकांना कार्यक्रमात अभ्यासलेले एक किंवा दोन मजकूर दाखवतात, जेणेकरुन पालकांना जाणीव होते की त्यांचे युवाकिशोर काय शिकत आहेत. जरी प्रत्येक अनुप्रेरकाला अनेक महिन्यांच्या विस्तारित कालावधीत पालकांसोबत मैत्रीचे असे बंधन जोपासणे आवश्यक असले तरी, पहिल्या काही भेटींमध्ये अधिक अनुभवी व्यक्ती त्यांना मदत करू शकते.

युवाकिशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमात सहभागी असलेल्या युवाकिशोरांच्या पालकांशी होत असलेल्या संभाषणाचा आधार असलेल्या संकल्पनांची आठवण करून देण्यासाठी, आपणास रुही पुस्तक २, घटक ३, विभाग १४ कडे वळण्यास प्रोत्साहित केले जाते. त्यानंतर, या अभ्यासक्रमामधील इतर सहभागींसोबत, आपल्या गावात किंवा प्रभागात युवाकिशोरांच्या कुटुंबांना भेट देऊन मिळालेल्या अनुभवांविषयी चर्चा करा. या पुस्तकाच्या आपल्या अभ्यासातून कोणत्या अतिरिक्त कल्पना अशा भेटींमध्ये संभाषण समृद्ध करू शकतात?

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## विभाग २९

सुरुवातीस युवाकिशोरांच्या गटामध्ये अनुप्रेरकाने सुरू केलेले संभाषण विशेषत: महत्त्वपूर्ण आहे. हे आवश्यक आहे की, सुरुवातीच्या तीन किंवा चार बैठकींमध्ये, सहभागींनी गटाच्या उद्देशाबद्दल परिपूर्ण चर्चा करावी आणि त्यांना एकत्रितपणे पूर्ण करू इच्छित काही उद्दिष्टे ओळखावी. त्यांना जे उपक्रम हाती घ्यायची इच्छा आहे, त्यांच्या स्वरूपाबद्दल त्यांनी काही निष्कर्षापर्यंत पोहोचले पाहिजे. या बैठकींमध्ये विचारविमर्श केलेले विषय गटागटानुसार विभिन्न असू शकतात. तरीही काही अशा संकल्पना आहेत, जसे की "उत्कृष्टता" आणि "सेवा", ज्यावर अशा सर्व बैठकींमध्ये भर देणे आवश्यक आहे. त्यानंतर, आपण तयार करण्यात मदत करत असलेल्या गटांच्या सहभागींशी आपले पहिले काही संभाषण आयोजित करण्यास, खाली दिलेले मुद्दे आपणास मदत करू शकतात. या अभ्यासक्रमामध्ये आपण आपल्या सहकारी सहभागींसोबत प्रत्येक मुद्द्याचे बारकाईने अन्वेषण केले पाहिजे आणि आपणास लवकरच सहभागी होण्याची आशा असलेल्या युवाकिशोरांच्या गटाशी चर्चा कशाप्रकारे कराल याबद्दल आपले काही प्रारंभिक विचार लिहा.

- अनेक अनुप्रेरकांना, सहभागी युवाकिशोर या गटाकडे एक असे व्यासपीठ म्हणून पाहण्यासाठी प्रोत्साहित करणे उपयुक्त वाटते, ज्यामध्ये ते आध्यात्मिक आणि बौद्धिक उत्कृष्टतेची आकांक्षा बाळगू शकतात. अनुप्रेरक स्पष्ट करतात की, आध्यात्मिक उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करत असतांना, आपल्या उदात्त स्वभावाशी संबंधित असणारे गुणवैशिष्ठ्य जसे की, प्रेम, उदारता, प्रामाणिकपणा, नम्रता ह्यांचा विकास करणे आम्हासाठी आवश्यक असते. बौद्धिक उत्कृष्टतेसाठी झटत असताना, आम्हाला ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्य हस्तगत करणे आवश्यक असते, जे आमचे व इतरांचे जीवन सुधारण्यास साह्यभूत ठरेल. "प्रत्येक प्रभात आधीच्या सायंकाळपेक्षा अधिक उन्नत असो आणि प्रत्येक उद्याचा दिवस आधीच्या दिवसाहून समृद्ध असो," अशा वचनांचे पाठांतर, अर्थातच उत्कृष्टतेच्या संकल्पनेची समज वाढविण्याच्या दृष्टीने प्रभावी असते. ———————————————
  ————————————————————————————————————————
  
  ————————————————————————————————————————
  
  ————————————————————————————————————————

- गटाच्या उद्देशाविषयी काही स्पष्टता प्राप्त केल्यानंतर, अनुप्रेरकाद्वारे त्यातील सहभागींना विशिष्ट क्रियाकलाप जसे की —बौद्धिक, क्रीडा आणि सांस्कृतिक— ठरवण्यासाठी मदत केली जाऊ शकते, जे युवाकिशोरांना त्यांच्या उत्कृष्टतेच्या प्रगतीसाठी अंगीकार करावयास आवडेल. ————————
  ————————————————————————————————————————
  
  ————————————————————————————————————————
  
  ————————————————————————————————————————

- बौद्धिक आणि आध्यात्मिक श्रेष्ठतेच्या संदर्भात, भाषेचा प्रश्न, जो विचारांच्या आकृतिबंधासोबत निगडतेने जोडलेला आहे, यावर काही प्रमाणात चर्चा करणे आवश्यक आहे. युवाकिशोरांसोबत या विषयावरील संभाषणात, सामान्यत: हे स्पष्ट करणे पुरेसे आहे की, उच्चतम पातळीवरील उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी, आपण आपल्या अभिव्यक्तीच्या शक्तीचा विकास केला पाहिजे. आपल्याला वाचता आले पाहिजे आणि आपण जे वाचले आहे त्याचा अर्थ समजून घेण्यास सक्षम असले पाहिजे; आपण आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करायला शिकले पाहिजे. याच परिपेक्षात, युवाकिशोर ज्या सामग्रीचा अभ्यास करतील त्या सामग्रीची ओळख करून देणे अनुप्रेरकांना अनेकदा प्रभावी वाटेल, त्यापैकी काही आपण संपूर्णत: किंवा अंशत:, या घटकामध्ये आधी अभ्यासले आहे. ————————————————————————————————————————
  ——————————————————————————————————————————————
  ——————————————————————————————————————————————
  ——————————————————————————————————————————————

- युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमात पवित्र लिखाणातील उद्धरणे कंठस्थ करण्यास योग्य महत्त्व दिले पाहिजे. उद्धरणे कंठस्थ करण्याचा प्रश्न, हा गटाच्या सुरुवातीच्या एका बैठकींमध्ये संभाषणाचा विषय असणे आवश्यक आहे. अनुप्रेरकांनी त्यांच्या युवाकिशोर मित्रांना ईश्वरी वचनाच्या अद्वितीय सामर्थ्याबद्दल आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करत असताना त्यांच्या जीवनावर त्याचा प्रभाव जाणून घेण्यास मदत केली पाहिजे. अशा चर्चेतून, त्यांना पवित्र लेखनीतील अनेक उद्धरणे कंठस्थ करण्याचे फायदे कळतील. ——————————————————————————————
  ——————————————————————————————————————————————
  ——————————————————————————————————————————————
  ——————————————————————————————————————————————

- सुरुवातीच्या काही बैठकींमध्ये, आपणास ह्यावर भर देणे आवश्यक राहील, की गट आध्यात्मिक उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करीत असताना, सहभागींनी मित्रत्वाचे मजबूत संबंध निर्माण करणे आणि अधिकाधिक ऐक्य प्राप्त करणे आवश्यक आहे. अनुप्रेरकांना सहसा युवाकिशोरांना पवित्र लिखाणातील उद्धरणांच्या प्रकाशात मैत्री, ऐक्य आणि सद्भाव या विषयांवर आपले स्वत:चे विचार व्यक्त करण्यास मदत करणे फलदायी वाटते, ज्यामुळे त्यांना ती उद्धरणे कंठस्थ करण्यासाठी प्रोत्साहित केले जाऊ शकते. ————————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

- मैत्री आणि ऐक्य या विषयांवरील चर्चा, गटातील सहभागी एकमेकांशी कशाप्रकारे संवाद साधतील याविषयी संभाषणासाठी एक नैसर्गिक सुरुवात करू शकतात. ते एकमेकांना लक्षपूर्वक ऐकतील; ते नेहमी एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतील, जरी त्यांच्यापैकी एकाला कल्पना व्यक्त करण्यात अडचण येत असेल; त्यांच्यापैकी कोणाला जे काही सामायिक करायचे आहे त्याला ते कधीही कमी महत्वाचे मानणार नाहीत —अशी काही निष्कर्षांची उदाहरणे आहेत जी ते एक गट म्हणून त्यांच्या संभाषणातून एकत्रितपणे काढू शकतात. ——————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

- सेवा हा गटाच्या सुरुवातीच्या बैठकींमध्ये एक विशेष महत्त्वाचा विषय आहे. युवाकिशोरांना हे स्मरण करुन द्यावे लागेल, की मनुष्यमात्र म्हणून आम्ही सर्व एकमेकांवर अवलंबून आहोत. आपण सर्व मानवपरिवाराचे सदस्य आहोत आणि आपल्या समुदायाच्या परिस्थितीत सुधार करण्याची शिकस्त करावी. आपल्या सभोवतालच्या लोकांकडून आपल्याला मदत मिळाली नाही तर काय होईल याची कल्पना केल्याने काहीवेळा युवाकिशोरांना सेवेचे महत्त्व ओळखण्यास मदत होऊ शकते. —————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

- आपल्या सेवेविषयीचे संभाषण संकल्पनेच्या चर्चेच्या आणि इतरांना सेवा देण्यासाठी आपण व्यक्तिशः काय करु शकतो, यापलीकडे जाऊन युवक एक गट म्हणून करु शकतील, अशा सेवाकार्यांचा शोध घेण्यापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. अर्थातच, हे महत्त्वाचे आहे की त्यांचे प्रारंभिक प्रयत्न कमी कालावधीचे, सहज साध्य करता येणाऱ्या उद्दिष्टांचे असावे. अशाप्रकारे, त्यांना त्यांच्या सामूहिक क्षमतेवर आत्मविश्वास मिळेल आणि ते एकत्र काम करण्यास शिकतील, ज्यामुळे त्यांच्यासाठी अधिक टिकाऊ सेवा प्रकल्प हाती घेण्याची शक्यता होईल. सुरुवातीपासूनच,

अनुप्रेरकांनी युवाकिशोरांना त्यांच्या समुदायाच्या जीवनाबद्दल आणि त्याच्या सुधारणेसाठी ते कशाप्रकारे योगदान देऊ शकतात याबद्दल विचार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे. समुदायाबद्दल निरीक्षण विधाने करून आवश्यक असलेले प्रश्न विचारणे त्यांना या संबंधात मदतनिस ठरेल. अशाप्रकारे, ते आजारी असलेल्या समुदायातील एखाद्या व्यक्तीला भेट देण्याइतके सोपे सेवेच्या कृतीसह प्रारंभ करू शकतात आणि हळूहळू अधिक प्रकल्प हाती घेण्यास पुढे जाऊ शकतात –उदाहरणार्थ, झाडे लावणे– ज्यामध्ये त्यांना योग्य स्थानिक संस्थांशी विचारविमर्श करणे आवश्यक असेल आणि दीर्घकालीन व्यवस्था करण्यासाठी मित्र व पालकांकडून मदत मिळवण्यासाठी प्रोत्साहित करेल. साहजिकच, गटाच्या पहिल्या काही बैठकांमध्ये, काही कौशल्ये आणि क्षमता तसेच प्रभावी सहकार्यासाठी आवश्यक असलेल्या वृत्ती आणि गुणांवर चर्चा केली जाईल. ————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

- स्वास्थ्यप्रद मनोरंजन, विशेषत: खेळ, हा युवाकिशोरांच्या गटाच्या सुरुवातीच्या बैठकीत चर्चिला जावा असा दुसरा विषय आहे. पुन्हा एकदा, संकल्पनेची पडताळणी करणे व अंतर्भूत बाबींचा विचार करण्यासोबतच, अनुप्रेरकास अशा बैठकीदरम्यान अथवा विशेषप्रसंगी घेता येणे शक्य असलेले मनोरंजनाचे क्रियाकलाप ओळखण्यास गटास मदत करावीशी वाटेल. यासंबंधित सावधानीचा एक शब्द आवश्यक वाटतो: जोरदार शारीरिक कवायत युवागटात असलेल्या जोमाची नैसर्गिक अभिव्यक्ती आहे. जगभरातील अनुभवाने हे स्पष्ट केले आहे की, जेव्हा कलात्मक क्रियाकलापांना खेळांपेक्षा जास्त पसंती देण्यासाठी निवडीची प्रक्रिया सुरू होते, तेव्हा काही तरुणांना अखेरीस त्यांचा सहभाग सुरू ठेवण्यास संकोच वाटतो. ——————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

वर प्रस्तुत केलेल्या सर्व मुद्द्यांच्या संदर्भात, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, अनुप्रेरक जसेजसे अधिक अनुभव प्राप्त करतात, तसेतसे ते युवाकिशोरांना एकमेकांना पूरक अशा उपक्रमांची आखणी करण्यात आणि अंमलबजावणी करण्यास अधिक चांगल्या प्रकारे मदत करू शकतात –पाठ्यपुस्तकांच्या अध्ययनाने त्यांनी आत्मसात केलेल्या अंतर्दृष्टीची व्यावहारिक अभिव्यक्ती आणि ते जोपासण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या उच्च आदर्शांचे व्यवहार.

## विभाग ३०

या पुस्तकाच्या पहिल्या दोन घटकांमधील आमच्या चर्चेतून, जे प्रामुख्याने वैचारिक स्वरूपाचे होते, अनुप्रेरक म्हणून काम करण्याची आपली तयारी, या घटकामध्ये, काही व्यावहारिक आकारमानांमध्ये देखील घनरूप झाली आहे. आपण सेवेच्या या क्षेत्रातील अनुभव प्राप्त करत असताना, या पुस्तकातील साहित्य आपणास प्रतिबिंबित करण्यासाठी काही कल्पना देत राहतील. अनेक अनुप्रेरकांना मागील विभागातील मुद्दे विशेषत: उपयुक्त वाटतात आणि ते त्यांचा पुन्हा पुन्हा संदर्भ घेतात, एक नोटबुक ठेवतात ज्यामध्ये ते त्यांच्या अनुभवाचा आणि त्यांच्या सहकारी अनुप्रेरकांशी झालेल्या चर्चेचा मागोवा ठेवतात. दरम्यान, असे सुचवले आहे की आपण आता ज्या प्रयत्नाला सुरुवात करणार आहात त्या प्रयत्नांच्या परिणामांवर प्रतिबिंबित करून हे घटक समाप्त करा. जगभरातील तरुणांना उद्देशून, विश्व न्याय मंदिराचे खालील शब्द, या सेवेच्या मार्गाचा अवलंब करू इच्छिणाऱ्या सर्वांना उचित मार्गदर्शन करतात:

> **“आश्चर्य नव्हे, की तो तुमचाच वयोगट आहे जो युवाकिशोरांना सहाय्य करण्याचा, आणि लहान मुलांना देखील, त्यांच्या नैतिक आणि आध्यात्मिक विकासासोबत त्यांच्यात सामुहिक सेवेबद्दलची व खऱ्या मैत्रीविषयीची क्षमता बळकट करीत, बहुतांश अनुभवाची प्राप्ती करून घेत आहे. सरतेशेवटी, या तरुण आत्म्यांना ज्या खाचखळग्यांनी तसेच संधींनी देखील भरलेल्या जगातून मार्गक्रमण करणे आवश्यक राहील याचे भान ठेवीत, तुम्ही सहजतेने आध्यात्मिक बळकटीकरणाचे आणि तयारी करण्याचे महत्व समजून घेता. जसे कि तुम्हास जाणीव आहे, बहाउल्लाह मानवजातीची आंतरिक आणि बाह्यस्थिती या दोहोंमध्ये परिवर्तन करण्यास आले, तुम्ही जे तुम्हा स्वत:पेक्षा अल्पवयीन आहेत त्यांना त्यांचे चारित्र्य परिष्कृत करण्यास आणि त्यांच्या समुदायाच्या योगक्षेमासाठी जबाबदारी अंगिकारण्यास तत्पर करण्यास सहाय्य करीत आहात. ते किशोरवस्थेत प्रविष्ठ होताना, तुम्ही त्यांना त्यांची अभिव्यक्तिची शक्ति वाढविण्यास, तसेच त्यांच्यात जबर नैतिक शक्तिने मूळ धरावे यासाठी सक्षम बनविण्यास त्यांना मदत करीत आहात. हे करीत असताना, जसे तुम्ही बहाउल्लाह ह्यांच्या “शब्द नव्हे तर कृती तुझे आभूषण असू दे” या आदेशाबद्दल सचेत असता, तेव्हा तुमचे स्वत:चे उद्दिष्टाबद्दलचे भान अधिक स्पष्टतेने परिभाषित होत आहे.”**[५२]

## संदर्भ


१. विश्व न्याय मंदिर – ११ जून २००६ पत्रातून
२. विश्व न्याय मंदिर – १९ जुलै २००६ पत्रातून
३. शोघी एफेंदी – १७ एप्रिल १९३६ पत्रातून
४. अब्दुल–बहा
५. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
६. वरीलप्रमाणे
७. अब्दुल–बहा
८. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
९. वरीलप्रमाणे
१०. अब्दुल–बहा, काही उत्तरीत प्रश्न
११. अब्दुल–बहांची पत्रिका
१२. अब्दुल–बहा
१३. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
१४. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
१५. अब्दुल–बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
१६. अब्दुल–बहा, दैवी तत्त्वज्ञान
१७. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
१८. अब्दुल–बहांची पत्रिका
१९. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२०. अब्दुल–बहा, दैवी संस्कृतीचे रहस्य
२१. बहाउल्लाह, ऐक्याचा निवासमंडप
२२. अब्दुल–बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
२३. अब्दुल–बहांची पत्रिका
२४. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२५. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
२६. बहाउल्लाह
२७. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे क्र. ४३
२८. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
२९. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
३०. वरीलप्रमाणे
३१. अब्दुल–बहांची पत्रिका
३२. वरीलप्रमाणे
३३. बहाउल्लाह, लांडगाच्या मुलाच्या नामे पत्रिका
३४. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
३५. वरीलप्रमाणे
३६. वरीलप्रमाणे
३७. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.१८
३८. बहाउल्लाह ह्यांच्या प्रार्थना आणि चिंतने, क्र. ३२
३९. बहाउल्लाह, ऐक्याचा निवासमंडप
४०. अब्दुल–बहा, जागतिक शांततेचा प्रसार
४१. बहाउल्लाह ह्यांच्या प्रार्थना आणि चिंतने, क्र. ११३
४२. बहाउल्लाह, बहाई प्रार्थना
४३. बहाउल्लाह ह्यांच्या प्रार्थना आणि चिंतने, क्र. १७८
४४. वरीलप्रमाणे , क्र. ७९
४५. बहाउल्लाह, बहाई प्रार्थना
४६. अब्दुल–बहा, बहाई प्रार्थना
४७. वरीलप्रमाणे
४८. बहाउल्लाह, बहाई प्रार्थना
४९. दिव्यात्मा बाब, बहाई प्रार्थना
५०. अब्दुल–बहा, बहाई प्रार्थना
५१. बहाउल्लाह ह्यांच्या प्रार्थना आणि चिंतने, क्र. ९१
५२. विश्व न्याय मंदिर – १ जुलै २०१३ संदेशामधून